

# नमकथा । डॉ.न.म.जोशी

# नमकथा

डॉ.न.म.जोशी

सुयोग प्रकाशन
पुणे

■ नमकथा

Nmkatha

■ प्रकाशिका

सौ.सुचेता राळे

सुयोग प्रकाशन

२१६३/१, सदाशिव पेठ, रजत को.ऑप.सोसा.,

निलायम टॉकीजशेजारील गल्ली, फ्लॅट नं.५,

पहिला मजला, पुणे ४११ ०३०.

फोन : २४३३ ६५ ८४ मो.९८२२८७३६६१

Email : suyogprakashan12@gmail.com

■ लेखक – डॉ. न.म.जोशी



■ © डॉ. न.म.जोशी



■ प्रकाशन दिनांक : दसरा, ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी)

■ प्रकाशन क्रमांक : ४००

■ अक्षरजुळणी : सुयोग प्रकाशन, पुणे

■ मुखपृष्ठ : राजेंद्र गिरीधारी

■ मुद्रक :

श्री जे प्रिंटर्स, पुणे

■ मूल्य : रुपये दोनशे नव्वद मात्र

# अनुक्रमणिका


१. सरता संचिताचे शेष ५
२. चांडालाची अमृतवाणी ७
३. कोमागातामारू ९
४. चामाबिना देह किनकी बनाई ११
५. एक परी आणि तीन राक्षस १३
६. प्रकटले नरसिंह स्तंभातुनी १५
७. प्रभाकराची वैकुंठसेवा १७
८. चिमणी का उडाली ? १९
९. होत्याचे नव्हते झाले २१
१०. जैत रे जैत २३
११. साठीतील शूर सेनापती २५
१२. 'दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्रमाझा' २७
१३. 'विशाखा' मधील वॉल्टेअर ३०
१४. मुलांची पाखरबाग ३२
१५. तळेगावकरांचा खटाटोप ३४
१६. नर्मदेश्वरमध्ये न्यायाधीश ३६
१७. नांगर, चरक आणि झाड ३९
१८. लोकमान्यांचा वारसदार ४१
१९. "धन्य हा निधडा वैष्णव वीर ! सारंगधर आणिला !!" ४३
२०. सांगली ते सानव्हितो व्हाया कोथरूड ४५
२१. बोकिलांच्या शाळेत शत्रा ४७
२२. कर्क युद्धाची समाप्ती ४९
२३. ये लम्हा फिलहाल जी लेने दे ५१
२४. अक्षरांचं आक्रित ५४
२५. आनंदबनातील निर्मल–गोपाळ ५६
२६. संरक्षणमंत्र्यांची स्वप्नपूर्ती ५९
२७. ...आणि त्याला घर मिळालं ६१
२८. सहा टिंबांची किमया ६३
२९. सर्वांभूती नारायण ६६
३०. 'मी' ची वेलांटी ६८
३१. नकोशी झाली हवीशी ७०
३२. राख : श्रीमंताची आणि गरिबाची ! ७३
३३. गंजण्यापेक्षा झिजणे बरे ७६
३४. "रुग्ण माझे ग्राहक" ७८
३५. परमानंद माधवम् ८०
३६. आणखी एक बागबान ८२
३७. प्रतिभाक्षर ८४
३८. रिक्षा, परीक्षा आणि शिक्षा ८६
३९. आम्ही वारिक वारिक । करू हजामत बारीक ।। ८९
४०. बैराग्याचा आशीर्वाद ९१
४१. देवासी केले एकदेशी ९३
४२. आय.एन.एस. शिवाजी ते शिवाजी मंदिर ९५
४३. 'नन्ही दुनियाँ'चा मोठा शिल्पकार ९७
४४. कापसाचा दोरा आणि दोऱ्याचा कापूस ९९
४५. तत्त्वज्ञ, मार्गदर्शक आणि मित्र १०१
४६. करुणा आणि क्रौर्य १०३
४७. ओळखलं नाहीस देवाला ? १०५
४८. सद्गुणांचे संमेलन १०७
४९. भूक : पोटाची व ज्ञानाची १०९
५०. स्वप्नपराग १११
५१. सात रुपये ते सातसमुद्रपार ११३
५२. सराफ, संशोधक आणि शेतकरी ११५
५३. त्या केशांते का हो चरचर नापित हस्ते कापविता ? ११७
५४. 'दिगू'चा अवतार ११९
५५. भूप, शंकरा आणि भैरवी १२१
५६. "हस्ना ना तू ?" १२४

| | | |
|---|---|---|
| ५७. | दीपक दर्शन | १२६ |
| ५८. | दरवळला स्मरणगंध | १२८ |
| ५९. | लक्ष्मी स्तोत्र | १३० |
| ६०. | अगतिक महिला 'दीन' | १३३ |
| ६१. | लोभ आहे जहर मोठे | १३५ |
| ६२. | त्यांनी थोडा उजेड द्यावा | १३७ |
| ६३. | पाहा माझा ग्रंथ नीट | १३९ |
| ६४. | कस्तुरीमृग | १४१ |
| ६५. | 'बिनमांगे मिले तो अमृतसमान' | १४३ |
| ६६. | मातीची अक्षरपूजा | १४६ |
| ६७. | खुर्ची आणि व्यासपीठ | १४८ |
| ६८. | पर्वती ते पार्लाद्वारा प्रभुपाखर | १५० |
| ६९. | प्रजासत्ताक दिन | १५२ |
| ७०. | गिडवाणीचं गणित | १५४ |
| ७१. | संध्येची लावणी | १५६ |
| ७२. | उपयोगी आणि निरुपयोगी | १५८ |
| ७३. | 'दिव्या दिव्या चमत्कार' | १६० |
| ७४. | कोठारींचा प्रभात | १६२ |
| ७५. | जेथ जेथ संपत्ती आणि दया... | १६४ |
| ७६. | ठेविले सोवळे घालुनी घडी | १६६ |
| ७७. | अंधाराचे डोळे | १६९ |
| ७८. | गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी | १७१ |
| ७९. | एक आण्याचा एक रुपया | १७३ |
| ८०. | चिलटं आणि चित्रकला | १७५ |
| ८१. | काळी माया | १७७ |
| ८२. | 'बँकेत भर आणि विसरून जा' | १७९ |
| ८३. | 'बोलणे झाले सहज निरोपाचे' | १८१ |
| ८४. | नाथांची लेखणी आणि तलवार | १८३ |
| ८५. | "शेतीला पाणी देतोय!" | १८५ |
| ८६. | मातृभूमीचा मृद्‌गंध | १८७ |
| ८७. | अमृतकुंभ शुद्ध झाला | १८९ |
| ८८. | साधू आणि क्रांतिकारक | १९१ |
| ८९. | 'यांचं कसं होणार ?' | १९३ |
| ९०. | हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले | १९५ |
| ९१. | बुलबुल आणि कुंचला | १९७ |
| ९२. | आधी साहित्यकार, मग पत्रकार | २०० |
| ९३. | वेडात खरोखर जग जगते | २०२ |
| ९४. | थुंकणे आणि पाया पडणे | २०४ |
| ९५. | दिलूचे भाग्य | २०६ |
| ९६. | देव झाला पंडित | २०८ |
| ९७. | रानवाऱ्याचा गंध | २१० |
| ९८. | तलावातले चांदणे | २१२ |
| ९९. | अमर भूपाळी | २१४ |
| १००. | मोटारीचे बलिदान | २१६ |
| १०१. | समाजवादाचा त्रिशूल | २१८ |
| १०२. | शाब्बास सूनबाई | २२० |
| १०३. | समतेची समस्या | २२२ |
| १०४. | सचिवालय ते शाळा | २२४ |
| १०५. | मुख्याध्यापकाचा कोट | २२६ |
| १०६. | दिघे यांची तीर्थयात्रा | २२८ |
| १०७. | उंची मनाची आणि शरीराची | २३० |
| १०८. | किरपेकरांची किमया | २३२ |
| १०९. | कोणीही बघणार नाही | २३४ |
| ११०. | चंद्रभागेचा प्रसाद | २३७ |
| १११. | नारद राजकपूर | २३९ |
| ११२. | पाच लाख – पाच कोटी | २४२ |

# १. सरता संचिताचे शेष

श्रीधर सहस्त्रबुद्धे हे मूळचे सांगलीचे असले तरी स्टेट बँकेतील नोकरीमुळे गावोगाव हिंडले आणि शेवटी पुण्याला येऊन स्थिरावले. नोकरीच्या ठिकाणी नावडती आकडेमोड झाली. संध्याकाळचा सगळा वेळ श्रीधरराव सांस्कृतिक क्षेत्रातच व्यतीत करतात. कधी ते 'मसाप' मध्ये दिसतील तर कधी नगर वाचन मंदिरातल्या सभेतून आढळतील. साहित्यात मनस्वी रस असलेल्या श्रीधरला वाचनाचीही विलक्षण ओढ आहे. ज्ञानदेव, नामदेवांचे ओवी-अभंग आणि समर्थांचे समास...यांच्या सहवासात त्यांचा वेळ छान जातो.

एकदा श्रीधरराव दासबोध वाचत होते...एका समासाशी ते थांबले. त्या ओळींनी त्यांना अंतर्मुख केले....

सरता संचिताचे शेष ! नाही क्षणाचा अवकाश !<br>
भरत न भरता निमिष ! जाणे लागे !!

आणि काही दिवसांतच श्रीधररावांना या ओळीतील अर्थाचा थरारक अनुभव आलाच.

सांगलीच्या विश्वनाथराव सहस्त्रबुद्धे यांना पाच मुलं. थोरली मुलगी नीला साने होऊन पुण्यात आली. आनंद, चिंतामणी, श्रीधर आणि वामन हे पाठोपाठचे भाऊ. स्वत: विश्वनाथराव हे सांगलीच्या प्रसिध्द पु.ना.गाडगीळ कंपनीत होते. दाजीकाका गाडगीळ आणि विश्वनाथराव ही आते-मामे भावंडं. सारे भाऊ आपापल्या मार्गाला लागले आणि विश्वनाथराव निवृत्त झाले. पण त्यातल्या चिंतामणीच्या आयुष्याची चित्तरकथा व्हायची होती. चिंतामणी लहानपणापासूनच आगळावेगळा होता.

जवळचे सिटी हायस्कूल सोडून त्यानं सांगलीतलं आरवाडे हायस्कूल शिक्षणासाठी गाठलं. जनरीतीप्रमाणे कॉलेजात न जाता इंग्रजी शीघ्रलेखनाचा कोर्स करून तो ब्रिज खेळायला शिकला. नाशिकच्या सिक्युरीटी प्रेसमध्ये तो लोकप्रिय झाला. दादरला रेल्वे अपघातात त्याचा एक पाय गमावला. कृत्रिम अवयव बसवून त्यानं आपली जीवननौका हाकण्यास सुरुवात केली. त्यावेळी चिंतामणी भाभा अणुशक्ती केंद्रात नोकरीला होता. आपलं अर्ध जीवन पंगु

आहे हे जाणून त्यानं लग्नाचा विचार बाजूला ठेवला होता. पण कोण्या सहानुभूतीदारानं गळ घातली म्हणून आधी सर्व सत्य स्थिती सांगून तो लग्नाला तयार झाला; पण त्याच्या जीवनावर दुर्दैवानं आणखी एकदा फुत्कार सोडला. ऐनवेळी मांडवताच वधूनं नकार दिला. चिंतामणीनं कसलाही त्रागा, आदळआपट न करता शांतपणे सर्वांना सांगितलं...

''लग्नविधी होणार नसला तरी सर्वांनी मांडवातच थांबा..प्रसन्न मनानं भोजन घेऊन जा.'' त्याच्या या स्थितप्रज्ञ वृत्तीचे जमलेल्या लोकांना आश्चर्य वाटले आणि चिंतामणी खरोखरच असामान्य चिंतामणी आहे याची ग्वाही करून घेत लोक परतले. मांडता मांडता मोडलेला स्वत:चा संसार पचवून चिंतामणीने अनेकांचे संसार उभे करण्यास मदत केली. सख्खे अथवा चुलतभाऊ, मित्र यांच्या मुलांनाही त्यानं स्वत:च्या एकांड्या आयुष्यात शिक्षणासाठी ठेवून घेतले. आदिबलभीम व्यायामशाळा, सांगली आरगडे हायस्कूल या त्याच्या आवडत्या संस्था. अरुण गाडगीळ, डॉ.अरुण जोशी, अशोक घारपुरे, विलास चितळे मित्र यांचा ब्रिज छान रंगायचा. अशा या चिंतामणीची बारा वर्षांपूर्वी मुंबईला हिंदुजामध्ये बायपास सर्जरी झाली. तो एकटाच ॲडमिट झाला. डॉक्टरानांही आश्चर्य वाटले. नव्या डॉक्टरांना सराव व्हावा म्हणून त्यानं स्वत:च नव्या डॉक्टरांची निवड केली. अशी इतरांची चिंता करणारा, इतरांची चिंता घालवणारा चिंतामणी... इंदूरला ब्रिजचे सामने होत. जानेवारी २००९ मध्ये इंदूरच्या यशवंत क्लबवर होणारे सामने खेळण्यासाठी हा धैर्यपुत्र चिंतामणी आपला भाऊ श्रीधर याचेबरोबर गेला. तेथील 'मसाप' चे माधवराव साठे, सी.आर.कुलकर्णी हे स्वागतासाठी आले होते.

चाणक्य हॉटेलमध्ये चिंतामणी-श्रीधर राहिले. ९-१० जानेवारीचे सामने पार पडले. या कालावधीत श्रीधर इंदूरचा फेरफटका करायला गेला होता.. ११ला सामने संपवून १२ जानेवारीला अवंतिकेने मुंबईला परतायचे होते. सकाळी श्रीधर उठला. भावाची झोपमोड करू नये म्हणून तो बाहेर फिरण्यासाठी जाणार एवढ्यात त्याला चिंतामणीची प्रचंड तगमग, तडफड जाणवली. घालमेल दिसली. दिवा लावला... हॉटेलमध्ये अंधार होता. हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. चिंतामणीचं मस्तक श्रीधरने आपल्या हाती धरले.. आणि चिंतामणीनं भावाच्या मांडीवर शेवटचा श्वास घेतला. श्रीधर एकटाच, पण हॉटेलमालक, इंदूरकर, मित्र यांच्या माणुसकीचं अभूतपूर्व दर्शन त्याला घडले. पुढील सर्व गोष्टी पार पडल्या. त्याला आठवलं...सरता संचिताचे शेष! नाही क्षणाचा अवकाश....!

■ ■ ■

# २. चांडालाची अमृतवाणी

तीर्थक्षेत्र काशी ! पुण्यवान काशीक्षेत्री देशभरातून हजारो भाविक नेहमीच येत असतात. ही परंपरा प्राचीन काळापासून सुरू आहे. काशीक्षेत्री गंगेला अनेक घाट आहेत. प्रत्येक घाटावर शेकडो भाविक गंगास्नानासाठी जमलेले असतात.

असाच एक घाट....नाव मनकर्णिका !

या मनकर्णिका घाटावर जाण्यासाठी काशीच्या एका वस्तीतून लहानसा रस्ता होता. बोळासारखाच रस्ता तो. या रस्त्यावरून मनकिर्णका घाटाकडे एक तेजस्वी तरुण संन्यासी चालला होता. त्याच्या डोळ्यात त्याची बुद्धिमत्ता दिसत होती. चालण्यात त्याचा आत्मविश्वास दिसत होता.

हाती कमंडलू, एक छाटी, दंड अशा अवस्थेत धीमेपणानं पावलं टाकीत तो तरुण संन्यासी पुढे चालला होता.

एवढ्यात....

त्या बोळासारख्या रस्त्याच्या त्या तोंडाकडून काहीतरी गलबला ऐकू येऊ लागला. या तरुण संन्याशानं बारकाईनं बघितलं. तर काही ब्रह्मवृंद एका माणसाकडे हातवारे करीत होते. तो माणूस काहीसा ओंगळ होता. त्याच्या अंगावरील वस्त्र जीर्ण झालं होतं. चेहरा भकास होता; पण डोळ्यात झाक होती ती वेगळीच होती. तो आत्मविश्वासानं चालत होता. रस्त्याचं तोंड अरुंद असल्यामुळं येणारे जाणारे त्याला टाळून, त्याचा स्पर्श टाळून पुढं जाण्याचा प्रयत्न करीत होते.

आता हा तरुण संन्यासीही पुढं गेला आणि तो माणूसही त्या तोंडाकडून पुढं येत होता. समोरासमोर दोघे भेटले तेव्हा त्या ठिकाणी ती वाट अगदीच अरुंद झालेली होती. त्याला टाळून पुढं जाता येणं शक्यच नव्हतं.

मग तो तरुण संन्याशी त्या चांडालवत माणसाला म्हणाला...

''दूर हो. मला पुढं जायचं आहे.''

''मग जा ना. मी आपणाला अडवलेलं नाही..'' तो म्हणाला.

''कसा जाऊ..तू तर चांडाल दिसतोस..''

''मला नाही माहीत.. मो कोण आहे ते ? पण मला आपल्याला एक विचारायचे आहे. आपण उच्चवर्णीय विद्वान संन्यासी आहात. मी एक गरीब चांडाल आहे. माझ्या शंकेचं निरसन आपण करावं, अशी या मूढ चांडालाची विनंती आहे.''

''तुझ्या वाणीवरून तू चांडाल वाटत नाही...तरीही विचार !''

''आपण मला दूर हो असं म्हणालात, बरोबर ?''

''हो..''संन्यासी म्हणाला.

''आपण खरंच कुणाला दूर हो, असं म्हणालात ?''

''म्हणजे ? तुलाच म्हणालो ना.''

''हो, मलाच. पण माझ्यातल्या कुणाला ?''

''म्हणजे ? मी नाही समजलो.''

''सांगतो.. आपण चांडाल समजून मला दूर हो म्हणालात. माझा स्पर्श, माझी सावली आपणाला नको म्हणून.''

''बरोबर,''संन्यासी उत्सुकतेनं म्हणाला.

''आपण माझ्या शरीराला दूर हो म्हणाला असाल तर तुमचं आणि माझं शरीर एकाच वस्तूनं घडलेलं आहे. अस्थी, मांस, मज्जा इ. धातू हे तसेच.''

''बरोबर.''

''आणि तुम्ही माझ्या आत्म्याला दूर हो असं म्हणला असाल तर तुमचा नि माझा आत्मा एकच आहे.''

''बरोबर,''

''मग तुम्ही मला दूर हो असं का म्हणालात ?'' चांडालानं विचारलं.

तो संन्यासी अंतर्मुख झाला.

त्यानं मायब्रह्म, द्वैताद्वैत यावर खूप विचार केला आणि त्याला चांडालाच्या त्या अमृतवाणीमुळंच अद्वैततत्त्व ज्ञानाचा साक्षात्कार झाला. पुढं त्यानं तत्त्वज्ञानाचा एक मोठा ग्रंथ सिद्ध केला. त्याचं नाव शांकरभाष्य. त्याचे कर्ते आद्य शंकराचार्य ! तो तरुण संन्यासी म्हणजेच आद्य शंकराचार्य आणि त्याला चांडाल रूपात अद्वैताचा साक्षात्कार घडविणारे साक्षात भगवान शंकर! पुढे शंकराचार्यांनी अद्वैतमताचा प्रसार केला आणि स्तोत्रं लिहिली. त्यांची अनेक स्तोत्रं आज लोकांच्या ओठावर आहेत.

■ ■ ■

# ३. कोमागातामारू

भारतीय स्वातंत्र्याचं आंदोलन म्हणजे अनेक क्रांतिवीरांच्या उज्ज्वल शौर्यकथा, देशभक्तांच्या दर्दभऱ्या कहाण्या आणि स्वातंत्र्यदेवीच्या उपासकांच्या ओव्या! याशिवाय अशा काही घटना आहेत की त्यामुळं आपल्याला अन्यायाची परमावधी म्हणजे काय हे समजेल. त्यातलं एक प्रकरण आहे...कोमागातामारू!

कोमागातामारू हे आहे जपानी नाव, बोटीचं नाव. कोणती कहाणी आहे कोमागातामारूची?

ही कहाणी आहे त्या जहाजावरील प्रवाशांची, त्यांच्यावर झालेल्या जीवघेण्या अन्यायाची आणि क्रूरकर्मा सत्ताधीशांच्या मग्रूर निर्णयाची!

बंगाल आणि पंजाब हे दोन्ही स्वातंत्र्याच्या चळवळीत बरेच आघाडीवर होते. हे दोन्ही प्रांत आतून धुमसत होते. ब्रिटिशांच्या जुलमी कारवायांमुळे तरुणांची माथी भडकत चालली होती. दोन्ही प्रांतांमध्ये ब्रिटिशांच्या दडपशाहीचा वरवंटा जोरानं फिरू लागला.

पंजाब प्रांतातले अनेक लोक पश्चिमेकडील देशामध्ये नशीब काढण्यासाठी आधीच गेलेले होते. त्या त्या देशात ते स्थायिकही झाले होते; पण वर्षानुवर्षे काबाडकष्ट करूनही त्यांच्या जीवनाला म्हणावं असं स्थैर्य मिळत नव्हतं. अमेरिका आणि कॅनडा या देशात तर अशा भारतीयांना मज्जावच होऊ लागला. जणू काही भारतातील या मूठभर लोकांमुळे यांच्या पोटावर पाय येणार होता.

मग कॅनडा सरकारनं देश प्रवेश आणि स्थलांतर याबाबत एक फर्मानच जारी केलं. त्या फर्मानाचे शब्द होते...'जे हिंदी लोक आपल्या बंदरातून निघून थेट कॅनडात येतील त्यांनाच कॅनडात येऊ दिलं जाईल."

अर्थातच वाटेत कुठंही बोट बदलणाऱ्यांना कॅनडात येण्यास मज्जाव होता. त्या काळी विमानसेवा एवढ्या मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नव्हत्या. त्यामुळं समुद्रमार्ग हाच लोकप्रिय मार्ग! तो आता मर्यादित झाला.

बाबा गुरुदत्त सिंग या नावाचा डोकेबाज शीख बहाद्दर होता. बाबा गुरुदत्त

सिंगानं एक नामी शक्कल लढवली. त्यानं एक सबंध बोटच भाड्यानं घेतली. बोटीचं नावं 'कोमागातामारू' ! ही बोट कलकत्त्याहून निघाली. पुष्कळ लोकांना भारताबाहेर जायचं होतं. ते सर्व लोक या बोटीनं आले. ही बोट मजल दरमजल करीत थेट कॅनडाच्या व्हॅंकुव्हर या बंदराला लागली. ही बोट थेट आली होती. कॅनडा सरकारनं जे जुलमी फर्मान काढलं होतं ते त्या बोटीला लागू नव्हतं. शेकडो भारतीय कोमागातामारू बोटीने कॅनडाला पोहोचले.

एक लढाई जिंकली; पण आता दुसऱ्या एका अधिक कठोर लढाईला तोंड द्यावं लागणारं होतं. पहिल्या लढाईपेक्षा ही लढाई अधिक भयंकर होती. ही जीवघेणी लढाई होती. या लढाईत प्राण पणाला लागणार होते.

कॅनडा सरकारनं आणखी एक कठोर फर्मान काढलं. कोणतं कठोर फर्मान होतं ते ?

बोटीतील हिंदी लोकांना किनाऱ्यावर उतरायला बंदी केली होती. घोर परिस्थिती निर्माण झाली होती.

कोमागातामारूवरील हिंदी प्रवाशांच्या हालांना सीमा नाही उरली. अरत्र ना परत्र अशी स्थिती झाली. बोटीवरच कैदखाना निर्माण झाला होता. अशा अवस्थेत लोक किती दिवस राहणार होते ?

बोटीवर अन्नधान्याचा तुटवडा होऊ लागला. पिण्यासाठी गोड पाणी मिळण्याची मारामार होऊ लागली.

आता आणखी हाल नकोत म्हणून बोट माघारी फिरली. ती भारताच्या किनाऱ्याला आली. तेव्हा लोकांना हायसं वाटलं. पण कशाचं काय ? हालअपेष्टांचा आणखी एक नवा अध्याय लिहिला जात होता. भारताच्या किनाऱ्यावर आले तेव्हा या जहाजावरील लोकांना हत्यारबंद पोलिसांनी थेट पंजाबचा रस्ता दाखवला. इकडं-तिकडं बघायला, अन्यत्र कुठं जायलाही बंदी !

जहाजावरील हे हिंदी बांधव समुद्रसफरीच्या कैदेतून मोकळे झाले. पण मेंढरासारखे मुकाट्यानं पंजाबच्या गाडीत जाऊन बसले. त्यांच्या खाण्यापिण्याची कुणी चौकशीसुद्धा केली नाही. मग प्रवासी आणि पोलिस यांच्यात तुंबळ रणकंदन झाले. पोलिसांनी पाशवी हल्ला केला. यात कितीएक ठार झाले. कितीएक जखमी झाले. बाबा गुरुदत्त सिंग विजनवासात गेला.

कोमागातामारू हे प्रकरण अशा तऱ्हेने अनेकांना विव्हल करून गेलं.

■ ■ ■

# ४. चामाबिना देह किनकी बनाई

ज्याहा देखो वहा चामाहि चाम
चामके मंदिर बोलत राम
चामकी गऊ चामका बछडा
चामका हाती चामका राजा
चामके उँटपर चामका राजा

हे भावपूर्ण उद्‌गार आहेत संत रोहिदास यांचे ! चर्मकार समाजातील ख्यातनाम संत रोहिदास यांनी आपल्या व्यवसायाचे रूपक वापरून आपले गुरूबंधू संत कबीर यांनाच वरील ओळी सांगितल्या होत्या.

चौदावे शतक हा तमोयुगाचा काळ होता. दिल्लीच्या तख्तावरून काही असहिष्णू सत्ताधीशांनी जनतेचा धार्मिक छळच चालविला होता. अशा परिस्थितीत भक्तिमार्गाची कास धरून काही संतांनी क्रांती केली. त्यातीलच एक संत रोहिदास होत.

उत्तर प्रदेशातील काशी-वाराणसी या पवित्र स्थळांच्या सावलीला मांडुरगडी या गावात रघुनाथ नावाचे एक चर्मकार राहत होते. पत्नीचं नाव लोनदेवी. रघुनाथ-लोन यांना पुत्रप्राप्ती झाली. तो वार होता रविवार.म्हणून मुलाचं नाव ठेवलं रविदास ! त्यालाच लोक रोहिदास म्हणून ओळखू लागले.

या गावापासून थोडंसं दूर लहरतारा नावाचे गाव आहे. तिथं संत कबीर यांचा जन्म झाला असं सागितलं जातं. रघुनाथ आणि लोनदेवी हे दोघेही पारमार्थिक वृत्तीचे होते. अर्थातच त्यांचा मुलगाही लहानपणापासूनच तसा झाला.

रघुनाथजी काम करता करता काही दोहे गायचे. वडिलांचं ते गायन चिमुकला रविदास एकाग्रतेनं ऐकत असे. सातव्या-आठव्या वर्षांपासूनच रोहिदासांना भक्तीचं वेड लागलं. रोहिदासांचं पारंपरिक शिक्षण झालेलं नव्हतं तरी जीवनाच्या शाळेत ते खूपच अनुभव घेत होते. त्यांना वडिलांबरोबर काम करताना चांगले धडे मिळत होते.

रोहिदास आता भगवद्‌भक्तीच्याच विशाल शाळेत दाखल झाले होते. 'चल मन हरि-चटसाल पढाऊँ' असं ते म्हणत होते. म्हणून तर ते एके ठिकाणी म्हणतात -

गुरुकी साटि, ज्ञानका अच्छर!
बिसरै तो सहत समाधी लखाऊँ!!
प्रेमकि पाटी सुरति की लेखनी!
हृदय बिचार प्रकाश दिखाऊँ!!

रोहिदासांचं हे परमार्थवेड आई-वडिलांच्या ध्यानी आलं. मग त्यांनी त्याला संसारपाशात बांधून टाकायचं ठरवलं. लोणा नावच्या मुलीशी त्यांचा विवाह केला. रोहिदासांमध्ये असलेली पारमार्थिक शक्ती आपोआपच लोनादेवीला मिळाली आणि लोनादेवीही पारमार्थिक क्षेत्रात प्रसिद्ध झाल्या.

संत रोहिदास आपल्या झोपडीत बसून चामड्याच्या वस्तू बनवीत, पादत्राणे तयार करीत; पण मुखानं नामस्मरण असे.रोहिदासांच्या हातात आरी आणि रापी होती; पण त्यांच्या मुखात सदैव रामनाम होते. संत रोहिदासांचे गुरू आचार्य रामानंद हे होते. एका पदात आपल्या गुरूविषयी रोहिदास म्हणतात-

रामानंद मोहि गुरु मिल्यो, पायो ब्रह्मविलास!
रामानंद अमिरस पिओ, रहूदासही भयो पलास!!

(मला रामानंद गुरू मिळाले, ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाली. रामनामाचे अमृत मी प्यालो त्यामुळे या रविदासाची भयभीती केव्हाच पळून गेली)

संत रोहिदास यांच्या शिष्यगणात संत मीराबाई यांचाही समावेश होतो. रोहिदास चर्मकार समाजातले संत! काही लोक त्यांचा मत्सर करीत; पण रोहिदासांच्या मनात कोणाबद्दलही वैरभाव नव्हता.

एका कुंभमेळ्याच्या वेळी रोहिदास आपल्या शिष्यगणांसह प्रयाग तीर्थावर गेले होते. गर्वानं पछाडलेल्या पंडितांनी त्यांना आव्हान दिलं. पूजेतील शाळिग्राम गंगेत फेकला तर तरेल काय? रोहिदासांनी आपल्या हातातील शाळिग्राम लगेच गंगेत फेकला आणि काय आश्चर्य! तो शाळिग्राम तरून गेला बुडाला नाही. मत्सरी पंडितांनी डोळे विस्फारले.

सिकंदर लोदी हा दिल्लीच्या तख्तावर होता. त्यानं इतरांच्या सांगण्यावरून संत रोहिदासाला कारावासात डांबलं. पण लोदीला सद्‌बुद्धी झाली. त्याला सर्वत्र रोहिदास दिसू लागले. मग त्यानं त्यांची सन्मानानं सुटका केली. असे हे रोहिदास तथा संत रविदास उत्तरेतून महाराष्ट्रात आले आणि विठ्ठलभक्तीत दाखल झाले.

■ ■ ■

# ५. एक परी आणि तीन राक्षस

कोकणची परशरामभूमी ही जशी अमृतफळांबद्दल-आंबा प्रसिद्ध आहे, तशीच ती कलाभूमी म्हणूनही प्रसिद्ध आहे. नाटक, संगीत, कीर्तन हे कोकणाचं वेड आहे. दापोली तालुक्यातल्या उंबर्ले या छोट्या गावात धांगुर्डे नावाचे एक प्राथमिक शिक्षक होते. परशराम धांगुर्डे यांनी कोकणच्या मातीत आपली शिक्षकी रुजवली. त्यांचा मुलगा रवींद्र यानं मात्र या मातीचा, कलेचा वारसा घेऊन अभियांत्रिकीत पाऊल ठेवलं आणि मुंबईला नोकरी करीत असतानाच त्यानं आपला संगीताचा व्यासंगही सुरू ठेवला. रीतीप्रमाणे विवाह झाला. सहचरीही कोकणकन्याच मिळाली. रत्नागिरीचे प्रख्यात गंगाधरभाऊ पटवर्धन यांचाच वारसा चालविणारी वंदना रवींद्रची सहचरी झाली आणि मग संसाराच्या सप्तपदीबरोबरच दोघांचीही सप्तसुरांची सप्तपदी सुरू झाली.

शाळा-कॉलेजमध्ये असतानाच दोघांनीही आपापल्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला होताच. रवींद्र धांगुर्डे यांनी संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गजांकडून संगीताचे पाठ घेतले.

चिंचवड येथे बजाज कंपनीत १९ वर्षे नोकरी करतानाच रवींद्र यांनी संगीतात पीएच.डी. मिळविली. पण रवींद्रच्या अंतरीच्या उमाळ्याची नोकरीत कोंडी होऊ लागली. मग रवींद्रने धाडसी निर्णय घेतला. नोकरी सोडली. सुदैवाने वंदनाला डे.ए.सोसायटीच्या शाळेत नोकरी होतीच. आता रवींद्र यांचा संगीत विहार मुक्तपणे सुरू झाला. वंदना आणि रवींद्र हे दांपत्य 'नादब्रह्मा' चे उपासक झाले. डॉ. प्रभाकर जठार, पं.जानोरीकर, पं. विकास कशाळकर यांच्याकडून मार्गदर्शन घेतलेले रवींद्र यांचा संपर्क डॉ. वसंतराव देशपांडे यांच्याशी आला; पण अल्पकाळाच्या सहवासानंतर वसंतरावांचे निधन झालं. डॉ. वसंतराव यांचे गुरू मा. दीनानाथ ! त्यांची सर्व नाटके नव्या स्वरूपात रवींद्र-वंदना यांनी रंगभूमीवर आणली.

'मानापमान' मधला धैर्यधर; 'संशयकल्लोळ' तला अश्विनशेठ यासकट 'स्वयंवर', 'मत्स्यगंधा', 'कट्यार काळजात घुसली' यासारख्या नाटकातील भूमिका रवींद्र ताकदीने पेश करतात. वंदनाही त्यांना साथ देते.

देशभूषण असलेल्या मंगेशकर कुटुंबीयांनीही त्यांच्या या प्रयत्नांना भरभरून दाद दिलेली आहे.

पुणे येथे 'संगीत मानापमान' प्रयोगाच्या वेळी 'चंद्रिका ही जणू.....' हे गीत रवींद्र धांगुर्डे यांच्या आवाजात आशा भोसले यांनी प्रत्यक्ष ऐकलं. तेव्हा त्याही भावविवश झाल्या. रवींद्रजींना अनेक पुरस्कार मिळाले; पण मा. दीनानाथ प्रतिष्ठानचा प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना लाभला हा ते स्वत: महत्त्वाचा गौरव मानतात.

रवींद्र-वंदना या दाम्पत्याने संगीतकला क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. 'गायकाचे पोर सुरात रडतं' असं म्हणतात, त्या म्हणीचा प्रत्यक्ष प्रत्यय त्यांची कन्या सावनी हिच्या गाण्यावरून येतो.

सावनी बालपणापासूनच सुरांशी खेळत आहे. धांगुर्डे यांच्या परिवारात अनेक साहित्यिक, कलावंत मंडळी येत असतात. गंगाधर महाम्बरे, पं.हृदयनाथ मंगेशकर, मंगेश पाडगावकर इत्यादी लोकांचा जवळून सहवास मग सावनीलाही घडतो.

गंगाधर महाम्बरे तर छोट्या सावनीला 'काही दिवस आमच्या घरीच राहायला ये' असा आग्रह करीत.

महाम्बरे आजोबा आपल्या या नातीला नेहमीच काहीतरी खाऊ आणत.

'नादब्रह्म' या संस्थेत नावाजलेल्या कलाकारांसमवेत संवादाच्या ज्या मैफली झडत त्यांचा आस्वाद मग सावनीलाही बालपणापासून घेता आला.

एकदा तर फार गमंत झाली.

चिंचवडच्या मोरया महोत्सवानंतर 'नादब्रह्म' या वास्तूत कलाकारांच्या मोकळ्या गप्पा चालल्या होत्या. यशवंत देव, मंगेश पाडगावकर आणि गंगाधर महाम्बरे यांनी छोट्या सावनीला मध्ये बसवून राजन लाखे या फोटोग्राफरला पोझ दिली. फोटो सुरेख आला होता. तेव्हा मंगेश पाडगावकर म्हणाले-

'एक परी आणि तीन राक्षस'

सारे हास्यकल्लोळात आकंठ भिजले. 'नादब्रह्मा'ची ही अशी किमया!

■ ■ ■

# ६. प्रकटले नरसिंह स्तंभातुनी

सध्याच्या पाकिस्तानातील मुलतान नगरी. मुलतान म्हणजे मूलस्थान. या मूलस्थानचा राजा हिरण्यकश्यपू. हा पराक्रमी राजा होता. त्यानं घोर तपश्चर्या करून अमरत्वाचा वर मिळवला होता. त्याने वीर भगवान विष्णूकडूनच वर मागून घेतले.

त्या वरांचे स्वरूप असे होते...

मला दिवसा मृत्यू येणार नाही; रात्री येणार नाही.

मला जमिनीवर मृत्यू येणार नाही; आभाळात येणार नाही

मला माणूस अथवा पशू कोणीही मारू शकणार नाही.

मला घरात अथवा घराबाहेर मृत्यू येणार नाही.

अर्थातच भगवान विष्णूंनी त्याला हे वर दिले. अशा प्रकारे वरप्राप्ती झालेला हिरण्यकश्यपू मग बेफाम झाला. ज्या भगवान विष्णूंनी त्याला वर दिले त्याच भगवान विष्णूंचा तो द्वेष करू लागला आणि आता आपण अमर आहोत; या थाटात तो वागू लागला. उन्मत्त अशा हिरण्यकश्यपूचा अहंभाव शिगेला पोहोचला.

हिरण्यकश्यपूचा पुत्र प्रल्हाद हा भगवान विष्णूंचा भक्त होता. तो नेहमीच 'नारायण...नारायण' असा जप करीत असे. प्रल्हादाने श्री विष्णूची भक्ती करावी, हे हिरण्यकश्यपूला आवडत नव्हते. एवढेच नव्हे तर त्याच्या उन्मत्तपणाची परिसीमा अशी झाली होती की भगवान विष्णू हे नाव ऐकलं तरी हिरण्यकश्यपूच्या तळपायाची आग मस्तकी जात होती.

मग हिरण्यकश्यपूनं काय केलं....

प्रल्हादाला 'नारायण...नारायण...' जप करण्यास बंदी केली. त्याला श्री विष्णूची भक्ती करायलाही बंदी केली.

हिरण्यकश्यपूनं आपल्या प्रतिहारींना सांगून ठेवलं होतं की प्रल्हादाच्या तोंडून 'नारायण...नारायण..' असा शब्द निघाला तरी त्याच्या मुसक्या बांधा...

पण खरा भक्त अशा बंधनांना थोडाच मानतो! भक्त प्रल्हाद श्री विष्णूची भक्ती करीतच राहिला. नारायण...नारायण... असा जप करीतच राहिला.

एकदा हिरण्यकश्यपूनं भक्त प्रल्हादाला डोंगराच्या कड्यावरून खोल दरीत ढकलून दिलं तरी प्रल्हादाचा प्राण गेला नाही. मग एकदा त्याला उकळत्या तेलाच्या कढईत बसवलं, तरीही भक्त प्रल्हादाला काहीच झालं नाही.

हिरण्यकश्यपूचा जळफळाट वाढत होता. त्यानं आपल्या संपूर्ण राज्यात आणि राजवाड्यात विष्णुनामाला बंदी केली होती.

हिरण्यकश्यपूचा भला मोठा राजवाडा होता. भव्य महालांना मोठमोठे लाकडी खांब होते. या खांबावर कोरीव काम केलेलं होतं. राजवाड्याला अनेक दालनं होती.

असाच एक दिवस....

वेळ संध्याकाळची होती. दिवस मावळत होता; पण रात्र अजून भरलेली नव्हती. भक्त प्रल्हाद 'नारायण....नारायण...' असा जप करीत राजवाड्याच्या एका दालनात बसला होता. क्रोधाविष्ट होऊन राजा हिरण्यकश्यपू आला आणि प्रल्हादाला म्हणाला–

"बंद कर तुझी बडबड! विष्णूचं नाव घ्यायचं नाही."

"नारायण....नारायण... !" भक्त प्रल्हाद म्हणाला.

"कुठाय तुझा नारायण ? दाखव मला. मी त्याला लोळवतो."

"नारायण सर्वत्र आहे," भक्त प्रल्हाद विनम्रपणे म्हणाला.

हिरण्यकश्यपू विकट हास्य करीत राजवाड्याच्या एका खांबाकडे बोट दाखवून म्हणाला, "या खांबात आहे का तुझा नारायण ?"

"हो, नारायण सर्वत्र आहे," प्रल्हाद म्हणाला...

आणि मग उन्मत नराधम हिरण्यकश्यपूनं त्या खांबाला लाथ मारली.

....आणि काय आश्चर्य...

काड्‌ काड्‌ काड...कडाड्‌ कड.....

खांब दुभंगला. त्यातून एक अक्राळविक्राळ मूर्ती प्रगटली. देह मानवाचा; पण शिर सिंहाचे...

त्यांनी हिरण्यकश्यपूला आपल्या बाहूत घेतलं आणि राजवाड्याच्या उंबरठ्यावर आपल्या मांडवीवर आडवा टाकून आपल्या तीक्ष्ण नखाग्रांनी त्याचा कोथळा बाहेर काढला.

दुष्ट हिरण्यकश्यपूचा नरसिंहानं वध केला. सकाळ नाही, रात्र नाही; संध्याकाळी! बाहेर नाही, आत नाही; उंबरठ्यावर! माणसाकडून नाही, पशूकडून नाही; नरसिंहाच्या रूपात....

खलनिर्दालन आणि सज्जन रक्षण यासाठी परमेश्वराला नृसिंह अवतार घ्यावा लागला.

# ७. प्रभाकराची वैकुंठसेवा

पुणे शहरातील ओंकारेश्वर परिसर. आता जिथं बालगंधर्व पूल आहे. तिथं एका बाजूला ओंकारेश्वर मंदिर आहे आणि दुसऱ्या बाजूला थेट नदीच्या पात्रापर्यंत दहनभूमी आहे. आता ही दहनभूमी वैकुंठात गेली आहे; पण जुन्या काळात इथंच अंत्यविधी होत.

ओंकारेश्वराच्या शेजारच्या वाड्यात एक भट नावाचं कुटंब राहत होतं. भटांच्या राहत्या वाड्यासमोरून नेहमीच कोणत्याही वेळी अवेळीसुद्धा अंत्ययात्रा जात. 'रामनाम सत्य हे' चा जप कानावर येई. हुदंके, श्वास, आक्रोश, किंकाळ्या, हंबरडे यांनी मध्यरात्रीसुद्धा वातावरण भेदून जाई...ते भटांना ऐकू येई.

भटांचा एक मुलगा प्रभाकर!

प्रभाकर लहानपणापासून ही सारी दृश्ये बघत होता. जळणाऱ्या चिता, त्यांच्या ज्वाला, आभाळात उडणाऱ्या ठिणग्या त्यांच्या खिडकीतही दिसत. माणसांचे शोकाकुल भकास चेहरे तर नेहमीच बघायला मिळत.

प्रभाकर भट या दृश्यांनी अंतर्मुख झाले.

मृत्यूचा साक्षात आविष्कार त्यांना रोज बघायला मिळत होता.

पण ते तर असू द्या...अंत्ययात्रा, अंत्यविधी यासंबंधी अनेक हृदयद्रावक दृश्य त्यांना अस्वस्थ करीत असत.

पावसाळ्याचे दिवस. ओंकारेश्वराच्या दहनभूमी रचलेल्या आणि जळणाऱ्या चितेपाशी कोणीतरी एकटाच डोळे गाळत होता. त्याच्या व्याकुळ चेहरा पाहून प्रभाकर गलबला आणि मग लक्षात आले की मयतीसाठी फक्त तीन माणसंच आली होती. त्याला मृत्यूचा दाखला, अंत्यविधीचा परवाना याबाबत काहीच माहिती नव्हती. परवाना असल्याशिवाय शवाला अग्नी देता येणार नव्हता. मग दोघे जण त्याकरिता धावत गेले. रात्री कुठलाही डॉक्टर मिळेना. या खटाटोपात तो देह चार तास सरणावर होता आणि शेजारी तो एकटा माणूस भकासपणे बसला होता. मग प्रभाकर पुढं झाला. त्यानं त्या माणसाला धीर दिला. त्याला

भडभडून आलं.

काय संबंध होता प्रभाकरचा आणि त्याचा ?

पण प्रभाकरचा हात पाठीवर पडताच त्याच्या भावनेचा बांध फुटला आणि तो डोळ्यावाटे गाळू लागला.

प्रभाकर भट यांनी मग या कार्याचा वसाच घेतला. त्यांच्याबरोबर त्यांचे दोन-चार समानधर्मी मित्रही या कार्यात सामील होऊ लागले.

ज्या काळात विद्युतवाहिनी नव्हती, त्या काळात चितेवरच अग्नी दिला जायचा. चिता रचणे हे एक शास्त्र असते. चिता पेटविणे हेही शास्त्र असते. नुसती लाकडे ठेवून चिता रचली जात नाही. ती कोसळू नये म्हणून लाकडांचे एकमेकात गुंतलेले आडवे-उभे थर रचावे लागतात. प्रभाकर भट यामध्येही तरबेज होते.

ओळखीचा असो वा नसो.

नात्यागोत्याचा असो वा नसो.

परिचित, परिवारातला असो वा नसो.

जात, धर्म, वंश, रक्त, वय, लिंग, परिस्थिती यापैकी कशाचाही विचार न करता प्रभाकर भटांनी पुढं होऊन अंत्यविधी केले.

एकदा तर प्रभाकर भट एका अंत्यविधीवेळी आले होते. त्या वेळी त्यांच्यासमोर मृताच्या नातेवाईकांमध्ये कोणत्यातरी कारणावरून वादावादी झाली. भांडण विकोपाला गेले. पोलिस आले. त्यांनी सर्वांनाच पकडून पोलिस स्टेशनमध्ये नेले.

आणि भांडणाऱ्यांच्या आप्ताच्या शवाचं रक्षण करीत प्रभाकर भट बसले होते. त्यांच्याजवळ त्या वेळी स्माशानीतील इमानी कुत्र्याशिवाय कुणीही नव्हतं.

पुढे पुढे तर प्रभाकर भट यांना निरोपच येऊ लागले. मग आला निरोप की तयार प्रभाकर ! अर्ध्या चड्डीतील प्रभाकर एका पायावर या कार्यासाठी तयार.

आपल्या या सेवेच्या काळात प्रभाकरानं ६ हजारांपेक्षा अधिक मृतांवर अंत्यसंस्कार केले.

पुण्य नावाची काही चीज असेलच तर प्रभाकरचा जीवनकुंभ या पुण्याने काठोकाठ भरलेला आहे आणि पुण्य जोडणारा माणूस मोक्षालाच जातो अशी भावना खरी असेल तर प्रभाकराचे मोक्षातील स्थान परमेश्वरानेच राखीव आसन म्हणून आधीच पक्के केले असेल. अनेकांना मोक्षमार्गाची वाटचाल करताना मार्गदर्शक करणारा कृतिशील समाजसेवक प्रभाकर यांची वैकुंठसेवा कोणत्याही तथाकथित समाजसेवेपेक्षा खूपच मोलाची ! मोक्षमार्गांचा हा वाटाड्या दीर्घकाळ संस्मरणीय !

■ ■ ■

# ८. चिमणी का उडाली ?

एका नदीचं विशाल पात्र. दोन्ही काठावरून भरभरून वाहणारी ती नदी त्या प्रदेशाला तृप्त करीत वाहत होती. अंतराअंतरावर अनेक गावं....मध्ये ती नदी अगदी निर्मनुष्य प्रदेशातून खळाळ वाहत होती. काही भागात तिच्या दोन्ही काठावर घनदाट झाडी होती. गावांचे काठ असणारी ही नदी माणसांना पाणी देत होती, तशीच ती जंगली श्वापदांचीही तहान भागवत होती.

रात्रीच्या वेळी वाघ, सिंह, चितळ, लांडगे पाणी प्यायला नदीकाठी येत. गावापासून दूर गाई-म्हशी चरायला आल्या तर पाणी प्यायला नदीकाठीच येत.

कुणी एखादा साधू आपली छाटी धुवायला आणि कमंडलू भरून पाणी प्यायला नदीकाठी यायचा. अशी ही नदीमाय सर्वांचं भरणपोषण करीत होती. सर्वांना थंडावा देत होती.

जंगलाच्या भागातून नदी वाहत होती. तेव्हा रोज एक चिमणी तिथं मधोमध असलेल्या खडकावर दूर आभाळातून उडून यायची. पाण्यात पंख भिजवून ओले पंख फडफडवीत त्या खडकावर बसायची. कधी चोचीनं हळूच पाणी प्यायची. असा त्या चिमणीचा क्रम कितीतरी दिवस चालला होता. गावातला एक म्हातारा शेतकरी आपल्या लहानग्या नातवाला घेऊन दूरवरच्या एका टेकडीसारख्या उंचवट्यावर बसून ही गंमत नातवाला दाखवायचा.

एकदा एक वाघ त्या नदीच्या पाण्याजवळ आलेला त्यांनी पाहिला. वाघानं नदीत प्रवेश केला. तो पाणी पिऊ लागला. शेजारीच त्या खडकावर चिमणी पंख फडफडवीत होती. वाघानं हलकीशी डरकाळी फोडली. चिमणीनं चिव चिव करून पंख फडफडविले; पण तिचं खडकावर खेळणं चालूच होतं. वाघ आला तसा पाणी पिऊन परतला.

शेतकऱ्याच्या नातवाला गंमत वाटली. त्याला वाटलं होतं, वाघाला बघितलं की चिमणी लांब भुर्रकन उडून जाईल; पण तसं काहीच झालं नाही.

मग थोड्या वेळानं एक रानरेडा आला. रानरेडा चांगला गलेलठ्ठ होता. नाकपुड्यातून तो सुस्कारे सोडत धावत धावत आला आणि पाण्यात शिरला. रानरेड्याला पोहता येतं होतं. पोहत पोहत तो खडकाजवळ गेला. परतताना पाणी पिऊन तो बराच वेळ पाण्यात डुंबून मग बाहेर आला. चिमणी तिथं पंख फडफडवीत होतीच. ती चिमणी त्या रानरेड्याच्या पाठीवर उडून बसली. रानरेड्यानं आपली शिंगे हलवली. हा खेळ शेतकऱ्याचा नातू बघत होता. त्याला खूप गंमत वाटली. मग रानरेडा निघून गेला. चिमणीचा खेळ अजून संपला नव्हता....थोड्या वेळानं एक चिमणा आला. मग चिमणा-चिमणी दोघंही खडकावर खेळू लागली. त्यांची चिव चिव सुरू होती.

मग थोड्या वेळानं एक भला दांडगा माणूस आला. त्याने आपले कपडे काठावर काढून ठेवले आणि पळत पळत त्यानं त्या नदीच्या पाण्यात सूर मारला. हात मारत मारत तो माणूस त्या खडकाच्या दिशेनं पोहत जात होता.

चिमणा-चिमणी दोघंही घाबरली, भेदरली. चिमणी तर खूपच भेदरली. तिनं चिव चिव करून चिमण्याला सांगितलं. मग चिमणी आणि तिच्यामागं तो चिमणा भुर्रकन उडून पळाले. ते दूरच्या झाडात जाऊन गडप झाले. हा सारा खेळ तो नातू बघत होता.

मग नातवानं विचारलं.

''आजोबा, वाघोबा एवढा भयंकर प्राणी ! तो आला तरी चिमणी खेळत होती. त्याला ती नाही घाबरली. रानरेडासुद्धा चांगला गलेलठ्ठ होता. त्याच्या पाठीवर ती चिमणी बसली; पण उडून घाबरून पळून नाही गेली. मग माणूस पोहायला आला तर चिमणी घाबरून गेली हे कसं ?''

''बाळा, वाघ काय किंवा रानरेडा काय, त्यांच्या वाटेला गेलं तरच ते प्राणी इतरांना त्रास देतात. माणूस मात्र स्वत:ला त्रास झालेला नसला तरी इतरांना त्रास देतो. हे त्या चिमणीला माहीत होतं. म्हणून चिमणी पळाली बरं.''

■ ■ ■

# ९. होत्याचे नव्हते झाले

पुण्याच्या प्रशांतनगरमधील लालबहादूर शास्त्री रस्त्यावरील एका विजिगीषू टुमदार वास्तूत बापट कुटुंबाचा निवास आहे. गजाननराव बापट या उद्यमशील आयुर्विम्याच्या उपासकानं कुसुमकोमल साथीनं ही वास्तू उभारली. श्रीकृष्ण, अशोक व जयप्रकाश या तीन सुपुत्रांनी त्या वास्तूचे वैभव स्वत:च्या कर्तबगारीतून वृद्धिंगत केले. थोरले श्रीकृष्ण अर्थशास्त्राचे प्राध्यापक आणि अर्थविषयक उद्योगांचे सल्लागार, तर मधले अशोक स्थापत्य अभियांत्रिकीत वाकबगार होते. जयप्रकाश यांनीही आपल्या प्रकाशवाटा उजळून टाकल्या.

तिघांचेही संसार दृष्ट लागावे असे झाले. कुसुम-गजाननाचा वंशवेल तरारून वाढला आणि देशपरदेशात याचा सुगंध गेला.

पण नियतीच्या खुणा काही वेगळ्याच असतात.

अशोक बापट पुण्याहून मुंबईत स्थायिक झाले. गोरेगावला राहू लागले. शासनाच्या सेवेत काही वर्षे काढली आणि मग राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळात ते गेले. तिथं जनरल मॅनेजर पदापर्यंत त्यांची प्रगती झाली. पत्नी अंजली (संध्या) याही एका महाविद्यालयात व्याख्यात्या आहेत. बॅलार्ड पिअरला बापट याचं एनटीसीचं कार्यालय. या महामंडळात त्यांनी झोकून देऊन काम केलं. एनटीसी मॅनेजिंग डायरेक्टर रामचंद्र पिले तर म्हणत की अशोक बापट यांच्यासारखा आमच्या महामंडळाचे सखोल व सर्वांगीण ज्ञान असणारा अधिकारी म्हणजे आमचा ज्ञानकोशच!

बापट यांना महामंडळाचं काम नसेल तेव्हा सवड काढून ते निरनिराळ्या गृहरचना संस्थांचे सल्लागार म्हणून काम करीत. असे बापट निवृत्त झाले तरीही त्यांना महामंडळाने मुदतवाढ दिली.

रोज आपल्या सहकारी मित्राबरोबर ठराविक लोकलनं प्रथम वर्गाच्या डब्यातून बापट कार्यालयीन कामासाठी जात.

आणि मग तो दिवस उजाडला.

११ जुलै!

अख्खी मुंबई बॉंबस्फोटांनी हादरली होती. कानठळ्या बसवणारे आवाज. प्रचंड हादरे, स्फोट आणि किंकाळ्या व उसासे यांनी मुंबईची काही रेल्वे स्थानके हादरून गेली होती.

बॉंबस्फोटांनी मुंबापुरी हादरली होती.

घरचे लोक वाट बघत होते. अशोक बापट रोजच रात्री कामावरून उशिरा घरी येत. तसे ते येतील म्हणून पत्नी वाट पाहत होती; पण काळीज धकधक करीत होते. नेहमीपेक्षा जास्तच उशीर झाला तेव्हा संध्याताईंचा धीर विरघळून गेला. शंकेची पाल चुकचुकली. पुण्याल फोन गेले. मुलगा चेन्नईला गेला होता.

मग पुण्यातून भर रात्री गाडी निघाली. नितीन, रोहित, बाळ-भाग्यश्री, प्रकाश, अमोल, मंदार, विभा, अविनाश....संध्या, मेधा ही सारी रक्ताची माणसं धगधगत्या काळजीनं मुंबईत गोळा झाली. जवळचे मित्र निशिकांत जोशी, गोखले, ठाकूर, देव, श्रोत्री...सारे जमले. कपूर हॉस्पिटलमध्ये बॉम्बस्फोटात प्राण गमावलेल्यांचे देह आहेत, हे समजताच मंडळी तिकडे धावली. हारीनं प्रेतं होती. दृश्य हृदयद्रावक होतं. कुणाच्या देहाचा चेंदामेंदा झाला होता तर कुणाची नुसती कवटी दिसत होती. ओळखणार कसं..

पण थोरले बंधू श्यामराव यांनी कपड्यांवरून ओळखलं..आणि रुद्र कंठाने, विद्ध नजरेनं ते म्हणाले...

अशोक. ! अशोकच...आपला अशोक ! आणि मग एकच दु:खकल्लोळ.

तरीही सर्वांनी संयम राखला होता. इस्पितळाच्या लोकांनी चेहऱ्याचा जेवढा भाग विच्छिन्न झाला होता त्यावर बँडेज बांधून ओळखणारा चेहरा उघडा ठेवला होता. त्या अर्धआवृत्त मुखावर शांत भाव होते.

होत्याचे नव्हते झाले होते.

बालपणी रमणबागेत शिकलेला अशोक...फर्ग्युसनमध्ये अभ्यास करणारा अशोक...इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सतत वरची श्रेणी मिळवणारा अशोक..नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनचा एक कर्तबगार उच्चपदस्थ अधिकारी असलेला अशोक...थोरले बंधू श्रीकृष्ण यांना लक्ष्मणासारखी साथ करणारा अशोक...नेहमीच विविध ठिकाणी प्रवास करणारा अशोक...त्यादिवशी नेहमीप्रमाणे लोकलमध्ये बसताना कुणाला तरी असं वाटलं असेल का...की यानंतर...या क्षणानंतर....अशोक आहे....याचं रूपांतर अशोक नाही...यामध्ये होणार आहे !...होत्याचं नव्हते झाले.

■ ■ ■

# १०. जैत रे जैत

मिरजेच्या ब्राह्मणपुरीत राहणारे श्रीराम रानडे पुण्यात आले आणि त्यांच्या मनीच्या महत्त्वाकांक्षेची जैत रे जैत झाली. बालपणापासून नाट्य, अभिनय, कला यांची आवड असलेले श्रीराम धुवट पायजमा, कुर्ता, शबनम पिशवी, स्वस्त हवाई चपला, पण काहीतरी करण्याची जिद्द अशा अवस्थेतच पुण्यात आले. शाळेत नोकरी मिळाली तीही नापासांच्या शाळेचे मुख्याधापक कै. पु.ग. वैद्य यांच्या आपटे प्रशालेत. शिक्षकी पेशा प्रामणिकपणे करतानाच उरलेला सगळा वेळ मात्र श्रीराम रानडे पुण्यातल्या नाट्य-चित्रवर्तुळात राहू लागले. सुदैवानं जीवनसहचरी प्रोत्साहन देणारी मिळाली आणि तिनं भारत इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षिकेची नोकरी करून श्रीरामाच्या महत्त्वाकांक्षेला सीतेची साथ देण्याचं ठरवलं.

चंद्रकांत काळे, नंदु पोळ, अनंत कुलकर्णी अशा अनेक धडपड्या नाट्यकलावंतांच्या वर्तुळात राहणाऱ्या श्रीराम रानडे यांना जब्बार पटेल यांचाही स्नेह लाभला. 'जैत रे जैत' या गाजलेल्या चित्रपटाची जुळवाजुळव सुरू झाली आणि श्रीराम रानडे यांना त्या चित्रपटात एक भूमिका मिळाली. चित्रपटाची नायिका अर्थातच स्मिता पाटील होती आणि नायक होते डॉ. मोहन आगाशे. चिंधी आणि नाग्या यांची मधाळ प्रेमकहाणी या चित्रपटात हृदयस्पर्शी व प्रत्ययकारी रीतीनं रंगवलेली आहे.

श्रीराम रानडे यांना मिळालेली भूमिका तशी एकूण चित्रपटाचा आवाका पाहता नगण्य होती; पण श्रीराम यांनी ती समरसून केली होती. प्रत्येक कलावंताला चित्रपटात नायिकेबरोबर एखाद्या महत्त्वाच्या दृश्यात आपण असावं असं वाटतच असतं. रानडे यांनाही तसं वाटलं होतं; पण त्या भूमिकेचं स्थान, दिग्दर्शकाचा दृष्टिकोन आणि कथा यावरच ही गोष्ट अवलंबून असते. सुदैवानं रानडे यांच्याबाबत ही संधी चालून आली.

चित्रपटात शेवटी चिंधी मधमाश्या चावून मरण पावते असं दृश्य आहे. ती ज्या ठिकाणी नाग्यासाठी वाट बघते तेथून, बऱ्याच उंचीवरून तिचा मृतदेह खाली तळजमिनीवर कुणीतरी आणायचा, अशी त्या दृश्याची मागणी होती.

जब्बार पटेल यांनी श्रीराम रानडे यांना विचारलं.

''चिंधीच्या त्या ठाकर वस्तीतल्या लोकांपैकीच कुणीतरी चिंधीचा मृतदेह हातावर पेलून खाली आणायचा आहे, तू आणशील ?

''आनंदानं'' श्रीराम रानडे म्हणाले.

श्रीराम रानडे यांनी दोन गोष्टींमुळे ही जबाबदारी स्वीकारली होती. पहिली गोष्ट म्हणजे स्मिता पाटीलला ते खूप लहानपणापासून ओळखत असल्यामुळे तिच्या वजनाचा त्यांना अंदाज होता आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्मिता पाटीलसमवेत एका महत्त्वाच्या दृश्यात सहभाग असण्याची त्यांची इच्छा फलद्रूप होणार होती.

मग चित्रीकरणाला सुरुवात झाली. चिंधी असलेली स्मिता पाटील मधमाश्या चावल्यामुळे निपचित पडलेली होती. ठाकराच्या वेशातले श्रीराम रानडे आले आणि त्यांनी तिचा देह आपल्या दोन हातांवर घेऊन ते वाट चालू लागले. आणि....

श्रीराम रानडे यांचा अंदाज चुकला.

दोन्ही हातांवरील चिंधीचा मृतदेह त्यांना पेलवेना.

वाट उतरती आणि खडकाळ...

ठाकर फाटका, आणि चिंधी पुरेशी वजनदार...

काही क्षणी तर ठाकराला वाटलं की हा देह आता आपल्या दोन्ही हातांवरून घरंगळणार आणि धपकन मधेच खाली पडणार. असं झालं असतं तर मग पुन्हा रिटेक...कदाचित स्मिता पाटीलला लागलंही असतं...पण श्रीराम रानडे यांनी निश्चय केला...चित्रपटाचं नाव 'जैत रे जैत' आहे.. आपलीही या दृश्याबाबत जैत झालीच पाहिजे.

खरं तर आधारासाठी स्मिता पाटील पडू नये म्हणून रानड्यांच्या गळ्यात हातही टाकू शकत होती. पण चिंधी मरण पावलेली होती ना ! मग अशीही तडजोड शक्य नव्हती...श्रीराम रानडे यांनी आपली सर्व प्राणशक्ती एकवटली. त्यांचे दोन्ही हात म्हणजेच जणू त्यांचा सारा देह झाला होता...घरंगळत्या चिंधीच्या मृतदेहाला त्यांनी सारी प्राणशक्ती एकवटून पेलले तरीही व्हायचे तेच झालं...

स्मिता पाटील खाली पडल्या..मग रिटेक आलाच.

नंतरचं दृश्य इतर कुणाला घेऊन चित्रित झालं. खरं तर श्रीराम रानडे यांची जैत झाली नव्हती. त्यांची जी आकांक्षा होती तिची जैत झाली होती आणि काही काळापुरते तरी का होईना स्मिता पाटील यांच्याबरोबर त्यांना कॅमेऱ्यासमोर उभं राहता आलं होतं. त्यांच्या महत्त्वाकांक्षेची जैत झाली होती. हार होऊनसुद्धा त्यांच्या दृष्टीनं लाखमोलाची होती.

■ ■ ■

# ११. साठीतील शूर सेनापती

वय वर्षे अवघे साठ! भरदार मिशा, तरणाबांडही लाजेल अशी कणखर देहयष्टी, करारी मुद्रा आणि नजरेत प्रचंड आत्मविश्वास....

अशी मूर्ती होती छत्रपती शिवराय यांच्या सेनापतीची. या शूर सेनापतीचं नाव बाजी पासलकर. कणखर सह्याद्रीच्या मावळ खोऱ्यातील तव नावाचं गाव. इथले पासलकर तालेवार होते. हे घराणं मावळातलं मातब्बर देशमुख घराणं होतं. आदिलशाहीनं धुमाकूळ घातलेला होता. रोहिडेश्वरी तरुण शिवबानं स्वराज्याची शपथ घेतली होती. शिवबांच्या साहसी निर्णयाला ज्या शूर मावळ्यांनी शक्ती दिली त्यामध्ये बाजी पासलकर आघाडीवर होते.

तव गावाभोवतीच्या मोसे, पानशेत शिर्कोली, ठाणगाव, सोनापूर, खानापूर अशी पाचपंचवीस गावं बाजीच्या देशमुखीची होती.

पंचक्रोशीत कुठं तंटाबखेडा झाला तरनिवाडा बाजींनीच करायचा. संकटकाळी धावून जायचं ते बाजींच्या वाड्यावर अशी प्रथा होती.

बाजीना एक किताब होता... यशवंतराव!

यशवंतराव बाजींनी समाजाचं कर्तेपण आपल्याकडे घेतलं होतं. बाजींच्या आश्रयाला अनेक मंडळी असत.त्यामध्ये एक मुलगा होता. नाव त्याचं अनंता खुर्चुले. पोर शिंप्याचा, पण तालीमबाज होता. पैलवान होतं. पैलवानाला खुराक लागतोच. बाजींनी अनंता खुर्चुलेला रोज दोन शेर दूध मिळेल अशी व्यवस्था केली. बाजीच्या पदरी शे-दोनशे नोकरही होते. शिवाय शूर असे रजपूतही होते चौदा. शिवाय बाजींच्या वाड्यात शूर असा येल्या मांगही होता. खंड्या महार होता. येल्या आणि खंड्या हे दोन सेवक म्हणजे बाजींचे डावे-उजवे होते.

रणमर्द बाजी पासलकर यांच्या पागेत एक घोडीही होती. त्या घोडीचं नाव यशवंती. यशवंती म्हणजे अबलख वारू. निष्ठावान सेवक. यशवंतराव बाजी पासलकर यांची यशवंती घोडी अत्यंत आवडती होती. तिच्यावर आरूढ होऊन बाजींनी यापूर्वी अनेक लढाया मारल्या होत्या. चकमकी जिंकल्या होत्या.

त्या काळी विजापूरकर आदिलशाहीची मुस्कटदाबी मराठी मुलखावर कधी कधी चालून येई. काही मराठी सरदारही आदिलशाहीला निष्ठेनं मुजरा करीत. काही गुपचूप साथ देत.

बाजीच्या पदरीही असे दोन फितूर निघाले. सोनू दळवी आणि मरकतराव अशी त्या दोघांची नावं. या दोघांनी एक मसलत केली. ही मसलत करून त्यांना आदिलशाहीच्या दरबारी आपली प्रतिष्ठा वाढवायची होती. कोणती मसलत होती ती ? बाजींच्या घरून त्यांच्या आवडत्या आणि पराक्रमी यशवंती घोडीला पळवून न्यायचं आणि विजापूरच्या बादशहाला ही घोडी अर्पण करायची. म्हणजे मग बादशाहीला कुर्निसात केला की मनसबदारी मिळेल असा त्यांचा मनसुबा !

मरकतराव हे तर बाजींचे जावईच !

जावईच सासऱ्याविरुद्धच्या कटात सामील. मग कट यशस्वी व्हायला किती अवकाश !

मरकतराव आणि सोनू दळवी योग्य मोक्याची वाट बघत होते आणि एक दिवस त्यांनी डाव साधला.

दुपारची सामसूम होती. बाजी जेवायला बसले होते. वाड्यावर तशी शांतता होती. पाचशे गडी घेऊन सोनू दळवी आणि मरकतराव यांनी पागेवर हल्ला केला. बराच कल्ला झाला. मग बाजींचे निष्ठावान सैनिक धावून गेले. येल्या मांगानं सोनू दळवीला ठार केलं, तर स्वत: बाजीनं आपल्या जावयाला- मरकतरावाला लोळवलं. हल्लेखोर मारेकरी पळून गेले. यशवंती दिमाखात उभी होती. रोहिडेश्वरी शपथ घेऊन शिवाजीराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले. त्या वेळी बाजी पसलकरांनी महाराजांच्या हाताला हात लावून साथ दिली होती ती अखेरपर्यंत सोडली नाही.

मोसे खोऱ्यावर आदिलशाहीच्या सरदारांनी अनेक चढाया केल्या. पण बाजी पासलकर प्रत्येकवेळी यशस्वी झाले. मग आदिलशाहानं ठरवलं की शिवाजी महाराजांचा पुरता बीमोड करायचा. महाराज त्यावेळी पुरंदर किल्ल्यावर होते. त्यावेळी त्यांच्यासमवेत बाजी जेधे, गोदाजी जगताप, बाजी पासलकर, मल्हारराव खासनीस, कावजी वगैरे मंडळी होती.

फतेहखान पुरंदरवर भल्या मोठ्या सैन्यानीशी चालून आला. स्वत: बाजी पाचशे सैनिकांना घेऊन फत्तेखानवर तुटून पडले. खानाला सैन्याची दाणादाण झाली; पण वेळसर गावाजवळच्या घनघोर चकमकीत बाजींच्या बलदंड शरीरावर तलवारीचा घाव पडला. बाजी धारातीर्थी पडले. महाराजांचा साठीतील सेनापती वीरमरण घेऊन अमर झाला.

■ ■ ■

# १२. ‘दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा’

वाई–महाबळेश्वर परिसरातलं पसरणी नावाचं गाव. गाव तसं लहान खरं; पण नांदतं आणि गाजतं गाव. गाव–बारव, भैरोबानाथाचं जागृत देवस्थान. अशा गावातलं साबळे कुटुंब. यातला कृष्णा हा खरोखरीच कृष्णासारखा सूरवेडा होता. शाळेत जाऊन बुकं शिकण्याऐवजी रानावनात जाऊन वनाची शीळ ऐकावी असं त्याला वाटे. गोड गळा आणि पसरणीचा मळा... कृष्णा लहानपणापासूनच गाऊ लागला. नागपंचमीच्या फेराला गावातल्या बायका फेराच्या मध्यभागी उभं राहून याला गाणं म्हणायचा आग्रह करायच्या आणि टिपेच्या आवाजात गाणं सुरू करायच्या. मग भैरोबाच्या देवळात रात्री भजनी मंडळी बसली की किसनदेवाला गायचा आग्रह व्हायचा. कृष्णाच्या मामानं घरून येताना एक गाणं पाठ करून घेतलं होतं.

‘सूरये उगवला. परकास पडला आडवा डोंगर...
ह्या ह्या आंधळ्याला दिसंना आरसा करा म्होरं.’

कृष्णाला मग हा नादच लागला. शाळा शिकेना. आई–वडील सैरभैर झाले. पोरांनं शाळा शिकलीच पाहिजे. मग आईनं युक्ती केली. काळजावर दगड ठेवून कृष्णाला मामाकडं अंमळनेरला शिकायला पाठवून दिला आणि पसरणीचा कृष्णा अंमळनेरच्या शाळेत खानदेशात दाखल झाला.

अंमळनेरच्या शाळा क्रमांक तीनमध्ये कृष्णा जात होता. वाटेवरच एक घर होतं. त्या घरात एक गृहस्थ राहत होते. त्यांचं नाव सानेगुरुजी ! सानेगुरुजींच्या सभांना कृष्णा जाऊ लागला आणि व्हायचं तेच झालं. इथंही त्याचं लक्ष शाळेवरनं उडालं आणि स्वातंत्र्याच्या आंदोलनात जे लोक भाग घेत होते तिकडं त्याचं मन वळलं. एकदा सानेगुरुजींच्या सभेत कृष्णानं ‘रमला कुठं गं कान्हा’ हे गाणं म्हटलं.

गुरुजींना याचा आवाज आवडला; पण या गाण्याऐवजी उपदेशपर गाणं

त्यानं म्हणावं म्हणून गुरुजींनी त्याच चालीवर एक गाणं रचून दिलं.

'मिळवा जगी हो ज्ञाना, सारी राष्ट्रे पुढती जाती,
किती तयांची आहे प्रगती, मिळवा जगी हो ज्ञाना'...

या गाण्याचे बोल खरेच ठरले. कृष्णाच्या नशिबात येथेही शालेय शिक्षण नव्हते. कारण स्वत: सानेगुरुजीच कृष्णाला आपल्या सभांमध्ये गायला बोलावू लागले. कृष्णा अंमळनेरच्या शाळेत कसा तरी व्हा.फा. पर्यंत पोहोचला आणि मग कृष्णाच्या आजीनं त्याला परत पसरणीला पाठवलं; पण अंमळनेरच्या चार-पाच वर्षांच्या काळात त्याला सानेगुरुजींचा परिसस्पर्श झाला होता.

यापुढे 'पोटासाठी भटकत जरी दूरदेशी फिरेन' या गीताचे बोल कृष्णासाठी खरे ठरले. त्या वेळी मुंबईला गिरणीमध्ये कामगारांची भरती होत असे आणि मग एका गिरणीत धोटा फुंकण्याच्या कामावर कृष्णाची नेमणूक झाली. तिथं काही दिवस काम केलं आणि लीलाबाई मांजरेकर यांच्या फडात तालीम-मास्तर म्हणून कृष्णा काम करू लागला. कृष्णाच्या चुलत्याला हे सहन झालं नाही. त्यानं कृष्णाची रवानगी पुन्हा वाईला केली. बेकार अवस्थेत वाई-पसरणीत करणार काय, म्हणून एका वस्त्रानिशी पुणं गाठलं. पुण्याला अरुण फिल्म कंपनी आणि सरस्वती सिनेटोन या नावाच्या फिल्म कंपन्या होत्या. तिथं काम बघण्यासाठी कृष्णा गेला. रुजू झाला. मग मलेरियाच्या साथीनं अनेकांना लोळवलं. कंपनीनं अनेकांना कमी केलं. पुन्हा कृष्णा बेकार! शाहीर निकम यांचा परिचय झाला आणि आपण शाहिरीचे कार्यक्रम करायचे; असं कृष्णानं ठरवलं. स्वातंत्र्य आंदोलनात त्यानं भाग घेतला. पार धुळ्यापर्यंत त्याची शाहिरी पोहोचली. पोवाडाच नव्हे तर कै.ग.दि. माडगूळकर यांनी केलेल्या, कृष्णानं गायिलेल्या ओव्याही लोकांना आवडू लागल्या...

गांधी माझा सखा गं। ओवी त्याला गाईन।
अन् तुरुंगात जाईन। स्वराज्य मी मिळवीन।

असं करता करता या दौऱ्यावरच कृष्णाला भानुमती भेटली. विवाह झाला आणि भानुमतीच्या सुशिक्षित सहकार्यामुळं कृष्णाच्या कलेचा वारू... पुढे अश्वमेध झाला.

शाहीर साबळे आणि पार्टी त्रिखंडात गाजू लागली.

मुक्तिनाट्य नावाचा एक प्रकार शाहीर कृष्णराव साबळे यांनीच लोकप्रिय केला. 'यमराज्यात एक रात्र', 'आंधळं दळतंय' यासारखी नाटके तुफान

गाजली. मग शाहीर साबळे यांनी मोबाइल थिएटरची कल्पना लढवली. गावोगावी प्रयोग केले. पुत्र देवदत्त, कन्या चारुशीला, नातू केदार शिंदे हेही कृष्णरावांचा वारसा चालवू लागले. पसरणीचा कृष्णा साबळे रशियाला 'प्राग'मध्ये गेला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यानं महाराष्ट्र पिंजून काढला. मराठी मातीत प्राण फुंकण्याचे काम या शाहिरानं केलं आणि शाहिराचे महाराष्ट्रातील म्हणजे मराठी मनाचा मानदंड ठरला. आजही या गीतानं लोकांची मनं प्रफुल्लित होतात आणि दऱ्याखोऱ्यात स्वर उमटतो -

'सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा' !

■ ■ ■

# १३. 'विशाखा' मधील वॉल्टेअर

पुण्यात कोथरूडला डेक्कनकडून कर्वे रस्त्याला जावं... मारुती मंदिरापुढे उजव्या हाताला नवकेतन सोसायटी लागते. त्या गल्लीत भारतीय विद्यासंस्थेवरून पुढं गेलं की अगदी शेवटास 'विशाखा' ही टुमदार बंगली लागते. या घरात शिरवाडकर नावाचे एक वॉल्टेअर राहतात. हे कुसुमाग्रजानुज आहेत. म्हणजेच ख्यातनाम कवी कुसुमाग्रजांचे धाकटे बंधू के.रं. शिरवाडकर! 'गर्जा जयजयकार क्रांतीचा...' असं आपल्या कवितेतून गरजणाऱ्या क्रांतदर्शी कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या या सहोदराच्या मनातही क्रांती. स्वातंत्र्य या ऊर्मी बालपणापासून उफाळत होत्या.

सोलापूरच्या हरिभाई देवकरण हायस्कूलमध्ये शिकत असताना बालवयातच १९४२ च्या आंदोलनात शिरवाडकर आणि त्यांच्या मित्रांनी मोर्चा काढला होता. शाळेत करंदीकर नावाचे एक शिक्षक होते. या मोर्चाबाबत त्यांच्याविरुद्ध कागाळी झाली. खरं तर करंदीकर सर यांचा यात हात नव्हता. पण असं सांगणार कोण ? शेवटी शिरवाडकर नावाचा विद्यार्थी पुढं आला. त्यानं खरं बोलण्याची भीती बाळगली नाही आणि खोटं बोलणाऱ्यांना साथ दिली नाही. करंदीकरांचा यात हात नव्हता ही शिरवाडकरांची साक्ष मोलाची ठरली आणि करंदीकर यांच्यावरचं बालंट टळलं.

बालपणापासून सदैव सत्याशी सोयरीक करणारे शिरवाडकर पुढे इंग्रजीचे ख्यातनाम प्राध्यापक झाले. नांदेडच्या पीपल्स कॉलेजचे प्राचार्य झाले. औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठात इंग्रजी विभागप्रमुख झाले. त्यांच्या पत्नी-एडनचे प्रसिद्ध विठ्ठलराव जोशी यांच्या कन्या - याही प्राध्यापिका होत्या. नांदेडच्या पीपल्स कॉलेजचे प्राचार्य असताना एक आणीबाणीचा प्रसंग उद्भवला. महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत गॅसगळती होऊन आग लागली. आरडाओरडा ऐकू येऊ लागला. प्राचार्य आपल्या कार्यालयातून तडक बाहेर आले आणि नुसता विचारविनिमय न करता किंवा भांबावून न जाता त्यांनी प्रयोगशाळेतील भडकत्या भागावर बादलीनं पाणी शिंपडायला सुरुवात केली.

मग इतर लोक आले. आग विझली आणि पुढील अनवस्था प्रसंग टळला.

प्रत्यक्षात त्यांनी केलेलं 'अग्निशमन' हे कार्य पुढं त्यांनी नित्य जीवनात आणि साहित्य क्षेत्रातही केलं.

कुसुमाग्रज या त्यांच्या ज्येष्ठ बंधूंनी महाराष्ट्र शारदेला कितीतरी सुगंधी व देखण्या पुष्पमाला अर्पण केल्या आणि धाकटे बंधू के.रं.शिरवाडकर यांनी त्या पुष्पमालांचं रंगसौंदर्य, आकार सौंदर्य, अर्थसौंदर्य उलगडून दाखवलं.

शेक्सपीयर जीवन आणि साहित्य, मार्क्सवादी साहित्य विचार, साहित्यवेध, तो प्रवास सुंदर होता, साहित्यातील विचारधारा... असे सुंदर व वजनदार ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. शिरवाडकरांच्या समतोल मन, विशाल दृष्टिकोन असलेल्या समीक्षेवर मराठी भाषाभ्यासकांची एक पिढी पोसली आहे. महावीर जोंधळे, डॉ. मोहन भालेराव आणि कितीतरी महाविद्यालयांचे प्राचार्य हे शिरवाडकरांचे शिष्य आहेत.

एक कृतिशील विचारवंत म्हणून महाराष्ट्राच्या अनेक चळवळींचे ते साक्षीदार आहेत. संयुक्त चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतल्याबद्दल नांदेडला पीपल्स कॉलेजमध्ये असताना त्यांनी स्वत:च राजीनामा देऊ केला; पण स्वामी रामानंद तीर्थ यांनी तो स्वीकारला नाही. डॉ.सुरेंद्र बारसिंगे प्राचार्य होते. त्यांनीही शिरवाडकरांच्या चळवळीस मूक संमती दिली. मराठवाडा विकास आंदोलनातही शिरवाडकरांनी भाग घेतला. तेव्हाही त्यांनी असेच त्यागपत्र खिशात ठेवले होते.

आणीबाणीचा कालखंड! औरंगाबादेस तत्कालीन गव्हर्नर विद्यापीठात आले होते. शासनाविरुद्ध आणीबाणीच्या कार्यात सहभागी होणाऱ्या प्राध्यापकांवर कारवाई करणारा एक ठराव सरकारतर्फे येणार होता. त्यासंबंधी खुद्द गव्हर्नरसाहेबांनाच शिरवाडकरांनी धाष्ट्यांने प्रश्न विचारला आणि गव्हर्नरांना खुलासा करायला लावला. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा तर सध्या ऐरणीवरचा विषय आहे. याबाबत प्राचार्य शिरवाडकर वॉल्टेअरचं उदाहरण देतात.

वॉल्टेअरने रुसोला एकदा सांगितले होते...

''तुम्ही लिहिलेला मजकूर मला कदाचित मान्य नसेल; पण तो मजकूर लिहिण्याचे तुम्हाला स्वातंत्र्य आहे आणि ते कुणी हिरावून घेणार असेल तर त्यासाठी मी प्राणपणानं लढेल'' हेच तत्त्वज्ञान शिरवाडकर यांचेही आहे. चार कन्या, जावई, नातवंडे देशापरदेशात आहेत. पण 'विशाखा' मधील हा ८० वर्षांचा 'वॉल्टेअर' अजूनही लेखन-वाचन-चिंतनात मग्न आहे.

■ ■ ■

# १४. मुलांची पाखरबाग

पुण्यातील एका प्रसिद्ध पुस्तकालयातलं एक दृश्य !

एक पालक आपल्या मुलाला घेऊन आले होते. त्याला काही पुस्तकं घ्यायची होती. दुकानदार विविध पुस्तके दाखवीत होता. एवढ्यात एक लेखकं तिथं आले. मग त्या दुकानदारानं त्या पालकाची ओळख करून दिली. भारदस्त व्यक्तिमत्त्व, नम्र पण करारी भाव असलेली शांत मुद्रा, शास्त्रज्ञासारखे वाढलेले केस आणि टोकदार नजर असलेल्या त्या लेखकाची पालकाला ओळख झाली; पण पालकानं अगदी औपचारिक प्रतिसाद दिला.

एकीकडं विक्रेता त्या मुलाला पुस्तकं दाखवीतच होता. त्या मुलानं एका पुस्तकाची निवड केली. शेजारी तो लेखक होताच. तो मुलगा ते पुस्तक कुरवाळत होता. वडिलांनी ते पुस्तक विकत घेतलं आणि विक्रेत्याला राम राम करून ते मुलासह निघाले. एवढ्यात....

दुकानाचे जाणकार मालक आले. त्यांनी मुलाला विचारलं, या लेखकाची ओळख झाली का ?

"हो झाली" पालक थोड्याशा निर्विकारपणे म्हणाले.

"मुला, तू कोणतं पुस्तक घेतलंस ?"

"फास्टर फेणे, " मुलगा तत्काळ म्हणाला.

"मग त्याचे लेखक ते हेच ?" मालक म्हणाले.

आणि मग त्या पालकांची मुद्रा एकदम बदलली.

मघाचे निर्विकार भाव सविकार झाले, सादर झाले आणि मुलगाही कौतुकानं हळून मान वर करून लेखकाकडं बघत होता. लेखकानं हळूच खिशातलं एक चॉकलेट काढून त्या मुलाला दिलं. मुलगा खूश झाला. ज्या लेखकानं 'फास्टर फेणे' हे पुस्तक लिहिलं त्याच लेखकानं त्याला चॉकलेट दिलं. अत्यंत आनंदलेल्या त्या मुलाच्या चेहऱ्यावर तुडुंब समाधान होतं..

मग तो मुलगा महिनाभर शाळेत सांगत सुटला होता... मला फास्टर फेणेनं

चॉकलेट दिलं.

मुलाला चॉकलेट देणारा फास्टर फेणे, या पुस्तकाचा तो लेखक म्हणजे प्रसिद्ध बालसाहित्यकार भा.रा.भागवत!

भा. रा. भागवत यांची जन्मशताब्दी यंदा आहे.

भागवतांबद्दल गमतीदार रीतीनं त्यांच्या एका कनिष्ठ स्नेह्यानं म्हटलं आहे...

गांधीजींनी या देशाला मूलोद्योगाची प्रेरणा दिली; पण खरा 'मूलो'द्योग आयुष्यभर केला तो भा.रा.भागवत यांनी... मूलोद्योग या समासाची फोड 'मुलांसाठी केलेला उद्योग' अशी करायला हवी.

भागवत दाम्पत्यानं खरोखरीच आयुष्यभर मुलांसाठी शब्दोद्योग केला. मुंबई आकाशवाणीवर लीलावतीबाईंनी आपल्या उजळ कारकिर्दीत बालविश्वाला एक उजळ कोपरा मिळवून दिला आणि त्यांचे पती भा.रा.भागवत यांनी आपली लेखणी मुलांसाठी वापरली. मुलांचे भावविश्व अचूक जाणणारा, रंजनातून प्रबोधन करणारा आणि मोठं असूनही लेखणीतील बाल्य जपणारा एक भारदस्त लेखक म्हणजे भा.रा.भागवत!

साहित्यकृती आणि साहित्यिक यांची फारच थोडी समीकरणे मराठी साहित्यविश्वात उमटली आहेत; पण एक समीकरण मात्र सदाकाळ सिद्ध आहे. फास्टर फेणे म्हणजे भा.रा.भागवत असं ते समीकरण आहे. भागवत आठवले की फेणे आठवलाच पाहिजे आणि फेणेची याद आली की भा.रां.च्या आठवणीनं मन भारावून गेलंच पाहिजे असं ते समीकरण आहे.

उभी हयात मुंबापुरीत काढलेल्या भागवत दाम्पत्यानं आपलं निवृत्त आयुष्य पुण्यनगरीत काढण्याचं ठरवलं आणि सिंहगड रस्त्याला त्यांनी एक आगळवेगळं निवासस्थान बांधलं....त्याच नावं पाखरबाग! आनंदनगरमधील पाखरबाग!! पाखरबाग म्हणजे पाखरांची बाग असाही अर्थ घ्यावा किंवा पाखरबाग म्हणजे ज्या बागेत पाखर मिळते, माया मिळते, जिव्हाळा मिळतो ती बाग असाही अर्थ घ्यावा. पाखरबागेत पूर्वीचे आश्रमीय पर्यावरण बघायला मिळायचे.

या पाखरबागेच्या धन्यानं पाखरांसाठी अनेक उपक्रम तिथं राबवले. तिथं मुलं हसली, खेळली, बागडली, पंख पसरून नाचली आणि तेच मुलांचं विश्व भा.रा.भागवत यांच्या लेखणीतून साकार झालं... भा. रा. भागवत नावाची पाखरबाग जन्माला आली, त्याला शंभर वर्ष होत आहेत.

■ ■ ■

# १५. तळेगावकरांचा खटाटोप

अरुण रामचंद्र तळेगावकर ! इतर अनेक नावांसारखं हे नाव पण या तळेगावकरानं ग्रंथाची तळी उचलण्याचं जे काम गेली अनेक वर्षे चालवलं आहे ते पाहून भलेभले ग्रंथप्रेमी, ग्रंथलेखक, ग्रंथपाल, ग्रंथविक्रेतेही थक्क होतील.

कोथरूडच्या आपल्या घरातून पत्नी मीराताईंचा निरोप घेऊन, पुस्तकानं भरलेल्या धोपटीसह सकाळी आठ वाजताच तळेगावकर बाहेर पडतात. मग पुणे विद्यार्थीगृहासमोर नृसिंह मंदिर, रेणुकास्वरूपसमोर आप्पा पुरोहितांचं दुकान दहा वाजता, बालगंधर्व रंगमंदिरातील कॅन्टीनच्या अड्ड्यावर अकरा वाजेपर्यंत, तेथून पुढे एका चार्टर्ड अकौंटंट ग्रंथप्रेमींनी थाटलेल्या कर्वे रस्त्याच्या गल्लीतील छोट्या ग्रंथालयात, मग दुपारी चारच्या सुमारास स.प.महाविद्यालयामागे शिक्षण प्रसारक मंडळीच्या दत्तो वामन पोतदार ग्रंथसंग्रहालयात..आणि सहा वाजता परत घरी... असा तळेगावकरांचा ठरलेला कार्यक्रम असतो. या सर्व कार्यक्रमात आणि या सर्व थांब्यांवर पुस्तकांची देवघेव आणि पुस्तकावरील चर्चा असा महत्त्वाचा कार्यक्रम असतो. त्यांच्या धोपटीतील पुस्तकं मग कुणातरी जिज्ञासूच्या पिशवीत जाऊन पडतात आणि दक्ष जिज्ञासूने परत दिलीच तर ती पुस्तके पुन्हा तळेगावकरांच्या धोपटीत येतात.

गोखले इन्स्टिट्यूट, वाडिया कॉलेज इथं ग्रंथपाल म्हणून असलेले तळेगावकर सेमी कंडक्टर कंपनीत गेले आणि सेल्स व मार्केटिंग हाच व्यवहार ते करू लागले. हे करता करता अडवानी ऑर्लिकॉनमध्ये ते येऊन पोहोचले आणि पुढं इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर म्हणून त्यांनी काम केलं. जीवनाला अशी ही वेगवेगळी आश्चर्यकारक वळणं मिळत असली तरी त्यांचा मूळचा प्रवास हा ग्रंथयात्रेचा होता. मग सारे उपप्रवाह या मूळ प्रवाहाला येऊन मिळाले आणि ग्रंथप्रेमी अरुण तळेगावकर या शब्दगंगेत मनसोक्त डुंबू लागले.

तळेगावकरांच्या ग्रंथसंग्रहात कितीतरी जुनी दुर्मिळ पुस्तके आहेत आणि त्यांचं वैशिष्ट्य असं की त्या प्रत्येक पुस्तकाला काही विशेष पार्श्वभूमी आहे. उदा राजगोपालाचारी हे भारताचे पहिले गव्हर्नर जनरल. त्यांच्या स्वत:च्या

सहीचं एक पुस्तक तळेगावकर अभिमानानं लोकांना दाखवतात, तर बॅ.आप्पासाहेब पंत यांची सही असलेलं 'औंधचा राजा' हे पुस्तक त्यांच्या संग्रही असल्याचा विलक्षण अभिमान त्यांच्या डोळ्यातून डोकावत असतो.

कोणताही ग्रंथपाल हा वाचकांचा 'फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाइड असतो' तळेगावकर तसे आहेत. ते वाचकमित्र, वाचन मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ आहेत. त्यांच्याजवळ एखादे पुस्तक नसले तर आपल्या दुचाकीवरून ते नेमक्या ठिकाणी चकरा मारतील. रस्त्यांवरील पुस्तक विक्रेत्यांकडे जातील, ग्रंथालयामधील कपाटे शोधतील आणि वाचकाला योग्य तो ग्रंथ मिळवून देतील.

हा त्यांचा खटाटोप लौकिकार्थाने 'नितकामकर्म' या स्वरूपाचाच आहे. स्वत: पुस्तके शोधायची, खरेदी करायची, जपायची, धोपटीतून वागवायची, लोकांना वाचायला द्यायची आणि ती परत मिळवायची. त्यांचे लाभार्थी हे लाभार्थी होतात; पण तळेगावकर तसेच राहतात.

याबाबत एक विलक्षण अनुभव त्यांना आला.

सरस्वती मंदिर, बाजीराव रस्ता या ठिकाणी बसणाऱ्या एका जुन्या पुस्तकांच्या विक्रेत्याकडून तळेगावकरांनी एक पुस्तक विकत घेतले. त्याला कव्हर घालून, ठाकठीक करून ठेवले. एका वाचकाला ते आवर्जून वाचायला दिले. बरेच दिवस झाले तरी पुस्तक मिळाले नाही. ज्यांनी नेले होते ते जिज्ञासू वाचक जिज्ञासू तृप्तीनंतर पुस्तकासह गायब झाले. कुणाला विचारणार ? आणि मग...एक दिवस तळेगावकरांना तेच पुस्तक त्याच विक्रेत्याकडं विक्रीच्या गठ्ठ्यात मांडून ठेवलेले दिसले.

तळेगावकरांनी ते पुस्तक दुसऱ्यावेळी त्याच विक्रेत्याकडून विकत घेतले. एकाच पुस्तकाची दोनदा खरेदी !

असे तळेगावकर आपल्या संसारात तृप्त आहेत. दमयंती, देवेंद्र या कन्या-पुत्रांनी त्यांना ग्रंथकार्यासाठी सोडून दिलेले आहे.

बक्षी, पाळंदे, बलदोटा, अरुण पटवर्धन, सुहास भोळे या समविचारी मित्रांच्या संवादात रममाण होणारे तळेगावकर बालगंधर्व कॅन्टीनमध्ये राया पटवर्धन, विजय काळे आणि अण्णा जोशी यांच्या मेळाव्यात एखादं जुनं पुस्तक उलगडून दाखवतात..पण त्याचवेळी त्यांच्या मनाला हुरहूर लागलेली असते की शि.प्र.मंडळीच्या दत्तो वामन पोतदार ग्रंथसंग्रहाचं काम अजून म्हणावं तसं मार्गी लागलेलं नाही. तिथली ग्रंथावरील धूळ हातांवर झेलत अजूनही ते तिथं उत्साहानं काम करतात.

■ ■ ■

# १६. नर्मदेश्वरमध्ये न्यायाधीश

प्रसिद्ध कथालेखक कै.अरविंद गोखले आणि भारताचे सरन्यायाधीश कै. यशवंतराव चंद्रचूड हे शाळकरी मित्र. एका बाकावर नू.म.वि.मध्ये शिकलेले म्हणून त्यांचा स्नेह दृढ. गोखले सरकारी खात्यात नोकरीस लागले आणि चंद्रचूड वकिली करीत न्यायाधीश झाले. लेखणीच्या प्रांतात गोखले यांची मुशाफिरी धडाक्यात सुरू होती. पुण्याला सदाशिव पेठेत टिळक विद्यापीठ वाड्यासमोर (भुताचा वाडा) गोखले यांचे घर. पुढे गोखले मुंबईला नोकरीनिमित्तानं गेले; पण पुण्यात नेहमीच यायचे. आले की पेरूगेटसमोर कै.दि.बा.मोकाशी यांच्या रेडिओ दुरुस्तीच्या दुकानात ते नेहमीच गप्पा मारायला येत. मग शेजारीच असलेल्या नर्मदेश्वर अमृततुल्यचा चहा मागवला जाई. अशा मैफलीत सवडीनुसार अनेक लेखक येत. विद्याधर पुंडलिक, व्यंकटेश माडगूळकर, श्री.पु.भागवत, अरविंद गोखले, श्री.ज.जोशी, द.मा.मिरासदार, विजय तेंडुलकर, कधी कधी दत्तो वामन पोतदारही तिथं डोकावत असत. मोकाशींचं दुकान म्हणजे साहित्यिक अड्डाच होता.

यशवंतराव चंद्रचूड यांची सुप्रीम कोर्टावर न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली आणि ते दिल्लीला वास्तव्यासाठी गेले. मग गोखले आणि चंद्रचूड या शाळकरी मित्रांच्या भेटी कमी होऊ लागल्या.

केव्हातरी मनसोक्त गप्पा मारण्यासाठी भेटलं पाहिजे, असं दोघांनाही वाटत होतं. मग एकदा गोखले यांनीच सांगितलं...आपण पुण्यातच भेटू. पुण्यात मी शनिवार-रविवार जातोच. गोखले यांच्या पुण्यातल्या घरातच चंद्रचूडांनी यायचं असं ठरलं होतं. तोपर्यंत एरवीच्या गप्पांमध्ये दि.बा.मोकाशी यांचा साहित्यिक अड्डा आणि नर्मदेश्वरचा चहा याबद्दल चंद्रचूड यांना गोखले यांनी सांगितलेलं होतंच.

एका शनिवारी चंद्रचूड यांना पुण्यात टाऊन हॉल कमिटीत हिराबागेत एका

सभेसाठी यायचं होतं. सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश या नात्यानं कौन्सिल हॉलजवळील सरकारी विश्रामधामात ते उतरले होते; पण सभेनंतर त्यांनी गोखले यांच्या घरी सदाशिव पेठेत यायचं आणि घरी खूप गप्पा मारायच्या असं ठरलं.

चंद्रचूड यांनी दिलेली वेळ टळून गेली. एक तास झाला. चंद्रचूड आले नाहीत. मग कंटाळून गोखले यांनी आपल्या पत्नीला सांगितलं, 'तो आता फार मोठा झालाय. येईल असं वाटत नाही. मी आता दि.बा.मोकाशींच्या दुकानात जातो.''

आणि गोखले मोकाशींच्या दुकानी गेले.

सभेला खूप उशीर झाल्याची चुटपुट चंद्रचूड यांना लागली होती; पण त्यांचा नाइलाज होता. सभा संपल्यावर ते तडक सरकारी लाल दिव्याच्या गाडीनं गोखले यांच्या घरी गेले.

वहिनींनी सांगितलं, 'ते आत्ताच मोकाशींच्या दुकानी गेले.''

मित्राची भेट तर घ्यायची तीव्र इच्छा होती; पण भारताच्या सरन्यायाधीशानं एखाद्या दुकानात जाऊन मित्राशी गप्पा मारणं जरा अवघड होतं. गोखले यांना घेऊन कुठल्या तरी उंची हॉटेलात जाऊ, असा विचार करून चंद्रचूड यांनी गाडी तिकडे घेण्यास चालकाला सांगितलं. दुकानासमोर लाल दिव्याची गाडी उभी केली तर उगीच बभ्रा होतो. तेव्हा पेरूगेट ते शिवाजी मंदिर या रस्त्यावर त्यांनी चालकाला गाडी पार्क करण्यास सांगितली. सुरक्षा रक्षकालाही गाडीतच बसायला सांगितलं आणि स्वत: उतरून पायी चालत चंद्रचूड मोकाशींच्या दुकानी गेले. मित्र-मित्र भेटले. परमानंद झाला. नर्मदेश्वरचा चहा मागावायचं ठरलं; पण चहा यायला उशीर होईल म्हणून अमृततुल्यात जाऊनच चहा घेऊ असं मोकाशी आणि गोखले म्हणाले. चंद्रचूडांना जरा अवघडल्यासारखं वाटलं; पण दोनच मिनिटात तिथून गोखल्यांना घेऊन जाऊ, असा विचार करून त्यांनी संमती दिली...सुरक्षारक्षक व चालक पलीकडं होते. आणि मग....

अरविंद गोखले आणि दि.बा.मोकाशी हे लेखक आणि भारताचे सरन्यायाधीश होणारे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड ही त्रिमूर्ती शेजारच्या नर्मदेश्वर भुवनमध्ये गेले अमृततुल्याचा आस्वाद घ्यायला.

पलीकडं गाडीतील वायरलेसवर कौन्सिल हॉलमधून मेसेज आला होता. दिल्लीहून चंद्रचूडांशी महत्त्वाच्या व्यक्तींना बोलायचे होते. मग चालकानं धावपळ

केली. तो शेजारच्या पेरूगेटवर गेला आणि पेरूगेटचा पोलिस चंद्रचुडांना शोधण्यासाठी मोकाशींच्या दुकानात गेला. तिथल्या माणसानं नर्मदेश्वरकडं बोट दाखवलं...

पेरूगेटचे पोलिस इन्स्पेक्टर नर्मदेश्वरकडे धावले आणि काय दृश्य बघितलं... मोकाशी–गोखले हे दोन लेखक आणि भारताचे सरन्यायाधीश अमृततुल्याचा आस्वाद घेत आहेत...

इन्स्पेक्टरनं खाड्कन सलाम ठोकला. तेव्हा मित्रमंडळ विसर्जित झालं.

■ ■ ■

# १७. नांगर, चरक आणि झाड

किर्लोस्कर उद्योगसमूहाचे शिल्पकार लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी कुंडलच्या माळरानावर एक उद्यमनगरी वसवली होती. तीच होती किर्लोस्करवाडी. शेतीसाठी आवश्यक ती वेगवेगळी यंत्रे निर्माण करण्याचे अनेक प्रयोग लक्ष्मणरावांनी केले. १९१६ मध्ये इंग्रज सरकारने लक्ष्मणरावांना 'केसर-ई-हिंद' हे मानाचे चांदीचे पदक देऊन त्यांचा गौरव केला.

युद्धकाळात लक्ष्मणरावांनी आपल्या दूरदृष्टीने आपल्या उद्योगात सर्व बाजूंनी वाढ केली होती. सर्व पेठांमध्ये किर्लोस्करांनी आपले उत्तम बस्तान बसविले होते. कारखाना सतत वाढत होता. कारखान्याची वाढ करण्यासाठी लोखंड आणि वीज मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणं गरजेचं होतं. त्यासाठी लक्ष्मणरावांनी सातारा जिल्ह्यातील पाटण, गोवा, कोल्हापूर इथले कित्येक डोंगर पालथे घातले. कच्चे लोखंड कुठे मिळेल याचा शोध घेतला.

युद्धकाळामुळे इंग्लंडहून येणाऱ्या नांगरांची वाढ पूर्णपणे थांबली होती. आता किर्लोस्करांच्या देशी नांगराला खूप मागणी होती. नांगरांचा प्रसार वाढविण्यासाठी, त्यांची उपयुक्तता लोकांना पटवून देण्यासाठी जाहिराती देणे, घाऊक विक्रेत्यांची नेमणूक करणे या गोष्टी तर लक्ष्मणरावांनी केल्याच; पण ते काम अधिक नेटाने चालविण्यासाठी कुणीतरी फिरता प्रचारक नेमावा, असं लक्ष्मणरावांना वाटलं. ते अशा एका तरुणाच्या शोधात होते.

आणि असा तरुण त्यांना मिळाला.

या उत्साही तरुणाचं नाव होतं भाऊ...भाऊ पायगोंडा पाटील...

हे भाऊ पायगोंडा पाटील म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील. त्यांनी सुरुवातीच्या काळात किर्लोस्करांच्या नांगराचा उत्तम प्रसार केला. गावोगाव हिंडले. एका दौऱ्यावरून परत येताना त्यांनी उसाच्या चरकांची मोठी मागणी आणली. त्या वेळी नीरेचा कालवा नुकताच झाला होता. त्यामुळे बारामती भागात ऊस हे

मुख्य पीक झाले. तिथं लोखंडी चरकाची मोठी मागणी वाढली. मग लक्ष्मणरावांनी 'कमाल' नावाचं चरकाचं मॉडेल विकसित केलं. प्रथम हे मॉडेल लोकांना आवडलं नाही. मग लक्ष्मणरावांनी काय केलं....

भाऊराव पाटील आणि लक्ष्मणराव यांनी शेजारी चाललेल्या घाण्यावरून उसाची चिपाडे आणली आणि ती चिपाडे या चरकात घातली. रस गळू लागला. रसाची धार लागलेली पाहून लोकांना हा चरक अधिक उपयुक्त वाटला. काही काळानं भाऊराव पाटील यांनी हे काम सोडलं आणि ते एका वेगळ्याच क्षेत्रात गेले.

सातारा इथं भाऊरावांनी शिक्षणाच्या कार्याला वाहून घेतलं...त्यांनी तिथं रयत शिक्षण संस्थेचं झाड लावलं. हे झाड अनेकांना सावली देणारं होतं; पण त्याचवेळी भाऊराव नांगर विसरले नाहीत. जाता जाता भाऊरावांनी आणखी एक मोठं काम केलं होतं.

खानबहादूर धनजीशा कूपर यांना सातारा इथं त्यांनी एक कारखाना काढण्यासाठी सहकार्य केलं. लोखंडी नांगरांचा कारखाना सातारा इथंही सुरू झाला. किर्लोस्कर कारखान्याची एक मुळी त्यांनी सातारा इथंही लावण्यास मदत केली.

एकीकडे हे करतानाच रयत संस्थेचा वृक्षही बहरत होता. शिक्षणापासून वंचित असलेल्या अनेक गरीब मुलांना या संस्थेत 'कमवा व शिका' या योजनेद्वारे आधार दिला आणि शिक्षणाची बंद कवाडं खुली करून दिली. बॅ.पी.जी. पाटील, शिवाजीराव भोसले यासारखे पुढं नामवंत झालेले विद्याव्रती भाऊरावांनी लावलेल्या या झाडाच्या सावलीतच वाढले.

रयत शिक्षण संस्थेचं मानचित्र झाड हेच आहे. महाराष्ट्रातील कृषिक्रांतीला वेग देणाऱ्या लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा नांगर लोकप्रिय करणारे भाऊराव पाटील यांनी नंतर महाराष्ट्र विद्येची क्रांती घडवून आणली आणि..एक उद्योगमहर्षी आणि एक कर्मवीर.

नांगर आणि झाड..महाराष्ट्राच्या क्रांतीची दोन प्रतिके!

■ ■ ■

# १८. लोकमान्यांचा वारसदार

सोलापूरच्या नॉर्थकोट हायस्कूलचा एक विद्यार्थी ! नाव वालचंद ! वडिलांचं नाव हिराचंद. वालचंदच्या जन्मानंतर १५ दिवसातच त्याच्या आईचं निधन झालं. वालचंदचं संगोपन त्याच्या आजीनं आणि चुलतीनंच केले. गंमत अशी की लहानग्या वालचंदला शेळीच्या दुधावर वाढविण्यात आलं. असं सांगतात की शेळीच्या अंगावरच त्याला पाजविण्यात येत असे आणि खरेपणाचा भास निर्माण व्हावा म्हणून शेळीला साडीही नेसविण्यात येत असे.

वालचंद हा पुढे उद्योगपती होणार याच्या खुणा लहानपणापासूनच दिसून येत होत्या. वडील हिराचंद यांच्याकडे येणारीजाणारी माणसे अनेक होती. वालचंद लहान होते. लहानगा वालचंद या पादत्राणांकडे निरखून बघत होता. बरीच पादत्राणं विखुरलेली होती. आतल्या दिवाणखान्यात मंडळी बोलत बसली होती आणि छोटा वालचंद या पादत्राणांशी खेळण्यात गुंग झाला होता.

बराच वेळ झाला. हिराचंद यांना शंका आली म्हणून ते बाहेर डोकावले. पाहतात तर वालचंद पादत्राणांशी काही तरी करीत होता. हिराचंदांनी निरखून बघितलं..

वालचंद ती सर्व पादत्राणे एका रांगेत लावून ठेवत होता. त्या पादत्राणांची विशिष्ट रचना करण्यात तो अगदी गुंग होऊन गेला होता.

''वालचंद, बेटा हे काय चाललं आहे ?'' हिराचंद यांनी कौतुकभरल्या आवाजात त्याला विचारलं.

''आगगाडीचा रस्ता बनवतोय मी,'' वालचंद उत्तरला.

कसं केले होतं त्यांनी ?

एकाच आकारच्या चपला दोन रांगेत विभागून सरळ रुळांसारख्या ठेवल्या होत्या.

बुटाच्या कमानी व बोगदे त्या रुळांवर होते आणि वालचंदने त्या पादत्राणांचा

रेल्वेमार्ग तयार केला होता. शाळेत हुशार म्हणून प्रसिद्ध असलेले वालचंद खेळाच्या मैदानावरही प्रख्यात होते.

गणित विषयाची आवड आणि साहित्याची मात्र आवड असलेले वालचंद यांच्या मनावर अनेक थोर शिक्षकांचा प्रभाव होता. डेक्कन कॉलेजचे प्रो. बेन, सेंट झेविअर्सचे फादर बॉस्थिन आणि संस्कृतचे प्रख्यात पंडित राजारामशास्त्री भागवत यांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. साहित्य, संगीत, कला यामध्ये वालचंदशेठजींना विलक्षण रस होता. संगीत नाटकांना ते आवर्जून जात.

पुढे मोठे उद्योगपती झालेल्या वालचंदशेठनी अगदी तरुणवयापासून लोकांना मदत केली.

लोकमान्य टिळकांनी राजकीय क्रांतीसाठी सारा भारत जागा केला; पण त्याच काळात आर्थिक व औद्योगिक स्वातंत्र्यासाठी वालचंदशेठजींनी खूप परिश्रम केले आणि उद्योगक्षेत्राचा कायापालट केला.

एकदा वालचंदशेठजी आपल्या एका सहकाऱ्यासह परप्रांतात एका खेड्यात गेले होते. त्या काळी एवढ्या खाणावळी नव्हत्या. भोजनालये किंवा डायनिंग हॉल नव्हते. खेड्यात एका गृहस्थाश्रमी व्यक्तीकडे त्यांची जेवणाची सोय झाली. निरोपाच्या वेळी त्या गृहस्थांची चौकशी केली आणि काय आश्चर्य...

त्या गृहस्थांकडे चार दिवसांनी एक पार्सल आलं. त्यात दोन ताटं, सहा वाट्या, दोन पेले अशी सुंदर चांदीची भांडी होती...तेव्हा त्या गृहस्थांना समजलं की आपल्याकडे शेठ वालचंद जेवून गेले आहेत. 'लोकमान्यांचा स्वातंत्र्याचा वारसा आर्थिक क्षेत्रात चालवणारे उद्योगपती' असा वालचंदजींचा त्यावेळी गौरव करण्यात आला.

■ ■ ■

## १९. "धन्य हा निधडा वैष्णव वीर ! सारंगधर आणिला !!"

चौदाव्या शतकाचा उत्तरार्ध काळ ! विजयनगरच्या कृष्णदेवरायाचा हा काळ ! याच काळात एकनाथमहाराजांचे प्रपितामह संत भानुदास होऊन गेले. पैठणमधील समृद्ध ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेले भानुदास लहानपणापासूनच चिकित्सक वृत्तीचे होते.

एकदा गोदाकाठी ते गेले असताना एक तपस्वी नाक धरून बराच वेळ बसलेला त्यांना दिसला. भानुदासांना कुतूहल वाटले. त्या योग्याची समाधी उतरताच छोटा भानुदास त्याच्यासमोर जाऊन उभा राहिला. हात जोडले.

"काय हवंय बाळा तुला ?" योग्यानं विचारलं.

"शंका आहे."

"विचार."

"आपण नाक धरून का बसता ?"

"याला प्राणायाम म्हणतात."

"तो का करायचा ?"

"याला योगसाधना म्हणतात."

"ती का करायची ?"

"परमेश्वरप्राप्तीसाठी."

"किती वर्षे करता आहात ?"

"अखंड करतोच आहे."

"तरी परमेश्वर भेटला नाही ?"

"तू अजून लहान आहेस."

योग्याच्या या उत्तरानं भानुदासाचं समाधान झालं नाही. असाच एकदा भानुदास रुद्र म्हणणाऱ्या पंडिताकडं गेला. त्यानं पंडिताला विचारलं...

"आपण म्हणता त्याचा अर्थ मला सांगाल का ?"

''अर्थाची चौकशी करू नकोस. उत्तम पाठांतर कर..''

''पण आपण जे पाठ करतो त्याचा अर्थ तर समजायला हवा.''

''परंपरेने जे सांगितलंय तेवढंच करायचं.''

पंडिताच्या या म्हणण्यामुळे भानुदासाचं समाधान झाले नाही. तो सतत सत्याच्या शोधात होता. देवाच्या शोधात होता. भानुदास पाठशाळेत जाऊ लागला; पण पाठशाळेतील पाठांतरानंही त्याचं समाधान झालं नाही. उलट पाठशाळेतील गुरुजी त्यालाच मंदबुद्धी म्हणायला लागले.

मग भानुदास उठला आणि तडक गावाबाहेरच्या देवालयात गेला. तिथं त्यानं कडक तप केलं. अन्न-पाण्याविना चिंतनात मग्न झाला.

एका ब्राह्मणाच्या रूपात भानुदासाला देवाची भेट झाली आणि मग भानुदास अज्ञानी लोकांसाठीच परमार्थाचं निरुपण करू लागला.

एक विलक्षण घटना घडली.

विजयनगरचा राजा कृष्णदेवरायानं पंढरीच्या विठ्ठलाची खूप भक्ती केली आणि त्यानं प्रत्यक्ष पांडुरंगालाच पंढरीहून विजयनगरला येण्यासाठी साकडं घातलं.

पुंडलिकाच्या भक्तीमुळं पांडुरंग पंढरीत राहिले. आता ते विजयनगरला कसे जाणार; पण कृष्णदेवरायानं हट्टच धरला आणि त्यानं विठ्ठलाला विजयनगरला नेलं.

वारीचे दिवस आले होते. हजारो विठ्ठलभक्त पंढरीत येणार! त्यांना कळलं तेव्हा ते व्याकुळ झाले. मग त्यांनी भानुदासांना विनवलं. संतोबा आणि गणोबा यांनी भानुदासांना साकडं घातलं.

मग भानुदास विजयनगरात आले. देवालयातील कडी-कुलूपात पांडुरंगाला पाहून त्यांचं मन व्यथित झालं. त्यांनी पांडुरंगाष्टक म्हणण्यास सुरुवात केली आणि पांडुरंगानं भानुदासांना साक्षात्कार घडविला.

भानुदासांसाठी पांडुरंगानं स्वत: लघुरूप घेतलं आणि भानुदास शेकडो भक्तांच्या मांदियाळीत विठ्ठलमूर्ती घेऊन पंढरीस आले.

पंढरीचे लाखो वारकरी आनंदानं नाचू लागले आणि म्हणाले-

''धन्य हा निधडा वैष्णव वीर! सारंगधर आणिला!!''

■ ■ ■

# २०. सांगली ते सानव्हितो व्हाया कोथरूड

इटलीमधील रोमजवळचं सानव्हितो नावाचं एक छोटसं टुमदार गाव.५०-५५ वर्षांच्या लुचिया नावाच्या एक बाई गुण्यागोविंदानं राहत होत्या. दिवस छान चालले होते; पण केव्हा तरी छातीत वरच दुखायचं. अर्थातच डॉक्टरांना दाखवलं. निदान झालं स्तनाचा कर्करोग! या जीवघेण्या रोगावरचे उपचारही तितकेच जीवघेणे असतात. केमोथेरेपी, रेडिओथेरेपी मग शस्त्रक्रिया. असे उपचार किती त्रासदायक असतात, हे लुचियाबाईंना माहीत होते. त्यांनी हे उपाय करून घेण्यास साफ नकार दिला. सानव्हितो गावी वर्षातून तीन-चार वेळा परदेशातले एक डॉक्टर येत असत. हे डॉक्टर वैद्य होते. आयुर्वेदाचार्य होते. त्यांचे अनेक रुग्ण तिथं असत. लुचियाबाईंना कोणीतरी या डॉक्टराचं नाव सुचवलं. हे डॉक्टर भारतातले होते. लुचियाबाईंनी निश्चय केला की कोणी काहीही म्हणो, आपण याच वैद्य असलेल्या डॉक्टरांचं औषध घ्यायचं.

इटलीतील आयुर्वेदाचा सल्ला देणाऱ्या भारतातील या डॉक्टराचं नाव होतं डॉ. पांडुरंग हरी कुलकर्णी! त्यांना तिथं पी.एच.म्हणत. पी.एच. यांनी लुचियाबाईंना तपासलं. आयुर्वेदाची औषधं दिली. मानसिक स्वास्थ्यासाठी गायत्री मंत्र म्हणायला सांगितला आणि डॉक्टर भारतात परतले. सहा महिन्यांनंतर लुचियाबाई डॉक्टरांना भेटायला आल्या तेव्हा त्या खूपच उत्साहित होत्या. बाई म्हणाल्या, ''पी.एच., मी आता बरी झाले. तुमच्या सल्ल्याप्रमाणे अजूनही संरक्षक औषधे घेते आणि मुख्य म्हणजे मी दर रविवारी येथील चर्चमध्ये मी ध्वनिक्षेपकावरून सर्वांना गायत्री मंत्र सांगते.

सांगलीच्या पांडुरंगाची इटलीतील सानव्हितोपर्यंतही कोथरूडद्वारा घेतलेली झेप विलक्षण आहे. सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये शिकणारा पांडुरंग लहानपणापासूनच धडपड्या होता. वडील हरिभाऊ कुलकर्णी यांचं अडतीचं दुकान होतं. तिथे ते छोटीसी फार्मसी चालवत. निरनिराळी औषधं करून विके.

तेच बाळकडू पांडुरंगाला मिळालं आणि मग तो पुण्याला टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून उच्च वैद्यकीय पदवीधर झाला. पुण्यात कोथरूडला म्हातोबा मंदिराजवळ राहून तिथंच त्यानं प्रॅक्टिस सुरू केली.

रुग्णांची नाडीपरीक्षा करता करता पांडुरंगाला समाजाचीही नाडीपरीक्षा करण्याचा छंद जडला आणि मग धडाक्यानं तो समाजप्रवण होऊ लगला. आयुर्वेद रसशाळा, ऑल इंडिया इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन अशासारख्या अनेक संस्थांचा तो कित्येक वर्षे पदाधिकारी होता. पुणे विद्यापीठाची आयुर्वेद शाखाही पांडुरंगानं विभूषित केली. त्याचवेळी आपल्या सांगली मित्र मंडळालाही तो विसरला नाही. सीताराम गाडगीळ, शांताराम कुलकर्णी, मधु खाडिलकर, मंगमुळी, सहस्रबुद्धे, महादेव भट, वासुदेव फाटक, सुभाष भेंडे, मुकुंद दीक्षित, कॅलिग्राफीवाला र.कृ.जोशी यांच्या मेळाव्यात तो अजून रमतो. खरं तर देशापरदेशात पांडुरंगाचे अनेक कार्यक्रम सतत असतात; पण वेळ काढून तो मित्र मंडळीत रमतो. त्यांच्या या मित्रांनी त्याला पदवी दिली 'इंटरनॅशनल पांडुरंग' !

हा इंटरनॅशनल पांडुरंग धन्वंतरीदिनाला पूर्ण भारतीय पोशाखात भक्तिभावानं धन्वतंरी पूजन करतो. स्वतःच्या कविता म्हणतो. आता तर पांडुरंगाचा व्याप वाढला आहे. पत्नी विभावरी यांची या पांडुरंगाला रुक्मिणीसारखी साथ आहे. पुत्र सागर आणि पवन वडिलांचा वारसा चालवीत आहेत. कन्या अचला तर त्याच्या काळजाचा तुकडाच !

वर्षातून पाच-सात वेळा युरोपची वारी करणारा हा इंटरनॅशनल पांडुरंग आपली नातवंडं रोहित, वेदांग, अथर्व, आदित्य, गौरी यांच्या मेळाव्यात रमलेला असतो. मानसी आणि सविता या सुना त्याच्या लेकीच ! जामात श्रीपाद तारे पुत्रवत. जेनिफर पॅटन ही डॉ. कुलकर्णी यांची रुग्ण त्यांना देवच मानते. जगभर हवेतून फिरणाऱ्या या पांडुरंगाची नजर मात्र आपल्या मातृभमीवर आहे. सांगली ते सानव्हितो व्हाया कोथरूड असा त्याचा प्रवास आहे.

■ ■ ■

# २१. बोकिलांच्या शाळेत शन्ना

डोंबिवलीतलं ते जुनं घर म्हणजे जणू गोष्टीचं पुस्तकच होतं. त्या घरातला प्रत्येक जण गोष्टीवेल्हाळ होता. त्यातल्या छोट्याला त्याचे वडील, त्याची आई, त्याची मोठी भावंडं गोष्टी सांगायची. वडील फारसे शिकलेले नव्हते. त्या काळच्या भाषेत तीन बुकच शिकलेले होते; पण त्यांचं निरीक्षण आणि मग निवेदन विलक्षण प्रभावी होतं. डोंबिवली ते मुंबई प्रवास हजारो लोक करतात; पण या मुलाचे ते गोष्टीवेल्हाळ वडील प्रवासानंतर त्या प्रवासाची जी हकीगत सांगायचे त्यामध्ये कितीतरी जिवंत गोष्टी असायच्या आणि मुलगा तन्मयतेनं त्या गोष्टी ऐकायचा. गाडीला गर्दी होती किंवा गाडीत गर्दी नव्हती, हीसुद्धा सांगण्यासारखी गोष्ट आहे. दोन्ही वेळचं वातावरण फार वेगळं आहे, याचे संस्कार त्या मुलाच्या मनावर झाले.

पुढं हा मुलगा नामवंत कथाकार, प्रख्यात नाट्यलेखक, अ.भा.नाट्यसंमेलनाचा आधार झाला.

त्याचं नाव...शं.ना.नवरे !

त्यांना सगळे 'शन्ना' या नावानं ओळखतात.

लहानपणी शन्ना झोप येत नसली की, आईला म्हणायचे- "गोष्ट सांग."

मच्छरदाणीत बसून आईची गोष्ट ऐकता ऐकता बाळ शन्ना झोपी जायचा. आई गोष्टी इतक्या छान सांगायची की अरबी भाषेतील सुरस गोष्टीत हा मुलगा बगदाद शहरात आणि अलिबाबाच्या गुहेत हिंडून येई.

मग शन्ना मोठा झाला. शिकला. नोकरी लागली.

त्याला असं वाटलं की बालपणी मला गोष्टींचा इतका खजिना माझ्या घरच्यांकडून, समाजाकडून मिळाला आहे. ..तर त्या बाबतीत मीही काही लोकांचं देणं लागतो.

आपण गोष्टी लिहून मोठं व्हावं असं शन्नाला वाटू लागलं. काही तरी केलं

पाहिजे. लिहिलं पाहिजे, या विचारानं शन्ना नावाचा तरुण झपाटून गेला.

त्या काळी वि.वि.बोकील हे जागलेले नामवंत लेखक होते. त्यांची भाषा सोपी आणि नैसर्गिक असे सहजसंवाद, मिस्किलपणा हे बोकिलांच्या लेखनाचं वैशिष्ट्य !

मग शन्ना पुण्यात वि.वि.बोकील यांना भेटायला आले. त्या वेळी बोकील जोगेश्वरीच्या बोळात नू.म.वि.शाळेच्या मागे राहत होते. शन्ना यांनी बोकिलांकडे जाण्यापूर्वी त्यांची बहुतेक सर्व पुस्तकं वाचली होती. शन्नांनी दार ठोठावलं. बोकिलांनी हसून स्वागत केलं.

बोकील शन्नांशी खूप मोकळेपणानं बोलले आणि शन्ना यांच्या मनावरचं दडपण कमी झालं.

"मलाही थोडंफार लिहिता येतं. मला कथा लिहायच्या आहेत." शन्ना म्हणाले.

तेव्हा किंचित हसून बोकील त्यांना म्हणाले," चांगला विचार आहे. पण तुम्हाला एक गोष्ट सांगतो..."

"सांगा..तुमचं मार्गदर्शन मला हवंय," शन्ना म्हणाले.

"गोष्टी लिहा; पण छापायला कुठं पाठवू नका," बोकील म्हणाले.

" का बरं ?" शन्नांनी साशंक स्वरात विचारलं.

"चांगल्या पंचवीस-तीस कथा आधी नुसत्याच लिहा. एका पाठोपाठ लिहा. मग त्या तीस कथांमधील तुम्हाला चांगल्या वाटणाऱ्या दोन-तीन कथा कुठंतरी पाठवा. लिहिता लिहिता तुमचं तुम्हाला कळेल की आपल्या लेखनात किती आणि कशी प्रगती झाली आहे." बोकील म्हणाले.

बोकील मास्तरांनी शन्ना नावाच्या शिष्याला हा धडाच दिला. मग शन्ना यांनी बोकील मास्तरांच्या तीस कथांचा लेखनकोर्स पूर्ण केला आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यातील तीन कथा निवडून मासिकांकडे पाठविल्या. कथा छापून आल्या. लेखक म्हणून 'शं.ना.नवरे' हे नाव शन्नांनी पाहिलं, तेव्हा उरी आनंद दाटून आला आणि बोकील मास्तरांच्या कथाशाळेत शिकण्याचं सार्थक वाटलं.

■ ■ ■

# २२. कर्क युद्धाची समाप्ती

हरणासारख्या उड्या मारणारा गोरागोमटा संदेश एक दिवस मधेच शाळेतून आला आणि पोट दुखतंय म्हणून शरीराचं वेटोळं घालून पलंगावर पडून राहिला. मग ऑफिसातल्या कामाला रेशनिंग लावून आई धावली आणि डॉक्टरांकडे नेलं. वाटलं अपचन, गॅस यामुळं झालं असेल. जुजबी उपचारांनी थोडं बरं वाटलं, तरी पुढच्या आठवड्यात पुन्हा तसंच झालं.

शाळेतून येऊन उपचाराच्या वेळी आबांच्या मांडीवर डोकं ठेवून संदेश झोपू लागला. आबांचा चेहरा काळजीनं काळवंडला. त्यांना ज्योतिष कळतं होतं. त्यांनी सुनेला आणि मुलाला हळूच सांगितलं, "सांभाळा ! वाघोबा येतोय"...

त्यांच्या या उद्‌गारांचा नीटसा उलगडा कुणालाच त्या वेळी झाला नाही; पण एक महिन्यानं आणखी काही तपासण्या केल्या तेव्हा कळलं की पोराच्या देहाच्या फांदीवर कर्करोगाचं घुबड बसलंय !

सारेच घाबरले. आईला तर वाटलं आपल्या प्रगतीच्या वाटा आता बंद झाल्या आहेत. वडिलांना वाटलं आपल्या सांसारिक जीवनातला प्रकाश आता काळवंडलाय ! आबांच्या 'वाघोबा आलाय' या उद्‌गारांची संगती लागली...

आणि मग सुरू झाली संदेशची कर्कयुद्धाशी लढाई !

दोन खोल्यांचा संसार. आवक बेताची. वाढता संसार. तरी आबांच्या पेन्शनची साथ होती. आता प्रवास हातघाईचा !

मुंबईला टाटाच्या वाऱ्या कराव्या लागत. तिथं राहणार कुणाकडं तोही एक प्रश्न एका आप्तानं सोडवला. संदेश, आई आणि बाबा इथून रेल्वेनं जायचे. रात्री पोहोचायचे..अंथरुण तयार असायची...दुसऱ्या दिवशी मग टाटा इस्पितळात त्या युद्धभूमीवर अनेक कर्कसैनिक असायचे. कुणाची तरी प्रतिभा कामी आली. 'जयंत' भावनेनं या संकटावर मात करायची, असं सर्वांनी ठरवलं.

उपचार सुरू झाले. रेडिओथेरेपी. काही वेळा शस्त्रक्रिया, या मजल्यावरून

त्या मजल्यावर...सभोताली सगळेच कर्करोगी ! आणि त्यांचे काळजीनं काळवंडलेले नातेवाईक !

कॉटवर संदेश नळी घालून पडलेला. शेजारी आई आणि बाबा ! केमोथेरेपीची ती नसा आणि रक्त जाळणारी औषधं कर्करोगाच्या क्रूर सैनिकांवर हल्ला करता करता शे-पन्नास चांगले सैनिकही मारत असत. वेदना व्हायच्या. उलट्या व्हायच्या. पण पोरानं हूं का चूं केलं नाही.

कोकणातल्या रसाळ टपोऱ्या सुगंधी हापूस आंब्यासारखा संदेशचा असलेला देह देशावरच्या सुकलेल्या रायवळ आंब्यासारखा दिसू लागला. डॉक्टर उपचार करीत होते. पुणे-मुंबई प्रवास सुरु होता. या वेळी संदेशसाठी कुणी कुणी काय काय करावं ? शेजारची एक म्हातारी त्याच्या गोजिरवाण्या चेहऱ्यावरून हात फिरवून कळवळ्यानं म्हणाली, 'पोरा, मी म्हातारी ! तुझ्यासाठी धावपळ मला नाही रे करता येणार; पण तुझ्यासाठी मी जप करते.' असं म्हणून म्हातारी जपाला बसायची. म्हातारीनं लाखाचा जप केला.

सगळी सोंग करता येतात; पण पैशाचं ! पण या युद्धातही नियतीनं साथ दिली. संदेशच्या आईचा माहेरचा जुना वाडा होता. आईनं अत्यंत कष्टानं आपलं शिक्षण केलं होतं. तिला तिच्या मेव्हण्यांचा खूप आधार होता. त्यांनी ती वास्तू मार्गी लावली. या युद्धासाठी संदेशच्या आईला रसद पोहोचवली.

मग दिवस 'निल रिपोर्ट' आला... वाघोबानं माघार घेतली होती. संदेशच्या चेहऱ्यावर तकाकी दिसू लागली. वाघोबा गेला. बरोबर आबाही गेले. वाघोबा गेला तरी त्याच्या पाऊलखुणा पंधरा वर्षे राहतात, असं डॉक्टरांनी सांगितलं. दरवर्षी तपासायला जायचं ! एव्हाना संदेश आई-वडिलांच्या विवाहाला पंचवीस वर्षे झाली. रौप्यमहोत्सवी वर्ष सुरू झालं. पंधरा वर्षे लढाईत गेली; पण ज्या दिवशी पंचविसावं वर्ष सुरू झालं त्या दिवशी मुंबईहून रिपोर्ट आला. संदेश आला...संदेश खडखडीत बरा झाला. कर्कयुद्धाची समाप्ती झाली. सुखद संदेशाची गंधाली सर्वांना समाधान देती झाली.

■ ■ ■

# २३. ये लम्हा फिलहाल जी लेने दे

ऑगस्ट १९८५ सालचा निगडीतला गणेशोत्सव. तीन वर्षांची एक चिमुरडी तिसरी मराठी पाठ्यपुस्तकातील एक कविता न चुकता धीटपणे म्हणते, 'चिव चिव चिव रे. तिकडे तू कोण रे?' टाळ्यांच्या पाऊस पडतो. बाबांच्या बदलीमुळे या मुलीला नागपूर, जळगाव, सांगली, सोलापूर येथे हिंडावं लागतं. १९९४ साली ही मुलगी लूना चालवायला शिकली आणि नंतर काही वर्षातच स्कुटरच नव्हे तर सफाईदारपणे कारही चालवू लागली. अश्विन महिन्यात जन्मलेली म्हणून चंद्रहास-सुनंदा या तिच्या आई-वडिलांनी तिचं नाव अश्विनी ठेवलं. दिसामाजी अश्विनी वाढू लागली. अश्विनी नावाचं एक फुलपाखरू मोठं व्हायला लागलं आणि मग तिच्या उमलत्या व्यक्तिमत्त्वाचे चमत्कार सर्वांना थक्क करून सोडायला लागले.

गणेशोत्सवात दारासमोर सुंदर रांगोळी काढणारी अश्विनी, मंगेशीच्या देवळात जाताना नऊवारी साडी नेसायला शिकणारी अश्विनी,

कुठल्याही क्लासला न जाता गोड गाणी गाणारी अश्विनी,

मित्र-मैत्रिणींसाठी रिलिफ सेंटर असणारी अश्विनी,

वृद्ध व्यक्तींना आपण होऊन आपल्या गाडीवर लिफ्ट देणारी अश्विनी,

हौसेनं रक्तदान करून इतरांना प्रेरणा देणारी अश्विनी,

'नो मोअर टीअर्स मम्मा' असं दुःखाच्या वेळी आईलाच सांगणारी अश्विनी,

जप्तीवाले माणगावकर कुटुंबीयात आपल्या लडिवाळपणामुळे आणि धाडसी दीर्घोद्योगामुळे सर्वांना प्रिय असलेली अश्विनी,

अश्विनीनं तरुण वयातच देहदान आणि नेत्रदान करण्याची इच्छा बोलून दाखविली होती.

युनायटेड वेस्टर्न बँकेचे अधिकारी चंद्रहास जप्तीवाले आणि पत्रकार व लेखिका सुनंदा जप्तीवाले यांची अश्विनी ही लाडकी कन्या. अगदी चार-पाच वर्षांची असतानाही घरी एक समारंभ होता. तेव्हा समारंभात नंतर तिने सगळ्या

डिशेस, कपबशा धुवून स्वच्छ करून घरातल्यांना मदत केली हाती. फर्ड इंग्लिश बोलाणारी अश्विनी सर्व वाहनं आत्मविश्वासानं चालवायची.

'ये लम्हा फिलहाल जी लेने दे' हे तिचं अत्यंत आवडतं गाणं आणि या गाण्यात सांगितल्याप्रमाणे अश्विनी स्वत:च ते गाणं जगली. कधीही उद्याची वाट न पाहणाऱ्या अश्विनीनं आज आपल्या मुठीत ठेवून उद्यावर हसत खेळत स्वार होण्याची तयारी ठेवलेली होती.

विशीतली अश्विनी शिक्षणासाठी पुण्यात एकटी राहत होती. १५ वर्षांची असताना पुणे-सोलापूर महामार्गावर दहा किलोमीटर बाईक स्वत: चालवून अश्विनी आपल्या भावाबरोबर-सुहासबरोबर-सोलापूरला आली होती.

अश्विनीचा लहान भाऊ सुहास पनवेलला होता. तिथे भयानक पूर आला होता. बहिणीला हे कळताच ती भावाच्या मदतीला धावली. चिखलात शिरून तिनं भावाच्या संसारातलं सामान सुखरूपपणे बाहेर काढायला मदत केली. त्या वेळी इतरांच्या हातावर सुदंर मेंदीकाम करणारे तिचे हात चिखलानं माखलेले होते. पनवेलहून लोधिकळीला सगळं सामान पोहोचतं करण्यासाठी अश्विनीनं पुढाकार घेतला होता. ३१ जुलैला ही घटना घडली. मग त्याच रात्री निगडीला एका नातेवाइकाच्या घरी निहालच्या वाढदिवसानिमित्त सगळे जमले होते. त्या आनंदात अश्विनी सहभागी झाली. अश्विनीला गाणे म्हणण्याचा खूप आग्रह झाला. मग तिचे सूर हवेवर स्वार झाले. गोड आवाजाने सर्वांचे कान तृप्त झाले. ते आवडतं गाणं अश्विनीनं म्हटलं..

'ये लम्हा फिलहाल जी लेने दे'

मैफल संपली. रात्री कोथरूडला परत येतानाही सर्वांच्या खूप गप्पा झाल्या. १ ऑगस्ट सोमवार ! सकाळ झाली.. जो तो आपल्या नित्य उद्योगाला लागला. अश्विनी सकाळी लवकर कॉलेजसाठी बाहेर पडली.

वाडिया कॉलेजच्या रस्त्याला लागली. गर्दीतून नेहमीप्रमाणे ती सफाईदारपणे वाहन चालवत होती. वाट काढीत होती...

आणि...

कसला तरी प्रचंड आवाज झाला...

वाडिया कॉलेजसमोरच्या चौकात गर्दी ठप्प झाली होती. अवाढव्य ट्रेलरचं धूड पिसाळलेल्या राक्षसासारखं उभं होतं आणि त्याखाली एक कोवळी कळी चिरडली गेली होती.

ही कोवळी कळी म्हणजेच अश्विनी जप्तीवाले. २२ वर्षांची तड़फदार,

अल्लड, बुद्धिमान तरुणी...एका क्षणाचा खेळ. होय एका क्षणाचाच खेळ होता. पण तो क्षण सारं संपवून गेला.

वाडिया कॉलेजसमोरचा चौक शोककळा पसरून सुन्न झाला होता. अश्विनीचे सूर त्या वातावरणातही गुणगुणत होते....

'ये लम्हा फिलहाल जी लेने दे'

■ ■ ■

# २४. अक्षरांचं आक्रित

बबन पोतदार यांच्या आक्रितच्या कथासंग्रहाची पाच वर्षांच्या आत तिसरी आवृत्ती निघाली. 'गुंजेचा पाला' या कथासंग्रहाच्याही चार आवृत्त्या निघाल्या. हे आक्रित घडलं कसं ? सध्याच्या जगात बबन पोतदारांना हे मानाचे तुरे प्राप्त झाले कसे ? ते त्यांच्या अक्षरामुळेच.

सातारा जिल्ह्यातील मसूर हे छोटं गाव. या गावातील एक-प्राथमिक शिक्षक पोतदार ! अवतार जमदग्नीचा. पाच मुलं, त्यातली एक मुलगी. पोरं माळावरची रानफुलं वाढतात तशी वाढत होती. त्यातलं एक टपोरं टवटवीत फूल म्हणजे बबन. मसूरला संरक्षणमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांची सभा होती. त्या सभेत एका पोरानं उत्स्फूर्तपणे भाषण केलं. टाळ्यांचा कडकडाट झाला. संरक्षणमंत्री खूश झाले. त्यांनी त्या मुलाला स्वाक्षरी दिली. तोच बबन पोतदार !

पोराचा हा पराक्रम गावकऱ्यांनी शांताबाईंच्या (आईच्या) कानावर घातला. स्वातंत्र्यसैनिक विष्णुमास्तरांनी तेव्हाच भविष्यवाणी केली, "शांताई, तुझा बबन कुणीतरी मोठा होऊन नाव काढणार बघ." बबन मसूरच्या शाळेत शिकला. एस.एस.सी.ला होता तेव्हा त्याचं पुस्तक बरंच फाटलं होतं. मग बबननं काय करावं ? दुसऱ्याचं पुस्तक आणून आपल्या पुस्तकातले फाटलेल्या पानांवरील धडे स्वत:च्या सुंदर हस्ताक्षरात लिहिले आणि ती पानं पुस्तकाला जोडली. छापलेल्या पानांपेक्षा त्याची ही हस्तलिखित पानं सुंदर होती. एस.एस.सी.ला फॉर्म फी भरायलाही पैसे कमी पडले, अशा अवस्थेत बबन शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाला. आता पुढच्या शिक्षणाचा प्रश्न ! रोजच्या जीवनाची जमवाजमव करावी लागे तिथं कॉलेजात कसं जाणार !

पण बबन उठला आणि तडक कऱ्हाडला गेला. एका नातेवाईक मित्रानं छप्पर दिलं. पण फी ? कॉलेजशिक्षण परवडणारं नव्हतं. बबन प्राचार्यांकडे गेला, त्याचा हस्तलिखित अर्ज प्राचार्यांसमोर होता. ते मोत्यासारखं टपोरं अक्षर

बघूनच प्राचार्य खूश झाले. बबननं त्यांना आपली अडचण सांगितली. प्राचार्य म्हणाले, 'आजपासून इथल्या सर्व फलकांवर आमच्या महाविद्यालयाच्या सर्व सूचना, विविध बातम्या आणि काही निवेदन तू तुझ्या हस्ताक्षरात लिहीत जा. तुला फी माफ.'

आणि बबनला फलकलेखनाचं काम मिळालं. त्याच्या सुंदर हस्ताक्षरानं हे आक्रित घडवलं होतं. मग बननची क्षितिजं रुंदावली. मार्ग मिळाला. धडपडीला रस्ता गवसला. बबन पदवीधर झाला. त्याला आयकर खात्यात नोकरी मिळाली. विवाह झाला. शांताबाईचा मुलगा विजयाबरोबर संसार करून वाटचाल करतानाच त्याला नशिबानं पुष्कराज गवसला.

आता बबन पोतदाराचा आयकर अधिकारी बबनराव पोतदार झाला होता; पण बबनराव केवळ आयकराच्या नोकरीवर समाधानी नव्हते. त्यांच्यातला साहिंत्यिक त्यांना स्वस्थ बसू देईना. आयकर कार्यालयात हिशोबाचे तक्ते मांडण्यासाठी आणि ते तपासण्यासाठी त्यांची लेखणी चाले; पण तीच लेखणी रात्रीच्या वेळी एखादी लघुकथा लिहिण्यासाठी आसुसलेली होती. मग पोतदार लिहू लागले. आकाशवाणी, दूरदर्शनवर त्यांच्या लेखनाचं स्वागत होऊ लागलं. मानसिंग पवार, रवींद्र महाजनी, माधव चव्हाण यांचा स्नेह लाभला. बबनराव नोकरीनिमित्तानं शहरात आले. खूप हिंडले, पण मातीची नाळ तुटली नाही. ते मसूरला वारंवार जातात. तिथल्या वाड्या-वस्त्यांत हिंडतात. बायाबापड्यांशी बोलतात. बालमित्रांच्या संगतीत काळ घालवतात आणि येताना अनेक देशी कथाबीजं घेऊन येतात.

म्हणून त्यांचा कथा म्हणजे आईच्या हृदयाचा हुंकार असतो. त्यांच्या कथा म्हणजे मसूरच्या मातीचा मृदगंध असतो. 'गुंजेचा पाला' आणि 'आक्रित' हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या आवृत्त्या निघाल्या. पोतंभर पुरस्कार मिळाले. शरश्चंद्र मुक्तिबोध पुरस्कार, सातारा जिल्हा साहित्यरत्न पुरस्कार हे त्यातले काही पुरस्कार! 'आक्रित'मधल्या काही कथांचं हिंदीत भाषांतर झालं. अनेक कार्यशाळामधून 'आक्रित' कथांचं वाचन झालं. निवृत्त झालेले पोतदार अजूनही लेखणी सरसावून आहेत. या त्यांच्या यशाचं आक्रित कशात आहे? त्याच्या सुंदर हस्ताक्षरात! कारण त्या सुंदर हस्ताक्षरानंच पुढील जीवनाच्या वाटा उलगडून दिल्या! अक्षरानं घडवलं आक्रित.

■ ■ ■

# २५. आनंदबनातील निर्मल-गोपाळ

माहेरची मूळची सांगलीची, पण नंतर सातारा इथं स्थायिक झालेली किराणे घराण्यातील निर्मला मुंबईचा गोपाळ किराणे यांची सहचरी झाली आणि शिक्षण व साहित्य या दोन्ही क्षेत्रात रस असणाऱ्या त्या दोघांची आनंदमय संसारयात्रा सुरू झाली. सुरुवातीला परळच्या चाळीत संसार मांडला. दीड खोलीतला संसार! गोपाळराव तीन नोकऱ्या करीत होते. दोघाचीही आपापल्या रणक्षेत्रावर लढाई सुरू होती. वेळ पुरत नव्हता. गोपाळरावांवर आणखी काही जबाबदाऱ्या होत्या. विवाहानंतर पुन्हा एकदा विद्यार्थिपद स्वीकारून निर्मला बी.एड. झाली. १९६२ साली दोघांनीही एकाच वर्षी एम.एड. पदवी मिळवली.

एकीकडे नोकरी, व्याख्याने, निरनिराळ्या ठिकाणी मार्गदर्शन आणि संसार या सर्व गोष्टी सांभाळून निर्मला-गोपाळ यांनी आणखी एक वेगळे धाडस केले-

'आनंदबन' नावाची प्रकाशन संस्था सुरू केली.

पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या काळात अशी प्रकाशन संस्था सुरू करणे म्हणजे धाडसाचं काम होतं; पण किराणे पती-पत्नी दोघांनाही साहित्याची आवड होती, त्यामुळे त्यांनी हे धाडस केलं. पुस्तक प्रकाशनाच्या व्यवसायातली एक मोठी अडचण अशी असते पुस्तकाचं वितरण कठीण असतं. किराणे दाम्पत्याला याबाबत फारच सुखावह अनुभव आले.

पुस्तक विक्रीसाठी त्यांना कोणत्याही दुकानात एकदाही जावं लागलं नाही. १९६४ ते १९८९ एवढ्या दीर्घकाळात 'आनंदबन' प्रकाशनाने अनेक पुस्तके प्रकाशित केली, पण एकदाही ऑन सेल पुस्तक कोणत्याही दुकानात ठेवले नाही. निरनिराळ्या शाळांमध्ये स्वत: जाऊन त्या प्रती किराणे देत. वर्षाला एखाद्या पुस्तकाच्या कमीत कमी एक हजार प्रती खपत. मुंबईच्या बालमोहन विद्यामंदिराचे दादासाहेब रेगे यांनी तर किराणे यांना सांगूनच ठेवलं होतं...

"पुस्तक काढले की त्याच्या २५ प्रती 'बालमोहन'ला देत चला."

'आनंदबन' प्रकाशनाचं पहिलं पुस्तक होतं पं. नेहरूंचं चरित्र 'प्यारे चाचा'- मुंबई महानगरपालिकेनं या पुस्तकाच्या नऊशे प्रती घेतल्या. दोन महिन्यात दुसरी आवृत्ती काढावी लागली.

मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी होत्या डॉ. माधुरीबेन शहा. निर्मल-गोपाळ त्यांना भेटायला गेले. माधुरीबेन यांनी या शिक्षक दाम्पत्याचं अत्यंत आदराने स्वागत केलं आणि सांगितलं.

"किराणे, तुम्ही दोघंही शिक्षक आहात. मुलांच्या हाती कोणती पुस्तकं असावीत हे तुम्हीच चांगलं जाणता; पण तुम्ही स्वत: एवढं कशाला हिंडता ?"

"अहो, त्याशिवाय पुस्तकं कशी खपतील." किराणे म्हणाले.

"एका शिक्षक दाम्प्त्याला पुस्तकांसाठी असं फिरावं लागावं हे मला बरोबर वाटत नाही. माझ्यापुरता मी त्यातून मार्ग काढते." माधुरी बेन म्हणाल्या.

"आपण मार्ग सुचवा. आम्ही त्याप्रमाणे करू." किराणे म्हणाले.

माधुरीबेन आता आणखी कोणता मार्ग सांगतात याबाबत किराणे यांना उत्सुकता होती. थोडी काळजीही वाटत होती. कारण पुस्तक खरेदीबाबत निरनिराळ्या संस्थांमध्ये कोणते व कसे व्यवहार होतात याची थोडीशी कल्पना किराणे यांना होती. 'आनंदबन' प्रकाशनाच्या वतीनं असे कोणतेही अंधारातले व्यवहार करायचे नाहीत हे किराणे पती-पत्नी यांनी आधीपासूनच ठरवलं होतं. त्यामुळं माधुरीबेन काय सांगतात याची ते वाट बघत होते. मग माधुरीबेन म्हणाल्या...

"तुमचं कोणतंही पुस्तक प्रसिद्ध झालं की त्यासंबंधी एक अर्ज मुंबई महानगरपालिकेकडं पाठवा आणि पुस्तक रजिस्टर्ड बुक पोस्टानं पाठवा. मराठी माध्यमाच्या जेवढ्या शाळा असतील तेवढ्या तुमच्या प्रती मी नक्की घेईन."

माधुरीबेन यांच्या या आश्वासनामुळं किराणे पती-पत्नींना आपण खरोखरीच आनंदबनात आहोत असं वाटलं.

मग आनंदबन प्रकाशनाची दमदार वाटचाल सुरू झाली. किराणे दाम्पत्याने मुलांच्या वाचनाच्या आनंदबनात उत्तम विहार करता यावी म्हणून पुस्तकांच्या किमती अत्यल्प ठेवल्या होत्या...

१९६६ मध्ये प्रकाशित झालेल्या लालबहादूर शास्त्री या पुस्तकाची किंमत

तर त्यांनी एक रुपया ठेवली होती.

आनंदबन प्रकाशनच्या या धोरणामुळे अगदी गरीब मुलांनाही स्वत: पुस्तक घेऊन वाचण्याचा आनंद मिळाला.

आनंदबनातील निर्मला-गोपाळ यांचे जीवन कृतार्थ झालं.

गोपाळराव गेले. निर्मलाताई आता पुण्यात धन्यतेचे जीवन अनुभवत आहेत.

■ ■ ■

# २६. संरक्षणमंत्र्यांची स्वप्नपूर्ती

१९६४-६५ च्या सुमारास घडलेली एका शाळेतील एक गोष्ट. प्रतिवर्षी स्नेहसंमेलनाला कुणीतरी नामांकित पाहुणा बोलावायचा तर तो शाळेचा माजी विद्यार्थी असला पाहिजे, हा त्या शाळेचा अलिखित संकेत होता; पण त्या वेळच्या मुख्याध्यापकांनी आणि कार्याध्यक्षांनी हा संकेत या वर्षापुरता बाजूला ठेवायचं ठरवलं. भारत-चीन युद्ध झालं होतं. भारत-पाक युद्धाचं सावट होतं. मग तत्कालीन संरक्षणमंत्र्यालाच संमेलनासाठी पाहुणा म्हणून पाचारण करायचं ठरलं.

भारताचा संरक्षणमंत्री...

एका शाळेच्या साध्या स्नेहसंमेलनाला अध्यक्ष म्हणून येणार कसा, हा अनेकांना पडलेला प्रश्न बरोबरच होता.

खडा टाकून तर बघू, असा विचार संस्थेनं केला आणि काय आश्चर्य ! संरक्षणमंत्र्यांचं उत्तर आलं...

''निमंत्रणाचा स्वीकार केला आहे. संमेलनाला येतोय.''

शाळेच्या आवारात या बातमीनं आनंदीआनंद झाला. स्नेहसंमेलनाची जोरदार तयारी सुरू झाली आणि आधीचे पंधरा दिवस सगळी शाळा स्नेहसंमेलनमय झाली होती...

शाळा होती पुण्याची प्रख्यात नूतन मराठी विद्यालय... आणि स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे होते भारताचे संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण !

यशवंतरावजी सुसंस्कृत, व्यासंगी वक्ते, मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारसरणीचा पगडा असलेले तत्त्वचिंतक !

होकाराचं पत्र आलं. सचिवांचा फोन आला तरी अनेकांच्या मनात शंका होतीच की अर्धा होकार कळवला असला तरी ऐनवेळी मंत्री येणार नाहीत. आपल्या अवाढव्य देशाच्या गुंतागुंतीचे राजकारणात असलेल्या आणि त्या वेळी संरक्षणाचे प्रश्न ऐरणीवर असताना यशवंतरावजी या साध्या कार्यक्रमाला येऊ शकणार नाहीत. ते ऐनवेळी कळवतील... अशी अनेकांनी भविष्यवाणी केली.

पण यशवंतरावजींनी ही भविष्यवाणी खोटी ठरवली. हे स्नेहसंमेलनाला

आवर्जून उपस्थित राहिले. भव्य मंडप, तीन हजार विद्यार्थी, शिक्षक-पालक, शहरातले विशेष निमंत्रित! पत्रकारांनी तर गर्दीच केली होती.

मुख्याध्यापक डॉ. प्र. न. जोशी यांनी एका तरुण शिक्षक लेखकांकडून एक नाटिका मुद्दाम लिहून घेतली होती. शाळेतील शिक्षक कवठेकर, ताडफळे, भिंगे, राजे या कलाशिक्षकांनी हिमालयाचा भव्य सेट तयार केला होता. नंतरच्या काळात कलाक्षेत्रात गाजलेले नंदू पोळ, प्रकाश भोंडे इत्यादी मुलांनी या नाटिकेत कामं केली होती. मुख्य भूमिका दीपक माहुलीकर या पाचवीतल्या चुणचुणीत मुलानं केली होती. भारत-पाकिस्तान युद्धाची पार्श्वभूमी असलेल्या या कल्पनारम्य नाटिकेत 'जेव्हा देव अवतरतात'- दीपकनं इतकी उत्तम भूमिका केली की यशवंतरावजींनी या मुलाला लाडानं आपल्या मांडीवर बसवून घेतलं आणि नंतर आपलं मुख्य भाषण या नाटिकेवरच आधारित असं केलं.

गच्च सभामंडप यशवंतरावजींचे शब्द आतुरतेनं ऐकत होता.

यशवंतरावजी म्हणाले...

"मुलांनो, मी तुमच्याएवढाच असताना कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होतो. आमचं कऱ्हाड हे लहानसं गाव. प्रीतिसंगमावरच्या या गावाला कृष्णामाई, कोयनामाईनं वाढवलं. तिच्या किनाऱ्यावरच्या वाळूत आम्ही खेळलो. आम्हीही तुमच्यासारखीच मस्ती करायचो, शेतात जायचो... पण अभ्यासाच्या वेळी अभ्यासही करायचो. दुवेदी नवाचे मास्तर होते. छान शिकवायचे..."

यशवंतरावजींचे मधाळ शब्द मुलं कान टवकारून ऐकत होती आणि मग पालक-शिक्षक, निमंत्रित या मोठ्या माणसाकडं निर्देश करून यशवंतरावजी म्हणाले, "मी या शाळेच्या स्नेहसंमेलनाचं निमंत्रण कसं स्वीकारलं, याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटत असणार, याची मला कल्पना आहे. त्याचं रहस्य सांगतो. कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये असताना एका आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्यासाठी मी नूतन मराठी विद्यालय या शाळेत आलो होतो. नू.म.वि.चा केवढा मोठा दबदबा होता! या भव्य आणि प्रशस्त विद्यामंदिरात मला शिकायला मिळालं असतं तर... असा विचार माझ्या मनात तेव्हापासून येत असे आणि मग वाटलं केव्हा ना केव्हा या संस्थेचा, या वास्तूचा, या विद्यामंदिराचा पवित्र स्पर्श आपल्याला व्हायला हवा. ते माझं स्वप्न होतं. त्या स्वप्नाची पूर्ती आज स्नेहसंमेलनाचा अध्यक्ष या नात्यानं झाली. मी स्वत:लाच धन्य समजतो." यशवंतरावजींच्या या उद्गारामुळे सारा सभामंडप रोमांचित झाला होता.

■ ■ ■

# २७. ...आणि त्याला घर मिळालं

कोपरगाव तालुक्यातल्या टाकळी गावी असणारं एक कुटुंब! त्यातल्या चार भावंडातला एकुलता एक मुलगा, आईचा लाडका. लाडानं शिकायचा नाही म्हणून आईनं आपल्या बहिणीकडं या मुलाला शिकायला पाठवलं. वडिलांचं अचानक निधन झालेलं. संसाराची जबाबदारी ती माऊलीच पेलत होती. हा लाडका लेक चौथीपर्यंत शिकला आणि आईनं जगाचा निरोप घेतला. आई-वडिलांविना या लेकाला आता प्रवास करायचा होता. आपली वाट आपणच शोधायची होती.

मावशीच्या घराशेजारीच एक गुरुजी राहत होते. ते शिकवण्या घेत. दोघा मुलांबरोबर तिसरा मुलगा बसवला तरी वेगळे काही करावं लागणार नाही म्हणून दादाजी रतन शेवाळेगुरुजी या लेकालाही शिकवत. तो अर्थातच निःशुल्क विद्यार्थी होता; पण गुरुजींची त्याच्यावर माया होती. शेवाळेगुरुजींचा प्रेमळ हात त्याच्या पाठीवरून फिरत होता. औरंगाबादला शासकीय विद्यानिकेतन होतं. ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय शासनानं या शाळेत केली होती. शेवाळेगुरुजींनी त्याला या शाळेच्या प्रवेश परीक्षेला बसायला लावलं. त्यासाठी असणारं पन्नास पैसे शुल्क त्यांनीच भरलं. तो उत्तीर्ण झाला.

भविष्याचं दार तर उघडलं होतं; पण पुढची वाटचाल करायची, तिथं राहायचं तर निरनिराळ्या वस्तू आणण्यासाठीही सुमारे ५०० रुपये खर्च होता. मग शेवाळेगुरुजीच पुढं झाले. त्यांनी गावातल्या लोकांकडून, संस्थांकडून पैसे गोळा केले आणि तो लेक विद्यानिकेतनात दाखल झाला. विद्यानिकेतनात त्याला आपली वाट सापडली. सहा वर्षे तो या शाळेत शिकला. मारुफखान, द. कृ. काळे या प्राचार्यांनंतर एक दिवस एक उत्साही प्राचार्य विद्यानिकेतनाला मिळाले. त्यांचं नाव दिलीप गोगटे!

गोगटेसरांच्या वत्सल छायेखाली दमदार वाटचाल सुरू होती. भित्तिपत्रकाचा तो संपादक झाला. शाळेत पहाटे गाणी लावत असत. तेही काम त्यानं हौसेनं केलं. स्कूल कॅप्टनची निवडणूक तो हरला तरी त्या निवडणुकीनं त्याला

आत्मविश्वास दिला.

गोगटेसर धडधडणाऱ्या मुलांचा आधारवड!

प्रार्थनेत सुविचार सांगायला हाच विद्यार्थी.

बातम्या सांगायला तोच.

भोजनगृहात देखरेखीच्या कामावरही तोच.

अशी दमदार वाटचाल करीत बालपणी बौद्धिक कुपोषण झालेला 'तो' आता शारदेच्या दरबारात बाळसे धरू लागला.

पण... आता या दरबारातून त्याला रजा घ्यावी लागणार होती.

दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढं काय, हा जटिल प्रश्न 'आ वासून' उभा होताच. गंगापूरला परत जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. मावशीच्या घरी शिक्षणाचं वातावरण नव्हतं.

दहावीनंतर शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका हाती घेऊन गंगापूरच्या वाटेवर जाण्यासाठी तो थांबला होता. त्याला विद्यानिकेतनातले 'सोनेरी दिवस' आठवले... आणि समोर आलेले गोगटेसर...

"काय, आता कुठं जाणार?" सरांनी अथांग प्रेमळ स्वरात विचारलं.

"सर माझ्यासारखी मुलं कुठं जाणार... ?" त्याचे डोळे डबडबले होते.

"आधी तू शाळेच्या मेसमध्ये जेवून ये. मग ऑफिसात भेट." सर म्हणाले. तो जेवून आला. पोट भरलं होतं; पण मन अजून रिकामंच होतं आणि त्यात निराशेच्या पाकोळ्या फडफडत होत्या.

सरांनी समोरची फाईल बाजूला ठेवली आणि ते म्हणाले, "आमच्या घरी राहशील... ?"

सरांचा तो प्रश्न म्हणजे आधीच उत्तर मिळालेला प्रश्न होता. ते आश्वासन होतं. तो प्रश्न म्हणजे प्रचंड 'दिलासा' होता. त्या प्रश्नात जीवन व्यवहाराचे अनेक कुंभ एकवटले होते. त्या तीन शब्दांनी अनेक समस्या सोडविल्या होत्या.

पुढं तीन वर्षे तो दिलीप गोगटे यांच्या घरचाच एक सदस्य म्हणून राहिला... गुरू-शिष्य एवढेच एक नि:शब्द नातं होतं.

त्या तीन शब्दांनी आणि त्यापुढील प्रश्नचिन्हानं त्याला घर मिळवून दिलं होतं. घरट्यातल्या पाखराला पंख फडफडविण्यासाठी खुलं आभाळ मिळावं तसं झालं. त्याला घर मिळालं, घर मिळालेला हा दिलीप गोगटेसरांचा विद्यार्थी पुढे एका वृत्तपत्राचा संपादक झाला!

■ ■ ■

# २८. सहा टिंबांची किमया

फ्रान्समधील पॅरिसजवळचं कुप्रे नावाचं गाव. या गावात सिमोन ब्रेल हे खोगीरं बनविण्याचा व्यवसाय करून, आपला चरितार्थ चालवीत. घरापुढंच दुकान होतं. सिमोन यांचा सर्वात लहान मुलगा लुई, त्यांचा लाडका होता, शेंडेफळ ना ! लुई तीन वर्षांचा असताना, तो चामडं कापण्याच्या सुरीशी खेळत होता. खेळता-खेळता सुरी लागली डोळ्याला. त्या काळी आजच्यासारखे तातडीनं उपचार होत नसत. गावठी इलाज केले; पण डोळा गेला. लुई आता 'एकाक्ष' झाला. कालांतरानं दुसराही डोळा गेला. आता लुई अंध झाला. त्याच्या जीवनातच अंधार निर्माण झाला. आई-वडील दुःखी झाले; पण लुईच्या वडिलांनी दुःख बाजूला ठेवून, लुईला 'स्वावलंबी' आणि 'सुशिक्षित' करण्याचा निश्चय केला. लुईच्या हाताला धरून हळूहळू ते त्याला गावातून हिंडवत. आता लुई गावात कोणाचाही आधार न घेता एकटा हिंडू-फिरू लागला. एक प्रश्न सुटला.

पण शिक्षणाचं काय ?

लुईचं शिक्षण व्हायचं कसं, हा प्रश्न चिंतेचा होता.

गावात एक चर्च होतं. तिथले फादर प्रेमळ होते. त्यांची लुईला शिकवायला सुरुवात केली. लुई बुद्धिमान होता. त्याला आता झाडं, पशू-पक्षी, फुलं, आभाळ, चांदण्या यांची चांगली माहिती झाली. चांदणी तो पाहू शकत नव्हता; पण फादरनी वर्णन केल्यावर त्याच्या लक्षात येऊ लागलं.

मग लुई पॅरिस येथील एका अंधशाळेत शिकायला गेला. त्या वेळी त्याचं वय १० होतं. त्याला वाचता तर येणार नव्हतं; पण उठावदार अक्षरांच्या स्पर्शानं तो 'अक्षर ओळख' शिकला.

लुई आता बारा वर्षांचा झाला. त्याच्या शिक्षकांनी मुलांना एका प्रदर्शनासाठी घेऊन जाण्याचं ठरवलं. या प्रदर्शनात लुईला समजलं की एक 'टिंबांची लिपी'

तिथं आहे.

चार्लस् बार्बियर या नावाचे एक सेनाधिकारी १४ टिंबांच्या लिपीने आपल्या सैनिकांना गुप्त संदेश पाठवत.

लुईने बार्बियर यांचं व्याख्यान ऐकलं. त्यांनीही सांगितलं की ''या गुप्त लिपीचा उपयोग अंधांसाठी होऊ शकेल.''

शाळेत परत आल्यावर लुईने आपल्या शिक्षकांना याबाबत पूर्ण कल्पना दिली; पण त्यांनी दुर्लक्ष केले. लुईच्या मनात मात्र ही लिपी ठसली होती. आता ही लिपी हाच त्याचा ध्यास झाला.

लुई बार्बियर यांना जाऊन भेटला. त्यांच्याशी अनेकवेळा त्यानं चर्चा केली. लुई बार्बियर यांना म्हणाला, ''तुम्ही या लिपीसाठी 'चौदा टिंब' वापरता; पण आपल्या दोन हातांच्या बोटांनी कधी कधी एकाच हाताच्या बोटांनी चौदाही टिंबांना एकदम स्पर्श करता येत नाही. एकावेळी अनेक बिंदूंना स्पर्श शक्य नाही.''

''लुई, तुझं म्हणणं बरोबर आहे.''

''तुम्हा डोळसांसाठी ही 'चौदा टिंबां'ची गुप्त लिपी ठीक आहे; पण अंधांसाठी लिपी उपयुक्त व्हावी, यासाठी तिच्या सुधारणा करायला हवी.''

''होय लुई, तूच आता प्रयोग कर. तू तुझे निष्कर्ष सांग. मग मी विचार करेन. आपण नंतर फेरफार करू.''

मग लुईने स्वत: एका हाताने प्रयोग केले. प्रथम फ्रेंच भाषेतील ६३ चिन्हे त्यानं या टिंबांमध्ये बसविली. अनेक प्रयोग केले.

इ.स. १८२९ मध्ये लुई ब्रेल यांनी सहा टिंबांच्या लिपीत 'फ्रान्सचा संक्षिप्त इतिहास' हे पुस्तक लिहिले.

लुई ब्रेल आता थकले होते. ''तुमची शेवटची इच्छा काय आहे.'' असं त्यांच्या मित्रांनी त्यांना विचारलं.

''सहा टिंबांच्या लिपीनं अंधांना शिक्षण द्यावे, हीच माझी इच्छा.'' लुई म्हणाले.

६ जानेवारी १८५२ रोजी लुई ब्रेल यांचा मृत्यू झाला.

कुप्रे या त्यांच्या गावी त्यांची कबर बांधली गेली.

लुई ब्रेल यांनी हा महान शोध लावला; पण त्यांच्या हयातीत त्यांच्या या शोधाला फारशी मान्यता मिळाली नाही.

पॅरिसच्या शाळेत प्रथम या लिपीच्या आधारे अंधांना शिक्षण देण्यास सुरुवात झाली, मग मात्र जगभर या लिपीचा प्रसार झाला.

ब्रेल लिपी ख्यातनाम झाली.

१९५२ साली त्यांची कबर उकरून त्यांचे हात पँथियॉन या महान व्यक्तीच्या कबरीजवळील नव्या कबरीत ठेवण्यात आले.

फ्रान्समधील त्यांच्या घराचे संग्रहालय करून नंतर लोकांनी त्यांची स्मृती चिरंतर ठेवली. कुप्रे येथे लुईचा पुतळाही आहे.

आता जगभरातील अंध व्यक्ती शिकतात, ते लुई ब्रेल यांच्या लिपीच्या आधारे. सहा टिंबांच्या या लिपीनं अंधांच्या जीवनात प्रकाश आणला आहे.

■ ■ ■

# २९. सर्वांभूती नारायण

कोणे एकेकाळची गोष्ट. एका घनदाट जंगलात एक तपस्वी साधू राहत होता. साधूचे अनेक शिष्य होते. साधनामार्गाचे मार्गदर्शन साधू अनेकांना करीत असत. असाच एक दिवस आश्रमातील एका भव्य वृक्षाखाली साधू आपल्या शिष्यांना उपदेश देत होते. परमार्थ प्रवचन सुरू होतं. शिष्य जिवाचे कान करून ऐकत होते. गुरूमहाराज म्हणाले, "सर्वांभूती परमेश्वर आहे. कीडामुंगी असो नाहीतर हत्ती–माणूस असो, या सर्वांमध्ये परमेश्वर वास करतो. सर्वांभूती नारायण हे तत्त्व लक्षात ठेवा आणि भेटेल त्याला नारायणस्वरूप मानून त्याचा आदरभाव करा, त्याचं ऐका."

प्रवचन संपलं. सर्व शिष्य मंडळी गुरूवाणीच्या प्रभावानं एकाग्र झाली होती. प्रत्येकाच्याच मनात आजच्या प्रवचनातील ते तत्त्व ठसून गेलं होतं... 'सर्वांभूती परमेश्वर' !

एका शिष्याच्या मनावर तर याचा खूपच मोठा परिणाम झाला. तो आता भेटेल त्याला परमेश्वर मानून नमस्कार करू लागला.

हाच शिष्य एके दिवशी समिधा आणण्यासाठी जंगलात खोलवर गेला होता. समिधा गोळा करता करता तो खूप दूरवर गेला. आता दुसऱ्या एका आश्रमाची वस्ती दूरवरून दिसत होती. सायंकाळ होत आली होती. जंगलाचा रस्ता, शिष्य माघारी फिरत होता.

तोच दूरवरून एक सुसाट सुटलेला हत्ती येत होता. वाट अरुंद होती. माहूत हत्तीला आवरण्याचा प्रयत्न करीत होता; पण हत्तीला पुढं जाण्याची घाई झाली होती. माहुताच्या अंकुशालाही हत्ती जुमानत नव्हता. हत्ती पिसाळला होता. माहूत ओरडत होता. "आसपास कुणी असेल तर दूर पळा लवकर. हत्ती पिसाळला आहे."

जंगलच्या रस्त्यावरचे इतर लोक, आश्रमीय, जंगलवासी भराभर दूर पळाले. वाट फुटेल तिकडे धावले. आपला जीव वाचवण्यासाठी धूम पळाले. पण...

हे शिष्यवर पळाले नाहीत.

कारण...

त्यांच्या डोक्यात गुरुजींचा उपदेश होता. ते मनात त्या उपदेशाचं स्मरण करीत होते. सर्वांभूती परमेश्वर... सर्वांभूती नारायण...

हा पिसाळलेला हत्ती आहे, हे ते विसरले आणि सर्वांभूती नारायण तर हत्तीच्या ठिकाणी नारायणच वसती करीत आहे... मग कशाला पळा... असा विचार करून शिष्य तिथंच उभा राहिला. सर्वांभूती नारायण असलेल्या हत्तीसमोर तो हात जोडून उभा राहिला. हत्ती पिसाळला होता. माहूत ओरडत होता. शिष्य हात जोडून उभा होता. हत्ती समोर आला. आता माहूत आणखी जोरानं ओरडला. ''अरे, पळ बाबा. जोरात पळ. हत्ती पिसाळला आहे.''

शिष्य तसाच उभा. हत्तीनं सोंड उंचावली. शिष्याला सोंडेत धरलं आणि शेजारच्या झाडीत दूर भिरकावून दिलं.

हत्ती पुढं निघून गेला. शिष्याच्या अंगाला बराच मुकामार लागला. काट्याकुट्यांनी अंग विद्ध झालं. कुठून कुठून रक्त येत होतं. जवळपास कोणीही नव्हतं. अखेर विव्हळत विव्हळत शिष्य आपल्या आश्रमात आला आणि आला तसा बेशुद्ध पडला.

गुरुजींनी त्याच्यावर औषधोपचार केले. शिष्य शुद्धीवर आला. त्यांनी प्रेमभरानं विचारलं, ''काय झालं बाळा तुला ?''

मग शिष्यानं सारी हकिगत सांगितली. इतर शिष्य कान देऊन ऐकत होते. गुरुजीही ऐकता ऐकता किंचितसं हसत होते.

हकीगत सांगता सांगता मधूनच शिष्य कण्हत होता, विव्हळत होता. इतक्या जखमा त्याला झाल्या होत्या. हत्तीच्या सोंडेतून तो वाचला हेच नशीब. पूर्ण हकीगत सांगताना त्याचा श्वास जोरात चालला होता. मग गुरुजींनी विचारलं, ''अरे बाळा, माहूत ओरडत होता तर तू दूर पळाला का नाहीस ?''

''गुरुवर्य, आपणच सांगितलं होतं ना की सर्वांभूती परमेश्वर आहे. ती आज्ञा प्रमाण मानली. हत्तीच्या ठायीही परमेश्वर आहे, नारायण आहे, असं मानून मी त्याच्यासमोर हात जोडून उभा राहिलो.''

''अरे वेड्या, हत्तीच्या ठायी नारायण आहे हे जसं खरं, तसंच त्या माहुताच्या ठायीही नारायण आहेच ना. त्या माहूत नारायणाची आज्ञा तू मोडलीस. त्याचं ऐकलं नाहीस. तो पळा पळा म्हणत होताच. त्या माहूत नारायणाचं ऐकलं असतंस तर हा प्रसंग तुझ्यावर ओढवला नसता. सर्वांभूती नारायण याचा अर्थ असा समजून घ्यायचा असतो.

■ ■ ■

# ३०. 'मी' ची वेलांटी

पुण्यातील एक प्रख्यात मनोवैज्ञानिक डॉक्टर ! प्रॅक्टिस उत्तम चाललेली. अनेकांच्या आयुष्यातला अंधार उजळविणारा त्यांचा सल्ला शिरोधार्थही मानून वाटचाल करणारे रुग्ण. बालपणापासून साहित्य, संगीत, वक्तृत्व, समाजकार्य याची आवड असणारा हा डॉक्टर...

लोकांच्या दृष्टीनं वेडेपणाचा असलेला एक निर्णय घेतो. त्याला उतारवयात आलेले पुणेरी जीवनाचे अनुभव तसे सगळ्यांनाच येत असतात; पण हा मनस्वी लोकांचा डॉक्टर असलेला स्वत:च मनस्वी ! नाव त्याचं प्रकाश साठ्ये. भर टिळक रस्त्यावर स.प. महाविद्यालयासमोर स्वत:ची उत्तम कन्सल्टिंग रूम, बिबवेवाडीला राहतं घर, संसारात उत्तम साथ देणारी पत्नीसुद्धा, दोन कर्तबगार मुलं... हा सगळा आनंदाचा पसारा सोडून साठ्ये निघाले होते दूर कुठंतरी...

साठ्ये यांनी एकदा स्वत:च्या मनाशीच गणित केलं...

एकोणिसशे शहात्तर सालापर्यंत टिळक रोडवर जहांगीर नर्सिंगच्या पुढे येरवड्याला जायला बावीस मिनिटं पुरत; पण नव्वदच्या मध्यावर जहांगीर हॉस्पिटलपर्यंत सहा किलोमीटर ओलांडायला अर्धा तास पुरेनासा झाला. वानप्रस्थाच्या दिशेनं मनाची वाटचाल सुरू झाली.

सत्त्याण्णव सालच्या मे महिन्यात कन्सलल्टिंग रूमवरून घरी परतताना ट्रॅफिक जाममुळे अडीच किलोमीटर वाहनानं जायला अर्धा तास लागला. शांत पुणे आता इतिहासजमा झालं आहे याची जाणीव साठ्ये यांना झाली. माणसं आणि वाहनं यांची अनावर गर्दी, रस्त्यांची दुर्दशा, बेशिस्त रहदारी, असुरक्षितता, हवेचं प्रचंड प्रदूषण, कचऱ्याचा वाढता पसारा, डुकरांचा आणि कुत्र्यांचा सुळसुळाट... या सर्व कारणांमुळे पुण्यात वाढलेल्या साठ्ये यांना आता पुणेच असह्य होऊ लागलं आणि वानप्रस्थाच्या दिशेनं दुसरं पाऊल पडलं. लहानपणापासून साठ्ये वर्षातून एकदा तरी कोकणात जात असत. तारकर्ली मालवणपासून अलिबागपर्यंत प्रदेश त्यांनी पालथा घातला होता. शाळेच्या

पाठ्यपुस्तकात 'गारंबीचा बापू' अभ्यासला होता. मग दापोली मनात भरली... ब्रिटिशांनी त्या काळात कँपसाठी दापोलीची निवड केली होती. त्यावरूनच कॅम्प दापोली असं नामकरण झालं होतं. कृषी विद्यापीठामुळं उद्योगाचं प्रदूषण नाही. स्वच्छ प्रदूषणमुक्त हवामान आणि सुशिक्षितांचं प्रमाणही अधिक... मग या बापूच्या मनातही दापोली भरली... पुण्यात स्वत:चं स्वतंत्र घर नव्हतं. मग आंबराईतली जागा घेतली. 'श्रीसुशील' ही वास्तू तयार झाली.

पण त्याचवेळी अर्धशतकाहून अधिक ज्या पुण्याशी नाळ जोडली होती ती तोडावी लागणार होती.

साठ्ये नुसते मनोवैज्ञानिक डॉक्टर नव्हते तर जाणकार व मर्मज्ञ संगीतरसिक, पर्यटनप्रेमी प्रवासी, उत्तम पुस्तकांचे वाचक आणि बरंच काही होते. याच पुण्यात पु.ल. सुनीताबाई यांचे भावबंध जमले. याच पुण्यात विश्राम बेडेकर यांचं घर म्हणजे साठ्यांना विश्रामस्थान मिळालं होतं. याच पुण्यात भीमसेनांची संतवाणी त्यांनी भरभरून श्रवणात साठवली होती. याच पुण्यात वसंत बापट यांचा स्नेह संपादन केला. याच पुण्याच्या बी.जे. मेडिकल, ससून, येरवडा इस्पितळ, जहांगीर नर्सिंग होम या ठिकाणी त्यांनी आपली सेवा रुजू केली होती.

याच पुण्यपत्रातून रसिकराज श्रीराम पुजारी आणि कविवर्य विंदा करंदीकर यांची आपुलकीची थाप त्यांच्या पाठीवर पडली होती. याच पुण्यात त्यांनी कुमारगंधर्व, वसंतराव देशपांडे भरभरून ऐकले होते. याच पुण्यात मित्रांच्या मैफली जमविल्या होत्या. याच पुण्याच्या सांस्कृतिक भूमीनं त्यांना समाजकार्यातही ओढून नेलं होतं. गणगोताचा परिवार तर पुणे आणि आसपासच होता.

हं सारं सोडायचं तर नाळ तोडावी लागेल.

पण वानप्रस्थाची हाक एवढी टिपेची होती की बाकीचे सारे सूर खर्जात उतरून हवेत विरून गेले.

साठ्ये यांनी मग मागं वळून पाहिलं नाही. ते दापोलीचे 'श्रीसुशील' निवासी झाले. नव्या जगाचे रहिवासी झाले आणि नव्या आनंदाचा ठेवा त्यांच्या ओंजळीत ठिबकू लागला. 'मी'ची वेलांटी हे त्यांचं बोलकं आत्मचरित्र! त्यावर विंदा यांच्या ओळी आहेत.

'मीच्या वेलांटीचा सुटो सुटो फास
वेढ क्षितिजास, नको त्याचा'

■ ■ ■

# ३१. नकोशी झाली हवीशी

कृष्णाकाठची वाईनगरी. पटवर्धनांचं घर. माहेरवाशीण मालती बाळंतपणाला आलेली. आई कृष्णाबाई मुलीचं सगळं असोशीन करीत होती. गुटगुटीत बाळ झालं. तीन महिन्यांनंतर मुलीला सासरी पाठवायची. पाठवणीची तयारी सुरू झाली. बाहेर ओसरीवर आजोबा रामचंद्र पटवर्धन गोंडस नातवाला मांडीवर घेऊन बसले होते. प्रस्थानवेला झाली. मालती निघाली आणि तिनं वडिलांना नमस्कार केला. रामभाऊंच्या कंठातून एकदम हुंदका फुटला आणि २० वर्षांची ओली बाळंतीण मालतीही अश्रूंनी ओथंबून गेली. 'लाडकी शकुंतला' सासरी चालली होती. होय ! ते विरहाचं दुःख तर होतंच; पण आणखी एका व्यथेनं रामभाऊ उसाभरी झाले होते. येणारा दुःखाचा कढ आवरता घेऊन रामभाऊ म्हणाले...' ''तायडे, आज माझं भाग्य मी माझ्या मांडीवर जोजवत आहे. आजोबा म्हणून मानानं मिरवणार आहे... पण... मी कसाई आहे गं.''

''बाबा, काय बोलताय ? काहीतरीच तुमचं !''

''पोरी मी खरं बोलतोय. ही गोष्ट फक्त मला आणि हिला... तुझ्या आईलाच ठाऊक आहे. त्या वेळचे डॉक्टरही आता नाहीत आणि ती प्राणदायिनी पण आता नाही.''

''बाबा तुम्ही कशाबद्दल बोलताय मला काही कळत नाही.''

''सांगतो बेटा तुला आता...'' असं म्हणून मालतीच्या वडिलांनी- बाळाच्या आजोबांनी तिला तिच्या जन्माच्या वेळची चित्तरकथा सांगितली.

झालं होतं असं...

कृष्णाबाईंचे दिवस भरले होते. डॉक्टरांची एक टीम तिच्या सुटकेसाठी माजघरात प्रयत्न करीत होती. मूल आडवं आलं होतं. तीव्र वेदनांनी कृष्णाबाई तळमळत होत्या.

नवीन बाळ येणार म्हणून बाहेर तिघं भावंडं आनंदली होती; पण डॉक्टरांनी सांगितले होते... परिस्थिती गंभीर आहे. आई किंवा मूल यापैकी कुणी तरी

एकच वाचेल. आई गेली तर... तर नव्या बाळासह चार जणांचं संगोपन कोण करणार होतं ? प्रश्न होता. मग रामभाऊंनी डॉक्टरांना सांगितलं... ''आईला वाचवा.'' त्या वेळी तेच व्यवहार्य होतं.

एवढ्यात वाईमधील एक अनोळखी म्हातारी वाड्यात आली. कुठून कशी देवदूतासारखी आली ! ती म्हणाली...

''दादा, मला पाच मिनिटं द्या. नाही म्हणू नका. मी बाईला सोडवते न् बाळाला पण वाचवते.''

डॉक्टरांनीही परवानगी दिली. ती माऊली झटकन आत गेली. तिच्या हाताला काय जादू होती कुणास ठाऊक ! पाचच मिनिटात आतून बाळाच्या रडण्याचा आवाज आला. कृष्णाबाई सुखरूप होत्या. बाळ सुखरूप होतं. बाळ-बाळंतीण सुखरूप पाहून वडील भरून पावले. ती मुलगी म्हणजेच मालती. तिचीच पाठवण आज लाडक्या नातवासह रामभाऊ करीत होते.

पुढं रामभाऊंची नको असलेली ही मुलगी अनेकांना हवीहवीशी वाटू लागली. जनरीतीप्रमाणे रामभाऊंनी तिला लवकर उजवली. शिक्षणाची आस असूनही तिला संसारात पडावं लागलं आणि ती पटवर्धनांची पोर मालती थोरात झाली; पण तिचं भाग्य असं की तिचा पती पोस्टातला मधु... त्यानंच तिला पुढं आयुष्यभर साथ दिली. सुखाचा बटवडा केला. वाईच्या कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका थोर शिक्षणतज्ज्ञ कै. काशीताई नातू यांची ही लाडकी विद्यार्थिनी २९ व्या वर्षी शिक्षिका झाली. चाळिशीला प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका झाली. नामांकित क्रीडाशिक्षिका म्हणून रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत तिनं लौकिक मिळवला. शेकडो विद्यार्थ्यांच्या लाडक्या बाई म्हणून लौकिक मिळवला.

स्वत:ची सून दीप्ती हिला शिकवलं. नको असलेल्या या मुलीचा उत्साह तर एवढा दांडगा, स्वत:चा संसार उभा करता करता तिनं नात्यागोत्यातले अनेक संसार उभे केले. लग्नं जमवली. एकाच बहरलेल्या झाडाला टवटवीत सुगंधी फुलं यावीत, तशी नात्यांची फुलं तिच्या जीवनवृक्षाला आली. मधुची सहचरी मालती, कुमुदिनीची जाऊ मालती कृष्णाकन्या मालती, दिगंबराची बहीण मालती, आबासाहेब अत्रे यांची आवडती शिक्षिका मालती, सुरेखा करमरकर, विमल कुलकर्णी, नीलिमा नगरकर, प्रभा रत्नपारखी यांची मैत्रीण मालती, अमेरिकेतल्या मीरा फाटकची आत्याई मालती, क्रीडांगणावरील चपळ मालती, थोरात-पटवर्धन-पावसकर-आगाशे-काटदरे या सर्व कुटुंबाच्या गोकुळाची

उत्साही गवळण मालती ! अशी अनेकविध रूपे असलेली मालती थोरात हिनं मग लेखणी उचलली. आयुष्याचा सारीपाट आता शब्दबद्ध करायचा असं तिनं ठरवलं. पंचाहत्तरी आली. हा अमृतयोग तर मुला–नातवंडांनी, पातवंडांनी साजरा केलाच; पण मालतीनं 'मधुमालती' नावाचा शब्दांचा नजराणा सर्वांना आपल्या अमृतमहोत्सवानिमित्त भेट दिला आणि नको असलेल्या मुलीचा हवाहवासा जीवनप्रवास सर्वांच्या समोर आला.

■ ■ ■

# ३२. राख : श्रीमंताची आणि गरिबाची !

अद्वैतानंद स्वामी हे महान आचार्य होते. व्रतस्थ संन्यासी असूनही ते भ्रमणद्वारा लोकप्रबोधन करीत असत. मध्यप्रदेशातील एका अरण्यवनात त्यांची कुटी होती. आश्रमासारखा शांत परिसर होता आणि साधक जिज्ञासू स्वामींच्या भेटीसाठी आणि उपदेशासाठी दूरवरून येत असत. स्वामीजी प्रत्येकाचे प्रबोधन करून समाधान करीत असत. अंधारात चाचपडणाऱ्यांना प्रकाशवाटा मिळत आणि पीडितांना दिलासा मिळत असे, असा स्वामीजींचा लौकिक होता.

मात्र स्वामीजींचं एक वैशिष्ट्य होतं.

ते कुणालाही गंडादोरा, ताईत-तावीज, टिळा-माळा, अंगारे-धुपारे अशा प्रकारचा कर्मकांड मार्ग सांगत नसत. साधा-सोपा जीवनव्यवहार कसा असतो, याचा मार्ग दाखविणे हेच स्वामीजींचे जीवनध्येय होते.

एकदा आश्रमात एक साधक आला. एरवीही तो अधूनमधून येत असे. मग त्याला यम-नियम, प्राणायाम, ध्यानधारणा अशा चढत्या भाजणीच्या स्वरूपात स्वामीजी काही करायला सांगणार होते.

पण तो साधक उतावळा होता. त्याला झटपट ज्ञान हवे होते. त्याला साधनेच्या मधल्या पायऱ्या गाळून एकदम उंचीवर जायचे होते; पण ही गोष्ट सहजसाध्य नसते. त्यासाठी कठोर निग्रह आवश्यक होता.

साधकाजवळ तेवढा वेळ नव्हता; पण एकच गोष्ट बरी होती की त्यानं स्वामीजींना तसं स्पष्ट सांगितलं होतं.

''स्वामीजी, पुन: पुन्हा आपल्याकडं यायला मला कदाचित वेळ नसेल, आपण एकदाच काय तो मला उपदेश करावा.'' साधक म्हणाला.

''मान्य; पण हे बघ साधका, त्यासाठी मी जे सांगेन ते तुला निग्रहाने, निश्चयपूर्वक व निर्भयपणे करावे लागेल.'' स्वामीजी म्हणाले.

''मान्य आहे मला स्वामीजी. आपण सांगाल ते करीन.'' साधक म्हणाला.

मग स्वामीजींनी त्याला एक वेगळीच गोष्ट करायला सांगितली.

"हे बघ, आज रात्री तू या नगरीच्या स्मशानात जायचं."

"स्मशानात ? ते कशासाठी ?"

"सांगतो ना ! आजच आपल्या या आश्रमाच्या सावलीला असलेल्या नगरीतील एक धनाढ्य, गर्भश्रीमंत व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तेव्हा स्मशानात जा आणि त्यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहा. शिवाय तिथं आणखी काय आहे, कोण कोण होतं, हे मला सर्व निरीक्षणपूर्वक येऊन सांग." स्वामीजी म्हणाले.

स्वामीजींच्या सांगण्याबरहुकूम साधक स्मशानात गेला. तिथं त्या धनाढ्य गर्भश्रीमंताची अंत्ययात्रा येऊन पोहोचली होती. शेकडो लोक अंत्ययात्रेत सामील झाले होते. त्या धनाढ्याच्या शवावर हारफुलांचे ढीग होते. उंची भरजरी शालींनी त्याचा देह झाकला होता. त्याची चिता पेटली.

आणि हा साधक परतत असतानाच आणखी एक अंत्ययात्रा आली. मृत माणूस दरिद्री होता. त्याचा चेहरा ओढगस्त होता. त्याच्या शवावर एखादाच सुकलेला हार होता. बरोबरची माणसंही दरिद्रीच होती. त्यांच्या कपड्यांची लक्तरं होती.

त्याही माणसाची चिता या धनाढ्याच्या चितेशेजारीच पेटवली. त्याचे नातेवाईक हंबरडा फोडून रडत होते.

साधक परत आला. त्याचं मन सुन्न झालं होतं.

"स्मशानात काय पाहिलं ?' स्वामीजींनी विचारलं.

"धनाढ्याची आणि निर्धनाची चिता शेजारी शेजारी जळत होती."

"ठीक, आज एवढं पुरे आहे. आता उद्या ये." स्वामीजी म्हणाले.

साधक दुसऱ्या दिवशी सकाळी स्वामीजींकडं आला.

"आज पुन्हा स्मशानात जायचं." स्वामीजी म्हणाले.

"कशासाठी ? आज जाऊन काय करणार ?" साधकानं विचारलं.

"काल ज्या दोन चिता जळताना तू बघितल्यास त्या आज विझल्या असतील. त्या दोन्ही चितांमधली मूठभर राख वेगवेगळ्या पात्रात घेऊन ये." स्वामीजी म्हणाले.

मग साधक स्मशानात गेला. दोन्ही चिता विझल्या होत्या. त्यानं दोन्ही चितांमधली राख वेगवेगळ्या पात्रात घेतली आणि तो आश्रमात आला.

स्वामीजी आसनस्थ होतेच.

"ठेव ती दोन्ही पात्रं. आता मला सांग, पहिल्या पात्रातील राख त्या धनाढ्य गर्भश्रीमंताची आहे. दुसऱ्या पात्रातील राख निर्धनाची आहे. ही दोन्ही पात्रे निरखून बघ. या राखेत कोणता फरक आहे ?"

"राखेत कोणताच फरक नाही स्वामीजी." साधक म्हणाला.

"हे बघ, हाच माझा तुझ्यासाठी जीवनभराचा आदेश उच्च-नीच, काळा-गोरा, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब सर्वांची राख एकच ! हे तत्त्व जाण !"

■ ■ ■

# ३३. गंजण्यापेक्षा झिजणे बरे

लातूर जिल्ह्यात रूई हे लहानसं खेडं. या खेड्यात दादाराव-सरस्वतीबाई हे सत्वशील जोडपं राहत होतं. दादाराव स्वातंत्र्यसेनानी होते तर सरस्वतीबाई सात्त्विक वृत्तीच्या धर्मशील गृहिणी होत्या. दोघांना सात मुलं झाली. तीन भाऊ आणि चार बहिणी... असा परिवार वाढला. थोरली मुलगी अक्का आपल्या आईच्या वळणावर गेलेली, उद्यमशील आणि कर्मयोगी. शेतात कामं करू लागली. आपल्या तीन भावांना आणि तीन बहिणींना सांभाळू लागली.

कामाला वाघ! वडिलांच्या बरोबरीनं शेतात नांगर हाकण्यापासून तो घरकामापर्यंत रात्रंदिवस काबाडकष्ट करणारी आक्का पुरुषाला लाजवेल अशी कामं करीत होती. १००-१२५ किलो वजनाचं पोतं ती सहज उचले. त्या वेळच्या प्रथेप्रमाणं तिच्या वयाच्या चौदाव्या वर्षी आक्काचा विवाह झाला. आक्काचा संसार सुखानं चालला होता; पण मधेच एक आक्रित घडलं. अक्काच्या आईचं निधन झालं. भावंडं उघड्यावर पडली. सारीच भावंडं लहान होती. या कच्च्याबच्च्यांचा आधारच निखळला होता.

आईच्या अंत्यविधीसाठी सारेच स्मशानात जमले होते. दादाराव कराड परिसरातले वजनदार आसामी! म्हणून आणखीही बरेच लोक होते. छोटी भावंडं एकमेकांना बिलगून रडत होती.

रीतीप्रमाणं पिंडाला कावळा शिवण्याची वाट सारेच बघत होते. बराच वेळ झाला. कावळा पिंडाला शिवेना. त्या माऊलीचा आत्मा आपल्या पिलांभोवती घोटाळत असणार! विधुर दादासाहेब कराड सुन्न मनानं उभे होते. कावळे काव काव करीत येत; पण शिवत नव्हते. मग अक्काला काय वाटलं कुणास ठाऊक...

ती त्वरेनं पुढं झाली. आईच्या चितेची रक्षा उचलून तिनं कपाळी लावली. आपल्या कपाळीचं कुंकू आपल्या हातांनी पुसलं... मग चितेची राख सर्वांगाला फासली...

अक्का हे काय करतीय... सर्व लोक दिङ्मूढ होऊन बघत होते. मग अक्का

पुढं झाली. स्मशानातच आपल्या नवऱ्याच्या पाया पडली. त्यांना म्हणाली, "आजपासून मी संन्यासिनी झाले. माझा संसार संपला. तुम्ही दुसरं लग्न करायला मोकळे आहात. मी आता माझ्या लहान भावंडांची जबाबदारी घेणार आहे. या क्षणापासून मी तुमची पत्नी राहिलेली नाही. या माझ्या भावंडांची मी आई झालीय. माझी आई इथं रक्षास्वरूप आहे. तिच्या साक्षीनं सांगतीय मी."

सर्व लोक अवाक् होऊन हे दृश्य बघत होते...

जिवाचे कान करून अक्काचं बोलणं ऐकत होते... आणि योगायोग असा की... आईच्या पिंडाला कावळा लगेच शिवला.

सर्वांच्या बरोबर तरुण विवाहित अक्का संन्यासिनी होऊन माघारी आली आणि शांतपणे ती आपल्या मार्गावर व्रतस्थपणे मार्गक्रमण करीत राहिली. आपल्या समर्पित जीवनशैलीनं तिनं स्त्रीजीवनाचा एक आदर्शच घालून दिला. विकारांवर मात करण्यासाठी ती त्या दिवसापासून एक भुक्त राहू लागली. लोक त्यांना प्रयागअक्का म्हणू लागले. स्वातंत्र्याच्या चळवळीत संन्यासिनीनं वडिलांच्या खांद्याला खांदा लावून धाडसीपणानं काम केलं. रझाकार चळवळीत तिनं आपली चुणूक दाखवली. आपल्या घराच्या अंगणाची शिंपण करण्याबरोबरच इतर अनेकांच्या जीवनात सुखाची शिंपण करणारी अक्का म्हणजे एक प्रयागतीर्थच होतं.

कराडचं घर शेकडो लोकांचा आसरा ! आणि त्यातला भोज्जा म्हणजे प्रयागाक्का ! या प्रयागतीर्थात अनेकांनी स्नान केलं. स्वत:चं काया-वाचा-मन शुद्ध करून घेतलं. भावंडातला एक भाऊ विश्वनाथ तर विश्वशांती केंद्राचा निर्माता झाला. बाकीच्या बहिणी मार्गी लागल्या. दोन भावांनी घरचाच उद्योग सांभाळून आपली कार्यक्षेत्रं विस्तारली.

वयाच्या पंचाऐंशीव्या वर्षीही प्रयोगाअक्का अजून पहाटे उठतात. तासभर व्यायाम करतात. घरात सर्वप्रकारे वैभव आणि समृद्धी असूनही त्यांची कष्टाची कामं पहाटेच्या भूपाळीबरोबर सुरू होतात आणि रात्री भैरवीलाच त्या धरणीला पाठ टेकतात.

असे अविरत कष्ट करणाऱ्या आणि भावाच्या शैक्षणिक कार्याला, विश्वशांती केंद्राला आपला सबळ आशीर्वाद देणाऱ्या प्रयागअक्कांना कुणी कष्टांबद्दल विचारलं तर त्या अंमळ हसून मोजक्या शब्दात मंजुळवाणीनं उत्तर देतात...

"गंजण्यापेक्षा झिजलेलं बरं."

■ ■ ■

# ३४. ''रुग्ण माझे ग्राहक''

राजस्थानमधील एका घरातला एक मुलगा पुण्यातील भवानी पेठेत राहणाऱ्या राजमल तेजमल यांनी दत्तक घेतला. या दत्तक घेतलेल्या मुलाचं नाव हस्तिमल. राजमलजींचे पुण्यात धान्याचे दुकान होते. अर्थातच हस्तिमलही आपल्या वडिलांच्या – दत्तक वडिलांच्या या व्यवसायात त्यांना मदत करू लागला; पण हस्तिमलला या धान्यव्यापाराचा अनुभव होता कुठं? तरीही तो दुकानात काम करीत होता.

तळेगाव ढमढेरे येथील एका घरातली तेरा वर्षांची एक मुलगी या घराची सून झाली. नाव तिचं वसंता, वसंता-हस्तिमल यांचा संसार सुरळीत चालला होता; पण मधेच एक संकट आले, राजमलजींचं निधन झालं.

हस्तिमलला व्यवसायाचा अनुभव नव्हता आणि साहजिकच मग दुकान बंद पडलं. उदरनिर्वाहासाठी काहीतरी केलं पाहिजे म्हणून हस्तिमल नगर जिल्ह्यातील सारोळा गावी गेले. तिथं काही उद्योग करून बघितला; पण फारसं यश नाही मिळालं.

वसंताबाई धीराच्या! त्यांनी पतीला सांगितलं, ''आपण पुण्याला जाऊ. कष्टानं व्यवसाय करू. मुलांना मोठं करायचंय.''

नारायण पेठेत विजय टॉकीजजवळ दोन खोल्या दहा रुपये भाड्यानं घेतल्या आणि तिथंच किराणा मालाचं दुकान सुरू केलं.

जाड साखरेपेक्षा पिठीसारखेला भाव जास्त मिळायचा म्हणून भवानी पेठेतून जाड साखर ठोक भावात आणून वसंताबाई घरी जात्यावर दळून पिठीसाखर तयार करीत. भाव चांगला मिळे. मग 'रेशन' आलं. दुकानाचं कर्ज फिटलं. मुलं मदत करीत होती. एक मुलगा तर विशेष रस घेऊन काम करायचा. कांतीलाल त्याचं नाव. एकदा तो असाच गिऱ्हाईकाला गहू वजन करून देत होता. वजन कमी दिलं गेलं. वडिलांनी ते पाहिलं आणि त्याच्या हातावर जोराचा फटका मारला.

''ग्राहक आपले देव आहेत. त्यांच्यावर आपला चरितार्थ चालतो. आपण त्यांना जी सेवा देतो ती उत्तमच असली पाहिजे.'' हस्तिमल यांनी सांगितलं.

त्या वेळी कांतीलालला थोडंसं वाईट वाटलं; पण वडिलांच्या उपदेशाचा त्याच्या मनावर चांगला परिणाम झाला.

१९६२ मध्ये हस्तिमलजी यांचं निधन झालं. याच सुमारास पानशेत प्रलय झाला. त्यानं पुणे शहराचीच दुर्दशा केली. नारायण पेठेतलं संचेती यांचं दुकानही जलमय झालं. वडिलांचं निधन हा दैवी आघात झाला, तर जलप्रलय हा नैसर्गिक आघात. संचेती कुटुंब या आघातांनी विद्ध झालं; पण तरीही ते आव्हान मानून त्यांनी नवी उभारी धरली. प्रलयातही लहानशा लव्हाळ्यानं जीव धरावा आणि त्याचा पुढं मोठा वृक्ष व्हावा, तसं संचेती कुटुंबाचं होतं.

मातु:श्री वसंताबाई यांनी पुन्हा एकदा पदर बांधला आणि संकटांना ओंजळीत घेऊन त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या.

कांतीलालनं बघितलं होतं...

आई-वडील स्वत: दुकानाची झाडलोट करीत असत. कष्टाच्या कामांना ते कधीच मागं सरले नाहीत. संचेती यांनी विजय टॉकीजजवळच आणखी एक दुकान घेऊन तिथं हॉटेल चालवलं होतं. कांतिलालला खूप शिकवायचं होतं; पण कष्टाला पर्याय नव्हता. बारावी झालेला कांतिलाल पुढं मेडिकलला गेला; पण घरकाम व व्यवसायाचा भाग सांभाळावाच लागत होता. पहाटे चारला उठायचं. सकाळपर्यंत हॉटेलात काम करायचं. अगदी मालाच्या पुड्या बांधण्यापासून तो वजनकाट्यावर मालाचे योग्य वजन करेपर्यंत सर्व कामं कांतिलालनं केली.

श्रमाचं फळ मिळालं.

कांतिलाल एम.बी.बी.एस. झाला. डॉक्टर झाला आणि त्याला एक चांगली संधी मिळाली. डॉ. बानू कोयाजी यांच्याकडं काम करताना शिकण्याची संधी मिळाली.

कांतिलाल आता ख्यातनाम डॉक्टर झाला. शिवाजीनगर स्टेशनच्या सावलीला संचेती हॉस्पिटलची भव्य वास्तू उभी राहिली. संचेती म्हणजे अपघातग्रस्तांचा दिलासा. संचेती म्हणजे पूर्व पुण्याईचं संचित. संचेती म्हणजे रुग्णइतांना एक आश्वासन! संचेती म्हणजे दु:खपरिहार! संचेती म्हणजे हस्तिमल-वसंताला जोडण्याची शुभंकर कृतार्थता! हा कांतिलाल म्हणजे सुप्रसिद्ध रोगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. के.एस. संचेती!

आपल्या वडिलांचा तो हातावरील फटका अजूनही ते आठवतात आणि रुग्णग्राहकाची मनोभावे सेवा करतात.

■ ■ ■

# ३५. परमानंद माधवम्

मध्यप्रदेशातलं गुना जिल्ह्यातलं अरौन हे लहानसं गाव. इथं कात्रे कुटुंबात राधा-गोविंद या माता-पित्यांचा पुत्र सदाशिव जन्माला. वडिलांचं निधन झाल्यावर चुलते गंगाधरराव यांच्याकडं माध्यमिक शिक्षण घ्यायला सदाशिव गेला. मॅट्रिक झाल्यावर रेल्वेत नोकरी मिळाली आणि यथाकाळ विवाहही झाला. मुलगी प्रभावती लहान असतानाच पत्नीचंही निधन झालं आणि दुर्दैवाला त्यांचे दशावतार एवढेच पाहवले नाहीत म्हणून की काय... सदाशिवरावांना कुष्ठरोग जडला.

कुटुंबात, समाजात, आसपासच्या लोकांत कुचेष्टा आणि उपेक्षा सुरू झाली. एका गणेश मंदिराच्या कोपऱ्यात झाशी इथं ते राहू लागले. झाशीच्या आसपास अनेकवेळा कुष्ठरोगी मोठ्या प्रमाणावर दिसतात. एकुलती एक मुलगी प्रभावती हिच्या लग्नाची चिंता होतीच. कुष्ठरोग्याच्या मुलीला कोण वरमाला घालणार; पण सुदैवानं मधुकरराव सरवदे यांनी प्रभावतीशी सप्तपदी केली. कुष्ठरोग बळावतच होता. छत्तीसगढमधील बिलासपूर गावाजवळ मिशनरी कुष्ठरोग्यांसाठी एक आश्रमवजा इस्पितळ चालवीत होते. या इस्पितळात सदाशिवराव कात्रे दाखल झाले. त्यांचा रोग आटोक्यात आला, तरी पूर्ण बरा झाला नाही.

ख्रिस्ती मिशनरी सेवा करतात, पण पुढे धर्मांतरासाठी मन वळवितात असं कात्रे यांना वाटलं. त्या वेळचे राज्यपाल हरिभाऊ पाटसकर यांच्याकडे याबाबत तक्रार करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात कात्रे होते. तिथं राज्यपालांनी प्रश्न विचारला, ''कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी मिशनरीच पुढं येतात. अन्य समाजाचे लोक का येत नाहीत ? मग मिशनऱ्यांना दोष का द्यावा ?''

प्रश्न योग्य होता; पण उत्तर सापडणारे नव्हते.

मग कात्रेजींनी ठरवलं, आपणही याच प्रकारच्या कार्याची उभारणी करायची. मनात विचाराचं वादळ सुरू होतं. आपलं शरीर कुरूप आहे. आपण रुग्णसेवेचा

संकल्प केला आहे तो सिद्धीस जाईल का, असा संदेह मनात निर्माण झाला.

कात्रेजी हेडगेवारांचे भक्त होते. कै. माधवराव गोळवलकर गुरुजींना तर ते गुरुस्थानी मानत. ज्या ज्या वेळी मनाची भ्रांत अवस्था असेल त्या वेळी ते जप करीत असत...

परमानंद माधवम् । परमानंद माधवम् ।।

या चैतन्यशील परमानंद माधवांना भेटायला कात्रेगुरुजी नागपूरला गेले. प्रेरणा घेऊन बिलासपूरला परत आले आणि मग त्यांच्या कार्यासाठी स्थळ सुचविण्यात आलं. चांपा हे मध्य प्रदेशातलं गाव. जीवनलाल सावजी यांच्या झोपडीवजा घरात आश्रमाची सुरुवात झाली. आजूबाजूच्या वस्तीत व स्टेशनच्या परिसरात कात्रे स्वत: हिंडत. कुष्ठरोग्यांना स्वत: घेऊन येऊन या झोपडीत उपचार करीत. रोग्यांची संख्या आता वाढत होती; पण सोयीसुविधा अपुऱ्या पडत होत्या. मनात निराशेचं मळभ दाटत होतं. मग असेच एकदा कात्रे कै. गुरुजींना चांपा स्टेशनवर भेटले. गुरुजी नागपूरहून कलकत्त्याला जाणार होते. गुरुजींनी कात्रे यांच्या पाठीवर थोपटून फक्त प्रेमानं डोळ्यात पाहिलं... आणि कात्रे याच्या तोंडून एकदम उद्‌गार बाहेर पडले, 'परमानंद माधवम्...'

आश्रमाच्या परिसरात एक विहीर आणि धर्मशाळा होती. नोकरीतून मिळालेले पैसे यात गुंतवून कात्रेजींनी ती विहीर, धर्मशाळा आश्रमासाठी विकत घेतली. मग रात्री स्वत: काम करू लागले. त्यांच्या मनात जिद्द निर्माण झाली. हळूहळू आश्रमाला भेट देणाऱ्यांची, सुशिक्षितांची, सहानुभूतीदारांची संख्या वाढू लागली.

आणि उदारमनस्क लोकांनी आश्रमातील त्रुटी दूर केल्या. आश्रमाची स्वत:ची इमारत, शेती, गोशाळा तयार झाली आणि एक दिवस चमत्कार घडला.

तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी कात्रे यांचा गौरव करणारं एक प्रशस्तिपत्र पाठवलं आणि सोबत एक हजार रुपयांची वैयक्तिक देणगीही पाठविली. दिवस पालटले. कात्रेजींच्या भारतीय कुष्ठनिवारक संघाला देशाच्या सर्वोच्च व्यक्तीची प्रशंसा प्राप्त झाली होती. 'परमानंद माधवम्' हा मंत्र सफल झाला होता. आश्रमाचा पसारा वाढला. धरमतरी या गावी श्रमदानातून माधव–सागर तलाव बांधण्यात आला, असा हा 'परमानंद माधवम्' मंत्राचा चमत्कार !

■ ■ ■

# ३६. आणखी एक बागबान

'बागबान' हा हिंदी चित्रपट खूप गाजला. आई-वडिलांच्या कष्टाची कवडीची किंमत नसलेली कृतघ्न मुलं दोघांनाही कशी दु:ख देतात, याचं हृदयद्रावक चित्रण या चित्रपटात आहे. अमिताभ बच्चन आणि हेमामालिनी यांच्या बागबान या चित्रपटातील भूमिका म्हणजे आजच्या ज्येष्ठांच्या दुर्दैवाची करुण कहाणी! असा हा बागबान!

पण काही दिवसांपूर्वी पुण्यात आणखी एका 'बागबान'चं चित्रीकरण सुरू होतं. स्थळ ज्ञानल मंगल कार्यालय, शास्त्री रस्ता, नवी पेठ! या बागबानमध्ये अमिताभची भूमिका करणारे नेते होते पुण्याच्या पत्र्या मारुतीजवळ राहणारे नू.म.वि.तील माजी शिक्षक शरद दाते आणि हेमामालिनीची भूमिका करणाऱ्या त्यांच्या पत्नी क्षमा! आणि कृतघ्न नव्हे तर कृतज्ञ मुलांच्या भूमिका केल्या होत्या त्यांच्याच सुनील, सुधीर आणि अंजली या मुलांनी!

निमित्त होतं आईच्या सत्तरीचं आणि वडिलांच्या पंचाहत्तरीचं! सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाप्रमाणेच हातावरचं पोट असणारं दाते कुटुंब कष्टाच्या गोणी वाहात; पण स्वाभिमानानं संसाराचा सारीपाट मांडून बसले होते. शरदराव नू.म.वि.त शिक्षक होते तर मंडईजवळच्या लिमये कुटुंबातल्या मालतीबाई क्षमा दाते होऊन सप्तपदी चालू लागल्या होत्या. क्षमाताई ससूनमध्ये परिचारिका। परिचारिकेची नोकरी म्हणजे ड्युटीच्या वेड्यावाकड्या वेळा, ससूनमधील अनेक मनस्ताप, सतत रोग्यांचा सहवास, धावपळ आणि पहाटे साडेचारपासून रात्री अकरापर्यंत संसार आणि नोकरी यांची कसरत! तशाच शरदराव यांना एका लोकविलक्षण आजारानं घेरलेलं. तीही चिंता क्षमाताईंना असायची. दोन खोल्यांच्या अडचणीचा पण शिस्तशीर संसार करताना क्षमा-शरद यांनी एकमेकांना खूप सांभाळून घेतलं. क्षमाताईंच्या नोकरीनं कामाच्या वेगाशी शरदनं आपली लय सांभाळून घेतली. लागोपाठ तीन मुलं झाली. संसारात शरदाचं चांदणं बरसलं.

आणि अशातच कमी म्हणून की काय दोघांनाही वेगवेगळ्या आजारान घेरलं. कधी शरदराव प्रकृतीनं गांजलेले तर कधी क्षमाताईंना शस्त्रक्रियेला सामोर जावं लागलेलं...; पण अशा जीवघेण्या लढाईतही आपल्या पिलांना कुठं जखमा होऊ नयेत किंवा त्यांच्या चोची कधी रिकाम्या राहू नयेत म्हणून क्षमा-शरद यांनी कसरतीची आणि श्रमाची पराकाष्ठा केली. स्वाभिमान हा तर त्यांचा अलंकार! कोणापुढे कष्टासाठी किंवा पैशासाठी त्यांनी हात नाही पसरला. मग घरातल्या कामाचा पसारा कधी कधी शरदरावांना सांभाळावा लागे. छोटा सुनील आपल्या बाबांना मदत करता करता सगळी घरकामं शिकला. मागोमाग सुधीरही आला. हे दोघे मिळून छोट्या अंजूची-लाडक्या बहिणीची काळजी घेऊ लागले.

ससूनमधल्या जळक्या वॉर्डात काम करताना आपल्या आईला किती यातना होत असतील याची मुलांना पुरेपूर कल्पना होती. यथावकाश मुलांची लग्नं झाली. थोरली मधुरा सकाळच्या मधुरांगणात विहार करते तर धाकटी मेधा आपल्या जावेसह सासू-सासऱ्यांच्या सेवेस सिद्ध असते. सुनील आता फॅसिलिटी मॅनेजर म्हणून एक कर्तबगार उद्योजक झाला आहे. सुधीर एका शिक्षणसंस्थेत जबाबदारीच्या पदावर आहे. अंजली मिलिंद पेंडसे गणिताची नामवंत प्राध्यापिका आहे.

अपूर्वा, अनघा आणि मृणाल या नातवंडांच्या सहवासात आता शरद-क्षमा कृतार्थानं जीवन जगत आहेत. अठ्ठावीस वर्षं दीपवती होऊन आईनं अंधारातून प्रकाशवाट निर्माण केली, याची मुलांना जाणीव आहे. मग त्यांनी ठरवलं. आपल्यापुरता आपण वेगळा बागबान साजरा करायचा. आईबरोबर ससूनमध्ये कष्टाच्या काटेरी वाटा चालणाऱ्या तिच्या मैत्रिणींना त्यांनी आवर्जून बोलावलं. दाबके (जोशी), गाडगीळ (दाबके), लिमये (देवस्थळी), अत्रे (पाटील), केळकर (अंबिके) या सगळ्या थकलेल्या मावश्या आवर्जून आल्या होत्या. लिमये कुटुंबातली झाडून सारी माणसं, तीन पिढ्यांचे वारसदार, निवडक मित्र यांची मांदियाळी ज्ञानलमध्ये जमा झाली. 'अमिताभ-हेमा'ला दोन सुखासनांवर बसवून साऱ्यांनी ओवाळलं. क्षमा आजींनी साऱ्या नातवंडांना कॅडबरी दिली. मुलं आणि नातेवाईक भरभरून बोलले. आई-वडिलांना आजारात स्वतःच्या खांद्यावरून घेऊन जाणारा श्रावणबाळ सुनील, आई-वडिलांच्या सेवेसाठी पुंडलिक होणारा सुधीर, क्षमा (हेमाच्या) मैत्रिणी, नातेवाईक हे सारेच या बागबान दृश्यानं भारावून गेले होते. कृतार्थतेने चिंब झाले होते.

■ ■ ■

# ३७. प्रतिभाक्षर

धुळ्याकडचं एक सर्वसामान्य कुलकर्णी कुटुंब. चार भाऊ, बहीण असा मोठा खटला. त्यातला एक विनायक. सगळ्यांचीच ओढाताण; पण एकमेकांचा आधार एकमेकांना घट्ट. विनायक मिलमध्ये नोकरी करून शिकत राहिला. लग्न झालं. हर्डीकरांची प्रतिभा त्याची अर्धांगिनी झाली. मूळची साहित्याची आवड असलेल्या विनायकाला लोणावळ्याला व्ही.पी.एस. हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी लागली. एका खोलीत नवा संसार मांडायचा होता. भावाला आणि वहिनीला विचारलं, 'संसारासाठी काही भांडीकुंडी घेऊन जाऊ का ?''

भाऊही थोर अंत:करणाचा. वहिनीही भली. ती म्हणाली हवं ते घेऊन जा; पण मुळातच काय होतं ? मग वहिनीनं दिलं ते घेतलं. सात-आठ हिंगाच्या डब्या- मोकळ्या, एक ताटली, एक तांब्या-भांडं, एक पातेलं, एक वाटी...

लोणावळ्यातला पहिला दिवस. एकाच पातेल्यात भात लावून तो काढून मग त्यातच आमटी केली...पण जेवायला एकच ताटली. प्रतिभानं पान वाढलं आणि तिच्या डोळ्यातून कृष्णा-कोयना वाहू लागल्या. ''जेवायला ताटही नाही हो... काय आपला संसार ?'' प्रतिभा म्हणाली.

''काही हरकत नाही. अगं जेवायला दुसरं ताट नाही ही आपल्यावर इष्टापत्तीच नाही का ! एकाच ताटात जेवू चल.'' हसत हसत विनायक म्हणाला आणि झटकन त्यानं प्रतिभाचे डोळे पुसत तिला एक उखाणाच ऐकवला...

'प्रतिभे, नको आणूस डोळ्यात पाणी,<br>
संसाराच्या सारीपाटावर आपण दोघं राजा-राणी...'

अशी दु:खालाही सुखाचा उखाणा घालून संसाराची सुरुवात केलेली प्रतिभा-विनायकाची जोडी म्हणजे भारतीय संस्कृतीतील आदर्श दाम्पत्यजीवनाचा उत्कट आविष्कार !

विनायकराव एम.ए. झाले. प्रतिभाताईंना पुण्याच्या नू.म.वि. मराठी शाळेत प्राथमिक शिक्षिकेची नोकरी मिळाली. प्रतिभाताईंचा हात स्वयंपाकघरात जसा

कलात्मकतेनं फिरे तसाच तो वर्गातील फळ्यावरसुद्धा फिरायचा. त्यांचं अक्षर सुंदर होतं. त्यांचं नावच अक्षरबाई असं झालं. अक्षरबाईंचा तास आहे, अक्षरबाई भेटल्या. असंच आता लोक बोलू लागले.

ओढगस्त संसारवेलीवर दोन टपोरी फळं आली. संजीव आणि साधना. विनायकरावांनी आता संसारातलं लक्ष पूर्णपणे काढून घेतलं आणि आणि ते आपल्या साहित्यसाधनेत रममाण होऊ लागले. त्यांनाही नू.म.वि.मध्ये नोकरी मिळाली. आपल्या विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक विनायकराव हे केवळ धडे शिकवंत नसत तर अक्षरांचा जीवनविषयक अन्वयार्थ ते उलगडून दाखवत. त्यांचा तास म्हणजे एक सुश्राव्य प्रवचन असे. तास संपल्यानंतर एखाद्या मैफलीतून स्वरांची सोबत घेऊनच रसिक रेंगाळत बाहेर पडतो तसे विद्यार्थी वर्गाबाहेर येत.

प्रतिभेच्या साथीनं विनायकरावांची अक्षरप्रतिभा फुलली. सुमारे साठ ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. भारतीय कलांवरील त्यांचा ग्रंथ म्हणजे एक संदर्भग्रंथ आहे. चंद्रमौळी घरात मात्र हारीनं मांडून ठेवणारे ज्ञानोपासक विनायकराव आता वयाची साडेआठ दशकं ओलांडत आहेत. संजीव-लीनाचा संसार बहराला आला आहे. नातू सत्यजीत उमदा आहे. साधना अरविंद कुलकर्णी आता सासू झाली आहे. पल्लवी आणि रश्मी यांच्या रिया आणि अरुष या पतवंडांच्या सान्निध्यात विनायकराव ज्ञानेश्वरीतील एखादी ओवी गुणगुणत असतात.

या आनंद सोहळ्यात उणीव एकच आहे... प्रतिभेनं विनायकरावांची साथ अर्ध्यावरच सोडली.

संसाराच्या काटेरी वाटेवर हिरवळ उगवली आणि आता दोघांनी मुला-नातवंडांसह सुखानं वाटचाल करायची या दिवसातच प्रतिभाताई कालवश झाल्या आणि विनाकरावांच्या सुखाचा कलश थोडा कलला.

पण गीताभ्यासी डॉ. विनायकराव स्थितप्रज्ञ आहेत. कारण 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' या गीताश्लोकाचा अन्वयार्थ त्यांनी पचवला आहे.

पुत्र संजीव परदेशी जाऊन कर्तबगार झाला आणि विनायकरावांच्या काळजीवाहू कारभारासाठी प्रतिभाताईऐवजी आता लीन असलेली सून लीना सज्ज असते. म्हणून नव्वदीकडे प्रवास करणाऱ्या या स्थितप्रज्ञ योग्याच्या चेहऱ्यावर शांत सौज्यनाचे सुस्वर भाव असतात. शिवगिरी अपार्टमेंटमधील हे प्रतिभाक्षर संचित अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करणारे आहे ना!

■ ■ ■

# ३८. रिक्षा, परीक्षा आणि शिक्षा

छ. राजर्षी शाहूमहाराजांची भूमिका छोट्या पडद्यावर साकारणारे प्रसिद्ध अभिनेते राहुल सोलापूरकर हे अभिनयाव्यतिरिक्त अनेक सांस्कृतिक उद्योग करीत असतात. त्यातल्याच एका कामासाठी त्यांनी परदेशातील एका व्यक्तीला एक ई-मेल केला होता. त्यांचं काम काय होतं ते झालं, पण त्या व्यक्तीने काहीही माहिती नसताना राहुल सोलापूरकरांना एकदा फोनवरून मोठ्या जिज्ञासेनं विचारलं,

"सोलापूरकर, तुम्ही नू.म.वि.चे विद्यार्थी का ?"

"होय, तुम्हाला कसं कळलं ?"

"सांगतो, पण आधी सांगा, तुम्हाला ग.के. जोशी नावाचे शिक्षक इंग्रजी शिकवायला होते का ?"

"होय, मी त्यांचाच विद्यार्थी. ग.के. आम्हाला इंग्रजी शिकवत होते; पण हे तुम्ही कसं ओळखलं ?"

"तुम्ही केलेल्या ई-मेलवरून."

"पण ई-मेलच्या मजकुरात तर याचा काहीच उल्लेख नव्हता."

"बरोबर, पण तुमच्या ई-मेलच्या प्रत्येक ओळीत फक्त आठ शब्द होते. नेमके मोजून आठ शब्द... त्यावरून मी ओळखलं."

"कसं काय ?"

"इंग्रजी लिहिताना एका ओळीत नेमके आठच शब्द लिहिणारा माणूस नू.म.वि.चा विद्यार्थी आणि ग.के. जोशीसरांचा शिष्यच असला पाहिजे, हे जागतिक सत्य आहे."

आणि मग राहुल सोलापूरकरांना आठवलं की ग.के. जोशीसर आपल्याला एका ओळीत आठच शब्द आले पाहिजेत, असं आग्रहानं सांगायचे आणि अर्थातच परदेशातील हे गृहस्थ नू.म.वि.चे विद्यार्थी आणि ग.के. जोशी यांचे

इंग्रजीचे विद्यार्थी होते.

अशा या ग.के. जोशीसरांची कहाणी म्हणजे एक चित्तरकथाच आहे. भावे स्कूलमधील निष्ठावंत शिक्षक कै. केशवराव जोशी–केपी– यांचा हा मुलगा. लहानपणापासून स्वतंत्र वृत्तीचा आणि वेगळ्या वाटेचा. त्याला राजमार्गाऐवजी पाऊलवाटा आणि हमरस्त्याऐवजी आडवळणे आवडत असावीत. मॅट्रिक झाला पण काय डोक्यात आलं कुणास ठाऊक... त्यानं रिक्षा घेतली आणि चक्क रिक्षाड्रायव्हर बनला. एका मध्यमवर्गीय शिक्षकाचा मुलगा रिक्षाड्रायव्हर हे दृश्य त्या वेळी तरी अप्रूप होतं. मग वडील केशवराव आणि मुलगा गजानन... त्याला मित्रमंडळी नाना म्हणत. यांच्या मनाचे दोर कापले गेले. नानानं शिक्षक व्हावं असं वडिलांना वाटत होतं. नाना एस.टी.सी. झाला. तो नू.म.वि. मध्ये शिक्षक म्हणून नोकरीला लागला. अंगावरचा रिक्षाड्रायव्हरचा गणवेश उतरवून नाना मध्यमवर्गीय मास्तर झाला. तरी त्याच्या दोन्ही भूमिका त्याच्या जीवनव्यवहारात एकमेकांवर कधीतरी आक्रमण करीत. मग समरप्रसंग उद्भवे आणि पाहणारे अचंबित होत.

नाना म्हणजे एक अजब रसायन होतं.

एकीकडं प्रख्यात लेखक– संशोधक डॉ. रा.चिं. ढेरे यांचा तो घट्ट कौटुंबिक मित्र होता. अरुणाचा नानाकाका होता तर दुसरीकडं रिक्षावाल्यांच्या संघटनेत तो 'मास्तर' होता. नू.म.वि. शाळेत तो आवडता 'गके' सर होता तर सहकाऱ्यांमध्ये भांडखोर पण मदतीस धावून जाणारा 'गके जोशी' होता. शाळेचा शिस्तपालन प्रमुख असणारा नाना नू.म.वि.च्या अनेक सहलींचा संयोजक होता. त्याची ॲम्बॅसेडर गाडी अनेकांना आधार देणारी होती. चक्रधारी नाना नुसता ड्रायव्हर नव्हता, तर मागे बसलेल्या प्रवाशांचा फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाइडही होता. जाडजूडही होता. एवढ्या सगळ्या गदारोळात तो आपल्या मुलांचा बापही होता आणि आई–वडिलांचा भक्त पुंडलिकासारखा मुलगाही होता. त्याच्या मित्रदरबारात कोण कोण लोक होते ? त्याच्या गाडीनं सुखाची सफर करणारे साहित्यिक, कलावंत, व्यापारी, वकील होते. रिक्षाड्रायव्हर आणि टॅक्सी ड्रायव्हर होते. नू.म.वि.तले सहकारी शिक्षक होते आणि हो... ज्योतिष विचारायला येणारे अडले नडलेलेही होते. नाना कुणाचा मित्र, कुणाचा सखा, कुणाचा शिक्षक, कुणाचा पालक आणि कुणाचा खास मित्र तर कुणाचा खमंग शत्रू होता. नू.म.वि.च्या शिक्षक आरामशाळेत मधल्या सुटीतील वादचर्चेमध्ये

टिपेचा आवाज नानाचा असायचा आणि क्रोधाचा वडनावळ असणारा नाना कधी डोळ्यातून झरा पाझरणारा हळवाही व्हायचा, हाताचा फक्त पंजा उंचावून विद्यार्थ्यांच्या डोक्यावर झिणझिण आणणारी टप्पल मारणे ही नानाची शिक्षा. नाना नू.म.वि.चा परीक्षाप्रमुख होता. आठ शब्दांची ओळ असणाऱ्या हजार ओळी लिहून आणा, अशी शिक्षा विद्यार्थ्यांना देणारा परीक्षाप्रमुख असलेला हा रिक्षाड्रायव्हर म्हणजे एक शापित यक्ष होता. असं त्याचेच घट्ट मित्र रा.चिं. ढेरे म्हणतात.

■ ■ ■

# ३९. आम्ही वारिक वारिक। करू हजामत बारीक॥

श्रीविठ्ठलाच्या अठरापगड संतभक्तांपैकी संत सेनामहाराज हे विठ्ठल भक्त होते. संत नामदेव महाराष्ट्रातून पंजाबात गेले त्याप्रमाणे सेनामहाराज उत्तरेतून महाराष्ट्रात आले.

अलाहाबाद-जबलपूर रेल्वेमार्गावर कटनी नावाचं एक जंक्शन आहे. तेथून बिलासपूरकडे एक फाटा जातो. या फाट्यावर उमरिया या नावाचं रेल्वे स्टेशन आहे. तिथं एका गडावर सातशे वर्षांपूर्वी एक वैभवशाली नगर होतं. रामराजाचं राज्य होतं. राजाच्या अनेक सेवकात देवीदास नावाचा सेवक होता. देवीदास राजाची श्मश्रू करायचा. वृत्तीनं धार्मिक, सदाचारी, प्रेमळ असलेला देवीदास आपल्या धंद्यात अत्यंत वाकबगार होता. पत्नी प्रेमकुंवरबाई आणि देवीदास यांचा संसार सुखाचा चालला होता; पण अजून अपत्यप्राप्ती नव्हती; पण सत्वस्थ वृत्तीच्या देवीदासाची इच्छा पूर्ण झाली आणि प्रेमकुंवरबाईंची कूस उजवली.

वैशाख वद्य द्वादशी.

वार रविवार

विक्रम संवत १३५७.

देवीदास आणि प्रेमकुंवरबाई माता-पिता झाले.

बालकाचं नाव ठेवलं सेना; त्याला सेना असं म्हणत. हाच सेना म्हणजे पुढं 'सेना' या नावानं प्रसिद्ध झालेला विठ्ठलभक्त!

उत्तरेतीलच एक थोर सत्पुरुष रामानंद एकदा देवीदासाच्या घरी बांधवगडास आले होते. देवीदास आणि रामानंद यांच्या गप्पा ऐन रंगात आल्या होत्या. देवीदासचा लहान मुलगा सेना खेळता खेळता त्या गप्पा ऐकायला येऊन बसला आणि गप्पा मन लावून ऐकू लागला. रामानंदांना आश्चर्य वाटलं... मग रामानंदांनी या बाळाला गुरुमंत्र दिला आणि या दिवसापासून सेनाबाळही भक्तीत रममाण होऊ लागला.

बांधवगडचे राजा वीरसिंह यांच्या सेवेत मोठा झाल्यावर सेनाही जाऊ लागला; पण त्याचं सारं लक्ष परमार्थ चिंतनाकडे होतं. सेना मोठा झाला.

विवाह झाला. देवीदास-प्रेमकुंवरबाई यथाकाल निवर्तले. मग सेनावर संसाराची सेवेची पूर्ण जबाबदारी होती.

एकदा उत्तरेकडील बरीच साधुसंत मंडळी सेनामहाराजांकडे आली होती आणि रोजच्याप्रमाणे राजवाड्यात महाराज वीरसिंहाच्या सेवेस जाणं सेना विसरून गेला. महाराजांच्या दरबारी सेनाचा वाढलेला लौकिक मत्सरी लोकांना बघवत नसे. सेनाचा विलंब त्यांच्या पथ्यावरच पडला. राजानं राजदूत पाठवला. सेना पारमार्थिक संवादात रममाण झाला होता. दूत तसेच परत गेले. राजाचे कान त्यांनी भरले. राजा क्रोधाविष्ट झाला. सेनाला पकडून आणण्यासाठी त्यानं हत्यारी प्रहरी पाठवले आणि एवढ्यात...

सेना राजवड्यात प्रविष्ट झाला.

सेनाचं रूप आज विलक्षण वेगळं दिसत होतं.

त्याच्या हत्यारांना वेगळंच तेज आलं होतं. त्याचा हात नेहमीपेक्षा सफाईदार होता. आपले काम करताना सेना तोंडानं गुणगुणत होता...

'आम्ही वारिक वारिक। करू हजामत बारीक।।'

काम संपलं. राजा खूश झाला, त्यानं ओंजळभर मोहरा सेनाच्या चौकटीत टाकल्या. सेना गेला. मत्सरी लोकांचे चेहरे उतरले आणि आणखी एक आश्चर्य घडले. थोड्याच वेळात सेना पुन्हा परत आला. राजाला आश्चर्य वाटलं. या वेळी सेनाचा चेहरा उतरला होता.

राजानं विचारलं, ''काय झालं सेना ?''

''महाराज, संत मंडळींशी संवाद करताना मला भान राहिलं नाही. चला, आता कामाला लागतो. बसा. मी अंगाला तेल लावून देतो.''

''अरे आत्ताच तर येऊन गेलास ना ? मी तुझ्या धोकटीत मोहोरा टाकल्या.''

''महाराज, मी आलो होतो ?'' सेना चमकला.

सेनासाठी स्वत: पांडुरंग सेनारूप घेऊन आला. मग सेना गाऊ लागला...

'आम्ही वारिक वारिक। करू हजामत बारिक।।
विवेकदर्पण आयना दावू। अहंकाराची शेंडी पिळू।।
भावार्थाचा बंगला झाडू। कामक्रोध नखे काढू।।'

असा विठ्ठलभक्त सेना पंढरपुरी आला आणि म्हणाला...

घेता नाम विठोबाचे। पर्वत जळती पापांचे।।

श्रावण वद्य द्वादशी सेनामहाराज विठ्ठलरूप झाला.

■ ■ ■

# ४०. बैराग्याचा आशीर्वाद

कोकणातलं आंबवडे नावाचं गाव. मंडणगडापासून सुमारे पाच मैलांवर असलेल्या या लहानशा गावात सकपाळ नावाचं एक कुटुंब राहत होतं. घराण्याची कुलदेवता भवानी. घराण्याच्या देवीच्या पालखीचा मान सकपाळ घराण्याकडे होता. या घराण्यावर नाथपंथाची सावली होती. याच घराण्यातील रामजी हे लष्करात गेले. रामजींचे वडील मालोजी हेही लष्करात होते.

लष्करातल्या पद्धतीप्रमाणे बदल्या या ठरलेल्याच. मालोजीराव लष्करात होते; त्या वेळी छावणीतल्या मुलांसाठी शाळा चालविल्या जात. अशाच एका छावणी शाळेत रामजी सकपाळही होते.

रामजी सकपाळ लष्कराच्या ज्या पथकात होते; त्याच पथकात योगायोगानं सुभेदार मेजर धर्माजी मुरबाडकर यांची नेमणूक झाली होती. मुरबाडकर कोकणचे आणि सकपाळही कोकणचे. दोघांचा परिचय मातीच्या ओढीनं अधिक दृढ झाला.

धर्मा मुरबाडकर यांची मुलगी लग्नाची होती. नाव तिचं भीमा. धर्माजींनी जावई म्हणून रामजी सकपाळांची निवड केली.

अठराशे पासष्ट साली एका शुभमुहूर्तावर धर्माजी मुरबाडकर यांची लाडकी लेक भीमाबाई रामजी सकपाळ झाली. गोरीपान, उठावदार व्यक्तिमत्त्वाची भीमाबाई सकपाळांच्या घरी आनंदानं नांदू लागली. माहेरची श्रीमंती होती. सासरी परिस्थिती बेताची होती. काही लोक दरिद्री नवऱ्याची बायको म्हणून भीमाबाईंकडं उपेक्षेने बघू लागली; पण तडफदार भीमाबाईंनी आपल्या सासरचा संसार उचलून धरला आणि मग तर भीमाबाईंनं माहेरचं टाकलं.

मोहरी जावं वाटायचं. माहेरचा सांगावा यायचा; पण मनाला आवर घालून भीमाबाई गप्प राहायची.

एकदा असाच माहेरचा सांगावा आल्यावर भीमाबाईनं निरोप पाठवला...

''माझ्या स्वत:च्या घरी दागिने वाळत टाकण्याएवढी श्रीमंती आली म्हणजे

मग मी माहेरी येईन, तोपर्यंत वाट बघू नका.''

अशा या मानिनी भीमाबाईनं संसार मांडला. उत्पन्न बेताचं. महत्त्वाकांक्षा मोठी. भीमाबाईनं संसारात कुठंही उणीव भासू दिली नाही की कष्टाला कमी केलं नाही.

रामजींची पुण्याला पाठवणी झाली टीचर्स ट्रेनिंग कॉलेजात. भीमाबाई मुंबईला. रामजी पैसे पाठवत तेवढ्यात काटकसरीनं संसार भागवण्याची कसरत भीमाबाई करीत– संसाराला मदत म्हणून तर एकदा तर या मानिनीनं चक्क रस्त्यावर खडी टाकण्याचं काम केलं. गरज भागली.

१८६५ साली लग्न झालं. १८९० पर्यंत भीमाबाईंना तेरा मुलं झाली. त्यातील सहाच जगली. बाळाराम, आनंदराव हे मुलगे, गंगाबाई, रमाबाई, मंजुळा, तुळसा या मुली.

मग रामजी सकपाळ यांना सुभेदार मेजर या पदापर्यंत बढती मिळाली. सासऱ्याच्या पंगतीला जावई बसण्याएवढी प्रतिष्ठा मिळाली. मग भीमाबाई माहेरी जाऊ–येऊ लागल्या.

रामजी सुभेदारांची बदली मध्य प्रदेशात महू इथं झाली. १८९० चा सरता महिना...

भीमाबाई गर्भवती होत्या.

रामजी सकपाळ यांचे एक काका लहानपणी बैरागी होऊन कोकणातून निघून गेले होते. बराच काळ त्यांचा शोध नाही लागला.

महूला साधुबैराग्याचा एक मेळा होता. रामजींना कुणी तरी सांगितलं, या मेळ्यात तुझे काका मिळतील.

रामजी तडक नदीवर गेले. सारेच बैरागी सारखे; पण अंतरीची खूण पटली आणि त्या काकांना रामजींनी ओळखलं. घरी चला म्हणाले... बैरागीकाकांनी नकार दिला; पण एक तोंडभरून आशीर्वाद दिला...

''जा बेटा, सुखानं घरी जा. लवकरच तुझ्या घरात नवा अवतार होणार आहे. हा मुलगा तुझं नाव करील.''

रामजी घरी आले. १४ एप्रिल १८८१... भीमाबाईंना मुलगा झाला. हा मुलगा म्हणजेच भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर!

बैराग्याचा आशीर्वाद खरा ठरला.

■ ■ ■

# ४१. देवासी केले एकदेशी

पैठणचे संत एकनाथ महाराज म्हणजे शांतिब्रह्म एकनाथ. सद्गुरू जनार्दनस्वामी यांच्याबरोबर एकनाथांनी तीर्थयात्रा केली. 'जग पाहणे अनुभवणे' हा तीर्थयात्रेचा उद्देश जनार्दनस्वामींनीच सांगितला होता.

खरं तर एकनाथांना अशा प्रकारे तीर्थयात्रेची काही गरजच नव्हती. त्यांचे गुरू एक किल्लेदार होते. एका परगण्याचे अधिकारी होते. गुरूंची आज्ञा म्हणून एकनाथ निघाले गुरूंच्या बरोबर. पंतांनी नाथांसाठी एक घोडी तयार ठेवली होती. स्वत:साठी एक घोडा होता. बरोबर सेवकवर्ग होता, आचारी होते.

अशी ही वैभवशाली तीर्थयात्रा होती.

नाथ आणि जनार्दनपंत.

गुरू आणि शिष्य. तीर्थयात्रेसाठी प्रस्थान ठेवते झाले. एखादे निसर्गरम्य ठिकाण दिसले की दोघेही मुक्काम करीत. एखाद्या संत पुरुषाचा सहवास घडला तर त्याच्याशी संवाद साधत.

या प्रवासात नाथांनी अनेक प्रकारची माणसं पाहिली. निरनिराळ्या धर्माचे, पंथाचे लोक त्यांना भेटले आणि त्यांना एक प्रश्न सतत भेडसावत राहिला.

धर्म, जात, पंथ यांचे हे सारे भेद कशासाठी ?

एकनाथांना परमार्थदर्शनाची तळमळ लागली होती. तोच त्यांचा ध्यास होता. परमात्मस्वरूप हे एकच असते. मग तिथं 'द्वैतभाव कैसा ?'

एकनाथ एकदा देवळात गेले. तिथं भजन-पूजन चाललं होतं; पण बाहेर एक मियाँ उभा होता. तो भजन तल्लीनतेनं ऐकत होता; पण तो आत आला नाही ?

तसेच एकदा ते एका मशिदीसमोरून जात होते. तिथं मुस्लिम बांधव आत ये-जा करीत होते.

हेही देवस्थानच ना, असा प्रश्न त्यांच्या मनी आला. त्यांनी याच प्रवासात

धर्मासाठी भांडण झाल्याच्या काही घटना ऐकल्या. काही प्रसंग अनुभवले.

त्यांनी आपली मन:स्थिती जनार्दनस्वामी यांच्यासमोर व्यक्त केली.

"एकनाथा, म्हणून तर मी तुला तीर्थयात्रेला आणलं आहे."

"पण गुरुदेव, जसजसे आपण मार्गक्रमण करीत आहोत तसतसं समाजाचं वेगळंच चित्र मला दिसतंय."

"तसं ते दिसावं आणि समाजातला हा द्वैतभाव नष्ट करण्यासाठी तू पुढं यावंस म्हणून तर आपण तीर्थयात्रेला चाललो आहोत."

"लवकरच तुझ्या मनातलं हे द्वंद्व नाहीसं होईल. तुला मार्ग सापडेल."

"या आश्वासनानंतर एकनाथ थोडे स्थिरचित झाले आणि मग जनार्दनस्वामींना पुढील प्रवासात एक विलक्षण दृश्य दिसलं.

पहाटे एका मशिदीतून बांग येत होती. बांग सुखद होती; पण मशिदीतून मुद्दाम देण्याची आवश्यकता आहे का, असा मनात प्रश्न उभा राहिला आणि मग एकनाथांनी त्या रात्री शांतपणे चिंतन केले. मध्यरात्रीस ते उठले... त्यांची लेखणी लिहू लागली...

खुदा माना पश्चिमेकडे, येरे अवघे ओस पडे ?
पांच वख्त खुदाचे झाले, बाकी वख्त काय चोरी नेले ?
तुमचे शास्त्र तुम्ही भुलले, देवासी केलं एकदेशी।

धर्मवेडे लोक एकमेकांना त्यांच्या त्यांच्या धर्मातील कर्मानुसार नावे ठेवून भांडतात. त्यावर नाथ लिहितात–

कुणास म्हणता पूजिता फत्तरे, तुम्ही का ठेविता प्रेतावर फुले ?
केवळ जे का मेले मढे, त्याची जतन करता हाडे !

असे परखड प्रश्न विचारून हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्माबाबत जे लोक धर्मवेडेपणाने इतरांना कमी लेखतील त्यांना एकनाथांनी बजावलं– 'देवासी केले एकदेशी' असं करू नका.

■ ■ ■

# ४२. आय.एन.एस. शिवाजी ते शिवाजी मंदिर

सकाळी साडेसातची वेळ. शिवाजी मंदिराकडून पुण्यातील नृसिंह मंदिराकडे एक 'अर्धी चड्डी घोळका' येत असतो. या घोळक्यात मनोहर जोशी, विठ्ठल बोरकर, दिलीप नलावडे, भास्करराव बापट असतात; पण याच्या केंद्रस्थानी गोलसर चेहऱ्याची, खाकी अर्धी विजार पण वर पांढरा स्वच्छ टी-शर्ट घातलेली आणि चेहऱ्यावर माफक हसू आणि मूठभर गांभीर्य असलेली व्यक्ती असते.

नाव यशवंत गोपाळ पेंडसे. कुणाला न विचारता कळेल की हा घोळका आत्ताच 'विश्राम' होऊन आलेला आहे. त्यातले पेंडसे यांच्याकडे पाहिले की असं वाटतं या गृहस्थाचा 'डिफेन्स'शी संबंध आहे आणि ते खरंच आहे. लोणावळ्याच्या आय.एन.एस. शिवाजीपासून भारतीय नाविकदलात नोकरीची सुरुवात करून पेंडसे विशाखापट्टणम इथं गेले. पंधरा वर्षांच्या सेवेत सिंगापूर, इंग्लंड, सिलोन, चीन, जपान, जिब्राल्टरची सामुद्रधुनी या सर्व ठिकाणी ते हिंडले.

पण पेंडसे यांचं वैशिष्ट्य असं की त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कुठंही या परदेश प्रवासाचा 'तोरा' तोळाभरही दिसत नाही. नाही तर परदेशप्रवास केलेली माणसं बऱ्याच वेळा इथल्या स्वदेशी मातीत नजर मिळवायलाही तयार नसतात.

वडील गोपाळराव पेंडसे हे वकील होते आणि राष्ट्राभिमानी होते. त्यांचा वारसा चालविणाऱ्या यशवंतरावांना अनेक दु:खांना सामोरं जावं लागलं आहे. त्यांचे दोघे धाकटे बंधू, विनायक आणि डॉ. बाळकृष्ण हे ऐन बहरात असताना पाठोपाठ गेले. विनायकरावांच्या पत्नी अलका या मुलींच्या शाळेत शिक्षिका आहेत.

आणि आणखी एक मोठा आघात यशवंतरावांना सहन करावा लागला...

रामदुर्ग संस्थानातील फडके कुटुंबातील शैलजा यशवंतरावांची सहचारिणी झाली. संसारवृक्षावर दोन टपोरी फुलं आली. मुलगी छाया आणि मुलगा सचिन.

छाया आता कोकणवासी होऊन रत्नागिरीत डॉ. बेडेकर यांची गृहस्वामिनी झाली आहे. आदित्य आणि अनुराग ही तिची मुलं आता तरुणाईत आहेत.

पण...

शैलजा-यशवंत यांच्या सुखी संसाराला काळभैरवाच्या छायेनं ग्रासलं, एक कोपरा पुरा काळवंडून गेला.

३३ वर्षांच्या तरुण सचिनचा अपघाती मृत्यू झाला आणि नाविकदलात काम करणाऱ्या या धीरोदात्त यशवंताचं काळीज गलबललं. शैलजाताईंना तर हा आघात म्हणजे मुष्टिप्रहारच वाटला. त्यातून बाहेर यायला त्यांना खूप वेळ लागला. मग त्यांनी मार्ग शोधला. त्यांनी भजनवर्गाला जाऊन मनाला शांतता मिळविली.

'दैवजात दु:खे भरता दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'

या ओळीतील अर्थ स्वत:च्या जीवनात सामावून घेणारे यशवंतराव मग निष्ठेनं समाजकार्यात सहभागी होऊ लागले. ग्राहकपंचायतीच्या ग्राहकपेठेच्या कामात त्यांचा सहभाग होता. त्यांची राहती सोसायटी पेंडसे स्नेहवर्धिनी सभा यामध्ये ते आपलं योगदान देतात.

आणि होय...

भारतीय नाविकदलाच्या सेवेतील त्यांचे सहकारी मित्र आजही एकमेकांना भेटतात. त्यांचा एक घट्ट ग्रुप आहे. त्यामध्ये सुधीर हर्डीकर, एन.पी. जोशी, अण्णासाहेब पटवर्धनांचे नातू श्रीनिवास पटवर्धन हे आहेत. राईलका आहेत. हे सर्व जण वर्षातून केव्हातरी एकत्र जमतात आणि आपल्या समुद्र सफरीच्या जीवनाची उजळणी मनोभावे करतात. त्यांचे कुटुंबीयही त्यात सहभागी असतात.

आय.एन.एस. शिवाजीमध्ये असलेले यशवंतराव पेंडसे गेली अनेक वर्षे नियमानं सकाळी साडेसहाला त्यांच्या 'शिवाजी वेशात' शिवाजी मंदिरात जाताना दिसतील. खाकी अर्धी चड्डी ही शिवाजी मंदिर शाखेची आणि वरचा पांढरा स्वच्छ टी-शर्ट आय.एन.एस. शिवाजीचा! असा सुरेख संगम त्यांच्या प्रौढ, गंभीर व्यक्तिमत्त्वात आहे.

दर शनिवारी रेणुकास्वरूपच्या मागे 'श्री साई'मध्ये अरुण अभ्यंकर, आपटे बंधू, नाना जोशी, शंकरराव थत्ते यांच्या मेळाव्यात भेटणारे यशवंतराव यांनी दोन शिवाजी स्थानकांचा संगम आपल्या व्यक्तिमत्त्वात साधलेला असतो.

■ ■ ■

# ४३. 'नन्ही दुनियाँ'चा मोठा शिल्पकार

मुंबईतील दादर भागात समर्थ आर्ट स्टुडिओ नावाचा एक स्टुडिओ. इथं तासाला रुपया याप्रमाणे कामावर एक हौशी चित्रकार होता. नाव होतं प्रमोद कांबळे. अहमदनगरचा प्रमोद चित्रकलेच्या शिक्षकाचा मुलगा. घरातच चित्रकलेचे संस्कार मिळाले. चौघे भाऊ चित्र काढीत होते. कागदावर चित्र काढता काढता प्रमोदला मातीचंही वेड लागलं. छोट्या-मोठ्या मूर्ती तो बनवू लागला. राजपुरे यांच्या गणपतीच्या कारखान्यातल्या गणपतीच्या मूर्ती त्याला सुखावू लागल्या. इकडं शाळा सुरू होती; पण केव्हातरी एकदा म्हात्रे शिल्पकार यांनी लिहिलेलं 'ढे ींहश ढशाश्रिश' हे पुस्तक वाचण्यात आलं. र.बा. केळकर हे प्रख्यात शिल्पकार भेटले. तेच प्रमोदचे शिल्पकलेतील गुरू!

प्रमोद नगरला आठवीत शिकत होता. तेव्हा घरी मोठा प्रश्न निर्माण झाला. वडिलांची नोकरी गेली. मग प्रमोदनं पोटापाण्यासाठी आपली कला राबवायला सुरुवात केली. दुकानांचे फलक रंगविणे, पेपरची लाइन टाकणे आणि नगरच्या सुरेश पब्लिसिटीसाठी जाहिरातीची डिझाइन्स तयार करून देणे अशी कामं प्रमोद करू लागला. संधी मिळाली आणि मुंबईच्या जे.जे. कला महाविद्यालयाच्या शिल्पकलेचा अभ्यासक्रम त्यानं पूर्ण केला. यावेळीच काहीतरी काम करणं आवश्यक होतं म्हणून दादरच्या समर्थ आर्ट स्टुडिओत त्यानं नोकरी केली.

मुंबईतच त्याला काम चांगलं मिळालं होतं; पण मुंबापुरीत मन रमेना, मातीची ओढ स्वस्थ बसू देईना. नगरच्या मातीत राहूनच मातीच्या कलेतून काही मिळवायचं असा त्यानं मनोमन निश्चय केला. नगरमध्ये येऊनही संघर्षांनी त्याची पाठ सोडली नाही. तरीही हा कलावंत संघर्षांना सामोरा जात जात आपली अंतरीची कला फुलती ठेवू लागला.

बघता बघता एक आर्ट गॅलरी तयार झाली. ९०० पेन्सिलींचा वापर करून ७२ दिवसात पाचशे भारतीय सुपुत्रांची पेन्सिल स्केचेस भव्य स्वरूपात प्रमोद कांबळे यांनी साकारली.

यामध्ये भगवान राम, श्रीकृष्ण, संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यापासून लता मंगेशकर यांच्यापर्यंत अनेक नेते, संत, क्रांतिकारक, कलावंत, साहित्यिक, समाजकार्यकर्ते आहेत.

या आर्ट गॅलरीला आता देश-विदेशातले लोक वारंवार भेटी देतात. पण... प्रमोद कांबळे यांची आणखी एक हातोटी आहे.

प्रमोद कांबळे यांच्या घराबाहेर, स्टुडिओसमोर बालगोपाळांची गर्दी असते. शाळा सुटली म्हणजे तर हे बालगोपाळ घरी जाण्याचं विसरून, पोटातील भुकेला मागं ठेवून त्यांच्या घरासमोर रेंगाळतात. तिथं निरनिराळे प्राणी या मुलांना भेटतात.

हे कसं काय ?

प्रख्यात समाजसेवक नानाजी देशमुख यांनी मध्य प्रदेशातील चित्रकूट इथं सांस्कृतिक नगरी उभी केली आहे. शेती, वनश्री, औषधी झाडे, पाणी, गृहबांधणी, उद्योग याबाबतचा आगळावेगळा प्रयोग चित्रकूट इथं साकारला आहे. नानाजींनी आफ्रिकेच्या जंगलात व इतरत्र बरीच भ्रमंती केली आहे. तेव्हा त्यांनी विचार केला, विविध वन्यप्राण्यांचं एक प्राणीवन इथं साकारावं. शिवाय ते हिंस्र अवस्थेत न दाखवता त्यांच्या वत्सल मूर्ती दाखवाव्यात. वाघीण व तिची मुलं, सिंह-सिंहीण व त्यांचे छावे, गाय-वासरू इत्यादी.

आणि हे आव्हान प्रमोद कांबळे यांनी स्वीकारलं. प्रत्येक प्राण्याची शरीररचना, स्वभाव यांचा तपशीलवार अभ्यास करून त्यांनी प्रथम प्राण्यांचे सांगाडे बनविले. चिकणमातीतील आकार तयार करून मग फायबरमध्ये त्याचे मोल्ड घेतले.

हे चित्रकूटसाठी तयार होत असलेले प्राणी नगरच्या कांबळे यांच्या स्टुडिओत साकारत होते, तेव्हा स्टुडिओपाशी जणू काही प्राणिसंग्रहालय उभे राहिले आणि मग कांबळे यांनी चित्रकूट इथं उभी केली 'नन्हीं दुनियाँ'. ही नन्हीं दुनियाँ म्हणजे दृष्टीसुखाचा आनंद सोहळा आणि पुन:प्रत्ययाचा अनुभवी साक्षात्कार !

'नन्ही दुनियाँ'मधले वाघ, मगर, हत्ती, जिराफ हे प्राणी बघून आबालवृद्ध प्रभावित होत असतात.

ही नन्ही दुनियाँ साकारणारे सृजनशील हात होते प्रमोद कांबळे यांचे. राष्ट्रपती अब्दुल कलामही ही नन्हीं दुनियाँ बघताना लहानाहून लहान झाले. 'नन्हीं दुनियाँ' साकारणारा असा मोठा शिल्पकार कांबळे !

■ ■ ■

# ४४. कापसाचा दोरा आणि दोऱ्याचा कापूस

कोकणातील पोमेंडी गावचं एक जोशी कुटुंब. गावातील देवस्थानांची व्यवस्था बघण्याचं काम या जोशी कुळाकडं होतं. सखारामपंत जोशी हे गावचे खोत होते. पसारा मोठा. त्यांचे नातू भाऊ तथा गणेश हेही अत्यंत विवेकी आणि व्यवहारदक्ष होते. गणेशपंतांना पाच मुलं झाली. तीन मुलगे आणि दोन मुली. त्यातलाच एक विठ्ठल. जोशी कुटुंबाची उपास्यदेवता श्रीराम! रामाचा दास हनुमंत. लहानग्या विठ्ठलाला वाटे हनुमंतासारखे आपण सेवाभावी व बलदंड व्हावे. विठ्ठलाला पुस्तकी शिक्षणात रस नव्हता. रत्नागिरी इथं सरकारी हायस्कुलात सहावीचं शिक्षण घेऊन विठ्ठलानं शाळेला रामराम ठोकला तो कायमचा!

बालपणापासून भगवद्भेटीची ओढ असलेल्या विठ्ठलानं संत साहित्याचे वाचन आणि पूजाअर्चा यातच कालक्रमणा करण्याचं ठरवलं. स्वच्छता, नीटनेटकेपणा, रेखीवपणा हा विठ्ठलाच्या कार्यक्रमांचा विशेष असे.

पुण्यातील बीडकर महाराजांचे नारायण केशव रानडे हे विठ्ठलाचे नातेवाईक होते. त्यांनी बीडकर महाराजांचे चरित्र वाचायला दिले. श्रीसंत नारायण महाराज केडगावकर यांच्याही दर्शनाची संधी बारा वर्षांच्या विठ्ठलाला मिळाली.

त्यांच्याकडून प्रसादाचा नारळ मिळाला, आशीर्वाद मिळाला आणि आणखी एका महान सत्पुरुषाचा सहवास या कुमारवयीन विठ्ठलाला लाभला; ते महान संत म्हणजे श्री गाडगेबाबा!

गाडगेबाबा रत्नागिरीला आले होते. विठ्ठल दर्शनासाठी गेला; पण ज्या वेळी तो तिथं गेला ती वेळ गाडगेबाबांची विश्रांतीची व एकांताची होती. रत्नागिरीतील मारुतीच्या देवळासमोर बेरडेवाणी यांच्या घरी गाडगेमहाराजांचा मुक्काम होता.

विठ्ठलानं काय करावं...

हळूच मागच्या दारानं, पाय न वाजवता प्रवेश मिळवला. गाडगेमहाराज झोपले होते. विठ्ठलानं त्यांचा चरणस्पर्श केला. गाडगेमहाराज त्या काळी

कुणालाही चरणस्पर्श करू देत नसत. कुणी पाय धरले तर ते रागावत आणि क्वचितप्रसंगी पाय धरणाऱ्याला काठीचा मारही मिळे. गाडगेमहाराजांचा हा पदस्पर्शासंबंधीचा रुद्रावतार अनेकांना माहीत होता. त्यामुळे सर्वसामान्य लोक साधारणपणे काठीच्या अंतरावरून त्यांचं दर्शन घेत.

आणि इथं तर अप्रूप घडलं.

विठ्ठलानं गाडगेमहाराजांचे पाय घट्ट पकडले होते. गाडगेमहाराज खडबडून उठले. त्यांनी पाहिलं... एका कोवळ्या सुकुमारानं भक्तिभावानं आपले पाय धरले आहेत. तरीही गाडगेमहाराज लटिके रागावले...

हातातली काठी त्यांनी उगारली आणि खड्या आवाजात ते गरजले–

''पाय सोड... नाहीतर ठार मारून टाकीन.''

तरीही विठ्ठलानं पाय सोडले नाहीत. कुमार विठ्ठल शांतपणे म्हणाला, ''मारलेत तर मारा. आपल्या चरणी मोक्ष मिळेल.''

या कुमाराचे हे भावपूर्ण उद्‌गार गाडगेमहाराजांनी ऐकले आणि त्यांचा लटका राग लगेच मावळला. उसनं अवसान गळालं. गाडगेमहाराजांनी विठ्ठलाला प्रेमभरानं उठवलं आणि विचारलं, ''हे तुला कुणी शिकवलं बाळ ?''

''मला कुणीच शिकवलेलं नाही. हे मूळचंच आहे महाराज.'' विठ्ठल.

''ऊठ बाळा. तू काही वेगळा दिसतोस. तुला काय पाहिजे ?''

''मला काय हवे असणार ? करणारच असाल तर एका शंकेचं निरसन करा महाराज.'' विठ्ठल आर्जवीपणानं म्हणाला.

''तुझी शंका काय आहे ते तर सांग.'' प्रेमभरानं गाडगेमहाराज म्हणाले.

''कापसाचा दोरा होतो, त्याला पीळ पडतो. त्याचा पीळ काढून टाकून त्याचा पूर्ववत कापूस बनविता येईल का ?'' विठ्ठलानं विचारलं.

कुमार विठ्ठलाच्या या प्रश्नावर गाडगेबाबाही अंतर्मुख झाले. त्यांचा राग तर मावळला होताच; पण हा प्रश्न म्हणजे अंतरीची खूण आहे असं त्यांना वाटलं. श्री गाडगेमहाराज प्रसन्नतेने हसले. अंतरीची खूण पटली आणि मग श्री गाडगेमहाराजांनी विठ्ठलाला आपुलकीनं जवळ घेतलं. ते मृदू स्वरात म्हणाले–

''होईल बरं बाळा ! या दोऱ्याचाही पूर्ववत कापूस होईल, कसा आणि केव्हा ते लवकरच तुला कळेल. माझा तुला आशीर्वाद आहे.''

श्री गाडगेमहाराजांचा कृपाशीर्वाद मिळालेला हा कुमार विठ्ठल म्हणजेच भविष्यात ख्यातनाम झालेले सद्‌गुरू दिगंबरदास महाराज !

■ ■ ■

# ४५. तत्त्वज्ञ, मार्गदर्शक आणि मित्र

सुमारे तीस वर्षांपूर्वीची गोष्ट ! पेरुगेटजवळच्या गोरे हॉस्पिटलमध्ये एक प्रौढ रुग्ण उपचार घेत होता. इस्पितळानं दिलेली औषधांची यादी त्यानं पाहिली. केमिस्टच्या दुकानात औषधं आली होती. बरेच पैसे द्यायचे होते. एवढ्यात त्याला भेटायला एक प्रौढ गृहस्थ आले. कृष्णवर्ण, डोक्याचं टक्कल, सोनेरी काडीचा चष्मा, चेहऱ्यावर करारी भाव, डोळ्यात बुद्धिमत्तेचं अफाट तेज, वेश पाश्चात्त्य; पण वाणी अस्खलित संस्कृतात डुंबलेली.

"कशी आहे तब्येत आता ?" त्यांनी रुग्णाला विचारलं.

"सर, आता बरी आहे; पण या प्रकृतीच्या कारणामुळं पुढील प्रकरण मी तुम्हाला लवकर दाखवू शकलो नाही."

"आधी हे प्रकृतीचं प्रकरण संपवा. मग आपल्या संशोधनाचं प्रकरण. काळजी नका करू. मी आहे नं," असं वत्सल स्वरात त्या विद्वान व्यक्तीनं त्या रुग्णाला आश्वस्त केलं.

हा रुग्ण म्हणजे ख्यातनाम गायक दत्ता वाळवेकर !

आणि त्याला भेटायला येणारी ती विद्वान व्यक्ती म्हणजे प्रसिद्ध समीक्षक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख, लेखक आणि नामांकित वक्ते डॉ. रा.शं. वाळिंबे !

वाळिंबेसर नुसते भेटायला येऊन थांबले नाहीत तर त्यांनी केमिस्टच्या दुकानात जाऊन सांगितलं, "वाळवेकरांकडून पैसे घेऊ नका. यांचे औषधांचे पैसे मी देईन."

दत्ता वाळवेकर हे गायक न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता इथे शिक्षक होते. उत्तम हस्ताक्षर आणि बायचित्रण ही त्यांची वैशिष्ट्ये होती. आपल्या एका लेखक मित्राच्या संगतीने ते एम.ए. झाले आणि त्यांनीच डॉ. रा.शं. वाळिंबे यांना त्यांचा परिचय करून दिला. पुढे वाळवेकर यांना पीएच.डी. करण्याची इच्छा झाली आणि त्यांनी डॉ. रा.शं. वाळिंबे यांच्याकडं संशोधक म्हणून नाव

नोंदवलं. 'खत्री बोली' या मराठीच्या बोलीवर त्यांचं संशोधन सुरू झालं. वाढता संसार, मिळवता हात एकच... समीरण आणि संगीता ही शिकणारी मुलं, त्यांच्या शिक्षणाचा खर्च... आणि आता पीएच.डी.च्या संशोधनासाठी होणारा खर्च. वाळवेकरांची तारांबळ होऊ लागली.

तशात जमदग्नी म्हणून वाळिंबे यांची ख्याती होती; पण वाळिंबे यांचे व्यक्तिमत्त्व असं होतं की रागावले तर भस्म करून टाकतील; पण लोभावले तर जिव्हाळ्याचं अमृतशिंपण करतील. शिस्तीला कडक, बोलायला धडक, चालायला तडक आणि निर्णयाला तडकफडक असं व्यक्तिमत्त्व असणाऱ्या वाळिंबे यांचं शिष्यत्व पत्करणं म्हणजे तारेवरची कसरत होती. दत्ता वाळवेकर यांना तसे अनुभव येतच होते. संशोधन कार्यात कुठलीही तडजोड आणि दिरंगाई त्यांना चालणार नव्हती; पण त्याचवेळी माणूस म्हणजे माणुसकीची गहिवर असलेल्या वाळिंबे यांचा वाळवेकर यांना वेळोवेळी प्रत्यय आला.

पीएच.डी.साठी विद्यापीठाकडं फीचे हप्ते भरायचे होते. वाळवेकर यांनी आपल्या एका लेखक मित्राची मदत घेतली होती; पण तरीही ओढाताण होतच होती आणि काय आश्चर्य...

वाळवेकर एक संशोधनाचं प्रकरण दाखविण्यासाठी भारती निवास कॉलनीतील वाळिंबे यांच्या बंगल्यावर गेले तेव्हा...

हडसून खडसून त्या लिखाणाबाबत चर्चा करून वाळिंबे यांनी वाळवेकरांना जणू तापल्या तव्यावर उभं केलं होतं.

चर्चा संपली, वाळवेकर थोड्या खिन्न मनानं निघाले...

"थांबा वाळवेकर," वाळिंबे सर करड्या आवाजात उद्गारले.

"काही राह्यलंय का सर ?" वाळवेकरांनी खालच्या आवाजात विचारलं.

"हो बरंच काही राहिलं आहे." सर पुन्हा तारस्वरात म्हणाले.

आत गेले आणि एक कागद घेऊन आले. ती पावती होती. विद्यापीठाची... परीक्षा विभागाची फी भरलेली पावती...

"हे राहिलं होतं. ही तुमची फीची पावती आहे. आता निश्चिंत मनानं पुढचा अभ्यास करा. पुढचं प्रकरण आठवड्यात दाखवा."

वाळवेकर भारावले. एका जमदग्नीची कृपा त्यांनी अनुभवली होती. शिक्षक हा तत्त्वज्ञ, मार्गदर्शक आणि मित्र असतो. (त्रीळशपव, झहळश्रीहिशी, त्रींळवश) असं त्यांनी वाचलं होतं. त्याचा रोकडा प्रत्यय वाळवेकरांना आला होता.

■ ■ ■

# ४६. करुणा आणि क्रौर्य

जेम्स नावाचा चित्रकार होता. विविध रंगछटांनी त्याची सजलेली चित्रं हा रसिकांच्या आनंदाचा विषय होता. विविध महापुरुषांच्या चित्राकृती त्यानं साकारल्या होत्या.

जेम्सला भगवान येशू ख्रिस्ताचं चित्र काढायचं होतं. ख्रिस्त म्हणजे करुणा. ख्रिस्त म्हणजे परोपकार. ख्रिस्त म्हणजे माया. ख्रिस्त म्हणजे अपार मानवप्रेम!

अशा या महामानवाचं चित्र काढायचं म्हणून जेम्सला ती जबाबदारी वाटत होती. मग जेम्स आपल्या गुरुवर्याकडं गेला. नम्रतेनं म्हणाला, "गुरुदेव, भगवान येशू ख्रिस्ताचं चित्र काढायचं म्हणतोय. मला आपलं मार्गदर्शन हवंय."

"वत्सा, विचार चांगला आहे; पण एक सांगतो. येशू ख्रिस्ताचं चित्र कल्पनेनं काढू नको. समोर कुणीतरी मॉडेल ठेव. ज्याच्या डोळ्यात अपार करुणा आहे अशी एखादी व्यक्ती शोध. अशा व्यक्तीला समोर ठेवून तू तशा करुणार्द्र चेहऱ्याचं चित्र काढ."

"आज्ञा प्रमाण गुरुजी," असं म्हणून जेम्स असं आपलं मॉडेल शोधायला बाहेर पडला. अपार करुणाभाव असलेला, निष्पाप असा चेहरा त्याला हवा होता. सध्याच्या या चंगळवादी, भोगवादी दुनियेत त्याला असा चेहरा कुठे मिळणार होता!

शोध केला; पण असा चेहरा नाही मिळाला. अखेर एक दिवशी जेम्स एका जंगलातून जात असताना एका झाडाखाली एका दगडावर शांतपणे बसलेला एक माणूस त्याला दिसला. जेम्सला फार आनंद झाला. तो त्या माणसाजवळ गेला आणि म्हणाला,

"माझ्यासमोर बसशील? आठ-दहा दिवस लागतील."

"कशासाठी बसायचं?"

"मला तुझं चित्र काढायचंय."

"माझं चित्र?"

"हो तुझंच. त्याबद्दल मी पैसे देईन!"

"चित्राबद्दल पैसे? असे मिळतात? नकोत मला पैसे." तो म्हणाला.

जेम्सनं त्याला विनवलं. मग तो गरीब माणूस दहा-पंधरा दिवस जेम्ससमोर बसला होता. जेम्सचं चित्र पूर्ण झालं. चित्र फारच अप्रतिम झालं होतं. जेम्स त्या माणसाला रोज चहा, जेवण देत होता. तेवढ्यावरच तो खूश होता. जेम्सनं शेवटी त्याला खूप पैसे दिले. तो घेत नव्हता. जेम्सनं बळेबळे... त्याच्या खिशात कोंबले.

मग जेम्स आपलं ते मोठं चित्र घेऊन गुरुजींकडं गेला. गुरुजींनी येशू ख्रिस्ताचं ते चित्र पाहिलं. त्यांनाही आवडलं; पण त्यांनी एक कल्पना केली. ते म्हणाले, ''बेटा जेम्स, येशू ख्रिस्ताचं हे चित्र तू फारच छान काढलं आहेस; पण हे बघ, एवढ्या करुणासागर येशू ख्रिस्ताला ज्या क्रूरकर्म्यांनी सुळी दिलं त्या क्रूरकर्म्यांचं चित्र या चित्राच्या पार्श्वभूमीवर फिकट रंगात असलं तर हे चित्र उठून दिसेल.''

''सूचना छान आहे गुरुजी. मी क्रूरकर्म्याचं चित्र काढतो.'' असं म्हणून जेम्स आता क्रूर माणसाच्या शोधात निघाला. पराकोटीचं क्रौर्य ज्याच्या चेहऱ्यावर आहे असा चेहरा त्याला आता हवा होता. खूप दिवस, महिने, वर्ष गेली. तो माणसाचा शोध घेत होता. सहा वर्षांनंतर त्याला हवा तसा क्रूर चेहरा भेटला. जेम्स त्याला म्हणाला, ''चल... माझ्यासमोर बसायचं. चार-पाच दिवस. किती पैसे घेशील ?''

''तुम्ही किती द्याल ?''

''दहा हजार रुपये.''

''पंचवीस हजार पडतील !'' तो क्रूर हृदय म्हणाला.

''मान्य; पण नीट शांतपणे असाच क्रूर चेहरा करून बसायचं.''

''बसेन.''

जेम्सनं त्याला अग्रिम म्हणून दहा हजार रुपये दिले. तो बसू लागला. चित्र पूर्ण झालं. चित्र छान झालं होतं.

गुरुजींनी जेम्सची पाठ थोपटली. तुझं हे येशू ख्रिस्ताचं चित्र जगात गाजेल असा आशीर्वाद दिला.

पण तो क्रूरकर्मा उरलेले पैसे न घेताच गेला होता. शेवटी जेम्सनं त्याला हुडकून काढलं आणि उरलेले पैसे देऊ केले.

''साहेब, मी तुम्हाला आधी ओळखलं नव्हतं म्हणून पंचवीस हजार मागितले. साहेब, आता मी तुम्हाला ओळखलं.'' जेम्सला तो म्हणाला.

''मग पैसे घे ना.''

''नाही साहेब, तुमच्याकडून दोनदा पैसे नकोत. करुणेचं चित्र माझंच होतं. क्रौर्याचंही माझंच !''

जेम्सचे डोळे विस्फारले.

■ ■ ■

# ४७. ओळखलं नाहीस देवाला ?

एक देवभक्त भाविक; पण भोळाभाबडा. भोळाभाबडा नुसता असता तरी ठीक होतं; पण आपली विचारशक्ती जणू त्यानं गहाण टाकली होती.

संसारी होता; पण सारा भार देवावर टाकत असायचा. बायको बिचारी उपासमारीनं मेली आणि त्यावेळी हा अरण्यात देवाचा धावा करीत होता.

नाव देवबा होतं.

देवबाला सारे म्हणत, "अरे देवबा, देवाची भक्ती करतोस ते चांगलंच आहे रे, पण विहित कर्म करावीच लागतात. असा कसा रे तू ?"

"देव बघून घेईल." देवबा म्हणायचा.

एकदा तर विलक्षण प्रसंग घडला.

देवबा आपल्या गावच्या नदीकाठावर गेला. नदी झुळुझुळू ओढ्यासारखी वाहत होती. पाणी कमी होतं.

देवबा पाच-दहा पावलं पुढं गेला. तिथं एक खडक होता. त्या खडकावर देवबा नाव घेत बसला.

काही वेळात वारा सुटला. विजा कडाडू लागल्या. आभाळ भरून आलं... नदीकाठी जे लोक होते ते भराभर काढता पाय घेऊ लागले. किनारा रिकामा दिसू लागला.

एक लहान मुलगा काठावरून जोरानं ओरडला...

"आजोबा, वादळ सुटलंय... जोराचा पाऊस येणार आहे. तुम्ही लवकर घरी चला."

"मी नाही येणार. वादळाची मला काय भीती ?"

"अहो आजोबा, सगळे लोक गेले. तुम्ही पण चला."

"देव माझं रक्षण करील. मी नाही येणार !"

देवबा तिथंच बसला...

पलीकडे तीन डोंगराच्या उतारावर जोराचा पाऊस कोसळून नदीचं पाणी

वाढू लागलं... तरी देवबा तिथंच बसून होता.

आता देवबाच्या खडकावर पाणी आलं होतं. चहूबाजूंनी पाणी अक्राळविक्राळ होऊ लागलं होतं.

एक नावाडी आपली नाव घेऊन आला.

"कोन रं बाबा तू ? खडकावर अडकलायंस. चल माज्या नांवेत बस. तुला किनाऱ्याला लावतो." नावाडी म्हणाला.

"छे छे, मी येणार नाही. मी देवाचं ध्यान करतोय. देव मला वाचवील. मला खात्री आहे. देव माझा सांभाळ करील."

"अहो देवबा, मलाच देव समजा. चला लवकर."

"मुळीच येणार नाही." देवबा रागानं म्हणाला. नावाडी बिचारा परत गेला...

आता देवबाच्या गळ्यापर्यंत पाणी आलं आणि त्याच्या नाकातोंडात पाणी जाऊ लागलं.

देवबा गटांगळ्या खाऊ लागला.

एवढ्यात एक कडब्याची पेंढी वाहत आली. ती पाण्यावर तरंगत होती. ती पकडली असती तर देवबा वाचला असता; पण देवबा तोंडानं नुसताच देवा... देवा... करीत होता...

ती पेंढी २-३ वेळ पाण्याच्या प्रवाहाबरोबर तराफ्यासारखी त्याच्याजवळ आली; पण देवबानं त्या पेंढीकडे दुर्लक्ष केलं.

आणि मग मात्र गटांगळ्या खात देवबा पाण्यात बुडाला आणि देवबाचा प्राण गेला...

देवबा स्वर्गात देवाजवळ गेला आणि त्यानं देवाच्या पायाशी बसून तक्रार केली, "काय हे देवा, मी एवढा तुझा भक्त. तुझा सदासर्वकाळ धावा करणारा... पण पाण्यात गटांगळ्या खाऊन मरावं लागलं. तू वाचवलं नाहीस ! मला वाटलं तू माझ्यासाठी येशील !"

"देवबा, मी तीन वेळा तुझ्यासाठी आलो होतो !"

"कसं ? कधी ?" देवबानं आश्चर्यानं विचारलं.

"प्रथम एका लहान मुलाच्या रूपात, मग एका नावाड्याच्या रुपात आणि शेवटी तू बुडू लागलास तेव्हा कडब्याच्या पेंढीच्या रूपात; पण तूच मला तिन्ही वेळा दूर लोटलंस. देवबा देवालाच ओळखलं नाहीस. मग तुझा मृत्यू अटळ होता."

■ ■ ■

# ४८. सद्गुणांचे संमेलन

श्रीसंत गुणीदास महाराज हे साक्षात्कारी संत होते. समाजात सद्गुणांचा प्रसार-प्रचार व्हावा यासाठी त्यांनी आपलं आयुष्य वेचलं होतं. नम्रता, परोपकार, बंधुभाव, सौजन्य हे सारे सद्गुण समाजात यावेत यासाठी त्यांनी वाणी आणि लेखणी झिजवली होती.

एकदा महाराजांना वाटलं, या सर्व सद्गुणांचं संमेलन आपल्या आश्रमात घ्यावं. प्रत्येक सद्गुणाला आमंत्रित करावं आणि त्याच्याशी संवाद वाढवावा. हे सारे सद्गुण प्रत्यक्ष आपल्या भक्तगणांना दाखवावेत. मूर्तिमंत स्वरूपात दाखवावेत.

झालं, महाराजांनी सर्व सद्गुणांना... स्त्री-पुरुष सद्गुणांना आपल्या आश्रमात निमंत्रित केलं आणि आपल्या सर्व भक्तगणांना त्यांनी सांगितलं...

''आज आपल्या आश्रमात सर्व सद्गुण एकत्र येणार आहेत. तुम्हाला प्रत्यक्ष त्या सद्गुणांचा परिचय होईल.''

महाराजांचे सारे भक्तगणही मोठ्या उत्सुकतेने आश्रमात दाखल झाले. मंगलमय वातावरण होतं.

महाराज व्यासपीठावर बसले होते. सद्गुणांसाठी त्यांच्या दोहोबाजूला निरनिराळी आसनं तयार ठेवली होती. मधल्या मोकळ्या जागेत चटयांवर भक्तगण मेळा बसला होता. एकेक सद्गुण यायला सुरुवात झाली. महाराजांनी सांगितलं होतं. ''सर्व सद्गुण आल्यावर मगच सभेच्या कामकाजाला प्रत्यक्ष सुरुवात होईल.''

प्रथम 'नम्रता' आली. शालीन वेषातील नम्रता खाली मान घालून आली आणि हळूच आपल्या आसनावर जाऊन बसली. तिच्यामागं आला 'प्रामाणिकपणा' ! शुभ्रवेशातला प्रामाणिकपणाही मोठ्या अदबीनं आपल्या आसनावर जाऊन बसला.

त्यामागं आला 'परोपकार'. परोपकाराच्या हातात काहीतरी होतं. त्याची

उधळण करीतच तो आला.परोपकार आपल्या आसनावर जाऊन बसतो न बसतो तोच 'वत्सलता' आली. तिचा चेहऱ्यावरचे वत्सल भाव बघूनच सर्वांना समाधान वाटलं. मग थोडीशी छाती पुढे काढून दोघे जण आले.

एकाचं नाव होतं 'अभिमान' !

एकाचं नाव होतं 'धैर्य' !

आणि त्याच्यामागं आला 'आत्मविश्वास'... अभिमान, धैर्य आणि आत्मविश्वास हे जणू तिघे तिळे भाऊ असावेत असं वाटत होतं. त्यांचे चेहरेही थोड्याफार फरकानं सारखे होते. ते एकमेकांच्या हातात हात घालून आले होते.

आता कोणता सद्गुण येणार... याची सर्वांना उत्सुकता लागून राहिली होती. बराच वेळ गेला आणि हळूच पावलं टाकीत आला 'प्रेमळपणा'... त्याचा चेहराच त्याचं प्रेम सांगत होता आणि मग मात्र खाडखाड पावलं वाजवीत दोघेजण आले...

'साहस' आणि 'धाडस'... साहस थोडा विचारी होता, पण धाडस मात्र बेधडक होतं... तेही जुळ्या भावासारखे दिसत होते.

गुरुजींच्या आश्रमातील सद्गुणांचं संमेलन आता चांगलंच रंगणार होतं. भक्तगणांमध्ये या साऱ्या सद्गुणांना भेटण्याचे, त्यांच्याशी संवाद करण्याची उत्सुकता होती.

'गुरुजी आता संमेलनाला सुरुवात करावी.' एक भक्त म्हणाला.

'नाही वत्सांनो, बरेच सद्गुण जमले; पण आणखी एक मोठा सद्गुण इथं अनुपस्थित आहे. तो आला की सुरू करू.'

'तो सद्गुण कोणता महाराज ?' भक्तानं विचारलं...

एवढ्यात...

एक कृश पण तेजस्वी व्यक्ती आश्रमाच्या प्रवेशद्वारातून आत आली. त्या सद्गुणी व्यक्तीला बघून गुरुजींना खूपच आनंद झाला; पण भक्तांना व इतर सद्गुणांनाही कळेना की हा शुद्र, कृश, तेजस्वी पण शांत सद्गुण कोणता ?

गुरुजींनी त्या सद्गुण मूर्तीचं स्वागत केलं आणि ते समाधानानं म्हणाले, 'भक्तजनहो, हा सद्गुण असल्याशिवाय इतर कोणत्याच सद्गुणाला अर्थ नाही. तो सद्गुण म्हणजे 'कृतज्ञता' !'

टाळ्यांचा कडकडाट झाला आणि संमेलनाला सुरुवात झाली.

■ ■ ■

# ४९. भूक : पोटाची व ज्ञानाची

इंग्लंडमधील प्रख्यात शहर लंडन!

लंडनच्या एका गजबजलेल्या भागात एका गौरवर्णीय बाईकडे खूप जागा होती, मग त्या बाईंनी पेईंग गेस्ट ठेवायचं ठरवलं. त्या बाईंकडे पेईंग गेस्ट म्हणून राहायला एक भारतीय विद्यार्थी आला. काहीसा गौरवर्णीयच. चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचं तेज; पण खोल कुठंतरी त्याच्या काळजात काहीतरी सलत असावं, असं बाईंना वाटत होतं. बाईंनी त्या विद्यार्थ्याला जागा दिली.

भारतातील आपले मित्र नवल भथेना यांच्या मदतीनं हा प्रौढ विद्यार्थी लंडनला आला होता.

१९२२ मध्ये हा विद्यार्थी बॅरिस्टर झाला. पीएच.डी.ही झाला; पण यासाठी त्याला कठोर ज्ञानसाधना करावी लागली.

ज्ञानाची भूक भागविण्यासाठी कधी कधी पोटाची भूक मारावी लागली आणि उपाशीपोटी पुस्तकं वाचावी लागली. कारण फार थोड्या काळात लंडनमध्ये त्याला आपला अवघड अभ्यासक्रम पूर्ण करायचा होता.

ज्या महाविद्यालयात या विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम सुरू होता, तिथलं वाचनालय उघडण्याआधी हा प्रौढ विद्यार्थी तिथं हजर असे आणि वाचनालय बंद होण्याची सायंकाळची वेळ असे, तेव्हा हा शेवटचा वाचक विद्यार्थी तिथं वाचनात गुंग असे.

एवढ्या दहा-बारा तासांच्या काळात जेवणाचं काय ? तोही प्रश्न विद्यार्थ्यानं आपल्या परीनं सोडवला होता.

सकाळी घरून निघताना घराच्या मालकीणबाई या प्रौढ विद्यार्थ्याला एक कप चहा आणि जाम लावलेले दोन पावाचे तुकडे देत असत. मग हा विद्यार्थी घरी फक्त चहा पीत असे आणि ते दोन पावाचे तुकडे एका कागदाच्या तुकड्यात गुंडाळून आपल्या खिशात ठेवत असे. सकाळपासून वाचून वाचून डोळे दुखू लागले की मग वाचनालयाबाहेरच्या व्हरांड्यात येऊन प्रथम दोन

ग्लास पाणी प्यायचं, मग हळूच ते पावाचे दोन तुकडे खायचे आणि पुन्हा एक ग्लास पाणी पिऊन पुन्हा वाचनालयात येऊ पठण सुरू.

रात्रीचं काय ते पोटभर जेवण!

असा दिनक्रम वर्षभर चालला होता.

ज्ञानाच्या भुकेसाठी पोटाची भूक मारणारा हा प्रौढ विद्यार्थी म्हणजे भीमराव रामजी आंबेडकर! डॉ. बाबासाहेब आंबेडकर!!

भारतरत्न ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर !!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकारणाबद्दल जितकं बोललं जातं त्याहून अधिक त्यांच्या विद्वत्तेबद्दल आणि ज्ञानप्रेमाबद्दल बोललं गेलं पाहिजे.

लेखन-वाचन आणि चिंतन-मनन यांचा दांडगा व्यासंग असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानयोगी होते.

अमेरिका आणि इंग्लंड येथील सर्वोच्च पदव्या त्यांनी मिळविल्या होत्या. ते बॅरिस्टर होते.

त्यांच्या विद्वत्तेबद्दल स्वदेशीच नव्हे तर पाश्चात्त्य विचारवंतांनीही त्यांची प्रशंसा केलेली आहे.

प्रसिद्ध विचारवंत हेरॉल्ड लास्की यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रबंधातील त्यांच्या विचारांबद्दल जाहीर प्रशंसा केलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे कायदामंत्री होते. एका पावसाळ्यात डॉ. आंबेडकर पुण्याला आले होते तेव्हाचे दृश्य! एक मोटार लाकडी पुलाकडून डेक्कन जिमखान्याकडे आली. मोटार थांबली. तीमधून एक भारदस्त व्यक्ती उतरली. चौकातच दीक्षित यांचे इंटरनॅशनल बुक स्टॉल हे दुकान आहे.

या दुकानात ती सुटाबुटातील व्यक्ती गेली...

दुकानाचे धनी दीक्षित यांनी स्वागत केले...

बाहेर पोलीस होते...

लोकांना समजलं, दुकानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले आहेत. लोक गर्दी करू लागले. बाहेर लोकांचा लोंढा होता. पोलिसांना ही गर्दी हटवता हटवता नाकी नऊ आले आणि डॉ. आंबेडकर मात्र पुस्तकांच्या कोंडाळ्यात एकाग्रतेनं पुस्तकं चाळत होते. लोकांसाठी बाबासाहेब बाहेर आले.

मात्र... त्यांचं मन अजूनही दुकानातील ग्रंथांभोवतीच रुंजी घालत होतं.

■ ■ ■

# ५०. स्वप्नपराग

हे काही एखाद्या नवोदित कवीच्या कविता संग्रहाचं नाव नाही. नावच आहे, मनात कवितांचे स्वप्नपराग फुलवणाऱ्या एका कृतिशील लेखकाच्या भावुक मनानं, आपली मनीषा पूर्ण करणाऱ्या एका माधवाच्या स्वप्नपूर्तीचं हे नाव आहे.

पेण-पनवेल-खोपोली हा परिसर तसा कोकणच्या अंत:पुरातला; पण देशाच्या वळणावर नेणारा! जांभुळपाडा, वाकण ही पाड्यांसारखी गावं याच्या सावलीला; पण अनेक सडे आणि साकव ओलांडल्याशिवाय एकमेकांचा संपर्क होणार नाही, असे आतले पाडे.

मनीषा-माधव हे दाम्पत्य पेणवासी! माधवराव प्राध्यापक. शिक्षणविचाराचा घरातच राबता. स्वत: माधवराव आरंभी प्राथमिक शिक्षक होते. खेड्यात जीवन गेलं. शिक्षणाची आबाळ अनुभवली. मग स्वत:च ही त्रुटी दूर करण्यासाठी शिक्षणसंस्था काढण्याची मनीषा होती. साथीला मनीषा होतीच. समविचारी मित्र मिळाले.

शाहीर अमर शेखांनी आपला बुलंद आवाज माधव पोतदारांची मनीषा साकार करण्याच्या कामी लावला. एकीकडे सात माध्यमिक विद्यालयांचा कारभार, नोकरी, दुसरीकडे स्वत:ची पात्रता वाढविण्यासाठी बहि:स्थ विद्यार्थी म्हणून अभ्यास... अशी दिवस-रात्र शारदेच्या दरबारातील जागती मैफल पोतदार अनुभवत होते. माधव पोतदार पुणे विद्यापीठाचे 'डॉक्टर' झाले. त्यांच्या पाठोपाठ पत्नी मनीषाताईही डॉक्टरेट झाल्या. स्वत:च्या शिक्षणाची आबाळ आणि कोकणातल्या मुलींची शिक्षणाची आबाळ लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यात पोतदार दाम्पत्यानं एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या बहि:स्थ केंद्राची स्थापना करून आतापर्यंत दोन हजार महिलांना पदवीधर होण्यास मदत केली. यातील दहा-पंधरा जणी पुढे पदव्युत्तर शिक्षण घेऊन एम.ए. झाल्या.

ही चौफेर कार्याची धुरा वाहताना पोतदारांना दिवसाचे चोवीस तास पुरत नसत. अनेक कसोटीच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागे. रायगड जिल्ह्यातील पावसाळी धुवांधार वातावरण आणि दळणवळणाच्या गैरसोयी या अडचणी तर

पाचवीलाच पुजलेल्या.

त्यांच्या बहि:स्थ केंद्रात जांभुळपाड्यावरून येणाऱ्या मुलींसमोर एकदा असाच अनवस्था प्रसंग ओढवला. ओढे-पाडे पार करीत या मुली पोतदारांपर्यंत पोहोचल्या खऱ्या; पण फॉर्म भरण्यासाठी त्यांच्याकडे द्रव्य नव्हते. वेळ टळून गेली होती. मुंबई विद्यापीठात अर्ज वेळेवर दाखल होणं आवश्यक होतं. मग त्या मुलींना मनीषाताईंनी स्वत:च्या घरी ठेवून घेतलं. आईच्या मायेनं त्या गारठलेल्यांना उब दिली. पेज प्यायला देऊन त्यांचा पोटोबा शांत केला. आता मुंबईला त्या मुली प्रवेशपत्र देण्यासाठी जाणं शक्यच नव्हतं.

माधवरावांनी त्या मुलींच्या सह्या घेतल्या.

आणि ते स्वत: तडक मुंबईला जाऊन वेळ संपण्याच्या शेवटच्या क्षणी त्यांनी त्या तीन मुलींचे प्रवेशअर्ज परीक्षा विभागात दाखल केले. त्या मुलींचं वर्ष वाचलं. पोतदार परत आले तेव्हा त्यांनी एक अभूतपूर्व दृश्य बघितलं.

तिघींचे डोळे पागोळ्या गळाव्यात तसे गळत होते...

माधव-मनीषा यांच्याविषयीच्या कृतज्ञतेनं...

यथावकाश डॉ. पोतदार निवृत्त झाले. पेण-खोपोली इथं असताना त्यांनी व्याख्यानांच्या रूपानं आपली वाणी आणि लेखनाच्या रूपानं लेखणी यांचा आविष्कार प्रकट केला होताच; पण दैनंदिन कामाच्या व्यापातून मुक्त होऊन त्यांना आता 'लेखनवासी' व्हायचं होतं. मग पोतदार पुण्याला आले. मुलगा पराग आणि मुलगी स्वप्ना यांच्या रूपानं संसाराची मनीषा तर पूर्ण झाली होतीच. आता धनकवडीत बाळकृष्ण सोसायटीत त्यांनी 'स्वप्नपराग' ही टुमदार वास्तू उभारली आणि मग ते लेखणी सरसावून बसले. एका पाठोपाठ ग्रंथनिर्मिती झाली. राष्ट्रपुरुष जगन्नाथ शंकरशेठ, चवदार तळे, आचार्य अत्रे-विनोद आणि तत्त्वज्ञान, गगनाचा गाभारा... वर्षातल्या दोन्ही हंगामात पिकाऊ जमिनीत सुगी निर्माण करावी, तसे 'स्वप्नपराग'च्या वास्तूतून ग्रंथनिर्मिती होऊ लागली. महाराष्ट्र शासन, मसाप यांचे प्रतिष्ठित पुरस्कारही या ग्रंथांना मिळाले. पुत्र पराग पित्याची प्रसन्न भाषाशैली लेखणीतून वागवून आहे तर मनीषाताई वानप्रस्थातही या ज्ञानयात्रीला सप्तपदीची साथ देत आहेत. या दोघांनी मिळून रायगड जिल्ह्यात महर्षी कर्वे यांच्याच कार्याचा पसारा आणि पिसारा उभारला... कुणी शेवंता, कुणी लक्ष्मी, कुणी गोदा... आज मनामनात त्यांची प्रतिमा जोजवत आहेत. 'स्वप्नपराग' कृतार्थतेनं चिंब झाला आहे.

■ ■ ■

# ५१. सात रुपये ते सातसमुद्रपार

अहमदनगर जिल्ह्यात डोंगराच्या कुशीला असलेली एक छोटीशी वस्ती-केळेवाडी ! शेकडो वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांदी भावंडांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही माती. इथला एक मुलगा १९८३ साली सत्तर टक्के गुण मिळवून शालांत परीक्षेत उत्तीर्ण झाला. आता पुढं शिकायचं होतंच; पण वाट अंधाराची ! परिस्थिती नव्हती. मग तो मुलगा चक्क सात रुपये रोजानं मजुरी करू लागला.

पण ज्ञानलालसा थोडीच स्वस्थ बसू देते ? दळणाचं गाठोडं घेऊन गिरणीत गेलेल्या या मुलाकडं पाहून गिरणीवालाही हळहळला... म्हणाला, ''कालिजात न्हाई का जाणार ?'' काय सांगणार होता हा मुलगा ? पण त्या गिरणीवाल्यानंच एक कापून ठेवलेला जाहिरातीचा तुकडा दाखविला.

बजाज टेम्पो लि.ची. अप्रेंटिस ट्रेनिंगची जाहिरात होती. मग हा मुलगा तडक उठला. चुलत्याकडून दहा रुपये घेतले आणि त्यातले ७.२० रुपये तिकीटासाठी खर्च करून तो पुण्याला आला. मोठी बहीण पुण्याला होती. तिच्याकडं चाळीतल्या खोलीत आधार मिळाला. कंपनीत निवड झाली. कंपनी सकाळचं जेवण एक वेळ देत असे. थोडा स्टायपेन्ड मिळू लागला. त्यातून बचत करून हा मुलगा घरी थोडे पैसे पाठवू लागला. या काळात 'टूल ॲड डाय' हा ट्रेड त्यानं यशस्वीपणे पूर्ण केला. आणखी एक औद्योगिक प्रशिक्षणही त्यानं पूर्ण केलं. 'कायनेटिक'मध्येही तो अर्धवेळ नोकरी करू लागला. रात्रंदिवस ध्येयवादानं उद्योग करणाऱ्या या मुलाचं नाव होतं भरत पाडेकर ! १९८८ मध्ये भरतला खडकीच्या दारूगोळा कारखान्यात निरीक्षक म्हणून नोकरी मिळाली. लग्नाचे प्रस्ताव येत होते; पण या वराकडे होते काय ? एक सायकल आणि एक भाड्याची लहान खोली. मन मात्र आभाळात भराऱ्या मारीत होतं. पुढं बरंच शिक्षण घ्यायचं होतं.

आणि कुठंतरी दैवानं हिरवा कंदील दाखवला.

एका लकी ड्रॉमध्ये एम-८० गाडी मिळाली आणि मग जीवनाचा वेग

वाढला. पाच तास झोप, एकोणीस तासातला दीड तास त्यानं खास स्वत:साठी ठेवला होता. अर्धा तास नेमानं पाठपूजा... पाठपूजा करतानाही भरत इतका तल्लीन होऊन जाई की घरचे-दारचे त्याला 'भरतबुवा' म्हणू लागले आणि एक तास... गायन, चित्रकला, ज्ञानेश्वरी वाचन...

कुणाच्या लग्नाला गेला की 'भरत'कृत मंगलाष्टकं हमखास...

पण स्वत:चं मंगलाष्टक मात्र त्यानं अजून तयार केलेलं नव्हतं. तोही क्षण आला. मुळ्यांची लता भरतवृक्षाच्या आधाराला आली आणि भरत-लता यांचा संसारवृक्ष बहरून एक टपोरं फुलंही आलं.

गावाकडे घर झालं. तिसाव्या वर्षी फोरमन म्हणून भरतची नियुक्ती झाली. भरतबुवाचे आता 'पाडेकर सर' झाले. आय.टी.आय.मध्ये अध्यापन, ए.एस.आय.ई.साठी अध्ययन... तिथंही चांगलं यश मिळालं. स्वत:चं घर हवं असं वाटू लागलं. दिघीला घरकुल बांधलं, नाव दिलं... 'भक्ती'. आता लतानंही भरतला साथ दिली. सुगृहिणी म्हणून तिचा कुशल हात संसारावर फिरत होताच; पण प्राथमिक शिक्षिका म्हणून ती महापालिकेच्या शाळेत रुजू झाली. संसारातली सप्तपदी तिनं सार्थ केली.

अनेक परीक्षा देत देत, कसोटीचे अनेक प्रसंग तळहातावर झेलून भरतबुवा असलेले भरतसर प्रौढ वयात एम.टेक. झाले. 'भक्ती'मध्ये निवास करणाऱ्या गणेशभक्तानं सरस्वतीची साथ कधी सोडली नाही. मग इंदिरा कॉलेज परंदवडी इथं भरत असि. प्रोफेसर म्हणून रुजू झाले तरीही त्याला आकांक्षापुढे गगन ठेंगणे वाटू लागले. पीएच.डी.साठी रजिस्ट्रेशन केलं...

सुरेल गायकाला संवादिनीची साथ उत्तम असावी लागते. भरतची संवादिनी म्हणजे लता! देखणं हस्ताक्षर असलेली भावूक लता आपल्या विद्यार्थ्यांत प्रिय झालीच; पण आपल्या ऋजू स्वभावामुळं तिनं साऱ्यांना जिंकून घेतलं आणि भरताची मैफल रंगू लागली. लता ही दिघीपासून लक्ष्मी रोडवरच्या स्वाध्याय महाविद्यालयात आठवड्याला एक एम.ए. वर्गाला येते. आता भरत पीएच.डी.च्या मार्गावर तर लता एम.ए. होत आहे.

भरताचं एक प्रोजेक्ट आता मान्य होऊन लवकरच त्याला सातासमुद्रापार निमंत्रण आलं आहे. सात रुपयांचा मजूर सातासमुद्रापार होत आहे! केळेवाडीची कूस धन्य झाली आहे!

■ ■ ■

# ५२. सराफ, संशोधक आणि शेतकरी

पुणे विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागात टीचर फेलोशिप मिळालेला एक प्राध्यापक संशोधक! सूक्ष्मदर्शक यंत्राखाली काही निरीक्षणे नोंदवितो आहे. त्याच्या आजूबाजूला बेडूक, चिचुंद्री, सरडा... अशा प्राण्यांचे संरक्षक द्रवात बुडविलेले नमुने आहेत. कधीतरी मग उत्तर आयुष्यात हा संशोधक शार्क माशाचं संशोधन करायला अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावर ट्रॉलरमध्ये असायचा...

सायंकाळी तुम्ही टिळक स्मारक रस्त्याला फ्रेंड्स म्युझिक हाऊस समोरून गेलात तर डाव्या हाताला विठ्ठल गणेश रानडे सराफीचं दुकान दिसेल. तिथं हाच संशोधक सोन्या-मोत्याची पारख करताना आणि गिऱ्हाईकांशी तोलून मापून बोलताना, सोनं वजन काट्यावर तोलून मापून देताना दिसेल...

हाच संशोधक नऱ्हे आंबेगाव येथील खंडोबाच्या मंदिराच्या उताराला असलेल्या शेततुकड्यातील फळझाडांचं निरीक्षण करताना दिसेल. स्वतःच्या शेतीतल्या पिकांशी संभाषण करताना आढळेल. सराफ, संशोधक आणि शेतकरी या तीन विभिन्न भूमिका एकाचवेळी वठविणारी ही अफलातून व्यक्ती म्हणजे डॉ. रा.वि. रानडे!

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महाड-दापोली रस्त्याजवळ रेवतळे गावचं रानडे कुटुंब! विठ्ठल गणेश रानडे हे साठ-सत्तर वर्षांपूर्वीच रेवतळे सोडून पुण्यात आले. आचारी, वाढपी हा व्यवसाय करता करता कापड दुकानही टाकल्यानंतर सराफीचा व्यवसाय तुळशीबागेजवळ सुरू केला.

त्यांचा मुलगा राम! नू.म.वि., स.प. महाविद्यालयात शिकला आणि प्राणिशास्त्राचा प्रोफेसर झाला. प्राणिजीवनाच्या अजब दुनियेचा परिचय झाला आणि रामभाऊ रानडे अंतर्बाह्य विचारमग्न झाले.

वडिलांचा सराफीचा व्यवसाय तर त्यांनी सुरू ठेवलाच; पण प्राणिजीवन आणि निसर्गजीवन यांची ओढ त्यांना लागली. पत्नी सुधा यांनी रामभाऊंना सदैव साथ दिली आणि राम-सुधाच्या संसारवृक्षाला बहर आला. 'कृष्णकमळ' ही नव्या पेठेतील सुंदर वास्तू आकारास आली. सुखाच्या राजरस्त्यावर एक

काटेरी कोपरा निर्माण झाला आणि मोठ्या मुलाचं अकाली निधन झालं.

नियतीचा कौल नेहमीच शांत मनानं स्वीकारणारे रानडे मनानं थोडे डळमळले, पण सावरले. प्राणिशास्त्राचा दीर्घकाळ अभ्यास असल्यानं राम रानडे यांनी मनाशी पक्की खूणगाठ बांधली की आत्मा वगैरे काही खरोखरीच असेल तर तो सर्वांनाच, जीवजंतूंनाही असणार आणि नसलाच तर तो कोणालाही नसणार! कारण आयुष्यभर रानडे यांनी चिलटे, डास, मुंग्या, मुंगळे, उंदीर, बेडूक, चिचुंद्री, साप, मासे, खेकडे, कोळी, पिंगळे, विंचू या जीवजंतूचा अभ्यास केला.

वयात आल्याने लाल झालेला गळा फुगवून मादीला खुणावणारा सरडा नरही अभ्यासला आणि निसर्गानं रंगांची उधळण केलेला तांबट पक्षीही त्यांना जवळचा वाटला. टाक्यांमध्ये गप्पी मासे सोडले की डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण ठेवता येते, हे रानडे यांनी अभ्यासले.

वयाच्या सातव्या दशकानंतर रानडे यांनी सराफी व्यवसायातून पूर्णपणे निवृत्ती घेतली. अजेय, अंजली आता समर्थपणे त्यांचा तो व्यवसाय सांभाळतात आणि 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी' असं म्हणत रानडे आपल्या नव्या पेठेतील घराच्या बागेत किंवा नऱ्हे येथील शेतावर असलेल्या वृक्षांशी, वेलींशी हितगुज करीत असतात.

आता स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावरील 'टवाळ सभेचे' ते जागरूक सभासद आहेत. केळ्याला रंभाफळ असे नाव देणारा जगातील सर्वात चावट रसिक आहे, अशी माहिती ते इतरांना पुरवतात. वयानुसार रानडे यांची समज जितकी सामंजस्याची आहे की ते म्हणतात, "प्रत्येक म्हातारा नवरा हे त्याच्या बायकोचे शेवटचे पण किरकिरे मूल असते..." "इतकी रॅशनल विचारसरणी त्यांना त्यांच्या अभ्यासाने दिली आहे. तरीही आयुष्याचा आनंद ओंजळीत वेचणे हा रानडे यांचा आवडता छंद आहे.

त्यांच्या घरी एक अतिउंच सोनचाफ्याचे झाड आहे. ते झाड सुंदर सुगंधी फुलांनी डंवरतं; पण उंच असल्यामुळं फुलं मिळतच नाहीत. तेव्हा पत्नी सुधाताई म्हणतात, "काय उपयोग मेल्याला इतके फुलं देऊन ?" तेव्हा रानडे मिस्कीलपणे म्हणतात, "अशी फुलझाडे म्हणजे छान सजलेली बायको माहेरची माणसात वावरावी आणि नवऱ्याने फक्त डोळं भरून बघावी! तक्रार कुठं करणार ?

त्यावेळी या वयातही सुधाताई लाजेने चूर होतात, असा हा सराफ, संशोधक आणि शेतकरी!

■ ■ ■

## ५३. त्या केशांते का हो चरचर नापित हस्ते कापविता ?

कोकणातील निसर्गरम्य मुरुडच्या कर्वे घराण्यात १८ एप्रिल १८५८ रोजी एका बालकाचा जन्म झाला. जन्मस्थान शेरवली. मुलाचं नाव ठेवलं धोंडू. वडिलांचं नाव केशव तथा केसोपंत. आईचं नाव लक्ष्मीबाई. हाच धोंडू पुढं महर्षी धोंडो केशव कर्वे म्हणून प्रसिद्धीस आला. कर्वे 'भारतरत्न' झाले.

भारतरत्न कर्वे यांनी केलेलं स्त्री शिक्षणाचं कार्य मूलगामी स्वरुपाचं होतं. विधवा विवाह, विधवा शिक्षण याबाबतचे त्यांचे प्रयत्न इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदलेले आहेत.

भारतरत्न, महर्षी अशा पदव्या असणारे कर्वे साधी राहणी आणि उच्च विचारसरणी अनुसरणारे होते. ते कर्ते सुधारक होते.

त्यांचे मित्र नरहरपंत जोशी यांची बहीण गोदूबाई ही अकाली विधवा झाली होती. तो काळ असा होता की एखाद्या स्त्रीचा नवरा देवाघरी गेला की त्या स्त्रीला आपलं आयुष्य जणू अंधार कोठडीत काढावं लागे. अण्णासाहेब कर्वे यांनी विधवेचं दु:ख जाणलं आणि स्वत:च गोदूताईंशी विधवाविवाह केला.

याबद्दल अण्णांना कुटुंबात, बाहेर, घरीदारी बराच मनस्ताप सहन करावा लागला.

अण्णांच्या या पुनर्विवाहाची खूप चर्चा त्यावेळी वृत्तपत्रांतूनही झाली. विवाहानंतर अण्णा आपल्या पुनर्विवाहित पत्नीबरोबर–आनंदीबाईंबरोबर एकदा आपल्या गावी मुरूडला गेले होते. गावकीची सभा भरली आणि गावकीच्या सभेनं तीन ठराव केले– १) एका बैठकीवर धोंडोपंतांना घेऊन बसू नये २) ज्या सभेत धोंडोपंत असतील त्या सभेत इतरांनी जाऊ नये ३) धोंडोपंतांवरच नव्हे तर त्यांचे बंधू भिकाजीपंत यांच्यावरही गावकीने बहिष्कार टाकावा.

अण्णासाहेब कर्वे यांनी लोकांच्या रागाचा शांतपणे स्वीकार केला. बंदुकीची गोळी कापसाच्या गाठीवर मारली तर तिची तीव्रताच कमी होते, तसं धोरण अण्णासाहेबांनी ठेवलं होतं.

हळूहळू समाजाची मते विधवाविवाहाबाबत बदलू लागली. अण्णासाहेब आपल्या भाषणातून, विचारातून त्याबद्दल आपल्या प्रामाणिक भावना नेहमी व्यक्त करीत असत.

त्यांनी विधवाविवाहाचा प्रसार अनौपचारिकपणेही कसा केला, याबद्दल एक मनोरंजक कथा आहे.

अण्णासाहेब कर्वे कलेचे भोक्ते होते. त्यांना नाटकाची खूप हौस होती. कोकणातील मंडळींना जात्याच नाटकाची आणि गाण्याची आवड असते. तशी ती कर्वे यांनाही होती. उन्हाळ्याच्या सुटीत ते मुरूडला आले की बालपणी नाटके बसवीत; पण त्यांचे वडील केसोपंत यांना मुलांनी नाटकात काम केलेलं आवडायचं नाही. मग त्यांनी वडिलांना सांगितले, ''पुण्यात नाटकांसाठी खूप उत्तेजन मिळते.''

डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी बसविलेली उत्तमोत्तम नाटके धोंडोपंत यांनी बघितली होती. एकदा धोंडोपंतांनी मुंबईहून येताना मुरूडला दोन नाटकाचे पडदेही बरोबर आणले. मुरूडच्या नाटकात नांदीमध्ये गणपतीची भूमिका ते करीत. संस्कृत संवादांची रचना करून एकदा तर त्यांनी पडद्यामागून राधेचा संवाद म्हटला. 'वेणीसंहार' या नाटकात अश्वत्थाम्याची भूमिका त्यांनी उत्तम वठवली होती. या भूमिकेबद्दल त्यांची खूप प्रशंसा झाली. या नाटकातील काही पदे व श्लोक ते उत्तर आयुष्यातही खणखणीत आवाजात म्हणत.

एकदा अशाच एका सभेत विषय विधवाविवाह होता. अण्णा भाषण करीत होते. श्रोते तल्लीन झाले होते.

आणि श्रोत्यांना अण्णांच्या तोंडून एक पदच ऐकायला मिळाले. हे पद सीतारामपंत देवधर यांनी तयार केलेलं होतं. पदाचे बोल असे होते–

'माता श्रमली प्रतिदिनी ज्याते न्हाउनि माखुनी वाढविता
त्या केशांते का हो चरचर नापित हस्ते कापविता ?
पुरे गांजणूक, कीव येऊ द्या, अनाथ भगिनींची आता
पुनर्विवाह संमति द्या हो सोडूनि मनिची निर्दयता'

टाळ्यांचा कडकडाट झाला. विधवांना केशवपन करावे लागे. या क्रूर चालीरीतीबद्दल घृणा निर्माण करण्यात अण्णा यशस्वी झाले आणि लोक ती ओळ गुणगुणतच घरोघरी गेले.

■ ■ ■

# ५४. 'दिगू'चा अवतार

नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांना नुकताच सरपोतदार पुरस्कार जाहीर झाला आहे. यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी हे सन्मानित झाले आहेत. त्यांच्या 'ललितकलादर्श' या नाटक कंपनीने महाराष्ट्रात व बृहन्महाराष्ट्रात एक इतिहास निर्माण केला; पण असाच इतिहास त्यांच्या एका नाटकानंही निर्माण केला आहे.

नाटकाचं नाव 'दुरितांचे तिमिर जावो' !

लेखक कै. बाळ कोल्हाटकर.

या नाटकातली अजरामर भूमिका दिगूची ! ती भालचंद्र पेंढारकरांनी इतक्या तन्मयतेनं साकारली की हे नाटक जेव्हा जोरात चाललं होतं तेव्हा त्यांचं मूळ नाव विसरून लोक त्यांना 'दिगू'च म्हणू लागले होते.

निष्पाप, निर्वैर, काहीसा अडाणी पण विलक्षण प्रेमळ आणि भाबडा दिगू पेंढारकरांनी लाजबाब रंगवला होता.

'आई तुझी आठवण येते...' या गाण्याने तर रंगमंदिरातल्या गच्च प्रेक्षकांचे डोळे पाण्यानं डबडबून जात.

हा झाला पेंढारकरांचा दिगू! नाटकातला दिगू! पण प्रत्यक्षात असा एक दिगू तुम्हाला बघायचाय ?

मग पुण्याला वासुदेव बळवंत फडके पथावर असलेल्या श्री नृसिंह मंदिरात या. तिथं तुम्हाला हा दिगू नक्कीच भेटेल.या दिगूचं नाव आहे केशव कुलकर्णी !

या दिगूचे वडील पुण्याला भरत नाट्य मंदिराशेजारी राहत होते. तिथं त्यांचं बिऱ्हाड होतं. वडील साध्या नोकरीतच होते. केशवला एक भाऊ आणि एक बहीण. केशव लहानपणापासूनच असा. शाळेचा उंबरठा त्यानं आत जाण्यासाठी ओलांडला नाही, बाहेर येण्यासाठी ओलांडला. मग तो काहीबाही कामं करू लागला. आई-वडील दोघंही वारले. बहिणीचं लग्न झालं. ती परगावी गेली. भाऊ आपल्या संसारात; पण दिगूला... केशवला आधार सापडला तो नृसिंह मंदिराचा. त्याची पथारी तिथंच पडलेली.

देऊळ झाडणं, तिथले लोक सांगतील ती कामं करणं... त्या कामाबाबतही

सांगणाराच जाणून असतो की केशवला जे काम सांगायचं ते त्याला झेपणारं असलं पाहिजे.

अर्धी गुडघ्यापर्यंत ओघळणारी मळखाऊ चड्डी, वर मळखाऊ सदरा किंवा मॅनिला तोही अर्धाच... पायात चपला नाहीत, अशा अवस्थेत हा दिगू त्या परिसरात सर्वांच्याच घरी जातो. रस्त्यावरून हिंडतो. मग त्याला अभ्यंकरांकडे चहा मिळतो, दोन जोशींकडे जेवण मिळतं, भावे, समोरचे पेंडसे आणि गल्लीतलं कुणीकुणी यांच्यांकडे त्याचे जेवणाचे वार आहेत.

त्याला जेवण देणारे लोक घरचा सदस्य म्हणून जेवण देतात. त्या अश्राप जीवावर ही मंडळी मनापासून प्रेम करतात. त्याला लिहिता, वाचता तर येतच नाही; पण निरक्षर केशवला एक विलक्षण शक्ती लाभलेली आहे.

गेली पन्नास वर्षे या परिसरात तो असाच आहे...

त्याला कोणत्याही वर्षाची, कोणतीही तारीख सांगावी...

केशव क्षणभर विचार करतो आणि मग पटकन तो त्याच्या अर्धबोबड्या भाषेत त्या तारखेला कोणता वार होता हे सांगतो. या परिसरातील अनेक लोकांनी याचा अनुभव घेतला आहे.

आता केशव सत्तरीकडे झुकलेला आहे.

कदाचित वयामुळे त्याच्या या गूढ शक्तीमध्ये काही उणीव निर्माण झाली असणे शक्य आहे.

केशव पावसाचे अंदाजही अचूक सांगतो.

त्यानं सांगितलेले दुष्काळांचे, अवकाळी पावसाचे अंदाज अनेकवेळा खरे ठरले आहेत. ज्याला साधा पैशाचा हिशेब येत नाही, तो ही गणितं कशी मांडतो, हे एक आश्चर्यच आहे.

प्रामाणिकपणा हा या केशव तथा दिगूचा अप्राप्य व दुर्मिळ गुण आहे. त्याला लोक जे पैसे देतात ते किंवा त्याला देऊळ झाडताना जे पैसे सापडतात ते, सर्व पैसा तो देवळाचे एक धनी ना. का. तथा श्यामराव जोशी यांच्याकडे देतो आणि श्यामरावांनीही त्याच्या नावानं ते स्वतंत्रपणे गुंतवून ठेवलेले आहेत.

या भाबड्या जीवाला भूतकाळाची जाण नाही, वर्तमानाची जाणीव नाही. भविष्याची चिंता नाही; पण त्याची चिंता इतर लोक करतात. काहींना तर वाटतं भालचंद्र पेंढारकरांनी 'दुरितांचे तिमिर जावो' मधला दिगू साकारताना केशवला बघितलं असावं. असा हा दिगूचा अवतार!

■ ■ ■

# ५५. भूप, शंकरा आणि भैरवी

सोलापूर सदर बझारमधील अभ्यंकर वकीलांच्या वाड्यातलं केळकरांचं बिऱ्हाड ! रेशनिंग ऑफिसर गोपाळराव केळकर आणि पत्नी सत्यभामाबाई केळकर यांची लाडकी लेक 'बाबी' आपल्या अंध गायनमास्तरांकडून धडे घेत होती. भूपराग गंभीर शांतरस... आणि बाबीच्या संगीत जीवनाचा शांत श्रीगणेशा झाला. बदलीच्या नोकरीमुळं सांगली, जळगाव, नगर करीत केळकर पुण्याला आले. तोपर्यंत बाबीचा भाऊ बाळूही तिला तबल्याची साथ करू लागला होता.

जनरीतीप्रमाणे बाबीचं लग्न होऊन ती प्रतिभा गोपाळ करंदीकर झाली आणि तिच्या आत्तापर्यंतच्या भूप रागाच्या शांतरसाला मुंबईच्या गर्दीची लयकारी लाभली. डोंबिवलीतल्या दोन खोलीतल्या बिऱ्हाडात प्रतिभाताई संसाराची मांडामांड करतानाच आपली संगीताची हौसही पुरवून घेत होत्या. डोंबिवलीतलं कलामय वातावरण त्यांच्या हौसेचं मोल करणारं होतं. यथावकाश भारती आणि शिरीष ही दोन अपत्यं झाली नि चौकोनी संसार झाला. महापालिकेत नोकरी करणाऱ्या पती गोपाळरावांनी प्रतिभेला प्रोत्साहन दिलं आणि घडी सुस्थितीत आणण्यासाठी प्रतिभाताईंनी नोकरी करायची असं ठरवलं.

मुंबईतल्या गर्दीच्या आणि धावपळीचा चेहरामोहराही आधी कधी न पाहिलेल्या प्रतिभाताई आता त्या गर्दीत 'सूर' मारायला सिद्ध झाल्या. कारण त्यांना सुरांची साथ होती. महापालिकेच्या शाळांमध्ये संगीत शिक्षकांच्या जागा भरायच्या होत्या. अर्ज केला. मुलाखतीसाठी बोलावणं आलं. मुंबई महापालिकेची ती भव्य इमारत प्रतिभाताई प्रथमच पाहत होत्या. शिक्षणतज्ज्ञ माधुरीबेन शहा, के.जी. गिंडे असे बडे लोक मुलाखत घ्यायला आणि मुलाखत द्यायला ख्यातनाम गायक विठ्ठल शिंदे, गोविंद पोवळे, जयवंत कुलकर्णी होते. आपली कशी निवड होणार, असं वाटत असतानाच नियतीचं दान पडलं आणि नेमणूक मिळाली; पण ती अशी की विक्रोळी, घाटकोपर, कांजूरमार्ग येथील निरनिराळ्या

शाळात जाऊन संगीत शिकवायचं...

नोकरीचा पहिला दिवस ! आठ वर्षांची भारती आणि सहा वर्षांचा शिरीष यांनी पायाला घट्ट मिठी मारून रडवेल्या चेहऱ्यानं सांगितलं, "आई, आम्हाला टाकून तू जाऊ नको ना !"... मग शिरीषला कडेवर आणि भारतीला हाताला धरून लोकल गाठली आणि पहिला दिवस आपल्या मुलांना घेऊन इतरांच्या मुलांना शिकवलं. शाळेच्या बाईंनी मुलांना पाणी आणि बिस्किटं दिली; पण आई जवळ म्हणून दोन्ही पोरं खूश होती.

आता जीवनातला शांत भूपराग संपला होता. तिथं धावपळीचा आणि उस्तवारीचा 'शंकरा' सुरू झाला होता. तशातच तिसरा मुलगा रमेश पायगुणाचा घेऊन जन्माला आला. संगीत शिक्षिकेची कारकीर्द यशस्वी होऊ लागली. संसार, नोकरी, लोकलचे धावते प्रवास अशी पाठशिवणी होतीच. एकदा भारतीला बरोबर येऊन घरी परत येण्यासाठी इंजिन लोकलमध्ये चढल्या तर छोटी भारती फ्लॅटफार्मवरच राहिली. पुढच्या स्टेशनवरून परत मागे आल्या आणि मुलगी दिसताच तिला घट्ट छातीशी धरून क्षणभर थरकापत उभ्या राहिल्या... अशा या वेळापत्रकात कधी हिंडोल, तर कधी मारव्याचे करुण स्वर अनुभवावे लागत; पण सगळं छान चाललं असतानाच नियतीनं एका ऊनवट रागाची क्रूर सुरावट प्रतिभाताईंना ऐकवली.

पती गोपाळरावांना एक जगावेगळा अनवट आजार जडला. पुढची अठरा वर्षे प्रतिभाताई या वातावरणाशी झुंजत होत्या. सुदैवानं मुलं हुशार निघाली. भारती स्टेट बँकेत लागली. शिरीष महापालिकेत, तर रमेश इंजिनियर झाला. 'लहरी अशा सुखाच्या या...' ही चीज आळवतानाच त्यांना जीवनातल्या तराणा गाऊन ऊर फुटेपर्यंत नोमतोम करावे लागे. मग चिडचिड व्हायची. 'ही तराणाच गाते, हिला मंद लयकारी माहीतच नाही' असं लोक बोलायचे... पण तशातही काही सुखविणारे सूर निर्माण व्हायचं.

विठ्ठल नार्वेकर नावाचा एक मुलगा... मोलकरणीचा... त्याला गाणं शिकवलं. एका स्पर्धेत उतरवला. परीक्षक म्हणून ख्यातनाम गायक जितेंद्र अभिषेकी होते. विठ्ठल नार्वेकरचा पहिला नंबर आला आणि संगीत शिक्षिका म्हणून अभिषेकीबुवांनी प्रतिभाताईंचा गौरव केला...

सप्तपदीची साथ संपली आणि सहचरीला मागं ठेवून सहचर काळभेटीस निघून गेला. मग प्रतिभाताईंनी ठरवलं... मुलं आपापल्या मार्गी लागलीत. रमेश

तर ख्यातनाम प्राध्यापक व पुस्तकांचा लेखक आहे... भारती-मधुकर यांचा गोडबोले संसार फुलून प्रज्ञा, सौरभ आणि वृंदा भूषण मार्गी आहेत. शिरीष-संगीताची श्रद्धा आणि रमेश-संध्याच्या ऋद्धी-सिद्धी या मुंबईत आहेत. स्नेहांश या पतवंडालाही मांडीवर खेळवलंय. आता पुण्यात अमृतमहोत्सवी वयात प्रतिभाताई शांतपणे भैरवी आळवीत आहेत. त्यांना दीर प्रभाकरराव व कुटुंबीय यांची सावली आहे. भूप ते भैरवी द्वारा शंकरातील तराणा हा प्रतिभाताईंचा संगीतप्रवास श्रवणीय आहे.

■ ■ ■

# ५६. “हुस्ना ना तू ?”

पुण्याला पेरूगेटसमोरच्या इमारतीत चौथ्या मजल्यावर एक कुटुंब राहायला आलं आणि इमारतीतील काही जणांच्या भुवया उंचावल्या.

मध्यमवर्गीय उच्चवर्णीयांच्या या इमारतीत जे कुटुंब राहायला आलं होतं त्यातल्या स्त्रीचं नाव हुस्ना होतं. शेजारीच राहणारे रामभाऊ जोशी यांनी आपल्या हातातला आध्यात्मिक ग्रंथ मिटून घेत थोडा वेळ विचार केला आणि ‘हुस्ना’ हे नाव कसं कोणी दिलं असेल, नावाप्रमाणे ही स्त्री मुसलमान असेल तर... कदाचित तिचं नाव ‘हृदया’ असेल, त्याचं भाषांतर हुस्ना असेल... अशा अनेक शंका...

मग रामभाऊ जोशी यांच्याकडं त्यांचे एक लेखक मित्र आले होते. त्यांचा या ‘हुस्ना’ कुटुंबाशी चांगला परिचय होता. लेखकमित्र रामभाऊ जोशी यांच्याकडे आलेत हे कळलं तेव्हा शेजारच्या ब्लॉकमधील ‘हुस्ना’ त्यांना भेटायला आली. येताच ती डोईवर ओढणी ओढून दोघांच्याही पाया पडली. रामभाऊ जोशी यांनी त्यांचे मूळचेच बारीक डोळे समाधानानं मिचकावले. कारण हुस्नाचा वेश हुस्नाच्या नावाप्रमाणेच होता; पण ओढणीचा पदर करून ती पाया पडली होती...

“अच्छा है आपका घर, बहोत साफसुथरा और सुंदर !” हुस्ना म्हणाली आणि हुस्नाचे डोळे काहीतरी शोधत होते. हुस्नानं एकदम रामभाऊंना विचारलं...

“देवघर कहाँ है ?”

“आत आहे.” रामभाऊ म्हणाले.

रामभाऊंच्या देव्हाऱ्यात त्यांच्या नित्यपूजेच्या मूर्ती होत्या. स्वच्छ शिसवी देव्हारा, टपोरी फुलं वाहिलेली. हुस्ना पुढं आली आणि गुडघे टेकून तिनं देव्हाऱ्यासमोर माथा लवविला...

रामभाऊंच्या डोळ्यात आणखी समाधानाचं पाणी तरळलं. मग एक मुलगी आली ती हुस्नाची मुलगी होती. नाव होतं मनप्रीत ! रामभाऊंच्या भुवया आणखी एकदा उंचावल्या... मग ते म्हणाले,

“हुस्ना ना तू ?”

“हाँ, मै हुस्ना नातू. हुस्ना उदय नातू !”

"तू हुस्ना, तुझा नवरा उदय, आडनाव नातू आणि तुझी मुलगी मनप्रीत... हे काय गौडबंगाल आहे?"

"सांगतो काका सगळं तुम्हाला..." असं म्हणून दारात आलेल्या हुस्नाच्या पतीनं... उदयनं ही सारी मनभरी कहाणी सांगितली...

ख्यातनाम कवी कै. मनमोहन नातू यांचा धाकटा मुलगा उदय... संभाजीराव काकडे यांच्याबरोबर त्यांचा सहायक म्हणून तो दिल्लीला राहत होता. तिथं कै. वसंतदादा पाटील यांची ओळख झाली आणि त्यांनी शब्द टाकून दिल्लीच्या ख्यातनाम हॉटेल 'ताज'मध्ये उदयला नोकरी लागली. उत्तम व्यक्तिमत्त्व, कष्ट करण्याची तयारी आणि चपळपणा यामुळे उदय अल्पावधीतच 'ताज'मध्ये लोकप्रिय झाला. बड्या लोकांच्या ओळखी. टीप म्हणून खिसाभर पैसे मिळायचे. उदय वडिलांसारखाच! तो इतरांनाही मदत करण्यास तत्पर... अशाच एका प्रसंगी 'हुस्ना'ची गाठ पडली. दोघं प्रेमात पडले.

चित्पावन ब्राह्मण हिंदू, हुस्ना मुसलमान, हुस्नाच्या घरून परवानगी नव्हती. पळून जाऊन लग्न न करता सर्वसंमतीने लग्न करण्याचा निश्चय करून हुस्ना-उदय यांनी बराच 'वेटिंग पीरियड' सहन केला आणि हुस्नाच्या घरून संमती मिळाली. हुस्नाचे वडीलही दिल्लीत अतिमहत्त्वाच्या ठिकाणी नोकरीस होते. लग्नाला मातब्बर मंडळी आली. उदयनं हुस्नाचं नाव कायम ठेवलं. पहिली मुलगी झाली.

उदय दिल्लीच्या सर्वधर्मीय वातावरणात वाढलेला. त्यानं मुलीला गुरुद्वारात नेऊन तिचं नाव ग्रंथसाहेबांच्या साक्षीनं ठेवलं- 'मनप्रीत!' हे नाव ठेवण्यात दोन उद्देश- 'मन' म्हणजे आजोबा मनमोहन यांच्या नावाचा अंश आणि प्रीत म्हणजे दोहोंच्या प्रीतीचा परिपाक! उदय गणपतीभक्त आहे. सारसबागेचा गणपती हे त्याचं पूजनीय दैवत! मग त्यानं मुलाचं नाव अमेय ठेवलं. बावीस वर्षांची 'ताज'मधली ऐटबाज नोकरी सोडून उदय सहकुटुंब पुण्यात आला. स्वत:ची राहती जागा अपुरी होती म्हणून तो पेरूगेटसमोर इमारतीत राहायला आला... मनप्रीत आणि अमेय दोघंही मुलं मराठी माध्यमाच्या शाळेत शिकतात. उदय तर या मातीतलाच आहे; पण हुस्नासुद्धा इतकी रुळून गेली आहे की फक्त भाषेचा प्रश्न सोडल्यास ती सर्वांशी मिळून मिसळून वागते. धर्मांतर न करता, धर्माचं अवडंबर न माजवता हुस्ना-उदय यांनी मनप्रीत-अमेय यांच्यासह एक आगळे-वेगळे उदाहरण घालून दिले आहे.

म्हणून तर कुणी विचारलं- "हुस्ना ना तू?", तर हुस्ना हसून आणि ठासून सांगते- "हो, मी हुस्ना नातू."

■ ■ ■

# ५७. दीपक दर्शन

गाव पुणे, रस्ता प्रभात रस्ता, स्थळ हॉटेल दर्शन ! हे पुण्यातलं नावाजलेलं हॉटेल. या हॉटेलमध्ये 'कमवा आणि शिका' या योजनेनुसार शिक्षण घेणारे महत्त्वाकांक्षी तरुण चक्क वेटरचं काम करतात. श्रमप्रतिष्ठेचा एक मूर्तिमंत अविष्कार या मुलांच्या रूपानं इथं बघायला मिळतो.

अशाच एका तरुणानं तिथं अर्ज केला. १० वी पास होऊन एस.पी. कॉलेजमध्ये सायन्सला प्रवेश घेतला; पण घरची परिस्थिती हलाखीची. वडील निवृत्त होऊन त्यांना घशाचा कर्करोग झालेला. औषधाला पैसे मिळण्याची वानवा ! एका गोळीची किंमत दहा रुपये. कुठून आणणार पैसे ? ११वीत असताना वडील गेले, मग या मुलानं वृत्तपत्रात जाहिरात वाचली-दर्शनची ! आणि सरळ तो त्या नोकरीत दाखल झाला. एका शिफ्टचे एकशे पाच रुपये मिळायचे. या मुलाचं नाव दीपक वैद्य. हळूहळू दीपक आपल्या वरिष्ठांच्या हाताखाली शिकून तयार झाला. हॉटेलमधली ११ ते १४ ही टेबलं सांभाळणं फार जिकिरीचं काम होतं; पण दीपक ते 'सराईतपणे' करू लागला. लहानपणापासून कष्टाची आव्हानं स्वीकारायची दीपकला सवय होती.

एका शिफ्टचं काम संपलं आणि दुसऱ्या शिफ्टचा मुलगा आला नाही तर तीही शिफ्ट करावी लागे. थोडक्यात कधी कधी दुपारी बारापासून रात्री दोनपर्यंत काम करावं लागे. टेबल पुसणे, ऑर्डर घेणे, डिशेस उचलणे ही सगळीच कामं करावी लागत. त्यामुळे कोणतंही काम हलकं नाही, हे समजू लागलं.

कधी कधी मानसिकदृष्ट्या कसोटीचे प्रसंग यायचे. एकीकडे शिक्षण सुरूच होतं. कामातील कौशल्यामुळं मालकांनी चार महिन्यांच्या आतच दीपकला कॅश काऊंटरचं काम दिलं. एकदा कॅशचं काम करताना, दुसरा मुलगा आला नाही म्हणून कॅश व सर्व्हिस अशी दोन्ही काम दीपकला करावी लागली आणि एकदा कॉलेजमधलीच एक मैत्रीण तिच्या मैत्रिणीसह येऊन ए.सी. हॉलमध्ये

बसली. दीपक त्या दिवशी ए.सी. हॉलला होता. ही मुलगी दीपक ज्यांच्याकडं गाणं शिकायला जायचा त्यांची भाची होती. दीपक चपापला; पण मालक किशोरभाऊंनी त्याला  ऑर्डर घ्यायलाच पाठवलं. ती मुलगी नाजुक हसली आणि तीन कॉफीची ऑर्डर दिली. मुली दोन आणि कॉफी तीन, दीपकला प्रश्न पडला. दीपकने तीन कॉफीचे मग टेबलावर ठेवले. तेव्हा ती मैत्रीण म्हणाली, ''घे ना आमच्याबरोबरच कॉफी. तिसरी कॉफी तुझ्यासाठीच आहे!''

त्याला 'दर्शन'मध्ये माणुसकीचं दर्शन घडलं होतं. मग याच दीपकनं 'गिरीकंद ट्रॅव्हल्स'कडं रेल्वे तिकिटाची कामं केली, पुस्तकांची लायब्ररी चालवली. तिथं शशिकांत बडवे भेटले. त्यांनी मोहन केळकर यांच्याकडं आप्पा बळवंत चौकात नेलं. तिथं बिल्डींग ड्रॉईंगची कामं मिळाली. दीड महिन्यात दीपकनं आपली प्रगती दाखवली. मग आर्किटेक्ट अनिल भागवत यांच्याकडं काम केलं. कदम यांनीही शिकवलं आणि दर्शनमध्ये काम करणारा वेटर बिल्डर आर्किटेक्ट झाला.

संगीता श्रोत्रीबरोबर विवाह झाल्यानंतर दीपकचं संसार संगीत आणखीनच लयबद्ध झालं. त्याला वेग आला. तळेगावला त्यानं स्कीम केली. अनंत अडचणी सोसून, व्याजानं पैसे काढून त्यानं स्कीम पूर्ण केली. त्यावेळी आधी मित्र असलेला पुण्यातील प्रख्यात नाक-कान-घसा तज्ज्ञ हेमंत दाबके यानं खूप मदत केली. पुढं डॉ. हेमंत त्याचा साडूच झाला आणि आज दाबके-वैद्य कुटुंबाची मैत्रीची भट्टी जमली. ती नात्याच्या भट्टीपेक्षाही वरची होती.

अशादीपकलाच अवघड वाटा-वळणावर अनेक माणसांच्या मदतीचा हात मिळाला. अनेक देवदूतांचा साक्षात्कार झाला. मग स्नेहवर्धन प्रकाशनाच्या डॉ. स्नेहल तावरे यांच्या आग्रहानं त्यानं या देवमाणसांची शब्दचित्रं रेखाटली आणि 'अशीसुद्धा माणसं असतात' हे पुस्तक प्रसिद्ध केलं. त्यात डॉ. मदन फडणीस, सुधीर व वासंती संत, श्री. पाटीलसाहेब, दिलीप कुलकर्णी, अंजली पाल, गिरीश-संपदा गाडगीळ, संपूर्ण हेमंत दाबके कुटुंब, सुधीर दरोडे, उज्वला बर्वे, विनय कुंभारे, प्रशांत-जयश्री देसाई, शंतनु भिडे यांची भावपूर्ण चित्रं.

दीपकच्या आयुष्यातला सर्वात कृतार्थतेचा क्षण म्हणजे त्यानं आईच्या सहस्रचंद्रदर्शनानिमित्त तिचं कवितांचं पुस्तक समारंभपूर्वक प्रकाशित केलं. त्या दिवशी मातु:श्रींच्या डोळ्यातून ओघळणारे धन्यतेचे अश्रू हे विलोभनीय दीपकदर्शन होतं.

■ ■ ■

# ५८. दरवळला स्मरणगंध

अहमदनगरच्या यादवराव पाटलांचा मोठा वाडा. पाटील तालेवार माणूस. घरी माणसांचा राबता. पाटील चावडीवर बसून माणसांच्या घोळक्यात त्यांचे प्रश्न सोडवण्यात गर्क असत. आडनावानं मूळचा वाघ असणारा हा माणूस वाघासारख्याच भगरच्च अंगाचा, जडशील वजनांचा; पण चपळ आणि चालाख! त्याची लाडकी लेक मात्र लहानखोरी, गोरीपान, चुणचुणीत, शाळेत जाणारी, संध्याकाळी पाटलांच्या चावडीवर लोक जमत तेव्हा त्यांची ही लेक त्यांना मोठमोठी पुस्तकं वाचून दाखवी. वडील कौतुकानं ऐकत. यादवराव मुलीला कौतुकानं राजा म्हणायचे, कारण त्यांनी तिचं नाव ठेवलं होतं राजकुँवर! महाराष्ट्रीयन मुलीचं असं नाव सहसा नसतं.

गोड आवाजाच्या गोऱ्या-घाऱ्या राजुबाईचं त्यावेळच्या रीतीप्रमाणे सातवी पास होताच वाघांनी लग्न लावून दिलं आणि कोवळ्या वयातच राजकुँवर पाटील, मग राजकुंवर गंगाधर सोनवणे झाली, तिला शिकायचं होतं; पण ती मुंडावळ्या नाकारू शकली नाही.

तिचं भाग्य असं की, तिच्या गळ्यात मंगळसूत्र बांधणाऱ्या तिच्या जोडीदारानं-गंगाधरानं-पहिल्याच रात्री तिला मोकळेपणानं सांगून टाकलं, 'तुला शिकायचं असलं तर शिक. हे मंगळसूत्र आहे, संसाराचं लोढणं नाही.' राजकुँवर या आश्वासक शब्दांनी फुलून गेली आणि ती आनंदानं संसाराचा सारीपाट खेळायला बसली. सासूनं या सुनेला पाठिंबा दिला. घरचं करून तुला काय करायचं ते कर, असं सांगितलं. लागोपाठ तीन मुली झाल्या; पण त्या जरा चालत्या बोलत्या झाल्या, तेव्हा राजकुंवर बाहेरून एस.एस.सी. परीक्षा पास झाली. क्लासला रोज स्वत: घेऊन घेण्याचं काम गंगाधरानं आनंदानं केलं. गंगाधर राजकुंवरच्या शिक्षणयात्रेचा चालक झाला आणि आजपर्यंत ती भूमिका गंगाधरांनी निष्ठेनं रंगवली आहे. राजकुँवर एस.टी.सी. झाली. शिवाजी मराठा संस्थेच्या शाळेत नोकरी मिळाली आणि मग राजकुंवरला आपला रस्ता सापडला. राहुरी कृषी विद्यापीठाच्या पूर्वेला 'सडे' गावात जन्मलेली राजकुँवर पुण्यात

आली आणि तिच्या आयुष्याला सुंदर आकार आला.

'अटकर बांधा, मोठं कपाळ, तेजस्वी कांती, गोंदण लपविण्यासाठी कपाळावर लावलेलं मोठं कुंकू, मनातल्या भावना बंदिस्त करून ठेवण्यासाठी घट्ट मिटलेले गुलाबी ओठ, कुरळ्या काळ्याभोर केसांची कपाळावर महिरप, त्याखाली चमकदार शांत डोळे, अपरंच पण शोभणारं नाक, इस्त्रीची साडी, उत्तम फिटिंगचा ब्लाऊज...' असं तिचं प्रत्ययकारी वर्णन, तिची मैत्रीण कुमद पाडवे हिनं एका लेखात केलंय.

अशा राजकुँवरनं जिजामाता विद्यालयात निष्ठेनं तीस वर्षाहून अधिक काम केलं आणि शेकडो विद्यार्थिनींच्या हृदयात स्थान मिळवलं. प्रसिद्ध संगीतकार राम कदम यांची सून नीला कदम ! पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका, त्यांनी राजकुँवरबाईचं नाव ठेवले 'आरबाई'. आरबाई का ? त्या शाळेत दोन सोनवणे बाई होत्या. मग त्यांचं वेगळेपण ओळखू यावं म्हणून या आरबाई !

मुलींना वर्गात रंगून शिकवता शिकवता राजकुँवरबाई स्वत: अध्ययनात रंगून गेल्या होत्या. एम.ए., एम.एड. झाल्या. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी परीक्षा समितीच्या अध्यक्ष झाल्या. नवोक्रम स्पर्धा आणि कृती संशोधन सत्रे यात भाग घेऊ लागल्या. शिक्षणाचं ध्येय तर त्यांनी काबीज केलंच होतं; पण आता शारदेच्या दरबारातही त्यांचा संचार सुरू झाला तो लेखिका म्हणून.

वृत्तपत्रात अधून-मधून राजकुँवर बाईंचे लेख येऊ लागले. पसंतीचे फोन येऊ लागले. घरचे दारचे कौतुक करू लागले. देखण्या अक्षरातले त्यांचे विचार सुंदर लेखांनी वृत्तपत्रांची पाने सजू लागली. याही प्रवासात पती गंगाधरराव यांनी त्यांचे 'चालकत्व' चालूच ठेवलं होतं. अनेक साहित्यविषयक कार्यक्रमात राजकुँवर-गंगाधर ही लक्ष्मी-नारायणाची जोडी दिसू लागली. विख्यात शास्त्रज्ञ प्रा. भागवतराव धोंडे-पाटील हे राजकुँवरबाईंचे मामेभाऊ. त्यांनी बहिणीचं कौतुक केलं. यथाकाळ बाई निवृत्त झाल्या. लेखणीच्या द्वारा मात्र त्या अधिकच प्रवृत्त झाल्या. आपल्या आठवणीचा पिसारा त्यांनी शब्दरूप सजवला, 'स्मरणगंध' नावाचं पुस्तक लिहिलं. वृत्तपत्रांनी चांगले अभिप्राय दिले.

'स्मरणगंध'ला संगमनेरच्या साहित्य मंडळाचा अनंत फंदी पुरस्कार मिळाला. नगर जिल्ह्यानं माहेरवाशिणीला साडी-चोळीच दिली जणू! प्रसिद्ध साहित्यिक रावसाहेब यांच्या हस्ते पारितोषिकाचा शानदार सोहळा झाला आणि आर बाईंचा स्मरणगंध सर्वदूर दरवळला. अजूनही तो दरवळ वाचकांना मोहवतोच आहे ना !

■ ■ ■

# ५९. लक्ष्मी स्तोत्र

शनिवार पेठ पोलीस चौकीच्या पलीकडे नवकल्पतरू सोसायटीत राहणारे आनंद भालचंद्र देव नू.म.वि.चे विद्यार्थी. पत्नी माधुरी आणि मुलगा अभिराम एवढाच त्रिकोणी संसार. वडील भालचंद्र देव हे डेक्कन कॉलेजमधले कर्मचारी. विद्वान, जाणकार, उत्तम वाचक आणि ज्ञानमार्गी असणारे देव यांनी कितीतरी वर्षे डेक्कन कॉलेजच्या आवारातच निवास केला होता.

देवांचे देवपणाचे संस्कार आपल्या पुत्रावर झाले होते. आनंद बालपणापासूनच वेगळ्या वाटेनं जाणारा मुलगा होता. डेक्कन कॉलेजमध्येच बालपण गेलेलं असल्यामुळे कितीतरी विद्वान, संशोधक, भाषातज्ज्ञ यांचा सहवास आनंदला मिळाला. डॉ. एस.एम. कत्रे, डॉ. कालेलकर, डॉ. एच.डी. सांकलिया यांच्यासारखी माणसं बालवयातच आनंदानं बघितली होती.

आनंद मोठा झाला. पदवीधर झाला. नोकरीला लागला. वाडिया महाविद्यालयात त्याची सेवा सुरू झाली. समाजमनस्क असल्यामुळं त्या सेवेत असतानाही त्यानं माणसं बघण्याचा, माणसं वाचण्याचा छंद सुरू ठेवला. अनेक अनुभव गाठीशी बांधले; पण त्यातल्या एका विलक्षण अनुभवानं त्याच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली.

एकदा देव कुटुंब प्रवासाला गेलं होतं. एका टर्मिल रेल्वेस्टेशनवरून त्यांना पुण्याला यायचं होतं. स्टेशन गजबजलेलं... आठ-दहा फ्लॅटफॉर्म... यांची गाडी पहिल्याच प्लॅटफॉर्मला लागणार होती. वडील आणि अन्य कुटुंबीय वेळेआधीच प्लॅटफॉर्मवर येऊन दाखल झाले होते. गाडीला अजून बराच अवकाश होता. तासभराचा अवकाश. तरीही अन्य गाड्यांची ये-जा सुरू होती. त्यामुळं प्लॅटफॉर्म गर्दीनं खच्च भरलेला असायचा. कडेला एक बाकाशी सामान लावून ही मंडळी खुर्च्यांवर बसली आणि आनंदा सहज म्हणून प्लॅटफॉर्मवर चक्कर मारायला गेला. गर्दीत त्याला पाठीमागून कुणीतरी आपल्याला ढोसतंय असं वाटलं. त्यानं मागे वळून पाहिलं, तर एक जख्ख म्हातारी! तीच त्याला

आपल्या हातातल्या काठीनं ढोसत होती. आनंदाला थोडा राग आला; पण म्हातारीच्या अवताराकडं बघून राग त्यानं आवरता घेतला. म्हातारी आंधळी नव्हती; पण तिला बरंच काही दिसत असावं.

"काय हो बाई... असं काय ढोसतांय काठीनं?" आनंदानं विचारलं.

पण त्या बाईचा चेहरा ढिम्म. परप्रांत होता. त्या बाईलाही मराठी कळत नसावं. तिनं हातातला एक कागद फडकावत त्याच्यासमोर दाखवला. ते रेल्वेचं तिकीट होतं.

तिची भाषा आनंदला कळत नव्हती. बहुधा ती तोडक्या मोडक्या हिंदीत बोलत होती; पण तमिळी किंवा मल्याळम भाषाच ती बोलत होती. आनंदानं तिकीट बघितलं आणि तिच्या आविर्भावावरून त्यानं जाणलं की हिला योग्य त्या गाडीत बसवून द्यायचं आहे.

तिची गाडी पाचव्या प्लॅटफॉर्मवर येणार होती. मग तिनं काकुळतीला येऊन आनंदाला त्या प्लॅटफॉर्मवर नेऊन गाडीत बसवून देण्याची विनंती केली. आनंदानं तिला दंडाला धरून नेलं. पाचव्या प्लॅटफॉर्मवर गाडी आली. गाडीला गर्दीही होतीच; पण तिचं रिझर्व्हेशन होतं. तिच्या मुलानं तिकीट काढून देऊन तिला दुसऱ्या मुलाकडं जाण्यासाठी स्टेशनवर सोडून दिलं होतं. तिच्या खोल डोळ्यात कृतज्ञतेचे भाव उमटले. आनंदा तिला मुलासारखा भेटला होता. स्वतःच्या मुलानं निराधार अवस्थेत सोडलं होतं; पण आनंदानं तिला आधार दिला होता. शिवाय त्यानं पन्नास रुपयांची नोट तिच्या हातावर ठेवली. तिचे डोळे डबडबले. गाडी सुटायला थोडा अवकाश होता. मग ती आनंदाला म्हणाली, 'समोर बस. आनंदाच्या डोक्यावर हात ठेवून ती स्तोत्रं म्हणून लागली. डब्यातले लोक कौतुकानं बघत होते. स्तोत्रं संपलं. आनंदानं नमस्कार केला.

तो म्हणाला, "कसलं स्तोत्रं आहे?"

"लक्ष्मी स्तोत्रं आहे बेटा. तू माझ्यासाठी एवढा वेळ दिलास. मला आणून बसवलंस. मी तुला खाऊ द्यायला हवा पण मी काय देणार? म्हणून माझ्याजवळ होतं ते मी दिलं. देवाची प्रार्थना! तुला काही कमी पडणार नाही."

गाडीची वेळ झाली. तिचे डोळे डबडबले. आनंदा पुन्हा पहिल्या प्लॅटफॉर्मवर आला. कारण आता त्याच्याही गाडीची वेळ झाली होती. वडील काळजीनं वाटच बघत होते. त्यानं सर्व हकीकत सांगितली. द्राविडी भाषेतल्या त्या स्तोत्राचे शब्द त्यानं सांगितले. वडील भाषातज्ज्ञ होते... ते म्हणाले, "आनंदा तू फार चांगलं काम केलंस. त्या माऊलीचे आशीर्वाद तुला मिळाले. ती

साक्षात लक्ष्मीच असली पाहिजे. तिनं तुला लक्ष्मी स्तोत्राचा आशीर्वाद दिला.''

पुढं आनंदानं धाडस केलं. नोकरी सोडून तो स्वतंत्र व्यवसायात गेला. एका कंपनीचा मार्केटिंग मॅनेजर झाला. आयुष्याच्या अर्धशतकाच्या टप्प्यावर त्याला लक्ष्मीचा सुखद सहवास मिळतो आहे. जीवनातील माधुरी चाखता येते आहे.

■ ■ ■

# ६०. अगतिक महिला 'दीन'

त्या झोपडपट्टीच्या अलीकडचीच जागा एका मोठ्या श्रीमंत शिक्षण संस्थेनं घेतली होती आणि तिथं सुंदर डौलदार इमारत उभी केली होती. झोपडपट्टीच्या आवाराला मोठी बंदिस्त भिंत बांधून संस्थेनं आपला सुभा सुरक्षित केला होता. वर्दळ नव्हती पण आवाज आणि भांडणं याचं प्रदूषण होतंच.

संस्थेचं मोठ्ठं सभागृह होतं. त्या सभागृहात मोठमोठ्या सभा होत असत.

अशीच एक सभा होती जागतिक महिला दिन ! ८ मार्चला दरवर्षी जागतिक महिला दिनानिमित्त सर्वत्र सभा होतात तशी ही सभा कुठल्या तरी महिला समाजवादी सभेनं आयोजित केली होती. सफेद उंची कपड्यातल्या बऱ्याचशा स्त्रिया आणि पुरुष सभेला उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या कुणीतरी समाज कार्यकर्त्या होत्या. 'बॉब कट, स्लीव्हलेस, माफक का होईना पण मॅचिंग लिपस्टिक आणि ऑफ व्हाईट साडी... त्यांच्या अवतीभवतीच्या स्त्रियाही नटूनच आलेल्या होत्या.

भिंतीच्या पलीकडं झोपडपट्टीत माणसं कळवळत होती. एका झोपडीच्या बाहेर दोन कोवळ्या वयाच्या मुली भांडी घासत होत्या. दुसऱ्या झोपडीत आत काहीतरी जोरदार वादविवाद चालला होता. तिसऱ्या झोपडीत एक जराजर्जर म्हातारी विव्हळत पडलेली होती. तिला एक चार वर्षांची मुलगी कटोऱ्यातून चहा पाजत होती. एखाद्या झोपडीत शांतता होती; पण तिथं दमूनभागून भांडी घासून थकलेली बाई तोंडाला मिश्री लावत बसलेली होती. एका झोपडीसमोर एक हातगाडी ओढणारी बाई आली. तिचा कारभारी आत दारू पिऊन पडला होता आणि त्याच्या हातगाडीचा धंदा ती चालवत होती... अगदी शेवटी नळकोंडाळ्यावर पाण्यासाठी त्या झोपडपट्टीत त्या बायकांची भांडणं चालली होती. त्यातल्या दोघी तर एकमेकींच्या झिंज्या ओढत होत्या.

भिंतीच्या अलीकडं जागतिक महिला दिनाची सभा सुरू झाली. दीपप्रज्वलन झालं आणि त्याचवेळी झोपड्यातले दिवे भारनियमनामुळे गेले. बायाबापड्या चिमणी पेटवू लागल्या...

सभेत स्वागत गीत सुरू झालं...

आणि झोपडपट्टीतल्या बायकांचे नवरे त्यांचं स्वागत करू लागले. बायकांच्या अगतिक किंकाळ्यांनी आसमंत भरून गेला.

जागतिक महिला दिनानिमित्त पाहुण्यांच्या टेबलावर ऑक्सिरिचच्या शुद्ध पाण्याच्या बाटल्या ठेवल्या होत्या आणि त्याचवेळी पोटुशी बायका नळकोंड्यावरून पाणी भरून डोईवरून आपल्या झोपडीत आणत होत्या. सभेत पाहुण्यांच्या हातात पुष्पगुच्छ होते. झोपडपट्टीत बाईंच्या हातात झाडू होता. दिवसभर बाहेर गेल्यामुळं झोपडीचा केरच काढला गेला नव्हता...

प्रमुख पाहुण्यांचं भाषण सुरू झालं... पाहुण्या तळमळीनं सांगत होत्या... ''आज जागतिक महिला दिनाच्या निमित्तानं आपण स्त्रियांच्या सबलीकरणाचा आणि सक्षमीकरणाचा विचार केला पाहिजे.'' झोपडपट्टीत त्याचवेळी एक पोरगी शाळा सोडून आईला मदत करीत होती. संसाराचा रेटा ओढण्यासाठी शाळेत न जाता तिला आईला मदत करावीच लागत होती...

''स्त्रियांचा आत्मसन्मान हा मोठा महत्त्वाचा मुद्दा आहे.'' बाई तावातावानं सांगत होत्या आणि त्याचवेळी भिंतीपलीकडं...

एका झोपडीत एक नवरा दारूच्या पैशांसाठी आपल्या बायकोला मारत होता आणि ती बिचारी किंचाळत होती.

'महिलांवरील अत्याचाराला पायबंद बसलाच पाहिजे त्यासाठी सरकारनं कायदा केला पाहिजे,' असं सांगितलं जात होतं. लोक टाळ्या वाजवत होते आणि त्याचवेळी एका झोपडीत...

एक मुलगी वेटोळं घालून पडलेली होती. अंगावर वाकळ घेऊन ती लोकांपासून तोंड लपवून राहत होती. तिच्यावर बलात्कार झाला होता. पण अब्रू जायला नको म्हणून केस नोंदवली नव्हती. एवढंच नव्हे तर तिच्या बापानंच बलात्कार करणाऱ्याकडून पैसे घेऊन पोलिसातली तक्रार मागं घेतली होती आणि वर तो त्या मुलीलाच दोष देत होता. महिलांच्या स्वातंत्र्याबाबत, स्वाभिमान रक्षणाबाबत, अत्याचार प्रतिबंधाबाबत सभेत टाळ्यांच्या कडकडाटात ठराव पास झाला आणि त्याचवेळी त्या झोपडपट्टीतील एका नवऱ्यानं चारित्र्याच्या संशयानं बायकोच्या डोक्यात पाटा घातला होता.

सभेत पसायदान सुरू झालं आणि झोपडपट्टीतलं वातावरण लाव्हारसासारखं उसळतं होतं. त्यातल्या अगतिक महिला जागतिक महिला दिनाच्या दिवशी जास्तच अगतिक दीन झाल्या होता.

■ ■ ■

# ६१. लोभ आहे जहर मोठे

अर्धशतकापूर्वीची गोष्ट! एक लहानसं रेल्वे स्टेशन. या स्टेशनवर दररोज एकच पॅसेंजर गाडी जाणारी आणि एक गाडी येणारी थांबत असे. बाकीच्या दोन-चार एक्सप्रेस मेल गाड्या न थांबता सुसाट जात असत. दोन-तीन मालगाड्याही ये-जा करीत. कधी कधी एक्सप्रेस मेल गाड्यांना लाइन क्लिअर करून देण्यासाठी मालगाड्या स्टेशनवर सायडिंगला थांबवत.

रणसिंग चौधरी स्टेशन मास्तर होते. त्यांच्या हाताखाली मोजून चार सेवक होते. एक सिग्नलमन, एक क्लार्क, एक कुली, एक शिपाई. यातला सिग्नलमन होता शंकरप्रसाद... शंकरप्रसादनं एकदा चौधरींना सांगितलं...

''साहेब आपल्या स्टेशनवर ज्या गाड्या थांबतात त्यात बराचसा माल असतो. एखाद्या गाडीची ब्रेकव्हॅन, एखाद्या गाडीचा मालडबा.. त्यातली काही पार्सलं सहज फोडण्यासारखी असतात. माझ्याजवळच्या मास्टरकीचा उपयोग करून दार उघडायचं, पार्सल फोडायचं-फार फोडायचं नाही... थोडंच उघडायचं आणि आतला माल थोडासा काढून घ्यायचा. मग तो फुटलेला, तुटलेला भाग तसाच ठेवायचा... असं केलं म्हणजे आपल्यावर काहीच आळ येणार नाही. मी डब्याचं दार नीट बद करेन. सील असेल तर सीलही करेन... आपल्याला रोज काही ना काही मिळत राहील. एखाद्या दिवशी काहीच नाही मिळालं तरी काही बिघडत नाही. मी तुम्हाला देत जाईन.''

शंकरप्रसादचा हा बेत ऐकून चौधरींच्या मनाची क्षणभर चलबिचल झाली; पण त्यांना मोह आवरला नाही. ते 'हो' म्हणाले. रोज मध्यरात्रीला एखादी मालगाडी सायडिंगला असे. मग शंकरप्रसाद एखादं छोटंसं पार्सल घेऊन येई. खांद्यावरून आणता येईल एवढ्याच वजनाचं ते असे.

मग चौधरींच्या क्वार्टरमध्येच पार्सलचा कोपरा फोडण्याचं, वरचं किंतान काढण्याचा काम चाले...

कधी सुका मेवा असे.

कधी कापड चोपड असे.

कधी धान्य-धुन्य, वनस्पती तुपाचे डबे असत, कधी औषधे असत, कधी काड्यापेट्या, कधी साबण...

असा रोज रात्रीचा कार्यक्रम असे.

मध्यरात्रीची वाट बघत घरातली कुटुंबीयही जागरण करीत साबणाच्या चार-पाच वड्या, काड्यापेटीची दोन-तीन बंडलं... सुका मेव्याच्या पिशव्या... थोडं घ्यायचं... पार्सल बंद करून टाकायचं...

परत डब्यात नेऊन ठेवायचं... पार्सल मुक्कामावर घेणाऱ्याला वाटे... पार्सल फेकल्यामुळं फुटलंय... शिवाय रेल्वे अशा गोष्टीची जबाबदारी घेत नाही, ही गोष्ट या लोकांच्या पथ्यावरच पडत होती.

असा क्रम पाच-सहा महिने चालला होता.

चौधरी आता चटावला होता. शंकरप्रसाद तरबेज होता. एकदा तर एक आरशाचं पार्सल होतं. त्यातले लहान-मोठे वीस-पंचवीस आरसे यांनी काढले आणि आपल्या सहकाऱ्यांना विकून टाकले.

आणि मग अशीच एक रात्र उगवली...

अंधारी रात्र... अमावस्या होती. ती काळरात्रच ठरली.

त्या दिवशी एक वेगळ्याच प्रकारचं पार्सल मिळालं... पार्सलला खालच्या बाजूला बारीक जाळी ठेवली होती. वरून किंतान होतं... पण आत काहीतरी खुडबूड खुडबूड होती. पार्सलवर लिहिलं होतं...

क्रपवश्रश ुळींह उरीश : झेळीप...

र्त्रे णीसशपीं ऊशश्रळींशीू...

पार्सल आणलं...

चौधरी, चौधरीचं दोन लहान मुलं, बायको भोवती बसले होते. शंकरप्रसादनं पार्सल मधे ठेवलं...

आज काय मिळणार अशी उत्सुकता होती...

शंकरप्रसादनं पार्सलच्या वरच्या टोकाचं किंतान काढलं. जाळीवरचं टोक उचकटलं... आणि काय... दोन-तीन भयंकर विषारी नाग फुत्कार सोडत त्यातून बाहेर पडले... आधीच खवळलेल्या त्या नागांनी सर्वांना दंश केला... केरळमधून मुंबईला हाफकिन इस्टिट्यूटसाठी हे पार्सल पाठवलं होतं... थोड्याच वेळात पाच-सहा काळीठिक्कर पडलेली प्रेतं तिथं इतरांना दिसली... लोक म्हणाले.

लोभ आहे जहर मोठं... नाव मोठं लक्षण खोटं.

■ ■ ■

# ६२. त्यांनी थोडा उजेड द्यावा

कविराय राम जोशी यांच्या सोलापुरातला आणखी एक आधुनिक कवी. गेली ५०-६० वर्षे हा कवी आपल्या शब्दफुलांच्या शिंपणीनं रसिकमनांना सुखावत आहे. छोट्या मोठ्या कविसंमेलनात, आकाशवाणीवर, दूरदर्शनवर त्याच्या कविता ऐकायला मिळतात; पण एखाद्या कवितेनं त्याच्या स्वत:च्या जीवनात आणि इतर अनेकांच्या जीवनात भाग्ययोग घडवून आणला आणि त्याचं मन अलौकिक आनंदानं दुथडी भरून वाहू लागलं.

एका वृत्तपत्राच्या संपादकानं आपल्या लेखात शेवटी या कवीच्या एका कवितेच्या चार ओळी उद्धृत केल्या होत्या. तशा त्या कुणाकुणा कवीच्या ओळी नेहमीच लोक उद्धृत करतात.

पण त्या ओळी वाचून पुण्यातील एका प्रतिष्ठित मासिकाचे संपादक निहायत सुखावले आणि त्यांनी कवीला फोन करून आपली खुशी कळवली आणि फोनवरूनच त्यांनी त्या कवितेच्या अन्य ओळी कविमुखातून ऐकल्या, उतरवून घेतल्या.

सोलापूरचा हा कवी म्हणजे कविवर्य दत्ता हलसगीकर आणि अंतर्नाद मासिकाचे संपादक भानू काळे यांच्यातला तो संवाद! कवितेच्या कुंडलीत तिचा भाग्ययोग सुरू झाला होता.

अंतर्नादच्या मार्च २००१ च्या अंकाच्या मुखपृष्ठावर ही कविता गुलाबी रंगात मोठ्या टाइपात छापली होती.

आणि मग हलसगीकरांचा फोन खणखणू लागला. नंतरचे काही दिवस पोस्टमन रोज घरी पत्रं आणून टाकत होता.

एके दिवशी मु.पो. जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड इथून शिंत्रे नावाच्या गृहस्थांचा हलसगीकरांना फोन आला. त्यांनी लिहिलं होतं.

'आम्ही बेघर मुलांसाठी एक आश्रम चालवतो. हा आश्रम एस.टी. स्टँडसमोर आहे. तुमची कविता मोठ्या फलकावर रंगवून लावावी वाटते. त्यासाठी तुमची परवानगी द्या.'

कवीने अर्थातच परवानगी दिली.

प्रतिमाच्या स्वरूपात जगण्याचं प्रयोजन असलेली ही कविता जाता येता लोक थांबून वाचू लागले. कवितेचे शब्द असे-

ज्यांची बाग फुलून आली त्यांनी दोन फुले द्यावीत.

ज्यांचे सूर जुळून आले त्यांनी दोन गाणी द्यावीत ज्यांच्या अंगणात झुकले ढग, त्यांनी ओंजळ पाणी द्यावे आपले श्रीमंत हृदय रिते करून भरून घ्यावे.

सूर्यकुलाशी ज्यांचे नाते त्यांनी थोडा उजेड द्यावा
प्राक्तनाच्या अंधारात प्रकाशाचा गाव न्यावा
मन थोडे ओले करून आतून हिरवे हिरवे व्हावे
मन थोडे रसाळ करून आतून मधुर मधुर व्हावे
आभाळाएवढी ज्यांची उंची त्यांनी थोडे खाली यावे
ज्यांचे जन्म मातीत मळले त्यांना वरती उचलून घ्यावे

काही दिवसांनी कविला शिंत्रे भेटले. त्यांनी त्यांना जांभुळपाड्याला नेलं. तिथं ठळक अक्षरात ती कविता येणारे-जाणारे लोक वाचत होते हे कवीनं बघितलं. मग शिंत्रे म्हणाले-

''ही तुमची कविता वाचून अनेक लोकांनी स्वयंस्फूर्तीने देणग्या दिल्या आहेत. ही वास्तू उंच होणार आहे. नवी मोठी इमारत होणार आहे. तुमच्या कवितेच्या उंचीनंच हे साध्य झालं.'' ज्ञानप्रबोधिनी संस्थेनं हीच कविता दिवाळी भेटकार्डावर छापली. बाबा आमटे यांच्या नंदनवनातही या कवितेला स्थान मिळालं.

ही कविता कवीला कशी सुचली ?

अनंतचतुर्दशीला अनंताची पोथी कवी वाचतात. त्यात एक कथा आहे. या कथेवरून कवीला ही कविता सुचली.

आणि मग तर या कवितेनं अनेकांची हृदययंत्र काबीज केली. रोटरी क्लबसारख्या संस्थांनी या कवितेचं वाचन त्यांच्या मुख्य अधिवेशनात केलं. सोलापूरजवळच कारंबा या गावी वेश्यांच्या मुला-मुलींचं पुनर्वसन करण्यासाठी स्नेहालय ही संस्था काम करते. या संस्थेच्या आवारातही ही कविता ठळकपणे रंगवून लावली होती.

अशी ही कविता कुठं कुठं पोचली आणि तिनं अनेकांचं भावजीवन उजळून टाकलं.

दत्ता हलसगीकर यांनी असंख्य कविता केल्या आहेत, पण या कवितेला ते भाग्यवती कविता म्हणतात आणि वाचकांच्या दृष्टीनं ते त्या भाग्यवती कवितेचे भाग्यवान कवी आहेत.

■ ■ ■

# ६३. पाहा माझा ग्रंथ नीट

सूर्यकांत रघुनाथ कुलकर्णी ! इतर हजारो नावांसारखंच हे एक नाव. श्री. रघुनाथ तथा भाऊ आणि मंगळाबाई (आई) यांचा हा मुलगा चारचौघांसारखा शिकून इंजिनियर झाला. वीज मंडळात नोकरीला चिकटला. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात तो फिरतीची नोकरी करू लागला आणि लोकांच्या जीवनातील अंधार दूर करणाऱ्या विजेचं काम करू लागला. आई-वडील, दादा, आजोबा, आईचे वडील, काका यांचे संस्कार लहानपणी झाले होतेच. त्यानुसार वीज मंडळाचं काम सुरू होतं. दिवस येत होते आणि जात होते.

एक दिवस कुलकर्णी यांचे एक नातेवाईक त्यांच्याकडं आले आणि पिशवीतून एक पुस्तक काढून कुलकर्णी यांच्या हाती देत म्हणाले, ''बघा सूर्यकांत, हे पुस्तक तुमच्या उपयोगी पडतंय का ? आमच्याकडं उगाचच धूळ खात पडलंय.''

''ठेवा तिथं. मी नंतर बघेन.'' सूर्यकांत म्हणाले.

दोन-चार दिवसांनी सूर्यकांतांनी ते पुस्तक उघडलं. तो होता दासबोध! पांगारकरांचा दासबोध! खूप जुनी प्रत किंमत केवळ नऊ रुपये.

पुस्तक उघडलं. नव्या पुस्तकाच्या पानांना जसा वास येतो तसा त्या पुस्तकाच्या पानांना वास येत होता.

म्हणजे हे पुस्तक तोपर्यंत कुणी उलगडून वाचलं नव्हतं.

कुलकर्णी यांनी निदान त्याची पानं सुटी केली आणि त्या दिवशी ते पुस्तक ठेवून दिलं.

पण त्यांच्या दृष्टीनं ते पुस्तक म्हणजे परीस ठरला.

ज्ञानाचा परीस !

वीज मंडळात काम करणाऱ्या सूर्यकांतांना त्यांच्या नसानसात वेगळीच वीज खेळलीय असं वाटू लागलं.

सूर्यकांताला चंद्रकांत मणी गवसला होता.

अभियंत्याला आध्यात्माची आणि व्यवहाराची अभियांत्रिकी सूत्र या ग्रंथाच्या रूपानं मिळाली होती.

ग्रंथ उघडताच त्यांचं लक्ष एका मजकुरावर सहज गेलं.

माझी काया आणि वाणी ! गेली म्हणाल अंत:करणी
परी मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।।
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत: सिद्ध ।
असता न करावा खेद । भक्तजनी ।।
नका करू खटपट । पहा माझा ग्रंथ नीट
तेणे सायुज्याची वाट । गवसेल की ।।

आणि मग कुलकर्णी यांना सायुज्याची वाट गवसली. वीज मंडळात काम करताना भलेबुरे, चांगले-वाईट, इष्ट-अनिष्ट अनुभव येतच होते, पण हा परीस हाती पडला आणि जीवनाला लखलखीत दिशा मिळाली. दासबोधाचं वाचन सुरू झालं आणि मग शिवथरघळीत सात दिवसांच्या शिबिरात जाण्याचा योग आला. सपत्निक गेले. शिवथरघळीतल्या धबधब्याचं विलोभनीय दृश्य पाहिलं. आवाज ऐकला. चं.प. भिशीकर, काका देशमुख यांचं दासबोधवरचं विवेचन ऐकलं आणि मग कुलकर्णी यांना वाटू लागलं... आपणही याबाबत काहीतरी लेखन केलं पाहिजे. निश्चय झाला. लेखणी सरसावली.

दररोज एकेका समासावर लिखाण करायचं ठरवलं.

वीज मंडळात कनिष्ठ अभियंतापदाची जबाबदारी मोठी होती. अनेकवेळा, वेळीअवेळी साइटवर जावं लागे. कामगारांशी संबंध येत होते. ग्राहकांच्या तक्रारी होत्या. ऑफिसमधील कर्मकांड तर पाचवीलाच पुजलेलं. दासबोध वाचत असताना समर्थांची एक ओळ नेहमीच डोळ्यांसमोर असे.

"कर्तव्यास चुको नये."

वीज मंडळीतील कर्तव्य चुकू नये असं असेल तर दासबोध बाजूलाच ठेवावा लागला असता, पण घर, संसार, वीजमंडळ, दैनंदिन व्यवहार हा सर्व कर्तव्याचा भार उचलूनही समासावरील प्रासादिक भाष्याचं लेखन झालं. ते एका वृत्तपत्रानं क्रमश: प्रकाशित करावं असं वाटलं कोण प्रकाशक मिळणार ? पण भेटले चेतक बुक्सचे कुणाल हजेरी यांनी पुस्तक प्रकाशित करायचं ठरवलं. सहाशे पानांचा ग्रंथ सिद्ध झाला. कुणाल हजेरी यांचे वडील मदन हजेरी हेही साहित्यिक आहेत. ग्रंथांचं नाव ठेवण्याची चर्चा झाली. नाव ठरलं.

'पाहा माझा ग्रंथ नीट'... आणि हा ग्रंथ श्री. सुनील चिंचोळकर आणि आणखी एक ख्यातनाम साहित्यिक यांच्या उपस्थितीत प्रकाशित झाला.

■ ■ ■

# ६४. कस्तुरीमृग

नूतन मराठी विद्यालयाच्या स्नेहसंमेलनातलं नाटक. दिग्दर्शक होते य.शं. गोडबोले. एका मुलानंच स्त्री–भूमिका केली होती. गोरापान, नाकेला, पाणीदार डोळ्यांचा हा मुलगा स्त्रीवेषात इतका सुंदर दिसत होता की त्यावेळचे शिक्षक म्हणाले, ''हा पुरुष आहे, हे माहीत आहे म्हणून ठीक, नाही तर याला इथंच कुणीतरी लग्नाची मागणी घातली असती.''

हा मुलगा म्हणजे पुढं ख्यातनाम झालेला अभिनेता मोहन गोखले.

आंतरशालेय नाट्यस्पर्धेत दुसऱ्या एका तरुण शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली बसविलेल्या नाटकात मोहननं भूमिका केली.

मोहनचे वडील बापूसाहेब गोखले हे 'सकाळ'च्या स्वराज्य साप्ताहिकाचे संपादक होते. ते या शिक्षकांचे स्नेही होते.

एकदा विश्रामबाग वाड्यापाशी हे शिक्षक बापूसाहेबांना भेटले तेव्हा बापूसाहेबांनी मोहनच्या अभ्यासाविषयी आणि त्यांच्या शाळेतील उपक्रमांविषयी चौकशी केली. प्रत्येक बापाला आपल्या मुलाच्या भवितव्याची चिंता असतेच. तशीच काळजीयुक्त चिंता बापूसाहेबांनी या शिक्षकांजवळ व्यक्त केली. तेव्हा हे शिक्षक म्हणाले,

''बापूसाहेब, तुमचा मुलगा रंगभूमी–चित्रपट क्षेत्रात नाव काढणार. मला भविष्य कळत नाही; पण वर्तमान वाचता येते. मोहन गुणी मुलगा आहे. तुम्ही अगदी निश्चिंत रहा.''

या शिक्षकांनी बापूसाहेबांना दिलासा दिला, हे कळल्यावर मग मोहनलाही बरं वाटलं. यथावकाश मोहन चांगल्या गुणांनी शालांत परीक्षा उत्तीर्ण झाला. महाविद्यालयात गेला. तिथं त्याच्या गुणांना अधिकच वाव मिळाला. त्याच्या अभिनयाची वाहवा होऊ लागली आणि मग मोहन नाट्य–चित्रसृष्टीचा अभिनेता झाला. एखाद्या चित्रपटात भूमिका मिळाली की तो या शिक्षकांना सांगत असे. त्यांच्याशी चर्चा करीत असे. महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचा या शिक्षकांनी खूप अभ्यास केला होता. 'गांधी' चित्रपटाच्या वेळी मोहनने या सरांशी खूप चर्चा केली होती. विवाहवेदीवर पाऊल ठेवतानाच मोहन मागं फिरला, कारण

तो आता नाट्यचित्र व्यवसायात खूप व्यग्र होता.

अधूनमधून बापूसाहेब या सरांना भेटत होते आणि समाधानानं सांगत होते, ''सर, मोहनच्या प्रगतीचा वाटा तुम्हीच सुरू केलाय.''

''बापूसाहेब, झाड आपोआप वाढतं. माळी फक्त पाणी घालतो. माझीही हीच नम्र भूमिका आहे.'' सर नम्रतेनं म्हणाले.

आयुष्याच्या एका वळणावर मोहन अडखळला तेव्हाही तो सरांशी बोलायला आला होता. तेव्हा सरांनी त्याला योग्य शब्दात समजावलं होतं.

मग मोहनला हवी तशी वाट मिळाली. त्या शुभांगीनं त्याची उत्तम साथ दिली.

मोहनला वसंत कानेटकरांच्या 'कस्तुरीमृग' नाटकात महत्त्वाची भूमिका होती. मोहन सरांच्या पाया पडायला आला. आशीर्वाद घेतले. त्यांना पुण्यातील पहिल्या खेळांच्या पहिल्या रांगेतील आसनाचं निमंत्रण दिलं.

प्रयोग बालगंधर्वला होता. सर प्रयोगाला आले; पण पहिल्या रांगेत बसले नाहीत, ते उठून मागे गेले आणि साधारण दहा-वीस रांगा सोडून मोकळ्या खुर्चीत बसले.

प्रयोग सुरू झाला. मोहनचे डोळे प्रयोगाच्या वेळी पहिल्या रांगेतील सरांना शोधत होते. सर त्याला दिसले नाहीत. सराईत अभिनेता असल्यामुळे त्यानं आपली निराशा चेहऱ्यावर दिसू दिली नाही; पण पहिला अंक संपल्यानंतर त्यानं आपल्या परिचितांना तसं बोलून दाखवलं, कारण त्याची भूमिका खूपच रंगली होती आणि सरांनी ती पाहून कौतुक करावं, अशी त्याची इच्छा होती. सर मागे होतेच. नाटक संपलं आणि सर रंगमंचावर गेले.

''सर, नाटक संपल्यावर आलात तुम्ही.'' मोहन काहीशा रागाने म्हणाला.

''होय बेटा. नाटक संपल्यावर आलो.''

''मग कशाला आलात ?''

''तुला सांगायला. शाबसकी द्यायला. मोहन मी मुद्दामच मागे बसलो होतो. माझ्या मोहनच्या भूमिकेबद्दल सामान्य प्रेक्षक काय म्हणतात हे मला ऐकायचं होतं. छान ऐकायला मिळालं. रोमांचित झालो. कृतार्थता वाटली. मी तर तुझं कौतुक करणारच; पण लोकांनी केलेलं कौतुक तुझ्यापर्यंत घेऊन आलोय. नाही तरी कस्तुरीमृगाचं सुगंध दूरवरूनच दरवळतो ना ?''

मोहन भारावल्या मनानं सरांच्या पाया पडला.

मोहननं फार लवकरच या जगाचा निरोप घेतला. सर कस्तुरीमृगाचा गंध अजून आठवतात.

■ ■ ■

# ६५. 'बिनमांगे मिले तो अमृतसमान'

त्याचे वडील शिक्षक होते. बेताची मिळकत. त्याला सहा भावंडे आणि एक सावत्र बहीण. मग तोही शिक्षक झाला. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड इथं. वडिलांच्या निधनानं जबाबदारी अंगावर पडली. ती त्यानं काळजीपूर्वक पेलली. श्रीकांत नाडगौडा हे त्याचे नाव. वनमाला सावत्र बहीण. दिसायला बेताची. तिच्या लग्नाची जबाबदारी होतीच. श्रीकांतचा विवाह मधल्या काळात झाला. पत्नी माहेरची शैलजा बेलसरे. तिनं श्रीकांतला मोठीच साथ दिली. सावत्र म्हणून नणंदेला कधीच वागवलं नाही. बहीणच मानलं तिला. वनमालाचं लग्न करायचं होतं. स्थळं पाहणं सुरू झालं. पुण्याच्या भावे स्कूलमधले शिक्षक डी.डी. पानसे यांच्या मुलाचं स्थळ समजलं. धनंजय त्याचं नाव. नोकरीला सैन्यात होता. नाडगौडांनी प्रस्ताव दिला आणि मुलगी बघण्याचा कार्यक्रम ठरला.

श्रीकांत नाडगौडा यांनी घराचं रंगकाम काढलं होतं. ते लांबलं म्हणून त्यांनी पानसे यांना निरोप पाठवला.

''घराचं रंगकाम काढलंय. घरात पसारा आहे. कार्यक्रम पुढं ढकलू या, नाही तर आम्हाला जरा समजून घ्या.''

पानसे यांनी निरोप पाठवला.

''आम्ही तुमचा घराचा रंग किंवा घरातील पसारा बघायला येत नाही आहोत. संकोचाचं कारण नाही. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम करा.''

नाडगौडांच्या साध्यासुध्या घरात कार्यक्रम झाला. नाडगौडांना बहिणीच्या पसंतीची आशा नव्हती; पण काय आश्चर्य...

पानसे यांनी तिथंच सांगितलं, ''मुलगी पसंत आहे...''

एक प्रश्न संपला होता; पण दुसरा मोठा प्रश्न उभा होता. हुंडा किती? श्रीकांत नाडगौडा यांनी नम्रपणे सांगितलं... ''आम्ही बेताच्या परिस्थितीतले लोक आहोत. आपण फार काही मागितलं तर मी असमर्थ आहे.''

श्री. पानसे हिंदीचे शिक्षक. ते हसून म्हणाले, ''मी चार ओळी ऐकवतो. त्या ऐका. मी पुढं काहीच सांगणार नाही.''

मग ते म्हणाले,

''सहज मिले तो दूधसमान
मूँहमाँगे तो नीरसमान,
लडके लेंगे तो खूनसमान
बिन माँगे मिले तो अमृतसमान''

या ओळी ऐकून सारेच भारावले. पुढं काही बोलावंच लागलं नाही. श्रीकांत नाडगौडा काय समजायचं ते समजले आणि लग्नाची तयारी सुरू झाली. धनंजय-वनमाला यांचा विवाह सुखरूप पार पडला. तरीही त्याआधी एक प्रश्न होताच लग्नखर्चाचा. कमीत कमी खर्च होणार होता, पण तोही श्रीकांतसारख्या हातावरचं पोट असणाऱ्या मध्यमवर्गीयाला मोठाच होता; पण नातेवाईकांनी मदत केली आणि पत्नी शैलजा यांनी तर एक दिव्य करूनच पतीच्या या कर्तव्ययात्रेत साथ दिली.

आज सारीच कुटुंबे सुखात आहेत.

जावई धनंजयरावांनी यथावकाश सैन्यातल्या नोकरीतून निवृत्ती घेतली आणि आता ते धायरीला आपला स्वतंत्र व्यवसाय सांभाळतात. त्यांचा मुलगा भूषण पानसे मुंबईत एक नामांकित वकील आहे. प्रसिद्ध अभिनेता अमीर खान याच्याही केसेस त्याच्याकडं असतात. श्रीकांत नाडगौडा यांचा मुलगा अमेरिकेत कॅलिफोर्नियामध्ये आहे. मुलगी सुस्थळी पडलेली आहे.

श्रीकांत-शैलजा जुने दिवस आठवतात तेव्हा त्यांना त्या कष्टप्रद जीवनातील सुखद आठवणींनी मोहरून येतं.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक असणारे नाडगौडा पुढं बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये प्राध्यापक झाले आणि यथावकाश त्या कॉलेजचे ते उपप्राचार्य झाले.

या प्रगतीच्या वाटा अनेक वळणांनी भरून गेलेल्या होत्या; पण त्या कष्टातही समाधानाची हिरवळ होती.

श्रीकांत नाडगौडा आता अनेक संस्थांना, व्यक्तींना उत्तमोत्तम ग्रंथांच्या भेटी देतात. आपणाला जशी चांगली माणसं भेटली आणि त्यांनी आपल्याला सुखद आश्चर्याचे धक्के दिले, तसेच ते सुखद धक्के इतरांनाही बसून त्यांच्या जीवनात सुखशांतीची शिंपण व्हावी, यासाठी अशा ग्रंथभेटीचा उपक्रम नाडगौडा करतात.

कारण त्यांना डी.डी. पानसे यांनी ऐकवलेल्या त्या चार ओळी उपनिषदासारख्या स्मरणात साठवून ठेवलेल्या आहेत आणि नाडगौडांना त्याचा असा सुखद प्रत्यय येतो की एखादी व्यक्ती त्यांना सांगते...

''सहज मिले तो दूधसमान...
बिन माँगे मिले तो अमृतसमान...''

या ओळी ऐकून आम्ही कोर्टकज्जे थांबवलेले आहेत. यापरत्वे तो आनंद कोणता ?

■ ■ ■

# ६६. मातीची अक्षरपूजा

कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमावरील करहाटक नगरी तथा कऱ्हाड ! हरिवरदाकार कृपण-दयार्णवापासून आधुनिक काळातील श्रीनिवास कुलकर्णी-दीपा गोवारीकर या साहित्यिकांपर्यंत आणि पी.डी. पाटील, पु.पा. गोखले यांच्यापासून कै. यशवंतराव चव्हाण या राजकारण्यापर्यंत कऱ्हाड शहराचा लौकिक वाढविणारी अनेक महान व्यक्तिमत्त्वे इथं झाली. कै. बाबुराव गोखले यांचे चिरंजीव विद्याधर यांनी शिक्षकीपेशाला आरंभ करून ते प्राध्यापक झाले आणि ते अचानक अर्थकारणाकडे वळले आणि कऱ्हाड बँक या ख्यातनाम बँकेचे उपाध्यक्ष झाले. कऱ्हाडमधील सर्व प्रकारच्या साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक चळवळी व संस्था यांच्याशी विद्याधर यांचा निकटचा संबंध आहे. अनेक 'व्याप' त्यांनी 'ताप' न मानता सांभाळले आहेत. साठीनंतर विद्याधर यांच्या मनात एक वेगळाच विचार आला. कऱ्हाडच्या मातीत आपण जन्मलो, वाढलो, खेळलो, रंगलो आणि जीवनाची यशस्वी वाटचाल केली.

या मातीची पूजा बांधायची. या मातीचं उत्तराई व्हायचं.

आणि त्यांचा या निश्चयाला त्यांचे सहकारी काशिनाथ धोंडो देशपांडे यांची साथ मिळाली. देशपांडेही प्रीतिसंगमाच्या प्रेमळ वातावरणात वाढलेले. वेणुताई चव्हाण कॉलेजमध्ये इतिहास व राज्यशास्त्राचे प्राध्यापक, साहित्य, संगीत कला, पर्यटन, पर्यावरण यासंबंधी त्यांनी खूप प्रासंगिक लेखन केले होते. 'आदिशक्ती' निवासी असलेल्या या काशीनाथनं मग विद्याधरच्या पूजाव्रतात सहभागी व्हायचं ठरवलं. ही पूजा काही तासा-दोन तासात संपणारी नव्हती आणि ताम्हण, निरंजन, पळी-पंचपात्र एवढीच मर्यादित सामग्री तिला पुरणारी नव्हती. कारण ही पूजा महापूजा होती, अक्षरपूजा होता.

मग हे दोघेही झपाटलेले भक्त पूजेच्या तयारीला लागले. कऱ्हाडनगरीला त्यांनी असंख्य प्रदक्षिणा घातल्या. प्रीतिसंगमाची आचमनं घेतली, अनेक जुन्या पोथ्या वाचल्या. अगदी स्कंध पुराणापासून शिलालेखांचा अभ्यास केला. या

पूजेसाठी केवळ जुनं पारंपरिक साहित्य वापरायचं असं न करता त्यांनी अत्याधुनिक उपकरण वापरायचं ठरवलं.

कै. पु.पां. गोखले हे कऱ्हाडनगरीचं भूषण! प्रतिवर्षी त्याची पुण्यतिथी कोणातरी शब्दप्रभूच्या हातून त्यांची पूजा बांधून साजरी केली जाते. विद्याधर गोखले आणि काशिनाथ देशपांडे यांनी ठरवलं की ६ डिसेंबर २००८ या बाबुराव तथा पु.पां. गोखले यांच्या स्मृतिदिनीच कऱ्हाड या आपल्या मातीची अक्षरपूजा बांधायची. काम कठीण होतं, वेळखाऊ होतं, किचकट होतं; पण एखादा भक्त सोवळं नेसून, निराहार व्रत करून एखाद्या ग्रंथाचं पारायण सलग पूर्ण करतो, तसं या दोघा भक्तांनी कऱ्हाडच्या मातीच्या निष्ठेचं सोवळं परिधान केलं. प्रेमाची धाबळी अंगावर पांघरून घेतली आणि संशोधनाची उपकरणं हाती घेऊन पूजेसाठी आरती लिहायला सुरुवात केली. चारशे एकोणीस पृष्ठांच्या या अक्षरपूजेसाठी कऱ्हाडला 'कऱ्हाड' हे नाव कसं पडलं, येथपासून एकूण १७ अध्यायांची पोथी तयार केली. मग या अध्यायात कृष्णामाईचा उत्सव दिसतो. संत सखू असते, कै. यशवंतराव चव्हाण दिसतात, कासेगावकर वैद्य असतात, डॉ. वा.रा. जोशी, डॉ. जी.एस. दातार, डॉ. एरम यांच्यासारखे धन्वंतरी असतात. या अक्षरपूजेमध्ये गोखले-देशपांडे कोणीही जिज्ञासू वाचकभक्ताला आपल्याबरोबर हाटकेश्वराच्या देवळात घेऊन जातात. आगाशिवा या डोंगरातील लेणी दाखवतात. नगरपालिकेत घेऊन जातात. ओगलेवाडीच्या काच कारखान्यातही प्रदक्षिणा घडवितात. टिळक हायस्कूलची विद्याभूमी दाखवतात आणि समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकरांची आठवण करून देतात. नकट्या रावळाच्या विहिरीत डोकावायला सांगून कै. यशवंतराव चव्हाण यांच्या सुंदर समाधीस्थळी घेऊन जातात. जाता जाता कऱ्हाड शहराशी संबंधित काही गोष्टी आणि आख्यायिकाही सांगतात. मधेच उंच मनोऱ्याचं दर्शन घ्या म्हणून सांगतात. विठाबाईच्या (यशवंतराव चव्हाण याच्या मातोश्री) ओव्याही ते या प्रदक्षिणेच्या मार्गावर आपल्याला गुणगुणून दाखवतात आणि शेवटी करहाटक नगरीचा सुंदर नकाशा प्रसाद म्हणून तळहातावर ठेवतात. गोखले-देशपांडे यांची ही अक्षरपूजा म्हणजे 'कऱ्हाड समग्रदर्शन' हा सुंदर ग्रंथ! गोखले-देशपांडे या शब्दब्रह्माच्या उपासकांनी मातीची बांधलेली पूजा वाचकभक्तांना दीर्घकाळ आनंद देणारी आहे.

■ ■ ■

# ६७. खुर्ची आणि व्यासपीठ

पुण्यातील प्रसिध्द बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचे कार्यालय ! त्यातील प्रबंधकाच्या खुर्चीवर एक सात्त्विक चेहऱ्याची व्यक्ती विराजमान. आडनाव कुलकर्णी ! अर्थातच देशस्थी कृष्णवर्ण; पण अंगभूत बुद्धिमत्ता, आध्यात्मिक विचारसरणी आणि वारकरी वाटचाल यामुळे त्या मुद्रेवर एक झळाळी ! सरळ नाक आणि ऋजुदेहबोली. मधेच प्राचार्यांचं बोलावणं येतं, कुणाचा तरी फोन येत असतो. परीक्षांची गडबड असते. कुणीतरी पालक, विद्यार्थी, प्राध्यापक अन्योन्य कामासाठी भेटत असतात. एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढणाऱ्या योद्ध्याप्रमाणे अविचल मनाने हा प्रबंधक सर्वांशी बोलत असतो. ज्याचे त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न करीत असतो. कामाच्या फाईली उरकता उरकता पुढील नियोजन करता करता दिवस कसा मावळतो ते कळत नाही. रात्रीही त्याला कधीतरी आनंदाश्रमात जायचं असतं.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी हाच प्रबंधक स्वच्छ धोतर, धुवट पैरण आणि उपरणे घेऊन आपल्या ऐतिहासिक दुचाकीवरून सदाशिव पेठेतील पुणे विद्यार्थी गृहासमोरच्या नृसिंह मंदिरात येतो. त्यांच्यासाठी पाटील आणि कंपनीच्या पांडुरंग दयानंद पाटील यांनी व्यासपीठ तयार ठेवलेले असते. सतरंज्या अंथरलेल्या असतात. ललिताबाई पटवर्धन, मालती अभ्यंकर, पुष्पा म्हैसकर, शांताबाई घोलप, मंदाकिनी कुलकर्णी, मधुवंती कुलकर्णी, सुलोचना भोसले, रजनी जोशी, श्री. वैद्य, बोकील, फडके, सुखात्मे, पाठक हे श्रोते तयार असतात. या मोजक्या श्रोत्यांसमोर हा प्रबंधक प्रवचनकार होऊन व्यासपीठावरून प्रबोधन करीत असतो. कधी दासबोध, कधी हरिपाठ, कधी भागवत यावर प्रवचने सुरू असतात.

ही दोन्ही रूपे एकाच व्यक्तीची !

डॉ. अजित कुलकर्णी यांची.

पुण्यात नवीन मराठी शाळेसमोर राहणारे अजित कुलकर्णी परिस्थितीवशात कॉलेजमध्ये कारकून म्हणून चिकटले. चिकाटीने काम करीत ते या महाविद्यालयाच्या

कार्यालयात रजिस्ट्रार (प्रबंधक) झाले. या भौतिक प्रगतीबरोबर त्यांची आध्यात्म क्षेत्रातील वाटचालही त्याच वेगाने सुरू होती. चाळीस वर्षे पंढरीची वारी, वाचन, लेखन, चिंतन, मनन यात सारा वेळ व्यतीत करणारे अजित कुलकर्णी कुशल प्रशासक आहेत. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्यावी वृत्ती असल्यामुळे आधुनिक काळात प्रशासनात अनेक संघर्षमय प्रसंग आले तरी कुलकर्णी यांनी चढ्या आवाजात बोलून कोणालाही अपशब्द वापरला नाही. त्यांचा नकारसुद्धा सौम्य आणि मृदू असतो आणि त्यांच्यावर अवचित होणाऱ्या अन्यायालासुध्दा ते प्रसाद म्हणून ओंजळीत वागवतात. याचं एक छोटंसंच उदाहरण ताजं आहे. पुण्यात फार मोठा गाजावाजा झालेले ब्राह्मण सभेचे बहुभाषिक संमेलन पार पडले. त्याच्या स्मरणिकेत डॉ. कुलकर्णी यांचा लेख आहे; पण संपादक अनुक्रमणिकेत त्यांचं नाव टाकायला विसरले. एका वाचकानं आणि त्यांच्या प्रवचनाला येणाऱ्या भक्तानं ही गोष्ट कुलकर्णी यांच्या नजरेस आणून दिली. तेव्हा कुलकर्णी हसून एवढेच म्हणाले, अंक शेवटपर्यंत वाचावा म्हणून माझं नाव टाकलं नसेल असं समजा आणि दुसरं असं की अनुक्रमणिकेत नाव नसताना लेख वाचायला मिळेल तेव्हा वाचकाला वाटेल 'अरे यांचाही लेख आहे वाटतं!' हा आश्चर्याचा धक्का आनंददायी आहे. अशा विधायक भूमिकेतून काम करणाऱ्या डॉ. अजित कुलकर्णी यांना विविध वीस संस्थांकडून गौरव व पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. गीतेच्या आधुनिक विचारावर 'श्रीमद्‌भगवद्‌गीता: एक जीवनप्रणाली' संशोधन करीत त्यांनी पुणे विद्यापीठाची पीएच.डी. मिळवली. भगवद्‌भक्तीचा वारसा लाभलेल्या घराण्यात जन्म झालेले कुलकर्णी यांना अनेक थोर संतमहात्म्यांचा सहवास लाभला. त्यांच्या घराण्याचा आणि लो. टिळकांचा घरोबा होता.

न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग शाळेत शिकत असताना गुरुवर्य द. नं. ठकारसरांनी त्यांना आळंदीच्या माऊलींचं दर्शन घडवलं आणि मूळचा वारसा असलेल्या त्यांच्या भक्तिप्रवणतेला अधिक चालना मिळाली. एकीकडे महाविद्यालयात म्हणजे विद्वत्तेच्या उच्चभ्रू क्षेत्रात वावरणाऱ्या डॉ. अजित कुलकर्णी यांना साध्यासुध्या, भावभोळ्या भाविकांसमोर व्यासपीठावर बसून प्रवचन करताना कुणी पाहिलं तर त्याच्या मनातली भावना तो व्यक्त करतो. प्रबंधकाची खुर्ची आणि प्रवचनकाराचं व्यासपीठ तेव्हा कुलकर्णी हसून म्हणतात, प्रबंधकाची खुर्ची निवृत्तीच्या नियमानुसार जाणारच असते, पण प्रवचनाचं व्यासपीठ निरंतरच आहे.

■ ■ ■

# ६८. पर्वती ते पार्लाद्वारा प्रभुपाखर

मुंबईत पार्ल्याला शान टॉकीजसमोरील विष्णुप्रसाद सोसायटीत राहणारे ॲड. विजय कर्वे गुजराथी उत्तम बोलतात, वकिली नेकीनं करतात; पण ते मूळचे पुण्याच्या पर्वतीचे. पुरंदऱ्यांच्या पर्वतीपासून पु.लं.चं पार्ला हा कर्वे यांचा प्रवास लक्षणीय आहे. कर्व्यांच्या पत्नी गुहागरच्या दातार! त्या ज्योर्तिमयी कर्वे होऊन पुण्याला कर्वे यांच्या 'प्रभुपाखर' घरात आल्या आणि त्याच सुमारास कर्वे यांनी पुणं सोडून मुंबईला वकिलीसाठी प्रस्थान ठेवण्याचा निर्णय घेतला. मग कर्वेबाई टिळक विद्यालयात शिक्षिका झाल्या आणि कोर्टात काळा कोट चढवून पक्षकारांची वकिली करणारे विजय कर्वे सकाळच्या वेळात पालेकर्स क्लासेसमध्येही शिकवू लागले.

हे धाडस करताना कधीतरी शंकेची पाल चुकचुकली. पुण्यातलं स्वतःच्या घरातलं आणि आई-वडिलांच्या भक्कम आधाराचं घर सोडून मुंबईसारख्या मायावी महानगरीत नवा खेळ मांडायचा म्हणजे धाडसच होतं; पण कर्वे यांना एक आश्वासक दिलासा होता... प्रभुपाखर!

त्यांच्या पुण्याच्या घराचं नाव होतं 'प्रभुपाखर'! पर्वतीच्या पायथ्याशीच घर असल्यामुळे पर्वतीवर जाणारे-येणारे या घराकडं कुतूहलानं बघत असत. त्या नावाशी घोटाळत असत. त्यावेळी पर्वती ते टिळक रस्ता वस्ती अशी नव्हतीच. एक दिवस प्रख्यात लेखक ना.सी. फडके आणि पत्नी कमलाबाई फडके काहीही ओळख नसताना 'प्रभुपाखर'मध्ये आले आणि त्यांनी विजय कर्वे यांना विचारलं, "हे नाव ठेवणाऱ्या कल्पक व्यक्तीला मला भेटायचंय."

"हे नाव माझ्या आईनं ठेवलं आहे."

"मी तुमच्या आईचं कौतुक करतो. 'प्रभुकृपा' वगैरे नावं पुष्कळ असतात; पण 'प्रभुपाखर' या नावात वेगळेपण आहे. पाखर म्हणजे रक्षण, प्रोटेक्शन या अर्थानं हे नाव फारच अन्वर्थक आहे."

या अर्थनिर्वचनामुळे विजय कर्वे अत्यंत समाधानी झाले आणि आता

आपल्याला 'प्रभुपाखर' आहेच, प्रोटेक्शन आहे या विश्वासानं त्यांनी मुंबई-मायानगरीत प्रवेश केला.

आणि खरोखरीच 'प्रभुपाखर' असल्याची प्रचीती कर्वे यांना येत गेली. उत्तम निष्णात वकील, उत्तम वक्ते, अभिनेते, समाजमनस्क कार्यकर्ता म्हणून त्यांना प्रसिध्दी मिळाली. लेखक, कलावंत, नेते यांचा सहवास घडला.

कौटुंबिक आघाडीवरही कर्वे यांची विजयपताका 'प्रभुपाखर'च्या छायेखाली फडकत राहिली. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी त्यांच्या विवाहाला आशीर्वाद दिला होता. चिन्मयी आणि किरण या दोन कर्तबगार मुली, दूरदर्शनवर अधिकारी असलेले जावई चंद्रकांत बर्वे आणि दुसरे अजित थत्ते आणि अभीर आणि दीप्ती ही नातवंडे अशा आनंदमय संसाराची वाटचाल त्यांना 'प्रभुपाखर' असल्याचीच जाणीव देत राहते.

कर्वे यांचे दोन्ही बंधू व त्यांचे कुटुंब पुण्यात नसतात. एक तर परदेशातच स्थायिक झालाय.

मग त्यांनी निर्णय घेतला...

'प्रभुपाखर' मोकळे राहता कामा नये. आईची स्मृती कायम राहिली पाहिजे. नव्या काळाला अनुलक्षून कॅनॉलच्या कडेला असलेल्या 'प्रभुपाखर'च्या जागी मग 'इन्ना अपार्टमेंट' तयार झाली.

आयुष्याचा पूर्ण पूर्वार्ध 'प्रभुपाखर'मध्ये घालवलेलं विजय कर्वे व त्यांच्या कुटुंबियांनी 'इन्ना' हे आईचेच नाव नव्या इमारतीला देऊन तिच्या स्मृती चिरंतन जागविल्या आहेत. कारण 'प्रभुपाखर' नावापासून आईनंच त्यांच्यावर मायेची पाखर घातली होती.

■ ■ ■

# ६९. प्रजासत्ताक दिन

पुण्याच्या सदाशिव पेठेतल्या देशमुखवाडीतले मनोहर गजानन जोशी नोकरी निमित्ताने दिल्लीला गेले आणि दिल्लीवासीच झाले. केंद्र सरकारच्या नोकरीत असलेल्या मनोहरपंतांना ३३ वर्षे राजधानी दिल्लीचा सहवास खूप घडला. पत्नी रोहिणी, मुलगा माधव आणि सून रमा यांच्यासह समाजमनस्क मनोहर जोशींचं दिल्लीतलं जीवन सुखाचं चाललं होतं. दिल्लीतील अनेक प्रजासत्ताक दिन रोहिणी-मनोहर यांनी पाहिलेले होते; पण नियतीनं या सुखधारा खंडित करण्याचा घाट घातला आणि तरुण मुलगा माधव काळानं हिरावून नेला.

त्यावेळी रमा अवघी तीन महिन्यांची बाळंतीण होती. मुलगा आनंद हाच आता तिच्या आणि कुटुंबीयांच्या जीवनाचा आनंदाधार उर होता. तरुण रमाला दुसरं लग्न करण्याविषयी उदारमनस्क सासरे मनोहरपंत यांनी खूप वेळा सांगितलं; पण रमानं दुसऱ्या लग्नाची वाट बंद केली होती.

मनोहरपंत निवृत्त झाले आणि मनोहर, रोहिणी, रमा, आनंद आपल्या मूळ गावी पुण्याला परतले. दिल्लीच्या दीर्घकाळच्या आठवणी निघतच होत्या. रोहिणीताई आपल्या तरुण मुलाच्या अकाली मृत्यूचं दुःख उरी खोलवर बाळगून होत्या; पण लहानग्या आनंदाला आता मोठा करणं हीच माधवची स्मृती जपणं, असं त्यांनी मानलं आणि पोटातलं दुःख ओठावर कधीही येऊ न देता या रोहिणीची मायेची उब आनंदला मिळू लागली.

दिल्लीवासी असल्यामुळे उत्तरेतल्या मोकळ्या-ढाकळ्या वातावरणात वावरलेल्या रोहिणीताई मूळच्या आपल्या शिस्तबद्ध सदाशिव पेठी वातावरणातही तितक्याच रममाण झाल्या...

रमाला त्यांनी सांगितलं... तू खुशाल नोकरी कर...

तुझ्या पिल्लाची सगळी जबाबदारी मी घेते...

आणि मग रमाच्या बरोबरीनं रोहिणीताई आनंदाच्या जणू आईच झाल्या. त्याची शाळा, त्याचा खाऊ, त्याचा खेळ, त्याच्या वेळा यासाठी त्यांनी

वेळापत्रकच आखलं आणि उरलेल्या वेळात त्या स्वत:चे कार्यक्रम करू लागल्या.

त्र्यंबकराव आपटे हे माजी नगरसेवक रोहिणीताईंच्या वर्गात प्राथमिक शाळेत होते. कुमठेकर रस्त्यावर आताच्या म.रा.शै.प्र.च्या जागेत त्यावेळी ट्रेनिंग कॉलेज होतं. त्याची सरावशाळाही होती. त्यावेळचे सगळे वर्गमित्र-मैत्रिणी आता त्र्यंबकराव आणि रोहिणीताई यांच्या पुढाकारानं एकत्र जमू लागली.

एकीकडे आनंदला वाढविण्याचा आनंद आणि दुसरीकडे समाजसंपर्काचा आनंद... पण...

मुलाच्या मृत्यूच्या ऊरभर दु:खानं कुठं तरी शरीरावर कोरीव काम करायला सुरुवात केली आणि रोहिणीताईंना मधुमेहाचा आजार जडला.

फिरायला जाणे, औषधं घेणे, पथ्यपाणी करणे हा सर्व गोष्टींनी त्यांनी मधुमेहावर नियंत्रण ठेवलं; पण तो रोग बागुलबुवासारखा असतो. त्यानं डोकं वर काढलं नाही तरी अस्तित्व कायम ठेवून छुपेपणानं काम करायला सुरुवात केली.

आनंद मोठा झाला. थाटामाटात मुंज झाली. आनंद एस.एस.सी. झाला. आता तो पदवीधर झाला की माझं कर्तव्य संपलं, असं रोहिणीताई म्हणू लागल्या. मनोहरपंतांचा समाज संपर्क, शाखा, संमेलने सर्व कार्यक्रम सुरू होतेच. रोहिणीताईंच्या मनात आलं यावर्षी प्रजासत्ताक दिनाला दिल्लीला जावं.

आणि नियतीनं रोहिणीताईंना जो काळ मंजूर केला तो जणू संपला...

कारण आनंद आता मोठा झाला होता... एका रात्री रक्ताची उलटी होऊन रोहिणीताईंचा अध्याय संपला... निरवानिरव झाली...

रोहिणीताईंच्या खोलीत दिवा लावला होता... त्या रात्री आनंद आपल्या आजोबांना म्हणाला... "आजोबा, तुम्ही आता तुमच्या खोलीत एकटं नाही झोपायचं. तुम्ही माझ्या खोलीत माझ्याजवळ झोपा. आता तुम्हाला मला सांभाळायचंय..." आजोबा मनातलं दु:खावेग मनातच दाबून म्हणाले... आनंद आता खरंच मोठा झाला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीच श्रध्दांजली दिन आला !

■ ■ ■

# ७०. गिडवाणीचं गणित

स्वातंत्र्यपूर्व काळात सिंध प्रांतात, आताच्या पाकिस्तानात असलेले सिंधी बांधव निर्वासित होऊन भारतात आले. सुरुवातीला निर्वासित छावण्यांमध्ये अनेकांनी दिवस काढले; पण सिंधी बांधव उद्यमशील. नोकरीपेक्षा धंद्याकडे त्यांचं लक्ष जास्त. रेल्वेच्या डब्यातून कंगवे–फण्या विकणारा आणि स्टेशनबाहेर खेळणी विकणारा कुणी गिडवाणी, मिडवाणी पुढं मोठा उद्योगपती झालेला आढळतो. कष्टाला कमी नाही. कामाला मागं नाही...

अशा एका गिडवाणीची ही गोष्ट !

तो असाच निर्वासित म्हणून आला...

कुठं मिळणार आसरा ?

पुढं काय करायचं ?...

धंद्याला भांडवल कुठलं आणायचं ? अनेक प्रश्न... पण त्याचं निरीक्षण चांगलं होतं. कल्पनाशक्ती उत्तम होती आणि त्याला चातुर्याची जोड होती.

ज्या शहरात तो आला त्याचं त्यानं बारकाईनं निरीक्षण केलं. शहराचा मध्यभाग वगळता शहराचं उपनगर खूप मोठमोठ्या नव्या वसाहती, सोसायट्या, अपार्टमेंटस्, टाऊनशिप यांनी गजबजून गेलं होतं... मग याने काय करावं...

एक हातगाडी घेतली, तीही भाड्यानं. मग रोज सकाळी एका ठोक व्यापाऱ्याकडं जाऊन दोन पोती साखर घ्यायचा, संध्याकाळी पैसे देण्याच्या बोलीवर. एक तागडी, वजनकाटा आणि वजनमापं घेतली, पिशव्या घेतल्या... आणि निघाला आरोळ्या देत... 'साखर घ्या, साखर... दाणेदार साखर...'

किरकोळ दुकानदारापेक्षा प्रत्येक किलोमागे साखर आठ आण्यांनी स्वस्त. शिवाय थेट दाराशी मिळते...

महिन्यातून एका विशिष्ट दिवशी एका विशिष्ट दिशेच्या वसाहतीतच तो जायचा, सकाळी चार तास. संध्याकाळी तीन तास...

मोठमोठ्या अपार्टमेंटमधल्या बायका चार–सहा किलो, कुणी दहा किलो

साखर घ्यायच्या...

संध्याकाळपर्यंत दोन पोती संपायची. रिकामी पोती गाडीवर घालून हा ठोक व्यापाऱ्याकडे परतायचा... आजचे पैसे देऊन दुसऱ्या दिवसासाठी नवी दोन पोती घेऊन यायचा.

बऱ्याच लोकांनी गिडवाणीला विचारलं...

"तुला साखर स्वस्त द्यायला कसं परवडतं ?"

गिडवाणी म्हणाला...

"माझं गणित वेगळं आहे. फायदा कमी झाला तरी चालेल, मालाचा उठाव जास्त असला पाहिजे. तसा तो झाला की एकूण फायदा जास्तच होतो. तुम्ही लोक पंचवीस टक्के कमिशनने विकता. मी पंधरा टक्क्यांनीच विकतो. माझं भांडवल शून्य ! हिंडणे हीच माझी भांडवली गुंतवणूक. चार किलो साखर विकून पंचवीस टक्क्यांनी वीस रुपये मिळण्यापेक्षा मी चाळीस किलो साखर विकून पंधरा टक्क्यांनीही अधिक पैसे मिळवतो. शिवाय उधारी नाही. हो... कष्ट आहेत, पण लगेच पैसा. "इस हाथसे दे और इस हाथसे ले।"

तरी सुध्दा एका व्यापारी मित्रानं त्याला विचारलं...

"अरे गिडवाणी, तरीही तुला कष्टाच्या मानानं पैसे कमी मिळतात." गिडवानी हसून म्हणाला...

"तुमची गैरसमजूत आहे..."

"ती कशी काय ?"

"माझं गणित वेगळंच आहे."

"ते कोणतं ?"

"हं बघा, सात तासांत मालाचा उठाव होऊन मला पंधरा टक्के फायदा मिळतो. उधारी नाही. शिवाय लोक माझी वाट बघतात, हे तर आहेच... पण आणखी एक गणित आहे."

"कोणतं ?"

"रिकाम्या दोन पोत्यांचे पैसे... प्रत्येकी तीस रुपयेप्रमाणे साठ रुपये हे मलाच सुटतात. तेवढे पैसे ठोक व्यापारी माझ्या खरेदीतून वजा करतो. आता सांगा... माझा तोटा होतो का ?"

गिडवाणीचं गणित बरोबर होतं. दहा वर्षांत गिडवाणीनं दुकान घेतलं. आता तो भल्या मोठ्या 'गिडवाणी आणि कंपनी' या फर्मचा मालक आहे.

■ ■ ■

# ७१. संध्येची लावणी

सोलापूरचे कविराय राम जोशी हे उत्तम शाहीर, कवी आणि तमासगीर होते. त्यांच्या जोशी घराण्याचे एक विठ्ठल मंदिर आजही सोलापुरात आहे. त्याच्या शेजारीच एक छोटंसं देवीचं मंदिर आहे. तिथं राम जोशी यांची शाक्त उपासना चालत असे. त्यांचे थोरले बंधू हे उत्तम प्रवचनकार होते. आपल्या धाकट्या भावानंही असंच उत्तम प्रवचन करावं म्हणून थोरला भाऊ धाकट्या भावाला शिकवीत असे; पण राम जोशींचं लक्ष अशा प्रकारच्या गोष्टींपेक्षा वेगळ्याच गोष्टींकडे असे. असं असलं तरी कुशाग्र बुद्धिमत्ता, उत्तम निरीक्षणशक्ती आणि प्रतिभा यांच्यामुळेच राम जोशी यांची कवने गाजली.

एकदा असं झालं... सोलापूरच्या त्या विठ्ठल मंदिरात तत्कालीन शंकराचार्य काही व्रताचरणासाठी आले होते. त्यांचा मुक्काम बरेच दिवस होता. त्यांचा शिवपरिवार आणि बराच लवाजमाही त्यांच्या समवेत होता.

शंकराचार्यांच्या लवाजम्यात एक हत्तीही होता. हा हत्ती देवळाबाहेर साखळदंडानं बांधलेला असे.

शंकराचार्यांच्या दर्शनाला येणारे लोक या हत्तीचंही दर्शन घेऊन जात. लहान मुलांना तर हत्ती ही पर्वणी होती.

शंकराचार्य रोज सकाळ-संध्याकाळ देवळामध्ये संध्या करीत असत. याशिवाय दिवसभर काही उपक्रम देवळात चालत असत.

एकीकडे देवळाच्या सभामंडपात असे आध्यात्मिक, धार्मिक कार्यक्रम चालत असत. सोलापूर गाव या कार्यक्रमांना लोटलेले असे तर देवळाशेजारीच देवीच्या मंदिरात बसलेले राम जोशी मधला छोटा दरवाजा उघडून तिथं कट्ट्यावर येऊन बसत. त्यांच्या हातात पानांची चंची असे किंवा कधी तरी ते तंबाखूची चिमूट तोंडात टाकत. वेषही ठाकठीक नसे... त्यांचे केस पिंजारलेले असत.

उच्च कुळातला हा तरुण... अशा तऱ्हेने वागतो याचं बऱ्याच लोकांना आश्चर्य वाटायचं, खेद व्हायचा. सोवळ्यातल्या शंकराचार्य परिवारातल्या

माणसांसमोर हा ओवळ्यातलं ब्राह्मण विशोभित वाटायचा.

एकदा शंकराचार्य सभामंडपात संध्येला येऊन बसल्यावर त्यांच्या शिष्यांनी या चंगीभंगी राम जोशाला बघितलं आणि काही गावकरी मंडळीनीही शंकराचार्यांना विनंती केली... ''यांना ग्रामण्य करावं. त्यांना वाळीत टाकावं.''

''एकदम अशी शिक्षा नको. त्यांच्याशी मी बोलेन. त्यांना माझी भेट शांतपणे घेण्यासाठी निरोप द्या.'' शंकराचार्य म्हणाले.

मग राम जोशी यांना सांगावा गेला.

पण कसचं काय ! निरोप पाठवताच येतील तर ते राम जोशी कसले ?

काही दिवसांनी अचानक राम जोशी आले.

शंकराचार्य सायंसंध्येला बसले होते.

संध्या सुरू झाली आणि राम जोशी आले. शंकराचार्य समोर संध्यामग्न असताना राम जोशी त्यांच्या पाठीमागं येऊन बसले. संध्या संपल्यावर शंकराचार्यांचं लक्ष गेलं. ते म्हणाले, ''आपण केव्हा आलात ?''

''आपल्या मनात आपली संध्या सुरू असतानाही आपला हत्ती आजारी आहे त्याला काय औषध द्यावे, असा विचार जेव्हा आला तेव्हा मी तुमच्यामागे येऊन बसलो.''

राम जोशींच्या या उत्तराने शंकराचार्य चकित झाले. कारण ते सत्यच होते. राम जोशी साक्षात्कारी असले पाहिजेत हे शंकराचार्यांना पटले. मग शंकराचार्य म्हणाले...

''एवढी शक्ती परमेश्वरानं आपणाला दिली आहे. मग आपण असे अस्वच्छ, असंस्कृत का वागता ? चांगले ब्राह्मण कुळातील आहात, संध्या तरी येते का आपणाला ?''

''हो, मला संध्या येते. म्हणून दाखवू ?'' राम जोशी म्हणाले.

''दाखव.''

''कशी दाखवू'' तुमच्यासारखी पळीपंचपात्री घेऊन संध्या करू की आमच्यासारखी डफझांज घेऊन करू ?''राम जोशींनी विचारलं.

''कशीही करा. संध्या करा.''

राम जोशींनी मग सूर लावला...

''केशवकरणी नारायणचरणी अद्‌भुतलीला...''

संध्येची चोवीस नावं लावणीत गुंफून लावणी म्हटली...

आणि संध्येची लावणी जन्माला आली.

■ ■ ■

# ७२. उपयोगी आणि निरुपयोगी

महात्मा गौतम बुध्द आपल्या शिष्यांना जे शिकवत असत ते केवळ पाठांतराने नव्हे तर प्रत्यक्ष प्रमाणातून आणि अनुभूतीच्या माध्यमातून. प्रत्यक्ष अनुभूतीद्वारा घेतलेलं ज्ञान हा मोठा ठेवा असतो.

एकदा असं झालं...

गौतमबुध्द आणि त्यांचा शिष्यपरिवार एका जंगलातून जाताना विश्रांतीसाठी एका झाडाखाली थांबले होते.

शिष्यमंडळी झाडाखालची जागा साफ करू लागली. पालापाचोळा, गवताच्या काड्या सगळं उचलून दूर फेकू लागले.

बुद्धांनी विचारलं... ''हे काय करीत आहात ?''

''निरुपयोगी वस्तू टाकून देत आहोत.'' शिष्यांनी सांगितलं.

गौतम बुद्ध हसले आणि म्हणाले... ''प्रिय शिष्यांनो, उपयुक्त आणि अनुपयुक्त असं या जगात काहीही नसतं. या विश्वाच्या साऱ्यातील सारेच घटक मानवी जीवनाला उपयुक्त आहेत. आता मी तुम्हाला या संदर्भात काही संशोधन करायला सांगणार आहे.''

''सांगावं महात्मन्... आम्ही तयार आहोत.'' शिष्य म्हणाले.

''आपण आता या जंगलातून जाणार आहोत. या जंगलातील कोणतीही अनुपयुक्त वनस्पती तुम्ही मला आणून द्या.''

मग सर्व शिष्यवर निघाले. त्यांनी अनेक वनस्पतींचा धांडोळा घेतला. अनेक झाडांचा अभ्यास केला.

आणि त्यांना काय आढळलं...

जे आढळलं ते सापडण्यासाठी त्यांनी दोन-तीन महिने कष्ट घेतले. कित्येक वनस्पती या औषधी होत्या. त्यांचा आयुर्वेदासाठी खूप उपयोग होता. त्यांची मुळं, खोडं, पानं, फुलं, डहाळ्या हे सर्व अवयव अत्यंत उपयुक्त होते.

मोठमोठी झाडे तर काय... त्यांचा सर्वच प्रकारे उपयोग होता. एके ठिकाणी

त्यांनी मोठी उंच सुरूची झाडं बघितली.

एका शिष्याला वाटलं...

सुरूच्या झाडाचा काहीच उपयोग नाही. फळ नाही. फूल नाही... ते अनुपयुक्त असेल...

पण दुसऱ्या शिष्यानं सांगितलं...

छे छे... सुरूचं झाडही उपयुक्त आहे. त्याचं खोड तर लाकूड म्हणून उपयोगाला येतंच; पण पानंही सुंदर असतात. शिवाय एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे...

''तो कोणता ?'' दुसऱ्या शिष्यानं विचारलं.

सुरूची झाडं नेत्रसुखाचीही असतात. हाही त्यांचा उपयोगच नाही का ? आणि मग सर्व शिष्यांनी एकत्र बसून विचार केला...

गौतम बुद्धांनी सांगितलं होतं...

''अनुपयुक्त वनस्पती आणून दाखवा.''

यांना तर एकही अनुपयुक्त वनस्पती आढळली नाही... त्या सर्व शिष्यांनी महात्मा गौतम बुध्दांना तसं सांगितलं... मग काही दिवसांनी गौतम बुद्ध आपल्या शिष्यांना म्हणाले...

''मागच्या वेळी तुम्ही अनुपयुक्त वनस्पती शोधण्याचं काम केलं. आता मला उपयुक्त वनस्पती... पण लहानात लहान... अशी आणून दाखवा.''

एक शिष्य अत्यंत चतुर होता...

तो म्हणाला, ''महात्मन्... सर्वच वनस्पती उपयुक्त आहेत.'' मग त्यानं एक गवताची काडी हातात धरली... तो म्हणाला,

''याच गवताच्या काड्यांची झोपडी होऊ शकते. याच गवताच्या काड्यांचं घरटं करून पक्षी त्यात राहतात. याच गवताच्या काड्यांच्या पेंढ्या तयार करून वैरण म्हणून जनावरांना घालतात. या एवढ्याशा गवताच्या काडीचे कितीतरी उपयोग आहेत.''

गौतम बुद्ध संतुष्ट झाले. त्यांच्या शिष्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून उपयुक्त व अनुपयुक्त याबाबतचे ज्ञान संपादन केले होते.

■ ■ ■

# ७३. 'दिव्या दिव्या चमत्कार'

पेंटर बेडेकर हे नाव पुण्याच्या फलक संस्कृतीला गेले अर्धशतक परिचित आहे. मूळच्या बेडेकरांची मुलंही आपल्या घराण्याचा वारसा उत्कृष्ट रीतीनं जपताना काळानुरूप आपला कलासंस्कृतीत बदलही करीत आहे. श्रीधर बेडेकर हे त्यातलेच.

श्रीधर आर्टस् हा त्यांचा कलाव्यवसाय पुण्याच्या रेणुकास्वरूप शाळेच्या पाठीमागच्या गल्लीत... केशवसुत दामले पथावर सुरू असतो.

पण श्रीधर नुसताच पेंटर नाही. पाट्या रंगविणे, फलक रंगवणे हे तो रोज करतो; पण त्याच्या मनाचे कल्पक रंग आणखी काही करू पाहतात आणि कधी कधी समाजाला त्यामुळे एक नवी दिशा मिळते.

पुण्याला बाजीराव रस्त्यावर नवा विष्णु चौकाच्या समोरच्या गल्लीत श्रीधर बेडेकर राहतात. हा रस्ता पुढे मंडईकडे जातो.

समाजाला वळण देणारे निरनिराळे उपक्रम निरनिराळ्या संस्था, व्यक्ती आपापल्या कुवतीप्रमाणे आणि कल्पनाशक्तीप्रमाणे चालवत असतात. आपणही असं काहीतरी केलं पाहिजे, असं श्रीधरला वाटू लागलं. गेली अनेक वर्षे दिवाळीत घराघरांवर आकाशकंदील लावलेले श्रीधर बघत होता. त्यानं एका वर्षी निरीक्षण केलं... प्रत्येक घरावरचा आकाशकंदील वेगळा, वेगळ्या आकाराचा, वेगळ्या रंगाचा, वेगळ्या प्रकारचा... ते लावलेलेही होते वेगवेगळ्या उंचीवर...

ते आकाशदिवे लावण्याची पद्धतही ज्याच्या त्याची वेगळी होती. त्यासाठी वापरलेले साहित्यही निरनिराळ्या स्वरूपाचे होते.

श्रीधरच्या कलात्मक दृष्टीला हे सर्व विशोभित वाटू लागले. रंगीबेरंगीच्या ऐवजी त्यातून नुसताच बेरंग दिसू लागला आणि एवढा मोठा खर्च करूनही, शक्ती पणाला लावूनही डोळ्यांना सुंदरता दिसावी असं फारसं काही घडत नव्हते.

मग श्रीधरच्या मनात एक वेगळीच कल्पना घोळू लागली. या संपूर्ण गल्लीत जेवढे म्हणून आकाशकंदील आहेत तेवढे सर्व एकाच आकाराचे, एकाच

प्रकारचे, एकाच उंचीवरचे असे असले तर! फार छान दिसेल ते दृश्य. पण हे होणार कसं?

इच्छा तिथं मार्ग...

सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे... परंतु तेथे पाहिजे... अधिष्ठान भगवंताचे...

श्रीधरला एक कल्पना सुचली. दिवाळीच्या कित्येक महिने आधी गुढीपाडव्यालाच त्यानं गल्लीतल्या तरुण मुलांना एकत्र केलं आणि त्यांना सांगितलं...

''यंदाच्या दिवाळीत आपण आपल्या गल्लीत एक वेगळा उपक्रम करायचा आणि इतर लोकांना दाखवून द्यायचं की आम्ही इतरांपेक्षा काहीतरी वेगळं करू शकतो...''

''काय करायचं श्रीधरदादा? तुम्ही सांगा आम्ही करू.'' मुलं म्हणाली.

''या वर्षी आपल्या आळीतील प्रत्येक घरावर एकसारख्या आकाराचे, एकाच प्रकारचे आकाशकंदील आपण लावायचे.''

''कल्पना छान आहे.'' सगळी मुलं उत्साहाने म्हणाली.

'हो, पण यासाठी जो खर्च येणार आहे तो आपणच करायचा. प्रत्येकाने आत्तापासून दरमहा या एकात्मिक आकाशकंदील योजनेसाठी प्रत्येकी १० रुपये मागे टाकायचे. कुणाकडे यासाठी पैसे मागायचे नाहीत. जे पैसे गोळा होतील त्यातून आकाशकंदील करायचे.''

''हो, आम्ही तसं करू.''

''आणि तुम्ही ही योजना चांगली यशस्वी केलीत तर मी एक ५० फुटी आकाशकंदील करून देईन आणि तो आपण आपल्या गल्लीच्या तोंडाशी उंच टांगू.''

''श्रीधरदादा... हुर्ये... हुर्ये...!'' मुलांनी टाळ्या वाजवल्या.

आणि मग त्याच वर्षीच्या दिवाळीला ती गल्ली एकाच प्रकारच्या आकाशकंदीलांनी सुशोभित झाली.

दृश्य एकदम सुंदर होतं. गल्लीच्या एका टोकाला उभं राहून नजर टाकली की सुंदर आकाशदिव्यांची रांग नजरेत भरे. शेवटी तो पन्नास फुटी आकाशदिवा...

एकतेचा सुंदर चमत्कार काय असतो ते श्रीधरनं आणि त्याच्या सवंगड्यांनी सिद्ध केलं. शेकडो लोक पाहून सुखावले... मनात म्हणत गेले, 'दिव्या दिव्या चमत्कार...'

■ ■ ■

# ७४. कोठारींचा प्रभात

'प्रभात'चे संपादक कै. वालचंद कोठारी हे कल्पक संपादक आणि यशस्वी उद्योजक होते. मराठी वृत्तपत्रांच्या मांदियाळीत त्यांनी 'प्रभात'ला एक विशिष्ट स्थान मिळवून दिले. ते स्वत: समाजमनस्क आणि कलासक्त व्यक्तिमत्त्वाचे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एक आघाडीचे नेते म्हणूनही त्यांच्या कारकिर्दीची नोंद आहे. तरुण पिढीला अचूक मार्गदर्शन करणारे व्यावसायिक हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

'प्रभात'च्या परिसरात राहणारा नारायण पेठेतला एक तरुण मुलगा नुकताच एस.एस.सी. पास झालेला. महाविद्यालयात शिक्षण घेताना परिस्थितीचे चटके खात तो विद्याभ्यास पूर्ण करीत होता. लहानपणापासून त्यालाही साहित्य, कला, वक्तृत्व, नाट्य यांची आवड होती.

हा मुलगा रोज शाळेला जाताना 'प्रभात' वरूनच जात असे. तो भावे स्कूलमध्ये शिकत होता...

कधी तरी त्याला तेथून कोट, टोपी आणि स्वच्छ धोतरातले वालचंद कोठारी बाहेर पडताना दिसत तर थोडं आत डोकावून बघितलं तर एक उंची, धिप्पाड गृहस्थ टेबलावर बसून काहीतरी लिहित आहेत ते दिसत...

हे नी.म. सिंधये...

'प्रभात'च्या संपादक मंडळात होते...

कधी तरी त्याला 'कृष्णद्वैपायन' तेथून बाहेर पडताना दिसत. याउलट आपलं शिक्षण पूर्ण करण्यासाठी काही तरी नोकरी करणं आवश्यक होतं...

आपल्याला इथल्या एखाद्या टेबलावर बसण्याची संधी मिळेल तर बरं, असा विचार त्याच्या मनात आला.

त्या वेळी संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन सुरू होतं आणि कोठारीची अनेक भाषणं त्या मुलानं ऐकली होती. मग एक दिवस तो तडक 'प्रभात'च्या कार्यालयात आला. संपादक कोठारी बसलेलेच होते...

''काय रे बाळा, काय हवंय तुला इथं ?'' त्याच्या कावऱ्याबावऱ्या नरजेकडं

बघत कोठारी म्हणाले...

"मला काही तरी काम हवंय ?" त्या मुलानं सिधयांच्या टेबलाकडं बघत सांगितलं.

"तुला काम हवंय ? दिलं, पण उद्या सकाळी लवकर ५।।-६ वाजता ये."

"येतो."

"नक्की ये. काम नक्की मिळेल." कोठारी म्हणाले.

तो मुलगा आनंदानं परत गेला. त्याच्या डोळ्यासमोर सिधयांचं टेबल होतं; पण आपल्याला सकाळी ५।।-६ ला कशाला बोलावलंय हे त्याला कळलं नाही... तो दिवस, ती रात्री त्यानं आनंदात काढली. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे तो मुलगा 'प्रभात'च्या दाराशी हजर. तिथं वितरकांसाठी 'प्रभात'चे गठ्ठे ठेवलेलेच होते. कुणी कुणी वितरक अंक घेऊन जात होते.

तिथल्या वितरणाचे काम बघणाऱ्याला हा मुलगा म्हणाला...

"मला कोठारीसाहेबांनी बोलावलंय."

"तुम्ही का ते ! हे घ्या पन्नास अंक तुम्हाला द्यायला सांगितलेत. ते ओरडून विका आणि कमिशन वजा करून पैसे आणून द्या. आता तुमच्याकडून पैसे घेऊ नका असं साहेबांनी सांगितलेय."

हे ऐकल्यावर तो मुलगा काहीसा हिरमुसला. त्याला टेबलावरचं काम हवं होतं. हे रस्त्यावरचं काम मिळालं; पण हरकत नाही म्हणून ते अंक घेऊन तो निघाला... त्याला वाटलं आपल्याकडून कोण अंक घेणार ? नेमका तो दिवस होता मुंबईला एस.एम. जोशी यांनी खवळलेल्या जनसमुदायाला अडवून एका इन्स्पेक्टरला वाचविल्याचा. सर्वच वृत्तपत्रांना त्या सकाळी खूप मागणी होती. हा मुलगा ओरडत निघाला. एक-दोन अंक विकले गेले; पण पुढं कोण घेणार ? हा काही व्यावसायिक विक्रेता नव्हता. एवढ्यात बुधवार चौकातल्या जोशी एजंटचा एक माणूस समोर आला नि म्हणाला, "आज 'प्रभात'ला खूप मागणी आहे. 'प्रभात'च्या कार्यालयातही अंक शिल्लक नाहीत. तुझ्याकडं किती अंक आहेत ? ते सर्व मला दे."

या मुलाकडं ४५ अंक होते. हे सर्व अंक त्याचं कमिशन देऊन घेतले आणि हा मुलगा हरणासारखा उड्या मारत एक तासाच्या आत सर्व अंकांचे पैसे घेऊन 'प्रभात'मध्ये आला. त्याच्या खिशात ५० अंकांचं कमिशन घडलं. कोठारी हसून म्हणाले, "बघ दिलं ना काम तुला ?"

कोठारींनी घालून दिलेला श्रमप्रतिष्ठेचा धडा त्याला उपयोगी ठरला.

■ ■ ■

# ७५. जेथ जेथ संपत्ती आणि दया...

कीर्तन संजीवनी श्रीमती पुष्पलता रानडे हे कीर्तन-कला क्षेत्रातील आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व आहे. हैदराबादची लेले पुण्याची पुष्पलता रानडे झाली आणि या पुण्यभूमीत तिनं आपल्या पुण्यकार्याचा मोठा ठसा उमटविला. त्यांचे पती राजाभाऊ रानडे आणि सौ. पुष्पलता म्हणजे लक्ष्मी-नारायणाचा जोडा. या जोड्याकडे लक्ष्मीही होती; पण या लक्ष्मीनारायणांनी समाजसेवेच्या रूपाने लक्ष्मीची उपासना केली.

पुष्पलताबाईंची अनेक कीर्तनं पुण्यातल्याच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक गावच्या देवळातून आणि सांस्कृतिक संस्थांमधून झाली आहेत. गुंडाचा गणपती या मंदिरात त्यांची कीर्तनं सुरू होती. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन या ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वाच्या मातेनं गुंडाच्या गणपतीला पुत्रप्राप्तीसाठी नवस केला होता आणि त्या मातेला अण्णासाहेबांच्या रूपानं प्रसाद मिळाला होता.

या पवित्र व प्रासादिक ठिकाणी पुष्पलताबाईची कीर्तनं सुरू होती. त्यांची कीर्तनं ऐकायला शेकडो लोक येत असत. निरनिराळ्या वयाचे स्त्री-पुरुष पुष्पलताबाईंची कीर्तनं ऐकून तृप्त होतं.

एक साधीभोळी दिसणारी; मराठमोळी स्त्री भाविकपणे त्यांची कीर्तनं या देवळात ऐकत असे. पहिल्याच दिवशी पुष्पलताबाईंनी या स्त्रीच्या मुद्रेवरील भाविक भाव ओळखले होते.

दुसऱ्या दिवशी या बाई पुष्पलताबाईंच्या आधी देवळात हजर. या बाई वरून स्वस्थचित्त दिसत असल्या तरी त्यांच्या मुद्रेवर खोल कुठं तरी वेदनेची आणि दुःखाची सल होती, हे संतकाव्याचा सखोल अभ्यास केलेल्या पुष्पलताबाईंनी जाणलं.

आणि कीर्तन संपल्यानंतर त्या बाई जेव्हा दर्शनाला आल्या तेव्हा पुष्पलताबाईंनी त्यांच्या पाठीवर हात ठेवून थोडंसं थोपटलं.

बांध फुटला...

आणि त्या बाईंनी अभावितपणे आपली व्यथा सांगितली.

बाईंचे पती ड्रायव्हर होते. ते नोकरी करीत होते. दोन मुली आणि तीन

मुलगे असा प्रपंच. ज्यांच्याकडं ड्रायव्हरची नोकरी होती, त्या मालकांचं निधन झालं. नोकरी सुटली. खाणारी तोंडं सात, मिळवणारा हात एकही नाही. संसाराचा गाडा ओढायचा कसा...

त्यांची ही करुण कहाणी ऐकून पुष्पलताबाइही मनोमनी गहिवरल्या आणि मग त्यांना एक कल्पना सुचली.

प्रत्येक हरिदास सामान्यपणे कीर्तनाच्यावेळी आपली दैवतमूर्ती स्वतंत्र आसन घालून ठेवतात, त्यासमोर छोटी दानपेटी असते. दोन्ही बाजूला दोन तबक असतात. कीर्तनाच्या मध्यंतरात दानपेटी फिरवली जाते. कीर्तन संपल्यानंतर दोन तबकामध्ये धान्य, फळे, नाणी इत्यादी दान मिळते. या बाई या सगळ्या गोष्टींची व्यवस्था करीत.

पुष्पलताबाई या बाईंना म्हणाल्या,

''लक्ष्मीबाई, ज्या कीर्तनकारांचा प्रपंच एवढ्यावरच असतो त्यांना या गोष्टींची आवश्यकताच असते. माझं काही तसं नाही. तुम्ही अडचणीत आहात. आजपासून ताटात जे धान्य जमेल ते घरी देऊन साठवा, फळंही घरी न्या. आरतीचे पैसेही घरी न्या. तुमच्या प्रपंचाच्या कारणी ते लावा.''

त्यानंतर कोणत्याही मंदिरात पुष्पलाताबाईंचे कीर्तन असलं तरी लक्ष्मीबाई येत आणि कीर्तनसेवेची सर्व जबाबदारी स्वीकारून, व्यवस्था लावून त्या आरती घेऊन जात.

रोजच्या आरतीतल्या पैशातून आपल्या कच्च्याबच्च्यांना त्या दूध आणि पाव आणत. सकाळची भुकेची वेळ भागत असते.

जमलेलं धान्य एकत्र करून शिजवत. त्यांचा स्वयंपाक होत असे. उरलेल्या किरकोळ पैशातून भाजी आणत.

सकाळी दूध-पाव.

संध्याकाळी एकदाच भरपेट जेवण..

असा दिनक्रम आरतीवर चालला होता.

अधूनमधून पुष्पलताबाई त्यांना कपडे देत.

दिवस पालटले. ड्रायव्हर यजमानांचं निधन झालं. मुलं मोठी झाली. कामाला लागली तरी लक्ष्मीबाईंनी पुष्पलताबाईंची साथ सोडली नाही. त्यांनी अनेक वर्षे त्यांची कीर्तनसेवा केली. पुष्पलताबाई स्वत: सांपत्तिक सुस्थितीत होत्या. आहेत; पण त्यांचा हात देता आहे. त्यांची ही वृत्ती पाहून त्यांचीच एक मैत्रीण त्यांना म्हणाली, ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगते- जेथे जेथ संपत्ती आणि दया। दोन्ही वसती आलिया ठाया। ते ते जाण धनंजया। विभूती माझी।

■ ■ ■

# ७६. ठेविले सोवळे घालुनी घडी

खानापूर तालुक्यातलं आसद गाव ! तिथं कऱ्हाडजवळच्या रेठरे हरणाक्षचा एक तरुण आला होता. त्याला तालमीचा नाद होता. पंचक्रोशीतील कुस्त्यांच्या फडात तो चमकायचा. कोल्हापूरच्या फडात त्यानं एका झटक्यात प्रतिस्पर्ध्याला आसमान दाखवलं होतं. छत्रपती शाहूमहाराजांच्या हस्ते त्याला दोनशे रुपयांचं बक्षीस मिळालं होतं. तो प्रकृतीनं इतका बलंदड होता की १२० शेर वजनाची दगडी गुंड तो लीलया उचलून खांद्यावर घ्यायचा...

पण हा पैलवान... कुस्तीच्या फडात जसा रंगेल होता, तसा तमाशाच्या फडातही रंगेल होता.

छत्रपतींच्या हस्ते मिळालेल्या दोनशे रुपयांच्या बक्षिसातून त्यानं तमाशाचा फड उभा केला.

या फडकऱ्याचं नाव होतं पठ्ठे बापूराव !

११ नोव्हेंबर १८६८ रोजी रेठरे हरणाक्ष येथील वतनदार कुलकर्णी घराण्यात बापूचा जन्म झाला. वडील कृष्णराव, आई राधा ! मुलाचं नाव ठेवलं श्रीधर ! तोच बापू. चुणचुणीत, गोरागोरा हा बापू गोड गळा घेऊन गायचा. खड्या आवाजातली त्यांची गाणी शाळेत आवडायची.

पुढच्या शिक्षणासाठी औंधच्या महाराजांनी आणि राणीसरकारांनी त्याला आश्रय दिला. बडोदा, लखनौ इथं पाठवलं.

घरच घडी विस्कटली म्हणून बापू परत रेठऱ्याला येऊन घरचे जोशीपणाचे आणि जोडीला कुलकर्णीपणाचेही काम पाहू लागला.

पण या किचकट कोरड्या कामाचा बापूला कंटाळा येऊ लागला. गावकुसाबाहेरच्या जगात कडे ढोलकीचे सूर त्याला साद घालीत होते. ब्राह्मणाचा मुलगा तमासगीरांच्या नादी लागतो म्हणून कुजबुज वाढू लागली होती. सुरुवातीला शास्त्रशुद्ध कवने करणारा बापू मग लावण्या आणि वग लिहू लागला.

चुलते हरिपंत यांच्या कानावर ही गोष्ट गेली, त्यांना फार वाईट वाटलं.

गावातली सनातनी मंडळी आता हरिपंतांबद्दलही काहीबाही बोलू लागली होती. बापू तलाठ्याचं काम करीत होता; पण रात्री तमाशाची जागरणं करीतच होता... एकदा तर कमाल झाली...

रात्रभर जागरण करून आलेला बापू सकाळी तलाठीकामाचा एक दस्तऐवज लिहायला बसला. कामाच्या बाबतीतल्या काही ओळी लिहून झाल्या. तो कागद समोर तसाच फडफडत होता.

बापूच्या डोळ्यासमोर रात्रीच्या तमाशातली सुंदरा होती. मग अभावितपणे त्यानं त्याचं कागदावर लिहिलं...

तीळ शोभे गोरा गाल
तुझी नथनी झुबकेदार...

आणि मग ती संपूर्ण लावणी त्या दस्ताऐवजाच्या कागदावरच लिहिली. तोच दस्ताऐवज तालुका मामलेदारामार्फत साताऱ्याला कलेक्टरांकडं पाठविण्यात आला. कलेक्टर होते इंग्रज साहेब. त्यांना थोडंसं मराठी येत होतं, त्यांनी वाचलं...

तलाठी कामाच्या दस्ताऐवजावर ही लावणी होती...

मग कलेक्टरसाहेबांनी बापूला बोलावून घेतलं...

त्यांनी विचारलं, ''हे तुम्ही काय लिहिलं आहे ?''

''काय आहे ?'' बापूंनी आश्चर्यानं विचारलं...

''व्हॉट डु यू मीन... तीळ शोभे गोरा गाल.''

''बापू एकम ओशाळला... पण इंग्रज साहेब चांगलाच ओरडला. सरकारी कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल त्यानं बापूची कानउघाडणी केली. नोकरीवरून काढून टाकीन असा दम भरला.

स्वाभिमानी बापूला हे शब्द झोंबले.

त्यानं तत्काळ स्वत:च कुलकर्णीपदाचा राजीनामा दिला.

आणि आता तर पक्षी पिंजऱ्यातून निसटला होता.

रान मोकळं झालं होतं.

बापूनं उघडउघड तमाशाची वाट धरली.

अनेक तमासगीर, अनेक फडकरी आवतण देऊ लागले. बापूच्या शब्दांवर घुंगरू नाचू लागले.

सनातनी लोकांनी बापूला वाळीत टाकायचं ठरवलं. हरिपंतांची अवस्था मोठी बिकट झाली होती. केव्हातरी बापूला चांगला खडसावून संपूर्ण गावासमोर

त्याची हजेरी घेण्याचं ठरवलं. बापूनं डफावर थाप मारली आणि तो गरजला...

श्रेष्ठवर्ण मी ब्राह्मण असुनी।
ठेविले सोवळे घालुनी घडी।
मशाल धरिली हाती तमाशाची।
लाज लावली देशोधडी।।

लोक अवाक् झाले. पट्ठे बापूराव ख्यातकीर्त झाले.

■ ■ ■

# ७७. अंधाराचे डोळे

नागनाथ पाराजवळ पुण्याला प्रसिद्ध 'आनंद' मासिकाचं कार्यालय होतं. कै. गोपीनाथ तळवलकर आणि त्यांच्या निमित्तानं अनेक लेखकांची वर्दळ या आवारात असे; पण स्कुटरचा जमाना आला आणि या आवारात एक स्कुटरला दवाखाना अशोक पटवर्धनांनी उघडला. पटवर्धनांचं गॅरेज हे अनेकांच्या विश्वासाचं ठिकाण होतं. आपलं गॅरेजचं काम संपलं की अशोक पटवर्धन आपले मित्र प्रख्यात नेत्रतज्ज्ञ सुधीर काळे यांचेकडे जात आणि मग गंमत अशी घडली की गॅरेजचे स्क्रू-पान्हा-हातोडा या हत्यारांबरोबरच डोळ्यांची तपासणी आणि डोळ्यांची निगा या विषयाचा नाद पटवर्धनांना लागला.

पटवर्धन स्वत: यंत्रांचे डॉक्टर आहेत. ते काही डोळ्यांचे डॉक्टर नाहीत; पण वर्षानुवर्षे डोळ्यांच्या डॉक्टरांबरोबर काम करून त्यांना 'डोळे' या विषयाविषयी नवी दृष्टी प्राप्त झाली आणि मग एक नवलच घडलं.

पटवर्धनांनी गॅरेज बंद करून टाकलं.

आणि चक्क ऑप्टिशियनचा व्यवसाय सुरू केला.

डोळ्यांचे डॉक्टर नसले तरी अनेक वर्षांच्या सहवासामुळं, सवयींमुळं 'डोळे' या विषयीची बरीच माहिती पटवर्धनांना झाली.

डोळ्यांचे नंबर काढणे, चष्मे तयार करून देणे ही काम तर ते एक व्यावसायिक म्हणून करीत होतेच; पण 'डोळा' हा शरीराचा अत्यंत नाजुक आणि महत्त्वाचा अवयव असल्यामुळं त्याबाबत खूप जनजागृती व्हायला पाहिजे, असं पटवर्धनांना वाटलं.

त्याला कारण घडलं तो एक विलक्षण प्रसंग.

पुण्याच्या एका प्रख्यात प्राथमिक शाळेच्या एक मुख्याध्यापिका पटवर्धन यांच्या चांगल्या परिचयाच्या होत्या. त्यांच्याकडे पटवर्धनांचं जाणं-येणं होतं. एक दिवस लिमयेबाईंनी-मुख्याध्यापकांनी-एक विलक्षण हकीगत पटवर्धनांना सांगितली...

शाळेतील एक नऊ-दहा वर्षांची मुलगी. तिचा चष्म्यांचा नंबर खूप होता. हा नंबर कमी करावा म्हणून मुलीच्या आई-वडिलांनी काही डॉक्टरांना तिचे

डोळे दाखवले होते. काहींनी जुजबी उपचार केले होते; पण एक वैद्य डॉक्टरानं एक वेगळाच उपाय सांगितला...

एक वर्षभर या मुलीला अंधाऱ्या खोलीत ठेवायचं. खोली हवेशीर असेल; पण तिथं अंधार असेल. मग हे वैद्यराज तिच्यावर उपचारही करणार होते. मग डोळ्यांचा नंबर कमी होणार होता. मुलीची आई एक वर्षाची रजा मुलीसाठी मागण्यासाठी लिमयेबाईंकडं आली होती. लिमयेबाईही आश्चर्यचकित झाल्या.

एक वर्ष अंधारात राहणाऱ्या त्या मुलीची दृष्टी सुधारली असती किंवा नसती; पण तिच्या मनाची अवस्था किती केविलवाणी झाली असती, याचा विचार कुणीच केला नव्हता...

मग लिमयेबाईंनी त्या बाईंना – मुलीच्या आईला – ''पटवर्धनांकडं पाठवलं आणि पटवर्धनांनी शांतपणे त्या मुलीच्या आईची समजूत काढली. ''बाई, अशा उपायांनी चष्म्याचा नंबर कमी होत नसतो.''

''पण त्या डॉक्टरांनी तसं सांगितलंय.''

''त्यांना एकच प्रश्न विचारा.''

''कोणता ?''

''एखादा मनुष्य वर्षभर नुसता एका जागेवर बसून राहिला तर त्याची उंची कमी होईल काय ? मग अंधारात बसून डोळ्यांचा नंबर कमी कसा होईल ? मुलीच्या आईची समजूत पटली आणि मुलीवरचं अंधारं संकट टळलं

या प्रसंगावरून पटवर्धनांच्या लक्षात असं आलं की डोळे या विषयासंबंधी सर्वसामान्य माणसांमध्ये खूपच जागृती होणे आवश्यक आहे. ही जागृती निर्माण करणारा कुणी डॉक्टरच असला पाहिजे असं नाही. त्याचा डोळ्यांचा अभ्यास असला पाहिजे म्हणजे झालं...

मग पटवर्धनांनी सखोल अभ्यास करून योजनापूर्वक एक स्लाइड शो तयार केला. त्याची कॉमेंट्री तीन भाषात तयार तयार केली. ज्येष्ठ नागरिक संघ, शाळा, मंडळे या ठिकाणी अशोक पटवर्धन आपलं हे स्लाइड शो करतात.

या स्लाइड शोचं नाव दिलं आहे – 'आपले डोळे !'

आत्तापर्यंत पटवर्धनांनी असे सहाशे स्लाइड शो केले आहेत आणि डोळ्यांविषयी डोळसांनाही नवी दृष्टी देण्याचं कार्य ते करीत असतात. गॅरेजमध्ये यंत्राशी खुडबुड करणारा एक तांत्रिक आता लोकांच्या दृष्टीची काळजी घेतो, हे विलक्षण नव्हे काय ?

अंधारालाही डोळे देण्याचं, अज्ञानांधकार घालविण्याचं काम पटवर्धन करीत आहेत.

■ ■ ■

# ७८. गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी

१९३२ साली गोडबोले स्वत: अगदी तरुण होते. तेव्हाच त्यांनी तिला बघितलं आणि ते तिला घेऊन आले. ठेंगणी-ठुसकी पण डौलदार, हलकी-फुलकी पण लडिवाळ अशी ती गोडबोल्यांना फारच आवडली.ती जर्मन... मेड इन जर्मनी... जर्मन लोकांचं एक वैशिष्ट्य असं की जगाच्या पाठीवर कुठंही जायचं झालं तरी स्वत:ची 'छाप' ठेवून प्रतिष्ठेनं राहायचं. शिवाय जर्मन लोकांना भारतीय संस्कृतीबद्दल विशेष प्रेम. त्यामुळं गोडबोल्यांनी तिला आणण्याचं ठरवताच ती खुशीनं आली आणि मेड-इन-जर्मनी असलेली अशी ती चक्क पुण्याच्या सदाशिव पेठेत, चिमण्या गणपतीच्या रस्त्याला असलेल्या गोडबोले वाड्यात तिनं गृहप्रवेश केला.

तसं तिनं भारतात पहिलं पाऊल ठेवलं ते मुंबई बंदरात; पण मुंबईचं गजबजाटाचं बाजारी जीवन तिला फारसं आवडलं नाही. पुण्यात यायला तिला फारच आवडलं. गोडबोल्यांना ती आवडली कारण वर्णानं ती सतेज गोरी होतीच; पण बांधा प्रमाणबद्ध असून, तिचे सर्व अवयव नाजुक आणि रेखीव होते.

गोडबोल्यांनी तिला आणलं तेव्हापासून ते शेवटपर्यंत त्यांनी तिच्यावर जिवापाड प्रेम केलं. गोडबोले यांनी तिची इतकी काळजी घेतली की तिचे वजन तोळामाशानेच काय; पण शेपन्नास मिलिग्रॅमनीसुद्धा कमी होणार नाही, याची काळजी घेतली आणि याचा पुरावा म्हणजे या जर्मन प्रेयसीला १९३२ पासून पन्नास वर्षे प्रकृती बिघडली म्हणून कोणत्याही डॉक्टरांकडं जावं लागलं नाही.

या जर्मन प्रेयसीचे लाड गोडबोल्यांनी खूप केले. तिचे मूळचे अंगावरचे दागिने म्हणजे साखळ्या, एक लांबट काट्यासारखी पिन आणि ब्रूच! पण गोडबोले यांचा सराफीचाच व्यवसाय असल्यामुळे त्यांनी आपल्या या जर्मन प्रेयसीला तऱ्हेतऱ्हेच्या असंख्य सुवर्णालंकरांनी मढवून टाकले होते. दागिन्यांची एखादी नवीन तऱ्हा निघाली की प्रथम या जर्मन तऱ्हेतऱ्हेच्या असंख्य सुवर्णालंकरांनी मढवून प्रेयसीच्या अंगावर दिसायची आणि मग इतरांच्या.

भारतीय परंपरेप्रमाणे गोडबोले यांनी या प्रेयसीला आपलं केलं तरी केवळ उंबऱ्याच्या आतली गृहलक्ष्मी न मानता तिला तिच्या माहेरच्या जर्मन- पाश्चात्य रिवाजाप्रमाणे व्यवसायातही फार मानाचे स्थान दिले. एखादी जहांबाज बाई आपल्या गरीब नवऱ्याला ज्याप्रमाणे बोटाच्या इशाऱ्यावर नाचवते त्याप्रमाणे या जर्मन प्रेयसीनेही केले. एखादे सरळ हलते बोट नाकाच्यासमोर स्थिर करून 'हेच बरोबर' असे ही जर्मन प्रेयसी सांगायची तेव्हा गोडबोले आणि या प्रेयसीचा सल्ला घ्यायला आलेले लोक तिचा निर्णय मुकाट्याने मान्य करीत.

गोडबोले यांनी आपल्या जर्मन प्रेयसीच्या सर्व आवडीनिवडी आस्थेवाईकपणे पुरवल्या. तिचे कोडकौतुक केले...

गोडबोले यांचा सराफीचा व्यवसाय. त्यांचे इतर समव्यवसायी देशी, भारतीय पद्धतीची बैठकच पसंत करीत; पण ही प्रेयसी परदेशी! गोडबोले यांनी हिच्याकरिता खास टेबल-खुर्च्यांची मांडणी केली होती. हिला स्वच्छतेची खूप आवड. धुळीचा तर तिटकारा. म्हणून त्यांनी खास हिच्यासाठी काचेचं मखरच तयार केलं होतं. पाश्चात्य स्त्रियांना फुलांची विशेष आवड. मग दसरा-पाडवा या सणांना गोडबोले आपल्या प्रेयसीला फुलमाळांनी नटवीत. हिच्या नाजुक प्रवृत्तीला वारा मुळीच सहन होत नाही, म्हणून गोडबोले यांनी कामाच्या जागी पंखा बसवलाच नाही. स्वत:ला उकाडा सहन करावा लागला तरी चालेल पण प्रेयसीला त्रास नको, असे त्यांचे धोरण होते. ही जर्मन प्रेयसी तशी स्त्रीस्वभावाप्रमाणे संशयग्रस्त होती. गोडबोले यांच्या सराफी व्यवसायामुळे त्यांच्याभोवती कायम स्त्री ग्राहकांची गर्दी असायची. मग या जर्मन प्रेयसीनंही कायमचा तळ तिथंच ठोकला. मग पुढं कितीही बायका आल्या तरी गोडबोले यांची आपल्या प्रेयसीवरील दृष्टी क्षणभरानंही विचलित झाली नाही.

अखेर एक विलक्षण कायदा आला. सुवर्णनियंत्रण कायदा हे त्याचं नाव. या कायद्यात यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावरच घाला आला आणि नाइलाजानं गोडबोले यांना आपल्या या प्रेयसीचा विरह सहन करावा लागला.

तीस-पस्तीस वर्षे सुखानं गोडबोले यांच्याबरोबर राहिलेली त्यांची ती जर्मन प्रेयसी म्हणजे एक सुंदर वस्तू होती. जर्मन बनावटीचा तो एक सुंदर नाजुक तराजू होता. ती मेड-इन जर्मनी वस्तू म्हणजेच गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी!

■ ■ ■

# ७९. एक आण्याचा एक रुपया

एका महानगरी रेल्वेचा लांब पल्ल्यांचा प्रवास सुरू होता. निरनिराळ्या स्टेशनवरून गाडी पुढे गेली की निरनिराळे विक्रेते आपापला माल विकण्यासाठी डब्यांतून हिंडत होते. भेळवाले, पेरुवाले, केळीवाले, कंगवे-फण्या विकणारे, असे कितीतरी...

कुणी त्यांच्याकडून काही घेत होते तर बरेचसे घेतही नव्हते. गाडीनं बऱ्हाणपूर स्टेशन सोडलं आणि गाडी भुसावळच्या दिशेनं वेगान पुढं जाऊ लागली.

खानदेशात केळीचा व्यापार मोठा त्यामुळे भुसावळच्या आसपास अलीकडं-पलीकडं केळी विकणारे बरेच विक्रेते गाडीत हिंडत असतात.

एक चुणचुणीत तरुण मुलगा डोईवर भलीमोठी केळींची पाटी घेऊन डब्यात शिरला.

आधी बरेच केळीवाले डब्यातून येऊन गेल्यामुळं याच्याकडून केळी कुणी घेईनात. त्यानं आर्जवानं एक तरी केळ घ्या. असं कुणाला म्हटलं की त्याला हुडुत करून पुढं हाकलत असत.

सगळे डबे हिंडला.

फर्स्ट क्लासच्या डब्यातसुध्दा त्याची निराशा झाली.

तो आता अगदी टेकीस आला होता. कारण या विक्रीतूनच त्याला घरी पैसे घेऊन जायचे होते. मगच चूल पेटणार होती.

ओरडून ओरडून घसा दुखला; पण दुर्दैवानं कुणी त्याच्याकडून केळी घेतली नाहीत. वेळ संध्याकाळची होती. सूर्य अस्ताला चाललेला होता. भुसावळ अजून दहा-पंधरा किलोमीटर होतं. बऱ्हाणपूर तर खूप मागं राहिलं होतं.

गाडीचा वेग कमी झाला... आणि गाडी आडरानात थांबली.

बरेच पॅसेंजर्स खाली उतरले, तेव्हाही त्यानं केळी घेण्याची विनंती केली;

पण दुर्दैवानं एकही हरीचा लाल भेटला नाही. त्यानं भाव उतरवून एक आण्याला एक केळं देऊ केलं तरीही त्याच्याकडं कुणी लक्ष दिलं नाही.

'भुसावळला यापेक्षा स्वस्त मिळतील केळी,' कुणीतरी म्हणालं.

गाडी आत्ता सुटेल, मग सुटेल अशी वाट लोक बघत होते. अर्धा तास झाला. गाडी हलण्याची चिन्हे दिसेनात.

पॅसेंजर मंडळींनी स्वत:जवळचे खाद्यपदार्थ फस्त केले. गाडीच्या पॅंट्रिकारमधलेही सर्व पदार्थ संपले. गाडी सुटण्याची अजूनही चिन्हं नव्हती. मग कुणीतरी पॅसेंजरनं चालत जाऊन ड्राव्हरला गाठलं... आता अंधार पडला होता. भुकेची वेळ झाली होती. बरेच लोक भुसावळला जेवण घेणार होते. लहान मुलं भोकाड पसरू लागली होती. मोठ्या माणसांच्याही पोटात कावळे ओरडू लागले होते.

आता रात्रीचे साडेआठ वाजले. गाडी अजूनही चार तास इथून हलणं शक्य नाही, अशी बातमी कुणीतरी आणली. भुसावळच्या अलीकडं अपघात झाल्यामुळं लाइन क्लिअर मिळणार नव्हती. मग मात्र लोकांच्या डोळ्यात प्राण आले. खाणं नाही, जेवण नाही, पाणी नाही... रात्रीच्या एक वाजेपर्यंत काही सांगता येणार नव्हतं. सर्व विक्रेत्यांकडचे सर्व पदार्थ संपले. अगदी बिस्किटांचे पुडेही संपले होते.

फर्स्टक्लासच्या डब्यातून आवाज आला...

अरे तो केळीवाला कुठं आहे, बोलवा त्याला.

मग लोकांनीच त्याला हुडकला. मघाशी ज्यांनी त्याचा तिरस्कार केला होता, तेच आता बोलावू लागले. लोकांनी त्याला घेराव घातला. अरे मला पाच केळी दे, मला दहा दे... मला दोन दे... साहेब एक रुपयाला एक केळ पडेल...

असू दे. दे लवकर.

गरजेनं वस्तूची किंमत वाढते. तसंच झालं. त्याची पाच डझन केळी खपली. साठ रुपये त्यानं खिशात टाकले आणि आनंदाने तो रूळ ओलांडून गेला. अर्ध्या तासात गाडी सुटली; पण त्याचं काम झालं होतं. एक आण्याचा एक रुपया त्याला नियतीनं दिला होता.

■ ■ ■

# ८०. चिलटं आणि चित्रकला

काही वर्षांपूर्वी मराठवाड्यात घडलेली ही गोष्ट! औरंगाबादपासून साठ किलोमीटर अंतरावर शिरूर नावाचं गाव. छोटं गाव. गावात एक दर्गा. दर्ग्याशेजारीच एक चिंचेचं झाड. शेकडो लोक नेहमीच तिथून ये-जा करीत असत. एक दिवस मोठा चमत्कार घडला. चिंचेच्या झाडाच्या शेंड्यापासून धूर निघू लागला.

एका गावकऱ्यानं ते बघितलं. त्यानं दुसऱ्याला सांगितलं. थोडा वेळ धूर यायचा. मग बंद व्हायचा. रोज सायंकाळी थोडा वेळ शेंड्यापासून असा धूर येत राहिला. गावकरी हा दैवी चमत्कार बघायला रोज तिथं जमू लागले. हजारो भाविक आसपासच्या गावातून हा 'धूर चमत्कार' बघायला येऊ लागले.

या चमत्कारानिमित्त दर्ग्यात एक मोठा उत्सव करून जत्रा भरविण्याचंही गावकऱ्यांनी ठरवलं. मराठवाडा वृत्तपत्रात यासंबंधी रोज ठळक बातम्या येऊ लागल्या.

याबाबत सत्य जाणून घेतलं पाहिजे, असं काही लोकांना वाटलं. मराठवाडा दैनिकात दररोजच्या अंकाचं पोस्टिंग करणारा एक काळसर, हडकुळा तरुण मुलगा होता. त्याचं नाव नंदकुमार जोगदंड. नंदकुमार कधी कधी हौसेनं बातम्या आणण्यासाठीही जात असे.

मराठवाडा दैनिकाच्यावतीनं या बातमीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी विजय दिवाण जाणार होते. त्यांनी नंदकुमार जोगदंडला आपल्याबरोबर येण्यास सांगितलं. नंदकुमार एक पायावर तयार झाला.

शिरूरच्या दर्ग्यात जाऊन दुपारच्या वेळी या दोघांनी दर्गा कमिटीच्या लोकांशी चर्चा केली. मग शिरूर गावच्या सरपंचांशीही चर्चा केली. तोपर्यंत संध्याकाळ झाली. सहा वाजत आले होते. रोज साधारण याचवेळी धूर निघायला सुरुवात व्हायची.

आजूबाजूला शेकडो लोक जमा झाले होते.

विजय दिवाण आणि नंदकुमार जोगदंड हे दृश्य बघण्यासाठी आतुरतेनं उभे होते. सर्वांच्या नजरा त्या झाडाच्या उंच शेंड्याकडं स्थिरावल्या होत्या. आणि

काय आश्चर्य !

झाडाच्या शेंड्यातून काळी रेषा उमटली... आणि पुढं धुराचा लोटही आला... लोक अनिमिष नेत्रांनी बघत होते.

दिवाण आणि जोगदंड यांनीही एकमेकांकडं पाहिलं. दर्गा कमिटीचे लोकही काहीशा विजयी नजरेनं बघत होते. एवढ्यात नंदकुमार जोगदंड म्हणाला,

"सर, हा धूरंबीर काही नाय बरं का."

"मग काय आहे ?"

"एवढा धूर निघतोय; पण धुराचा वास आहे का ?"

"नाही."

"तेच म्हणतो मी. धुराचा वासही यायला हवा. तसा येत नाही."

"हो. खरं आहे तुझे म्हणणं; पण मग... या धुराचा अर्थ..."

"सांगतो मी..." असं म्हणून नंदकुमारनं एका गावकऱ्याला थोडं गोडेतेल आणायला सांगितलं. एकाला एक बांबू आणि कागद आणायला सांगितलं. गोडेतेल फासलेला चिंब कागद बांबूच्या टोकाला बांधला आणि नंदकुमार तो बांबू घेऊन सरसर झाडावर चढला. लोक हे दृश्य बघत होते. बांबूला लावलेला तेलकट कागद त्यानं धुरात ठेवला. शेंड्याच्या आजूबाजूनं फिरवला. आता धूर कमी झाला होता. नंदकुमार खाली आला होता. तो बांबू आता काळा झाला होता.

त्यानं जमलेल्या लोकांना दाखवलं.

"हा बघा कागद. काळा झाला आहे; पण निरखून बघा..."

लोकांनी बघितलं. तेलकट कागद काळा झाला होता. म्हणजे धूरच, पण निरखून बघितल्यावर कळलं... त्या कागदाला हजारो चिलटं चिकटली होती...

गोष्ट अशी होती... त्या झाडाच्या शेंड्यातून रोज सायंकाळी हजारो चिलटांचे थवे झुंडीने खाली-वर जात असत. त्याला लोक धूर समजत. लोकांनी टाळ्या वाजवल्या... विजय दिवाणांनी विचारलं...

"तुला हे कसं समजलं."

"सर, मी चित्रकार आहे. शिवाय वास नाही हे मी जाणलं. चित्रकारीमुळं हे चिलटांचे थवे मी विज्युअलाइज केले आणि सत्य शोधलं."

चित्रकलेची दृष्टी असलेला हा नंदकुमार जोगदंड म्हणजे जे. नंदकुमार ! आता आंतरराष्ट्रीय ख्यातीचा चित्रकार आहे. त्याची चित्रं प्रदर्शनातून लाख रुपयांना विकली जातात.

■ ■ ■

# ८१. काळी माया

औरंगाबादच्या अनुराधा वैद्य या लेखिकेची अनेक पुस्तके आहेत. त्यामध्ये 'काळी माया' या नावाचं एक नाटक आहे. या लेखिकेच्या पूर्वजीवनात अशीच एक काळी माया आली नि तिचं नाटक घडून गेलं.

लातूर गावातलं दिवाण कुटुंब मध्यमवर्गीय; पण राजकारण आणि समाजकारण यामध्ये विलक्षण रस असलेलं. सौ. दिवाण नगरपालिकेच्या सदस्या आणि समाजकल्याण बोर्डाच्याही सदस्या होत्या. सुलोचना नावाची गोडसर मुलगी. अभ्यासात हुशार, कलागुणांनी युक्त. सुलोचनाच्या जीवनात एक दिवस ही 'काळी माया' अंधारून आली. मध्यम बांध्याची, रंगानं गोरी, सुस्वरूप सुलोचना एकीकडं भरत नाट्यम्‌चे धडे घेत होती, तर दुसरीकडं त्यावेळच्या मध्यमवर्गीय कुटुंबातल्याप्रमाणं घरकामंही सांभाळत होती. पाणी भरणं, अंथरुणं घालणं, घराचा केर काढणं, झाडणं-पुसणं, कुकर लावणं ही सगळी कामं ती मोठ्या हौसेनं करीत होती. एक सुलोचनाचा धाकटा भाऊ विजय बाहेरून खेळून घरात आला तर...

त्याला एक भयंकर विचित्र दृश्य घरात दिसलं... दिवाण कुटुंबाशेजारी खांडेकर कुटुंब राहत होतं- ही सर्व खांडेकर मंडळी दारात गंभीरपणे उभी होती. बाजूला स्वयंपाकघर होतं. आई, आत्या यांचे रडवेले चेहरे आणि शोकमग्न स्वर विजयला ऐकू आले... आसमंतात कसला तरी गंध... दुर्गंधच तो... पसरला होता. तो जळका वास होता.

सुलोचना घरात एकटीच असताना स्वयंपाकासाठी स्टोव्ह पेटवू लागली आणि वातीची चिमणी अंगावर पडून सुलोचना पेटली. भडका उडाला. अंग सत्तर टक्के भाजलं होतं. जळके कपडे अंगाला चिकटले होते.

पण सुलोचना ओरडत नव्हती, विव्हळत नव्हती... पण खोलवर आवाजात मात्र विचारत होती...

"आई, मी आता मरणार का गं... !"

केवळ चौदा वर्षांचं वय; पण सुलू वाचली. तिचा जीवनवृक्ष उन्मळता उन्मळता वाचला. अंगावर भाजल्याच्या खुणा राहिल्या एवढंच; पण तो

अग्निप्रपात तिच्या जीवनपटलावर कायमची काळी मोहोर उमटवून गेला.

त्वचारोपण, शस्त्रक्रिया यासारख्या खटाटोपात शाळा तर संपलीच; पण खेळणं-बागडणंही मावळलं. मुंबईच्या जी.टी. हॉस्पिटलमध्ये महिने न् महिने उपचार घेतले. तेव्हा तिच्या जीवनावर नैराश्याची काजळी होती; पण तिची जिद्द मोठी. लातूरला परत आल्यावर तिनं शालांत परीक्षा दिली. खांडव्याला मोठ्या भावाबरोबर जाऊन इंटर आर्टस्‌ची परीक्षा दिली. पुढं आंबेजोगाईत राहून बी.ए.ची पदवी घेतली. लग्नाचं वय झालं; पण अंगावरच्या जळक्या खुणा ? त्या आड येणार होत्याच; पण... त्या खुणांनीच जणू काही तिच्या भाग्याला खुणावलं...

शशिकांत वैद्य नावाच्या समंजस शशिकांतनं सुलोचनाला तिच्या खुणांसकट स्वीकारलं आणि अग्नीनं जिला कवटाळलं, ती सुलोचना आता सुखाला सामोरी जाऊ लागली. मूळच्या कलावंत मनानं उसळी खाल्ली. गोड आवाज, अभिनयाची आवड... पारिजात नावाची नाट्य संस्थाच तिनं सुरू केली. राज्य नाट्य स्पर्धेत तिला अनेक बक्षिसं मिळाली.

आत्तापर्यंत सुलोचनाची... म्हणजेच आत्ताच्या अनुराधा वैद्य यांची ४५ हून अधिक पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

'बाकी क्षेम', 'मनुष्यहाट', 'गुंफण', 'पंख', 'माध्यम', 'राणीवसा', 'चौफुला' अशी पुस्तकांची नावं आहेत.

अनेक लहान-थोर साहित्यिक मेळाव्याचं अध्यक्षपद अनुराधा वैद्य यांनी भूषविलं आहे.

हे सारे मानसन्मान मिळत असतानाच एक मोठं संकट उभं राहिलं. जीवनसाथी पती शशिकांत यांना अपघात झाला आणि...

बालपणीच्या स्वत:वर झालेल्या आघातानंतरचा हा दुसरा मोठा आघात अनुराधावर झाला. पती जायबंदी झाले आणि चार वर्षे अनुराधाबाईंना पतीची अहर्निश सेवा करावी लागली.

अपत्यप्राप्तीची स्त्रीसुलभ स्वप्न बाळगणाऱ्या अनुराधाताईंनी जीवनपूर्ती साधण्यासाठी काही एका निर्णय घेतला होता. एक मुलीला सन्मानानं कुटुंबात आणलं; पण त्याबद्दलचा काहीसा मन:स्ताप सोसावा लागला.

आज त्यांचा जीवनवृक्ष एका बाजूला फळा-फुलांनी डवरलेला आहे. सुखा-समाधानाच्या सावली तो देत आहे; पण तरुण वयातच अनुभवलेली 'काळी माया' त्यांना विसरता येत नाही, म्हणून तर त्यांनी पुस्तकाला नावच दिलं.. 'काळी माया'.

■ ■ ■

# ८२. 'बँकेत भर आणि विसरून जा'

सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचा विद्यार्थी शांताराम कुलकर्णी ! कृष्णाकाठच्या मातीची मस्ती त्याच्या स्वभावात आणि वाणीत पुरेपूर उतरलेली. जिभेचं लौल्यही कृष्णेच्या प्रवाहासारखं खळाळतं, पण अंत:करण मात्र त्याच पाण्यासारखं नितळ आणि आरस्पानी. शांताराम मित्रमंडळीत 'शांत्या' म्हणूनच जास्त ओळखला जातो आणि त्यालासुद्धा आपल्या नावाचं हे रूप आवडतं. म्हणजे असं आहे की 'शांताराम' म्हटलं की त्याच्या लक्षातच येत नाही की आपल्याला कुणी तरी हाक मारतंय ! 'शांत्या' म्हटलं तर तो चटकन ओ देतो.

भाषेची आवड, वाड्मयाचं वळण असलेल्या शांत्यानं एम.ए. पदवी प्राप्त केली आणि पुण्याला तो चक्क शिक्षक झाला. एम.एड. होऊन आदर्श महाविद्यालयात त्यानं शिक्षकांचा शिक्षक म्हणूनही नाव मिळवलं. थेट बालपणापासून, सिटी हायस्कूलमध्ये असल्यापासून शांताराम खट्याळ म्हणून प्रसिद्ध !

डॉ. वि.रा. करंदीकर हे ख्यातनाम प्राध्यापक मराठी शिकवायला विलिंग्टन महाविद्यालयात होते. हे खट्याळ बेणं त्यांच्या वर्गात. डॉ. करंदीकर कडक शिस्तीचे आणि व्रतस्थ बाण्याचे ! शांतारामाची वर्गातली हालचाल, त्याची शेरेबाजी, त्याचा वर्ग चालू असतानाच्या कुजबुजी, आजूबाजूचे कटाक्ष... यावरून करंदीकरांनीच शांतारामाला 'खट्याळ' ही उपाधी दिली होती.

स्वच्छ आणि ओघवत्या वाणीच्या शांतारामानं आता लेखणीही हाती धरली होती. अधूनमधून तो लिहू लागला होता. शांताराम आता पुण्यात स्थिरावला. तरी त्यानं आपले सांगलीकर मित्र गोळा करून आपला कृष्णाकाठचा खट्याळपणा सुरूच ठेवला होता. सिंहगड रस्त्याला विश्रांतीनगरच्या मागे राहणारा पुण्यातला शांताराम मनानं अजूनही सांगलीतच वावरत होता. प्राध्यापक नाव मिळवलं. संसार आकारास आला. मुलं मार्गी लागली. पत्नीची साथ उत्तम मिळाली. शांतारामाच्या मूळच्या खट्याळपणानं आणखी एक खट्याळ निर्णय घेतला. त्यानं प्राध्यापकी सोडली आणि चक्क एका मित्राच्या कारखान्यातच

तो प्रशासन आणि जनसंपर्क अधिकारी म्हणून काम पाहू लागला. त्याच मित्रानं उभारलेल्या एका स्वयंसेवी संस्थेचं समाजकार्याचं कामही शांताराम पाहू लागला. दोन्ही ठिकाणी खट्याळ शांतारामच होता.

डॉ. करंदीकरांना शांतारामचा हा खट्याळपणा समजला. त्यांचा आणि शांतारामचा पत्रव्यवहार होता. कधीमधी भेटीगाठी होत. करंदीकरसर चांगलं बोलतात, आशीर्वाद देतात; पण ते आपल्या भाषेचं, वाणीचं मनापासून कौतुक करीत नाहीत, असा एक समज शांतारामनं करून घेतला होता. आपलं खट्याळ व्यक्तिमत्त्वच त्यांनी लक्षात ठेवलंय याबद्दल मनाच्या एका कोपऱ्यात शांताराम अढी बाळगून होता.

शांताराम आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर होता आणि त्याच्या देहाच्या फांदीवर आजारानं वस्ती केली. आजारही श्रीमंत। हृदयविकाराचं दुखणं. मध्यमवर्गीय शांताराम घाबरला नाही; पण हडबडून गेला. शस्त्रक्रिया करावी लागणार होती, केली. दोन लाख चाळीस हजार रुपयांचं बिल आलं. ही रक्कम लिहिताना किती शून्य द्यायची असातात हेही शब्दांचा खेळ करणाऱ्या शांतारामला विचार करूनच लिहावं लागत होतं; मग सांगलीकर मित्र आपुलकीनं उभे राहिले. त्यांनी एक लाख चाळीस हजारांचा चेक गुपचूप शांतारामच्या खात्यात भरला. शांताराम भारावून गेला; पण अजून लाखभर रुपये कर्जापोटी होतेच. शिवाय पोस्टऑपरेटिव्ह औषधपाण्याचा, तपासण्यांचा खर्च होताच. याच सुमारास नेहमीप्रमाणे डॉ. वि.रा. करंदीकरांचं पत्र आलं. त्यांना शांतारामवरील आघाताची कल्पना नव्हती. त्यांनी लिहिलं होतं...

"आता सत्तरीला आलास, धावपळ कमी कर. लेखनवाचन वाढव." मग शांतारामनं लिहिलं, "सर, अजून काही वर्षे तरी तुमचा सल्ला मला मानता येणार नाही. कारण... जिवंत राहण्यासाठी केलेल्या कर्जाचा डोंगर मी हलका करतोय..."

काही दिवसांनी डॉ. वि.रा. करंदीकरांचं नवापूरहून पत्र आलं. पत्रासोबत वीस हजार रुपयांचा ड्राफ्ट होता. डॉ. करंदीकरांनी लिहिलं होतं...

"बँकेत भर आणि विसरून जा."

शांतारामचे डोळे त्या पत्रावर ओघळले. तो करंदीकरांविषयी जो मनाचा कोपरा झाकोळला होता तो उजळला आणि त्यांच्या मनाच्या मोठेपणानं शांताराम भारावला. त्यानं आपल्या मनाच्या बँकेत त्यांची आठवण भरून ठेवली.

■ ■ ■

# ८३. 'बोलणे झाले सहज निरोपाचे'

औरंगाबाद–पैठण रस्त्यानं वडती नावाच्या गावाकडं जायचं. तिथं एक आधुनिक तीर्थक्षेत्र भारलंय. श्री अग्निक्षेत्र समाधीस्थळ हे त्याचं नाव! प्रत्येक क्षेत्राला आपलं असं व्यक्तिमत्त्व असतं, इतिहास असतो. वडतीला असाच एक इतिहास आहे.

जेमतेम पंचविशीतला मुलगा! कृष्णा त्याचं नाव. घराण्याचं आडनाव भांड! औरंगाबादच्या साकेत प्रकाशनाचे बाबा भांड यांचा हा पुतण्या. बाबांच्या धाकट्या भावाचा हा मुलगा. लहानपणापासून या मुलाचं वेगळेपण घरी लक्षात येत होतं. सहा वर्षांचा झाल्यावर त्याला शाळेत घातलं, तर हा शाळेत, वर्गात एकटाच कोपऱ्यात बसायचा. एकदा त्याला आई म्हणाली...

"एकटाच बसतोय, एकटाच शाळेत जातोस, एकटाच येतोस, शेजारी विष्णू आहे. सिद्धेश्वर आहे. जावं त्यांच्याकडं, खेळावं."

"आक्का, मी एकटाच बरा" असं तो मोठ्या माणसासारखं म्हणाला. तेव्हापासून सगळ्यांना वाटत होतं की पोराचं लक्षण काही वेगळंच आहे. कृष्णा तिसरीत गेला अन् एका सकाळी अंथरुणातून उठून म्हणाला, "मला स्वप्नात महादेव आणि नंदी दिसला." तेव्हापासनं तो महादेव नंदीचा खेळ करू लागला.

कृष्णा लग्नाच्या वयाचा झाला तरी चारचौघांसारखं जीवन तो जगत नव्हता. घरातले काळजीत होते, त्यानं लग्न करावं म्हणून. मुली सांगून येत होत्या. त्या त्यानं बघावं म्हणून त्याला सांगत होते; पण कृष्णा लग्नाचं नाव काढेना. फारच मागे लागल्यावर त्यानं मुलगी बघण्याचं मान्य केलं. मुलगी बघायला गेला...

शेजारच्या सिद्धेश्वरानं विचारलं...

"दादा तुम्ही नवरी बघायला गेले होते ना?"

"अरे सिद्धेश्वरा, मी नवरी बघायला नव्हतो गेलो. मी आई बघायला गेलो होतो." कृष्णा गंभीरपणे म्हणाला.

कृष्णाची ही अस्वस्थ अवस्था दिवसेंदिवस वाढतच होती. त्याच्या मनी वादळ उठलं होतं. विचाराच्या वावटळीनं मन वेढून टाकलं होतं. घालमेल, कोंडमारा, घुसमट होत होती. एकदा तो असाच शेतावर गेला. उंचावरच्या

सावलीला बसला. खिशातला कागद काढला आणि सरसर लिहू लागला...

भेटीलागी मन व्याकूळ देवा।
आणिक काही मेवा नलगे आम्हा।

अशा ओळी झरझर लिहीत गेला. तो आता शेताच्या बांधावर, उंबराच्या सावलीला नव्हताच. त्याचं मनपाखरू केव्हाच आध्यात्माच्या आकाशात स्वैर विहार करीत होतं...

कृष्णा म्हणे आता केदारेश्वरी आस
त्याविना स्वास घेणे नाही...

कृष्णाला आता मोकळं मोकळ वाटत होतं. पहिला अभंग लिहून झाला होता. समोर त्रिगुणी वृक्ष होता. त्याच्या सावलीत त्यानं अंग टाकलं. मग तो पुन्हा कल्पनेच्या गुहेत शिरला मनानं... खोल खोल गेल्यानं त्याला प्रकाशवाट सापडली.

घरातल्यांचा निरोप घेऊन तो तुळजापूर, गाणगापूरला निघाला. सात घरं माधुकरी मागून त्यानं एक व्रत पूर्ण केलं. मग तो काशीयात्रेला निघाला. एवढासा फाटका तरुण... निसंग होऊन यात्रा करतोय... मग त्यानं लिहिलं...

कृष्णा म्हणजे गुरुकृपा झाली
म्हणून आम्ही वाराणसी देखिली

मग पंढरीची यात्रा झाली. पाहिला गे माये भोळा देव। हरपलो हो देहाचे भाव।... अशी त्याची अवस्था झाली.

असा हा कृष्णा आता नि:संग झाला होता. या देहाचे भावसागराचे बंध त्याला तोडायचे होते.

तो शेतावर गेला नि त्रिगुणी वृक्षाच्या ओढ्यावर त्यानं हातातल्या पिशव्या ठेवल्या. त्यावर बगलेतली शाल ठेवली. दत्ताच्या व शिवाच्या तसबिरीसमोर आपण लिहिलेल्या अभंगाच्या वह्या ठेवल्या. अभंगांची ६ ची वही! ५०० अभंग होते. मग ५०१ या कळसाचा अभंग लिहायला सुरुवात केली.

कळसाचा अभंग लिहितो आज।
बोलणे झाले सहज निरोपाचे..

वार गुरुवार तिथी एकादशी... अभंग लिहून संपला. मग कृष्णानं स्वत:ची चिता स्वत: रचली. तीवर पद्मासन घालून तो बसला आणि ती त्यानंच पेटवली. कृष्णानं अग्निसमाधी घेतली. ते स्थळ कृष्णा महाराजांचं अग्निसमाधि स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. कृष्णानं 'बोलणे झाले सहज निरोपाचे' असं सांगून जगाचा निरोप घेतला.

■ ■ ■

# ८४. नाथांची लेखणी आणि तलवार

संतश्रेष्ठ एकनाथमहाराज म्हणजे भगवद्‌भक्तीचा धवलध्वज! रुक्मिणीबाई आणि सूर्यनारायण यांचा हा पुत्र पुढं विठ्ठलभक्तीत इतका रममाण झाला की भागवत सांप्रदायाचे ते शिरोमणी झाले.

बालपणापासून जिज्ञासू आणि मुमुक्षू असलेले एकनाथ नेहमी चिंतनात मग्न असत. ते सद्‌गुरूंच्या शोधात होते आणि त्यांच्या भाग्यानं त्यांना तसा सद्‌गुरू मिळाला. देवगिरीचे किल्लेदार आणि परगण्याचे अधिकारी जनार्दनस्वामी हे त्यांचे गुरू! उंचेपुरे, गौर काया, तेजस्वी मुद्रा असलेले कणखर देहयष्टीचे जनार्दनस्वामी पायघोळ अंगरखा घालीत. कानात भिकबाळी, रुबाबदार मिशा असलेला हा किल्लेदार आध्यात्माचा अधिकारी होता.

बाळ एकनाथ त्यांना जाऊन भेटले. एकनाथाचं नाव ऐकून जनार्दनस्वामी त्यांना म्हणाले...

"एकनाथ, तुझ्या नावातच अद्वैत आहे..."

तेव्हापासून एकनाथ सदैव सद्‌गुरू जनार्दनस्वामी यांच्या सेवेत राहिले. चोवीस तास सद्‌गुरूंचं सान्निध्य आणि मार्गदर्शन ते त्यांनी सेवेच्या रूपानं प्राप्त केले. स्नानाचं पाणी काढणं, चंदन उगाळून ठेवणं, वस्त्र धुणं ही सगळी कामं तर एकनाथ करीतच; पण अंथरुण घालणे, बिछाना तयार करणे ही कामेही एकनाथ करीत. गीता, भागवत, ब्रह्मसुत्रे, उपनिषदे यांचं वाचन तर सुरू होतंच. त्यांची हुशारी आणि कर्तव्यदक्षता पाहून जनार्दनस्वामींनी एकनाथाला कचेरीत काम दिले. कचेरीतील सारीच जोखमींची कामे एकनाथ करीत असत. हिशोबात अधेलीची चूक, राहिली तर त्यासाठी एकनाथांनी रात्रभर डोळ्यात तेल घालून जागरण केलं. चूक शोधून काढली. जसे एकनाथ लेखणीबहाद्दर होते, तसेच ते तरवारबहाद्दरही होते हे त्यांनी अवचित एका प्रसंगी दाखवून दिलं.

दर गुरुवारी जनार्दनपंत आपल्या कामातून विश्रांती घेत असत; पण विश्रांती म्हणे जपध्यान! त्यातच ते आपला वेळ खर्च करीत. असाच एक गुरुवार होता.

या दिवशी किल्लेदार किल्ल्याकडे फिरकत नाहीत हे शत्रूला समजलं होतं आणि अचानक...

शत्रू सैन्यासह किल्ल्यावर चाल करून आला.

किल्ल्यावरचे दूत धावतच जनार्दनस्वामींच्या निवासाकडे आले. त्यांनी सांगितलं... "शत्रूचा हल्ला झालाय. स्वामींना पाठव."

"स्वामी ध्यानस्थ आहेत, मीच येतो." एकनाथ आत्मविश्वासानं म्हणाले. नाथांनी पंतांचं चिलखत अंगावर चढवलं. कमरेला तलवार बांधली, गुरूंचं नामस्मरण केलं. ते घोड्यावर आले आणि तडक निघाले आणि किल्ल्याकडे धावले. पंतांचं सैन्य तिथं होतंच. आज्ञेची वाट पाहात होतं. नाथांनी इशारा दिला. गडावर एकच धुमश्चक्री झाली. नाथांचं सैन्य शत्रूसैन्यावर तुटून पडलं.

आणि स्वत:ही शत्रूसैन्यावर आवेशानं तुटून पडले.

शत्रूसैन्य एका अर्थानं गाफील होतं.

शत्रूसैन्याच्या नायकाला वाटलं होतं आज किल्लेदार गडावर नाहीत. तेव्हा चढाई करणं सहज सोपं...

जनार्दनस्वामी नाहीत तर एकनाथ...

नाथांचा आवेश पाहून शत्रूसैन्याची पळता भुई थोडी झाली.

नाथांनी शेकडो सैनिकांना कैद केलं आणि विजयी मुद्रेनं ते माघारी फिरले.

जनार्दपंतांच्या वाड्यावर नाथ आले. घोडा पागेत बांधला. अंगावरचं चिलखत उतरवलं. स्नान केलं आणि...

काही क्षणांपूर्वी हातात तळपती तलवार घेऊन शत्रूसैन्यावर त्वेषानं चाल करून जाणारा हा योद्धा शांतपणे ज्ञानेश्वरीचा पुढचा अध्याय वाचत बसला.

ध्यानस्थ पंत ध्यानसमाधीतून जागे झाले. त्यांना काहीच कल्पना नव्हती. ते बघतात तर वाड्याच्या अवतीभोवती कैदी सैनिकांची गर्दी! आणि त्यांच्या स्वत:च्या सैनिकांचे उत्साही बोलणे!

"कसली गडबड आहे? हे कैदी कोण?"

जनार्दनपंतांनी विचारलं आणि मग त्या सैनिकांनी पंतांना घडलेली सर्व हकीकत सांगितली.

"आज्ञा कोणी दिली?"

"एकनाथांनी," सैनिक म्हणाले.

आणि जनार्दनस्वामी एकनाथांच्या कर्तृत्वानं आनंदून गेले.

■ ■ ■

# ८५. ''शेतीला पाणी देतोय !''

शीख धर्मगुरू नानकदेव हे महान विभूती होते. १४६९ मध्ये पंजाबातील तळवंडी इथं जन्मलेले नानक १५३८ मध्ये परलोकवासी झाले. तृप्ता आणि काळ या दाम्पत्यांचा हा मुलगा बालपणापासूनच वेगळ्या धाटणीचा होता. शाळेत घातला तरी त्याचं मन शाळेत रमत नव्हतं. तो आकाशाकडं बघत राही. स्वतःच्याच चिंतनात मग्न असे. आई-वडील, शेजारी-पाजारी यांना तो काही प्रश्न विचारत असे की त्यांची उत्तरे देण्यासाठी मोठ्यांनाही खूपच खूप विचार करावा लागे. नानकाचा व्रतबंध ठरला.

आणि... ऐन व्रतबंधाविधीच्या वेळी, नानकाने उपाध्यायांना जानवे घालू दिले नाही. जानवे न घालण्याच्या आपल्या हट्टी भूमिकेवर नानक ठाम होते.

नानकाच्या वडिलांना वाटलं आपला मुलगा शाळेत शिकत नसला तर न शिकू दे; पण त्यानं निदान व्यापारात तरी लक्ष घालावं, म्हणून मग वडिलांनी नानकदेवांना काही द्रव्य दिलं आणि सांगितलं,

''जा बाळा... हे द्रव्य घे आणि काहीतरी व्यापारधंदा सुरू कर.''

नानकदेवांनी आता उद्योग सुरू केला असेल म्हणून वडिलांनी वाट पाहिली आणि एक दिवस विचारलं...

''नानकबाळा, कसा काय चाललाय तुझा उद्योग ?''

''चाललाय ठीक.''

''काय केलंय त्या पैशाचं ?''

''त्याचा मी छान व्यवसाय केला.'' नानक उत्तरले.

''काय केलंस ? किती फायदा मिळाला ?'' वडिलांनी विचारलं.

''खूप फायदा मिळाला.''

''अरे वा छान... मग आता व्यवसाय वाढव.'' वडील संतोषानं म्हणाले.

''हो, पण त्यासाठी आणखी द्रव्य लागेल.'' नानक उत्तरले.

''देईन; पण तू कोणता व्यवसाय करतो आहेस ?''

''गोरगरिबांना पैसे वाटून टाकण्याचा. पुण्य जोडण्याचा.''

वडिलांनी कपाळावर हात मारून घेतला आणि नानकांनी घरात राहण्याबद्दल

नाराजी व्यक्त केली. नानकदेव बाहेर पडले. तोपर्यंत त्यांनी स्वत: काही अभ्यास करून भाषा, तत्त्वज्ञान, धर्मग्रंथ यांमध्ये पारंगतता मिळवली होती.

आता काही तरी करायला हवं... म्हणून त्यांनी दौलतखान सुभेदार यांच्या पदरी नोकरी पत्करली. पंडित या नात्यानं ते दरबारी रुजू झाले, पण त्याही चाकोरीबद्ध जीवनात त्यांचं मन रमेना.

मग ते मुक्त झाले आणि निघाले पर्यटनाला. गावोगाव हिंडून ते लोकांचं प्रबोधन करू लागले. त्यांचा कीर्तिसुगंध दरवळू लागला. पुढं दौलतखान सुभेदारच नानकदेवांचा शिष्य झाला.

नानकदेव देशभर हिंडत होते. पंजाब, उत्तरप्रदेश, हिमालयाच्या उत्तरेचा काही भाग या ठिकाणी यांची प्रवचनं होत होती.

एकदा हरिद्वारला असताना ते गंगाकाठी गेले होते.

त्यांनी एक वेगळं दृश्य बघितलं...

एक भाविक माणूस नदीच्या पात्रात उभा होता. त्याचं तोंड पूर्वेकडं होतं तो तोंडानं आणि मंत्र म्हणता म्हणता खाली वाकून ओंजळीत पाणी घेऊन अर्घ्य देऊन ते पूर्वेकडे टाकत होता... बराच वेळ नानक देव हे दृश्य बघत होते.

थोड्या वेळानं त्यांनी त्या भाविकाला विचारलं...

"हे आपण काय करीत आहात ?"

"मी माझ्या पूर्वजांना अर्घ्य वाहात आहे ?"

"अशाप्रकारे तुम्ही अर्घ्य का देत आहात ?"

"माझ्या स्वर्गस्थ पितरांनी हे अर्घ्य पोहोचतील व त्यांना शांती मिळेल."

मग गुरुनानकदेव स्वत: पाण्याच्या प्रवाहात उभे राहिले आणि ते स्वत: पश्चिमेकडे तोंड करून अर्घ्य देऊ लागले.

त्या गृहस्थानं विचारलं, "आपण पश्चिमेकडे तोंड करून अर्घ्य का देत आहात ?"

"येथून पुढं खूप अंतरावर तळवंडीला माझं शेत आहे. त्या शेताला हे पाणी अर्घ्यस्वरूप देत आहे."

"अहो, इतक्या दूरवरून नुसत्या ओंजळीनं पाणी कसं पोहोचेल ?"

"तुमच्या स्वर्गस्थ पितरांना जर तुम्ही दिलेलं अर्घ्य पोहोचतात तर मी दिलेलं अर्घ्य माझ्या शेताला का नाही पोचणार ?" नानक म्हणाले. तो भाविक काय समजायचं ते समजला आणि त्यानं गुरूनानक यांचं शिष्यत्व पत्करलं. गुरुनानकदेव अशा तऱ्हेनं समाजमनाच्या शेतीला पाणी देत राहिले.

■ ■ ■

# ८६. मातृभूमीचा मृद्गंध

पुण्याच्या सदाशिव पेठेतील करकोळपुऱ्यातील नृसिंह मंदिर ! (आत्ताच्या पुणे विद्यार्थी गृहासमोर. तिथं एक बलदंड शरीराचा दत्तभक्त राहत होता. दत्तभक्तीपेक्षाही देशभक्तीत त्यानं स्वत:ला झोकून दिलं होतं. स्वातंत्र्यपूर्व काळातली एकोणिसाव्या शतकातली गोष्ट. हा देशभक्त मूळचा पनवेलजवळच्या शिरढोण गावच्या फडके कुटुंबातला. ४ डिसेंबर १८४५ रोजी फडके यांच्या घराण्यात एका बाळानं जन्म घेतला. नाव ठेवलं वासुदेव. वासुदेव बालपणापासूनच चलाख, चपळ, अल्लड आणि धारिष्ट्यवान होता. मराठी राज्यात या फडके घराण्याकडं किल्लेदारी होती. घराणं सधन आणि दानशूर होतं. वासुदेव बालपणी बोकडाच्या गाडीतून हिंडायचा. वासुदेवाचं शिक्षण चांगलं व्हावं, म्हणून त्याला कल्याण आणि मुंबई इथं शिकायला ठेवलं होतं. प्रथम जीआरपी, ग्रँट मेडिकल कॉलेज आणि पुण्याला वासुदेवानं सरकारी नोकरी पत्करली. पुणे हे देशभक्तांच्या चळवळीचं माहेरघर. तरुण वासुदेवानं १८७२ डिसेंबरमध्ये न्या. रानडे यांची दोन व्याख्यानं ऐकली अन् वासुदेवाच्या मनातील स्वाभिमानाच्या सुप्त अग्नीवर फुंकर घातली गेली. नोकरीच्या जागी तो अस्वस्थ होताच. त्यात भर पडली ती एका प्रसंगानं ! आई आजारी असल्याचं पत्र शिरढोणवरून आलं.वासुदेवानं रजा मागितली. मुजोर इंग्रज साहेबानं रजा नाकारली. त्याची पर्वा न करता वासुदेवानं थेट शिरढोण गाठलं. तोपर्यंत आईची प्राणज्योत मालवली होती. आईच्या अंत्यदर्शनालाही वासुदेव मुकला होता. तिथंच त्यानं नोकरीवर लाथ मारण्याचा निश्चय करून त्यागपत्र पाठवलं आणि पुण्याला येऊन त्यानं इंग्रज़ी राजवटीविरुद्ध जनमत संघटित करण्यासाठी संघटना बांधायचं ठरवलं. पुण्यात त्यानं जागोजागी व्याख्याने दिली. पनवेल तरसोबावाडी, तासगाव पळस्पे इथं दौरे काढले. शिक्षितांचा फारसा पाठिंबा नाही मिळाला; पण रामवंशी जमातीच्या लोकांनी वासुदेवांना साथ द्यायचं ठरवलं. नृसिंह मंदिरात, त्याच्या आसपास, मागील मोकळ्या जागेत त्यांच्या बैठका होऊ लागल्या आणि वासुदेवांनी

इंग्रजांविरुद्ध बंडाचं निशाण फडकावलं. १८७९ साली धामारी खेड्यावर चाल करून त्यांनी आपल्या स्वातंत्र्ययुद्धाची नांदी केली. वासुदेव बळवंतांना पकडण्यासाठी सरकारनं जंगजंग पछाडले. गोपाळराव साठे, रंगनाथ महाजन, कृष्णाजी गोगटे, दौलतराव हे त्यांचे सहकारी होते.

वासुदेव बळवंतांनीही मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांचे मस्तक कापून आणून देणाऱ्यास दीडपट बक्षीस जाहीर केले. इंग्रजांच्या तोंडचे पाणी पळाले. दौलतराव एका चकमकीत धारातीर्थी पडले आणि मग वासुदेवरावांच्या नशिबी वनवास आला. डोंगरदऱ्या, रानेवने यातून वणवण करावी लागली.

अशा अवस्थेतच ते श्रीशैल्य मल्लिकार्जुनाला गेले होते. मेजर डॅनियल या नावाच्या अधिकाऱ्याची खास नेमणूक इंग्रज सरकारनं केली होती. डॅनियल वासुदेवरावांचा सतत पाठलग करीत होता.

गाणगापूरपासून वीस मैलांवर देवर नावडगी या खेड्यातील एका विहारात वासुदेव बळवंत तापानं फणफणून पहुडले होते. डॅनियलनं त्यांना बेसावध अवस्थेत पकडलं. जेरबंद केलं, खटला दाखल झाला. राजद्रोहाचा खटला. वासुदेव बळवंत यांची वकिली कोण करणार ? प्रश्नच होता; पण सार्वजनिक काका (जोशी) पुढं आले. पुण्यात संगमावरील कोर्टात खटला सुरू झाला. अर्थात वासुदेव बळवंतांना जन्मठेपेची शिक्षा झाली आणि शेकडो मैल दूर असलेल्या एडनच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली.

हजारो लोक वासुदेव बळवंतांचा जयजयकार करीत होते. पोलिसांची गाडी दूर जाताच हजारोंच्या समुदायाचे डोळे पाणावले. कारण... या देशभक्तानं, क्रांतिवीरानं जाताना बरोबर काय नेलं होतं ?

या देशाची मूठभर माती.

आपल्या प्रिय मातृभूमीपासून दूर जायचं होतं, मग त्यानं मूठभर मातीच घेतली.

''वासुदेव बळवंत की जय !'' आभाळ निनादून गेलं.

एडनच्या तुरुंगातून तुरुंगाची लोखंडी दारं उचकटून आपली मुक्तता वासुदेवरावांनी करून घेतली; पण दुर्दैव ! इंग्रजांनी पुन्हा पकडलं आणि खंगलेल्या शरीराच्या या महान देशभक्तानं एडनच्या तुरुंगात १७ फेब्रुवारी १८८३ रोजी देह ठेवला. त्या वेळी त्यांच्या उशाशी भारतभूमीची मूठभर माती होती. मातृभूमीचा हा पवित्र मृद्‌गंध घेऊनच त्यांनी शेवटचा श्वास घेतला !

■ ■ ■

# ८७. अमृतकुंभ शुद्ध झाला

कोरेगावचा एक विठ्ठलभक्त पाटील. त्याला कोणतीही वस्तू मिळाली की तो आधी विठ्ठलापुढं ठेवी. पाटलाच्या शेतातील आंब्याच्या झाडांना खूप आंबे आले. मग पाटलानं काही आंबे मोजले, पाटीभर मोजलेले आंबे सुदाम आणि सावित्री या जोडप्याकडं दिले आणि सांगितलं, "हे आंबे पंढरीला जाऊन विठ्ठलचरणी वाहून या."

सुदाम येसकर आणि त्यांची पत्नी झपाझपा पावलं टाकीत चालले. आता पंढरपूर काही कोस होते. डोईवर पाटीत आंबे होतेच.

एक कृश गरीब ब्राह्मण समोर आला, म्हणाला...

"बाबांनो, मला फार भूक लागली आहे, पोटाला द्या."

सुदामाला वाटलं, आपणाजवळ काय आहे ? काहीच नाही. हे आंबे आहेत; पण ते आपले नाहीत. पाटलानं विठोबासाठी दिलेत. ते कसे देणार ? शिवाय हा ब्राह्मण आपल्या हातून तो कसं घेईल ?

"तुमच्या पाटीत काय आहे ?"

"आंबे आहेत."

"तेच मला द्या."

"आंबे मोजलेले आहेत विठोबाला द्यायचेत. ते मी कसे देणार ?"

ब्राह्मण भुकेनं व्याकुळ झाला होता. सुदामच्या बायकोला– सावित्रीला त्याची दया आली. तिनं एक आंबा काढून ब्राह्मणाच्या हाती ठेवला. ब्राह्मण संतोषला; पण त्यानं आंबा चोखून पाहिला तर आंबट ! मग त्यानं तो चोखलेला आंबा परत सावित्रीच्या ओटीत टाकला. मग दोघं पती-पत्नी पंढरीला आले. त्यांनी पाटलानं दिलेली चिठ्ठी बडव्यांना दिली. बडव्यांनी आंबे मोजून घेतले. एक आंबा कमी होता. सावित्रीनं चोखलेला आंबा ओटीतून काढून दाखवला आणि घरी येऊन पुन्हा ओटी चाचपून पाहिले तर काय...

ओटीत एक लहान बालक होते.

ब्राह्मणाच्या रूपानं प्रत्यक्ष पांडुरंगानं आंबा चोखून प्रसाद दिला होता म्हणून त्या बालकाचं नाव ठेवलं चोखा !

हा बालक चोखा म्हणजेच पुढं ख्यातनाम झालेला भक्त चोखामेळा.

चोखोबा मंगळवेढ्याला राहत. शुद्र म्हणून चोखोबांचा समाजात खूप छळ झाला; पण प्रत्यक्ष पांडुरंगानंच भागवतधर्माची पताका त्यांच्या खांद्यावर ठेवली. नामदेवांच्या दर्शनानं ते कृतार्थ झाले.

चोखोबांच्या भगवद्भक्ताची उंची इतकी होती की त्यांना दैवी गुण आपोआपच प्राप्त झाले होते.

याबाबत एक अद्भुत कथा सांगितली जाते ती अशी– स्वर्गामध्ये इंद्रदेवानं देवमंडळींना भोजनासाठी आमंत्रण दिलं होतं. इंद्रपुरीतील प्रासादात सर्व देव, देवता, गंधर्व, किन्नर, यक्ष पंगतीत बसले होते. भोजनाचा अपूर्व थाट होता. देवांसाठी अमृत तयार होतं. खुद्द इंद्र आणि इंद्राणी अमृत वाढणार होते. वाढू लागले; पण अमृताची चव घेताच देवांची तोंडं कडवट झाली. अमृत नासले होते. इंद्रांनी हा वृत्तांत नारदाला सांगितला. नारद म्हणाले–

''इंद्रदेवा, साक्षात अमृतच नासलं, पण ते आता इथं कुठं शुद्ध होणार नाही.''

''मग काय करायला हवं ?''

''पृथ्वीवर जायला हवं. भूवैकुंठ पंढरीला जा. पांडुरंगाची भेट घ्या...''

इंद्र पांडुरंगाच्या भेटीस गेले. पांडुरंगानं सांगितले– ''इंद्रदेवा, तुमचे अमृत शुद्ध करायचं खर; पण आता आम्ही आमचं सारं सत्त्व आमच्या भक्तांना देऊन टाकलंय. आमचा एक भक्त चोखोबा आहे त्याच्याकडे जा.''

मग इंद्र अमृतकुंभ घेऊन महारवाड्यात चोखोबांकडे गेले. चोखोबा विठ्ठलनामात दंग होते. चोखोबांना दिव्यप्रकाश दिसला.

''मी इंद्र. मला पांडुरंगानं तुम्हाकडं पाठवलंय, अमृतकलशासाठी.''

''जोहार मायबाप ! पांडुरंगानं आमचं नाव सांगितलं ?'' ''हो.''

''मी तर महार. पांडुरंगानं माझ्यावर हे काय सोपवलं...'' यावेळी चोखोबांचे डोळे भरून आले. त्यांच्या डोळ्यातले दोन अश्रूमौक्तिक अमृतकुंभात पडले आणि काय चमत्कार... अमृत शुद्ध झाले... नासलेलं अमृत शुद्ध झाले, ते घेऊन इंद्र समाधानानं स्वर्गी गेला. अशी चोखोबांची थोरवी.

■ ■ ■

# ८८. साधू आणि क्रांतिकारक

विदर्भातले एक थोर क्रांतिकारक, कृषितज्ज्ञ देशभक्त डॉ. पाडुरंग सदाशिव खानखोजे. यांचं जीवन म्हणजे विलक्षण वावटळीचा इतिहास आहे. मुळातच घराण्याला मुसलमानी आडनाव होतं. बालपणापासून पांडुरंग तथा भाऊ खानखोजे हे अभ्यासू, कृतिशील आणि बलदंड होते. व्यायामाची आवड, मनस्वीपणा हे तर त्यांचं वैशिष्ट्यच होतं. अगदी कुमारवयातच इंग्रजी सत्तेच्या जुलुमांची त्यांना चीड आली आणि त्यांनी आर्यसमाजासारखी 'बांधव' संघटना उभी केली. मधेच 'सर्कस' चालवण्याचा एक प्रयोग करून झाला. सर्कशीत नेमबाजीचे प्रयोग होत. त्यातही देशभक्तीचे धडे दिले जात. या सर्कशीत जयकुवल उपाध्ये विदूषकाचं काम करीत पंधरा-वीस फुटांच्या अंतरावर इंग्रज साहेबांसारखी टोपीचं शिफ्तर असलेली बाहुली ठेवलेली असे. त्या बाहुलीला नेमबाजीनं पाडणाऱ्याला या सर्कशीत बक्षीस मिळे.

पुढे हे पांडुरंग तथा भाऊसाहेब खानखोजे लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेनं लष्करी शिक्षण घ्यायला गेले होते. अमेरिकेत त्यांनी कृषिशास्त्राची एन.एस. ही पदवी मिळवली. जॉर्ज कार्व्हरच्या जगप्रसिद्ध विचारवंताला ते टस्कगीत जाऊन भेटले. लाला हरदयाळ, पं. काशीराम यांच्याबरोबर गदर पार्टीच्या उभारणीचे काम त्यांनी केले. भारतीय स्वातंत्र्यासाठी इराणमध्ये चार वर्षे लढले. मॉस्कोत त्यांनी लेनिन यांची भेट घेतली. पुढं पंचवीस वर्षं मेक्सिकोत कृषिक्षेत्रात कार्य केलं. कृषिक्षेत्रात संशोधन करून त्यांनी लौकिक मिळवला. भारताला स्वातंत्र्य मिळालं; पण खानखोजे यांची तशी उपेक्षाच झाली. अर्थातच रणझुंजाराला रणसमर्पण हाच आनंद असतो. तो उपेक्षेचा विचारही करीत नाही. डॉ. खानखोजे हे वृत्तीने तत्त्वचिंतक होते. ते साधूच व्हायचे पण झाले क्रांतिकारक. यासंबंधी त्यांच्या कुमारवयातली एक विलक्षण कथा आहे.

एका सुटीत तरुणपणी ते वर्ध्याला असताना गावात रामदासानुदास श्रीधर

विष्णु परांजपे आले होते. टिळक आणि श्रीधरपंत यांचा उत्तम परिचय होता. त्यांना भेटून खानखोजे यांच्या बालसमाजाच्या चमूनं असं ठरवलं की आपण ज्या टेकडीवर बलोपासनेसाठी रोज धावायला जातो त्या टेकडीवर रामदासानुदासांच्या हस्ते हनुमानाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी. समारंभ झाला आणि त्या टेकडीला मग सर्व लोक हनुमानगड म्हणू लागले.

असेच काही दिवस गेले. १९०३ साली प्लेगमुळे वातावरण प्रक्षुब्ध झालं होतं. शाळा बंद होत्या. त्यामुळं नागपूरच्या शाळेत असलेले खानखोजे वर्ध्याला आले होते. इंग्रजांनी प्लेगचं निमित्त करून देशातल्या लोकांवर खूप अत्याचार केले. यामुळं खानखोजे खूप अस्वस्थ झाले होते.

त्यांच्या वडिलांनी त्यांचे लग्न ठरवलं होतं; पण त्यांनी रामदासांप्रमाणेच मांडवातून सावधान म्हणताच पळ काढला. वर्धा नगरीनं त्यांना 'पळपुटा भाऊ' हीच पदवी दिली.

कर्झनशाहीमुळे देशात प्रचंड असंतोषाचा भडका उडाला होता. खानखोजे यांच्या मनात खूप गोंधळ होता. घरचा विवाहाचा लकडा, देशाची परिस्थिती, इंग्रजांचे जुलूम. नेमकं काय करावं ? ते रामदासानुदासांना भेटायला वर्ध्याल्या गेले. गुरूंनी त्यांना सांगितलं, ''रामदासी व्रत घे, श्रीराम तुजवर प्रसन्न होतील.''

मग खानखोजे हनुमानगडावर गेले. तिथं स्वामी रामदासानुदास यांनी एक झोपडी उभारली होती. तिथं राहून तपश्चर्या करायची असं ठरवलं. पूर्वी स्वतःच मारुतीची स्थापना केली होती. माता-पित्यांना वंदन करून भाऊ खानखोजे झोपडीत आला. मातीच्या चौथऱ्यावर चटई पसरली होती आणि समोर बघितले तर काय... त्यांना विलक्षण दृश्य दिसलं.

ज्या चटईवर बसून ते ध्यानधारणा करणार होते त्या चटईवर एक भला मोठा नाग फडा काढून बसला होता. भाऊ खिळून उभे राहिले. नागोबा शांत होता.

भाऊ खानखोजे यांनी यावरून असा निष्कर्ष काढला की आपण साधू होऊन स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे हे श्रीरामाला मान्य नाही. स्वातंत्र्यासाठी लढत द्यायला हवी. म्हणून नागोबाला नमस्कार करून ते झोपडीतून बाहेर पडले आणि सशस्त्र क्रांतिकारकांच्या कार्यात सामील झाले आणि साधूचा क्रांतिकारक झाला.

■ ■ ■

# ८९. 'यांचं कसं होणार ?'

पुण्यातील नारायण पेठेतील पत्र्या मारुतीजवळ राहणाऱ्या सौ. आशाताई श्रीपाद जोशी (माहेरच्या उषा कान्हेरे) अनेक वेळा जवळच असलेल्या मोदी गणपतीच्या दर्शनाला जातात. नुकतंच लग्न झालेलं होतं. मूळचे भिळवडीचे; परंतु नंतर सांगोल्याला असणाऱ्या हेडमास्तर शंकरराव जोशींचा मुलगा श्रीपाद यांच्याशी विवाह झाला. श्रीपादला त्यांचे थोरले चुलतबंधू पंडितराव यांनी शिक्षणासाठी आश्रय दिला होता. कारण शंकररावांची परिस्थिती बेताची श्रीपाद बी.एस्सी., बी.एड. होऊन शिक्षक झाला; पण त्याकाळी शिक्षकांचा पगार होता किती ? दारिद्र्य हाच शिक्षकाचा अलंकार होता. उषाचे वडील डेप्युटी इंजिनियर होते. माहेरचं घराणं आर्थिक सुस्थितीतलं. स्वत: उषाही पदवीधर; पण विवाहानंतर संसाराचा मेळ बसविण्यासाठी तिनं नोकरी न करता संसारालाच वाहून घेतलं. श्रीपादरावांनीही दिवसाच्या शाळेव्यतिरिक्त रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या रात्रशाळेत नोकरी करून कष्टाची वाटचाल सुरूच ठेवली. संसारवृक्षावर एक टपोरी कळी उगवली. अरुणा तिचं नाव. अरुणा लाडाकोडात वाढू लागली आणि अरुणाच्या पाठोपाठ अनितानं जन्म घेतला. दोन मुली...

मोदी गणपतीच्या दर्शनाला गेलेल्या आशाताईंना त्यांच्या ओळखीच्या एका प्रौढ स्त्रीनं देवळातच सचिंत मुद्रेनं विचारलं, "अगं बाई, पाठोपाठ दोन मुली, आता तुमचं कसं होणार ?"

"परमेश्वर पाठीशी आहे आणि आपले हात-पाय आहेत हालवायला." आशाताई शांतपणे म्हणाल्या...

संसाराला शून्यापासून सुरुवात होती. जागेचा मोठा प्रश्न. मित्रांनी दिलेल्या भाड्याच्या जागेत संसार सुरू केला; पण विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेऊन हलावंच लागलं. तशात तिसरी मुलगी उज्वलाही दोन बहिणींच्या पाठीवर झाली. श्रीपाद-आशा दांपत्यानं तिचंही हसतमुखानं स्वागत केलं. उज्वला थोडी मोठी झाल्यावर पुन्हा आशाताई मोदी गणपतीच्या दर्शनाला गेल्या होत्या. त्यावेळी

अरुणा, अनिता आणि कडेवर उज्वला अशा तीनही मुली बरोबर होत्या...

नेमक्या त्या काळजीवाहू प्रौढ बाई भेटल्याच... त्यांनी सचिंत मुद्रेनं पुन्हा विचारलं, ''अगं बाई, तीन मुली, आता तुमचं कसं होणार?''

''आत्ता होतंय तसंच होणार?'' आशाताईंनी सुहास्य वदनानं उत्तर दिलं. यावेळी त्या प्रौढ स्त्रीला थोडं कमी दिसू लागलं होतं.

आशाताईंचा दुकीचा संसार सुरू होता. श्रीपादराव दिवसभर कष्टांची रतिब घालत होते. मुली मोठ्या होत होत्या. मुलींसाठी तरतूद करण्याची काळजी होतीच; पण आशाताईंनी योजनाबद्ध संसार करून तीही व्यवस्था केली. त्या नोकरी करत नव्हत्या; पण 'पैसे वाचवणं म्हणजे पैसे कमावणं' या सूत्रानुसार त्यांनी आपला संसार चोख केला. भवानी पेठेत जाऊन धान्य ठोक भावात घेऊन, त्याची निगराणी करून वर्षाचा साठा करणं, सगळी कामं शक्यतो घरीच करणं असा पहाटेपासून रात्रीपर्यंतचा हसतमुखानं कार्यक्रम चालला होता. श्रीपादारावांनाही आजूबाजूचे लोक संवादाच्या वेळी सचिंत मुद्रेनं म्हणत, ''तीन मुली! आता तुमचं कसं होणार? मुलींची लग्नं, हुंडापांडा.''

''आंधळ्याच्या गायी देव राखतो.'' श्रीपाद हसून म्हणायचे.

मुली चांगल्या शिकल्या. थोरली अरुणा एम.एस्सी. झाली आणि नाबार्डमध्ये नोकरी लागली. ती मुंबईत कांदिवलीला असते. दुसरी अनिताही एम.एस्सी. झाली. ती आय.बी.एस.सारख्या प्रतिष्ठीत संस्थेत हुद्द्यावर आहे. तिसरी उज्वला एम.एस्सी. स्टॅटिस्टिक्स घेऊन शिकली. ती लेक्चरर आहे. वडिलांचाच वारसा चालवतेय. अरुणाची शिवानी आणि अनिताची नयना या गोड नातींच्या सहवासात श्रीपाद-आशा आजी-आजोबांचा वेळ छान जातो. तीनही मुली उत्तम शिकल्या. मार्गी लागल्या. श्रीपादरावांना वयानुसार निवृत्ती घ्यावी लागली. तरी घरी गणिताचे अध्यापन ते करतातच. मधुमेहाच्या त्रासानं आता त्यांच्या देहावर वस्ती केलीय. मित्रांना वाटलं... मुलींच्या काळजीनं... पण त्यांना तेव्हा कळलं की एखादं अवघड गणित सरसर सुटावं तशा तीनही मुली शिकल्या, मार्गी लागल्या. लग्नं झाली, नातवंडं झाली आणि अशा कष्टांच्या खेळात आशाताई अमेरिकेलाही जाऊन आल्या.

मोदी गणपतीच्या देवळात भेटलेल्या प्रौढ बाई आता त्यांना भेटल्या. त्यांच्या हाती काठी होती. आशाताई मनात म्हणाल्या, ''आमचं झालं. आता तुमचंच कसं होणार बघा!''

■ ■ ■

# १०. हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले

विठ्ठलभक्तांच्या मांदियाळीतलं एक गोड गाण्यासारखं नाव म्हणजे संत कान्होपात्रा ! पंढरपूरजवळचं मंगळवेढे हे गाव. या गावात श्यामा नावाची नायकीण गाणं-बजावणं आणि नृत्यशृंगार करून लोकांना रिझवणं हा तिचा व्यवसाय. या श्यामा नायकिणीच्या पोटी एका मुलीचा जन्म झाला. नाव ठेवलं कान्होपात्रा. चिखलात कमळ उगवावं तशी कलावंतीणीच्या घरात कान्होपात्रा जन्मली.

लहानपणापासून कान्होपात्रा देवभक्त होती. अनेक बायका आपल्या लहान मुला-मुलींना घेऊन देवळात कथापुराणाला जातात, तसं आपल्या आईनंही आपल्याला न्यावं असं कान्होपात्राला वाटत होतं; पण श्यामा नायकिणीला ते शक्य नव्हतं.

कान्होपात्रा आता थोडी मोठी झाली. आईचे गाण्याचे सूर तिच्या कानावर पडत होते. आईचं नृत्य ती डोळ्यात साठवत होती. आता थोडी मोठी झाल्यावर कान्होपात्राही नाचू-गाऊ लागली; पण ती गाणी म्हणायची ती शृंगाररसाची नव्हती. भक्तिरसात ओथंबलेले शब्द होते तिचे. कान्होपात्रा आता तरुण झाली, सुंदर दिसू लागली. अनेक वखवखलेल्या नजरा कान्होपात्राच्या सौंदर्यावर खिळून होत्या. कान्होपात्राचं चित्त मात्र वेगळ्याच विचारात गुंतलेलं असायचं. कान्होपात्रेनं आपलं नायकिणीचं जीवन टाकून देऊन वैराग्याची वाट धरली होती. एकदा ती देवळात पुराण ऐकायला गेली होती. उषा-अनिरुद्धाची कथा पुराणिकबुवांच्या तोंडून ऐकताना तिचं देहभान हरपलं, तिनं आता परमार्थाची वाट धरली; पण या मार्गात परमेश्वर आपल्याला जवळ करील का अशी शंका तिला व्याकुळ करू लागली. मग कान्होपात्रा आर्ततेनं देवाला आळवू लागली.

पतित तू पावना, म्हणविसी नारायणा,
जरि सांभाळी वचन, ब्रीद वागविसी जाण...

कान्होपात्रा पंढपूरला जाऊ लागली. वारकऱ्यांच्या दिंडीत सामील झाली. ती आता देवदासी झाली होती. उत्कट भक्तीच्या जलाशयात ती सचैल स्नान करीत

होती. एकीकडे देवदासी म्हणून कीर्ती सर्वदूर पोहोचली होती. तिच्या सौंदर्याच्या कथा अनेकांच्या कानी गेल्या होत्या. गायिका असून नाच गाणं करीत नाही, याचं अनेकांना आश्चर्य वाटत होतं. अनेक धनवंतांनी तिच्यासाठी आपल्या जवळील मोहोरांच्या थैल्या उघड्या केल्या; पण कान्होपात्रा बधली नाही.

पायात चाळ बांधून नृत्य करण्याऐवजी ती आता गळ्यात वीणा अडकवून भजन करू लागली.

कान्होपात्रेला ज्ञानदेवांची भेट मिळाली. झालेल्या दिव्य दर्शनानं ती भारावून गेली. कान्होपात्राची आई श्यामा नायकीण आता वयस्कर झाली होती. तिला तिची चिंता होती. कान्होपात्रेचं पुढील आयुष्य कसं जाणार याची चिंता तिला होती. तिनं नाचगाणं करून द्रव्यलाभ करून घ्यावा, संचय करावा, असं श्यामाला वाटत होतं. इतरांच्या वासनेचा बळी होण्याचं कान्होपात्रानं साफ़ नाकारलं आणि एक मोठंच संकट कान्होपात्रेसमोर ठाकलं.

बिदरच्या बादशहाला कान्होपात्रेच्या सौंदर्याची मोहिनी समजली होती. ती श्यामा नायकिणीची कन्या आहे, हेही समजलं होतं. मग बादशहाच्या मनात कान्होपात्रा बसली. तिला घेऊन येण्यासाठी बादशहानं दूत पाठवले. शिकार पकडण्यासाठी शिकारी कुत्रे मंगळवेढ्याला आले. त्यांनी 'बऱ्याबोलानं आमच्याबरोबर चल' असं कान्होपात्रेला सांगितलं.

कान्होपात्रा काय समजायचं ते समजली. मनातच तिनं विठ्ठलाचा धावा केला आणि बादशहाच्या शिपायांना म्हणाली...

'एकदा मी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचं दर्शन घेते आणि मग तुमच्याबरोबर बादशहाकडे येते', शिपायांनी तिला संमती दिली.

कान्होपात्रा पंढरपूरला विठ्ठल मंदिरात आली. गळ्यात वीणा, हाती चिपळ्या घेऊन ती देवाला समोर बसून आळवू लागली-

नको देवराया अंत आता पाहू, प्राण हा सर्वथा फुटो पाहे।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले। मजलागी जाहले तैसे देवा।।

झाले, खरोखरीच विठ्ठलानं या हरिणीच्या पाडसाला बादशहारूपी व्याघ्राच्या तावडीतून सोडवलं. गाता गाता कान्होपात्रानं प्राण सोडले. ती विठ्ठलरूप झाली. तिचा अचेतन देह समोर होता. बादशहाचे शिपाई हताश होऊन निघून गेले.

■ ■ ■

# ११. बुलबुल आणि कुंचला

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे समाजप्रबोधक तर होतेच; पण त्यांनी आपल्या मुलांचं प्रबोधनही उत्तम प्रकारे केलं. प्रबोधनकारांना स्वत:ला संगीत, नाटक, कला यांची अत्यंत आवड होती. आपल्या मुलांनी अभ्यासाबरोबरच कलाविषयातही प्रगती करावी, असं त्यांना मनोमन वाटे. प्रबोधनकार दादांनी संगीताचा अभ्यास चांगला केला होता. खरं तर दादांना संगीतकारच व्हायचं होतं. परिस्थितीमुळे संगीतसाधनेला वेळ देता येत नव्हता. आपण संगीतकार झालो नाही तर नाही; पण आपल्या मुलांनी संगीतक्षेत्रात काम करावं असं दादांना नेहमी वाटायचं.

मोठा मुलगा बाळ ओरिएंटल हायस्कूलमध्ये होता. धाकटा श्री अजून लहान होता.

एक दिवस सायंकाळी घरी येताना दादासाहेब एक वस्तू घेऊन आले. त्यांनी बाळला बोलावलं आणि सांगितलं,

"हे बघ, मी तुझ्यासाठी काय आणलंय ?"

"काय आहे ?" बाळनं कुतूहलानं विचारलं.

"उघडून तर बघ," दादा गमतीनं म्हणाले.

त्या वेळी बाळच्या हातात कुंचला होता. तो त्यानं दूर ठेवला. पाहिलं तर एक छानपैकी बुलबुल.

बाळासाहेब काहीच बोलले नाहीत. आता बाळची शिकवणी सुरू झाली, दादा बुलबुल शिकवणार आणि बाळ वाजविणार.

बुलबुल या तंतुवाद्याची गंमत अशी असते की एका हातानं तारा छेडायच्या आणि दुसऱ्या हातानं बटण दाबून स्वरसाज निघायचा. दादासाहेबांनी बाळला सगळं शिकवलं. बाळनंही तेवढ्यापुरतं ते लक्षपूर्वक ऐकलं; पण खरं म्हणजे बाळाला त्या बुलबुल वाजविण्यात मुळीच रस वाटत नव्हता.

पण तसं दादांना स्पष्ट सांगायचं कसं ?

मधून मधून दादासाहेब चौकशी करायचे...

"काय बाळ, बुलबुल वाजवणं सुरू आहे ना ?"

"हो दादा, वाजवतोय, प्रॅक्टिस करतोय."

असं बऱ्याच वेळा झालं. खरी गंमत वेगळीच होती.

दादासाहेब बाळला बुलबुल वाजवायला शिकवत असताना बाळचा धाकटा भाऊ श्री (श्रीकांत) शेजारी बसलेला असायचा. तो हे सर्व लक्षपूर्वक़ बघायचा. त्याला मात्र बुलबुल वाजवायला जास्त आवडू लागलं होतं. आपणही बुलबुल वाजवायला हवा, असं श्रीकांतला वाटायचं आणि मग श्रीकांतच्या मनासारखी गोष्ट घडली. बाळला बुलबुल वाजविण्यात फारसा रस नव्हताच. मग त्याने ते बुलबुल आनंदानं श्रीला देऊन टाकलं.

आणि त्या दिवसापासून श्रीकांतच बुलबुल वाजवू लागला. श्रीकांतची बुलबुल वाजविण्यातली सफाई वाढली. वेग वाढला. अनेक छान छान गाणी तो वाजवायचा. निरनिराळ्या सुरावटी वाजवायचा ! मधे बरेच दिवस गेले. त्या दिवशी दादासाहेबांना वेळ होता. त्यांनी मुलांची चौकशी करायची ठरवलं. ते घरात आले तेव्हा आतल्या खोलीतून बुलबुलच्या सुंदर सुरावटी ऐकू येत होत्या. त्यांना फार बरं वाटलं. त्यांनी प्रेमभरानं बाळला हाक मारली.

बाळ पुढं आला... आणि...

आश्चर्य म्हणजे खोलीतून बुलबुलाची सुरावट ऐकू येत होती. बाळ तर समोर उभा आहे...

मग बुलबुल कोण वाजवतंय... हा प्रश्न दादांसमोर उभा राहिला. मग दादा खोलीत शिरले, तर श्री एकरूपतेनं बुलबुल वाजवत होता. त्याची बोटं सफाईनं बुलबुलाच्या तारांवरून फिरत होती. एका बाजूला उभा असलेला बाळ...

दुसऱ्या बाजूला बुलबुल वाजवत असलेला श्री...

मधे दादासाहेब उभे...

मग दादासाहेबांनी अर्थपूर्ण रीतीनं बाळकडं बघितलं आणि ते म्हणाले...

"श्री बुलबुल छानच वाजवतोय... पण मी तुला दिलं होतं..."

"होय, दादा तुम्ही मलाच दिलं होतं, पण माझ्यापेक्षा श्रीला ते अधिक आवडलं. मी त्याला देऊन टाकलं... दादा मला बुलबुलपेक्षा हा कुंचलाच अधिक आवडतो."

दादांनी प्रेमभरानं बाळच्या पाठीवर थोपटलं आणि ते समाधानानं म्हणाले,

''हरकत नाही, माझा एक मुलगा कुंचला घेईल, दुसरा बुलबुल घेईल. दोघंही आपापल्या क्षेत्रात मोठे होतील.''

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे भविष्यात महान व्यंगचित्रकार झाले.

ऊऊऊ

# १२. आधी साहित्यकार, मग पत्रकार

श्री. अटल बिहारी वाजपेयी हे प्रख्यात राजकारणी असले तरी मनस्वी साहित्यिक व हाडाचे कवी आहेत.

इ.स. २००० मध्ये दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियममध्ये दलित साहित्य संमेलन भरले होते. मा. अटलजी त्या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

मराठी कवी लहू कानडे यांनी 'टाचा टिंभा' या नावाचे आत्मकथनात्मक पुस्तक लिहिले होते. कविता होत्या. त्या कविता एका विशेष प्रसंगी अटलजींनी गोपीनाथ मुंडे यांच्या निवासस्थानी ऐकल्या होत्या. त्यांना त्या आवडल्या होत्या.

रतनलाल सोनग्रा यांनी या संग्रहाचे हिंदी रूपांतर केले होते. या हिंदी अनुवादाचे प्रकाशन तालकटोराच्या संमेलनात मा. अटलजी यांच्या हस्ते व्हायचे होते.

पुस्तक प्रकाशनाची तारीख आणि पुस्तक निर्मितीचा घोळ नेहमीचाच असतो. तसं या पुस्तकाबाबत झालं.

ताज्या ताज्या ५० प्रतींचा गठ्ठा बांधून विमानतळाकडे निघाले. तिथं लहू कानडे व श्री. अन्सारी वाट पाहात होते. 'टाचा टिंभा' वेळेवर दिल्लीला पोहोचले.

५ डिसेंबरला ११ वाजता प्रकाशनाचा कार्यक्रम होता. दिल्लीमध्ये दुकानं फार उशिरा उघडतात. पुस्तकांना गुंडाळण्यासाठी रंगीत कागद आणि रिबन घ्यायची होती; पण मिळणार कशी ? मग सोनग्रा यांनी कॅनॉट प्लेसच्या फूटपाथवर पुष्पगुच्छ विकणाऱ्यांकडून एक कागद घेतला. गुच्छ घेतला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रकाशनाआधी पुस्तकाची प्रत अटलजींना द्यायला हवी होती, तशी ती दिलेली नव्हती.

लहू कानडे आणि रतनलाल सोनग्रा टॅक्सीतून जात होते. जाताना त्यांना अटलजींचा बंगला दिसला. त्यांनी गाडी थांबवली आणि बंगल्यात गेले.

शत्रुघ्न सिन्हा नावाचे अटलजींचे खासगी सचिव होते. त्यांना यांनी सांगितले की कृपया अटलजींना सांगा, मुंबईहून साहित्यिक आपल्या भेटीसाठी आले

आहेत. 'ज्या पुस्तकाचे प्रकाशन आपण करणार आहात त्या पुस्तकाची भेट द्यायला आलेले हे साहित्यिक आपल्याला भेटू इच्छितात.'

शत्रुघ्न सिन्हा म्हणाले...

''आपण आलात ते बरंच झालं. कालपासून त्यांनी– अटलजींनी मला दलित साहित्यिकांची डिरेक्टरी आणि दलित साहित्य निष्कर्ष माहिती गोळा करायला सांगितलेच होते.''

''पण अटलजी आता भेटतील ना ?'' सोनग्रा यांनी विचारलं.

''हो. मी त्यांना सांगतो. रात्री उशिरा ते लखनौहून आले आहेत. आता ते स्नानगृहात आहेत. मी त्यांना निरोप देतो.'' आणि शत्रुघ्नजी निरोप घेऊन आले. ''बसायला सांगा.'' रतनलाल सोनग्रा आणि लहू कानडे आनंदले. अटलजींची शांतपणे भेट होणार याचं त्यांना समाधान वाटलं.

थोड्या वेळानं शुभ्रवेश परिधान केलेले प्रसन्न अटलजी आले. त्यांनीच या दोघांना बसायला सांगितलं.

अटलजींना या पुस्तकाविषयीच सोनग्रा आणि कानडे यांच्याशी थोडं बोलायचं होतं.

त्यांच्या गप्पा सुरू होतात न होतात तोच...

प्रख्यात टी.व्ही. पत्रकार करण थापर तिथं आले.

शत्रुघ्न सिन्हा यांनी तशी खबर दिली.

करण थापर यांच्याबरोबर टी.व्ही.ची कॅमेरामनसकट संपूर्ण टीम होती. करणजी आले. त्यांनी अटलजींना चरणस्पर्श केला आणि अत्यंत विनयानं ते म्हणाले, ''आपली मुलाखत हवी आहे, म्हणून सर्व टीम घेऊन आलोय.''

अटलजी प्रसन्न स्मितवदनाने म्हणाले, ''करणजी अच्छा हुआ आप आए मगर... अभी मुलाकात नहीं हो सकती. आप शामको आइए, या फिर कभी...''

''मगर अटलजी... मेरे साथ हमारी पुरी टीम है...''

''मेरे सामने भी साहित्यकारोंकी टीम है'' अटलजी म्हणाले आणि मग ते मृदू आवाजात करण थापर यांना म्हणाले,

''आधी साहित्यकार, मग पत्रकार.''

रतनलाल सोनग्रा व लहू कानडे भारावून गेले.

■ ■ ■

# १३. वेडात खरोखर जग जगते

पुण्याच्या शिवाजीनगर स्टेशनजवळची भारत इंग्लिश स्कूल ही शाळा ! या शाळेत एक निष्ठावंत शिक्षक होते. सोमनाथ बाबुराव वाईकर हे त्यांचं नाव. हिंदीचे शिक्षक असलेले वाईकर इतर विषयसुद्धा अत्यंत तन्मयतेने शिकवीत असत. वाईकर विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय होते. केवळ धडे शिकवणारा मास्तर नव्हे तर धडा घालून देणारा शिक्षक ही त्यांनी ख्याती मिळवली होती. मूळचे वाईचे असलेले वाईकर घराणे चार पिढ्यांपूर्वीच व्यवसायानिमित्त पुण्यात आले होते.

भारत इंग्लिश स्कूलमध्ये वाईकरांची २५ वर्षे नोकरी झाली. वाईकर मूळचे जंगम जातीतले होते. ज्या काळात वाईकरांचा शाळाप्रवेश विद्यार्थी म्हणून झाला होता त्या काळात त्यांच्या शाळेच्या दाखल्यात त्यांच्या जातीचा उल्लेख होता हिंदू बिगरमागास !

आता मात्र सरकारी धोरणानुसार जंगम ही जात अनुसूचित जातीत समाविष्ट करण्यात आली होती.

आणि वाईकरांच्या नशिबाचं दार एका संधीनं ठोठावलं...

ती संधी होती मुख्याध्यापकाची.

वास्तविक वाईकरांपेक्षा सेवाज्येष्ठ असलेले त्यांचे सहकारी तिथं होते. पण मुख्याधापक पदावर आता अनुसूचित जातीतील शिक्षकाची नेमणूक करायची होती. संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी श्री.र.म. कुलकर्णी आणि गो.व्यं.शिंगरे यांनी वाईकरांना आवर्जून बोलावून घेतलं आणि सांगितलं....

"वाईकर मुख्याधापक पदाची जागा रिक्त आहे. अनुसूचित जमातीतील शिक्षकाची त्या जागेवर नेमणूक करायची आहे. तुम्ही जंगम आहात. तुमची जात अनुसूचित जातीमध्ये आता समाविष्ट करण्यात आली आहे. तुम्हाला संधी आहे. तुम्ही अर्ज करा."

वाईकरांनाही क्षणभर मोह वाटला. सहज चालून येणारी संधी. वृक्षाखाली ओंजळ करुन उभं राहावं आणि अलगद ओंजळीत फळ पडावं तशी अवस्था !

तर मुख्याधपकपद त्यांच्यासाठीच होतं.

पण...

एक अडचण होती.

त्यासाठी समाजकल्याण खात्यामार्फत अर्ज करून मूळच्या वाईच्या दाखल्यात हिंदू बिगरमागासऐवजी अनुसूचित जाती असा उल्लेख करून सुधारणा करून आणायला हवी होती.

आणि वाईकरांच्या दृष्टीने हाच अडसर होता.

खरं तर कोणतीच समस्या नव्हती.

कायदा वाईकरांच्या बाजूने होता.

एक अर्ज करायचा अवकाश, सारं काम सुरळीत होणार होतं.

पण वाईकर जातिवंत शिक्षक...विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे शिक्षक; अध्यापनात रस घेणारे शिक्षक.

मुख्याधापक झाल्यावर कोणकोणती काम करावी लागतील याचं चित्रच वाईकरांना डोळ्यासमोर दिसू लागलं.

अध्यापन कमी आणि प्रशासन जास्त....

संस्था, पालक शिक्षणखाते, विद्यार्थी, शिक्षक या सर्वांचाच संबंध यायचा.. कधी बोलावं लागणार, कुणाला मेमो द्यावा लागणार, प्रवेशाच्या वेळी कुणाला नाही म्हणून दुखवावं लागणार.....अशा अनंत गोष्टी कराव्या लागणार..

मग वाईकरांना आपले शाळेतले तास दिसू लागले...

विद्यार्थ्यांचे प्रफुल्ल चेहरे, काही तरी नवीन समस्यांना त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान, वर्गात निर्माण होणारी सुंदर संवादी लय...तास संपताना विद्यार्थ्यांचे दिसणारे आनंदी समधानी चेहरे....

या सर्व आंदोलनाला विरजण घालून ठेवावे लागणार...

आणि त्या आनंदाच्या मोबदल्यात मिळणार काय...

मुख्याध्यापकपदाची प्रतिष्ठा... तीही जातीच्या आधारावर..सोमनाथ वाईकरांनी विचार केला...''मी खरा जंगम आहे. मला कागदोपत्री जंगम व्हायचं नाही. माझ्या विद्यार्थ्यांना आनंद देणारा मी जंगम आहेच, लोक मला वेडा म्हणतील, म्हणू देत. वेडात खरोखर जग जगते''....आणि वाईकरांनी मुख्याधापकपद नाकारलं.

■ ■ ■

# १४. थुंकणे आणि पाया पडणे

महात्मा गौतम बुद्ध हे सत्त्वशील समाजप्रबोधक होते. आपल्या उदात्त आचरणातूनच ते सर्वसामान्यांचे प्रबोधन करीत. एका गृहस्थाला गौतम बुद्धांचा राग आला होता. खूप खूप राग आला होता. मग त्यानं काय करावं ?

गौतम बुद्ध बोधिवृक्षाखाली ध्यानस्थ बसले असताना ही क्रोधमूर्ती तावातावानं तिथं गेली आणि...

गौतम बुद्ध शांत !

त्यांनी हळूच डोळे किलकिले करून त्याच्याकडं फक्त बघितलं. त्या क्रोधमूर्तीला वाटलं....

आता गौतम बुद्ध उठणार, आपल्या अंगावर येणारं, आपली मानगूट पकडणार, आपल्याला जाब विचारणार आणि मोठ्यानं बोलून आपली कानउघाडणी करणार...

पण असं काहीच झालं नाही.

हा ज्याची वाट बघत होता तसं काहीच घडलं नाही.

मग यानंच गौतम बुद्धांना विचारलं....

''मी आपल्या अंगावर थुंकलो हे आपल्याला समजलं ना ?''

''हो, समजलं ना'' बुद्ध शांतपणे म्हणाले.

''मग आपण रागवला नाहीत ?''

''नाही रागावलो.'' पुन्हा बुद्ध शांतपणे म्हणाले.

''हे कसं काय ? मी थुंकलो तरी तुमची काहीच प्रतिक्रिया नाही.''

''म्हणजे ?यात स्वातंत्र्य आणि गुलामीचा संबंध येतोच कुठं ?''

''येतो ना.''

''तो कसा काय ?''

'' हे पहा, तुम्ही थुंकलात म्हणजे तुम्हाला राग आला होता हे मला समजलं. तुमचा क्रोध तुम्ही थुंकण्याद्वारा प्रकट करून मला तुम्ही काही सांगितलंत.

अर्थातच मी काहीतरी करावं अशी जणू तुम्ही मला आज्ञाच केलीत. तुमचं थुंकण ही तुम्ही मला काहीतरी कृत्ये करण्याबद्दल केलेली आज्ञा होती.''

''मला ?''

''तुमची आज्ञा मी का पाळावी ? मी तुमचा गुलाम नाही. तुम्ही कोणतीही क्रिया करावी आणि त्याबरहुकूम मी चालावं. प्रतिक्रिया करावी म्हणजे मी तुमचा गुलामच नाही का ?''

''महाराज मी थक्क झालो.''

''अहो प्रत्येक व्यक्तीनं असं स्वतंत्र व्हायला हवं. स्वत: विचार करावा. दुसऱ्याच्या तालावर नाचू नये.''

हे सर्व विचार ऐकत तो थुंकणारा खाली मान घालून निघून गेला. गौतम बुद्ध शांतपणे त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं बघत होते आणि मंद स्मित करीत होते आणि अचानक दुसऱ्या दिवशी थुंकणारी क्रोधमूर्ती पुन्हा आली; पण आता त्याचा चेहरा पडलेला होता. तो आला आणि गौतम बुद्धाचे पाया पडला. अजिजीच्या स्वरात तो म्हणाला–

''महाराज आपण मला क्षमा करावी ?''

''कशाबद्दल ?''

''माझ्या हातून काल दुर्वर्तन घडलं. मी आपणावर थुंकलो. मला क्षमा करा. मी शरण आलो आहे. माझी मलाच लाज वाटते.''

''हे बघा, मी तुम्हाला क्षमा करणार नाही.''

''म्हणजे ? आपण तर थोर सत्पुरुष आहात. क्षमा आपला धर्म....''

''हो पण तुम्ही पुन्हा गुलामीतच राहायला लावता आहात ?''

''म्हणजे ?''

''काल तुम्ही थुंकलात तेव्हा मला रागवायला सांगत होतात, तोच तुम्हाला पश्चाताप झाला तेव्हा मला क्षमा करायला सांगत आहात. तुम्ही काहीतरी सांगायचं आणि मी त्याप्रमाणे वागायचं म्हणजे गुलामीच...''

''पण महाराज...''

''तुमच्या मनानं तुम्हाला पश्चातापाची जाणीव दिली आहे ! मग ती पुरेशी आहे. क्रोध प्रकट करतानाही तुम्ही विचार करायला हवा होता. तुम्ही विकाराचे गुलाम झालात. असे गुलाम होऊ नका. स्वतंत्रपणे विचार करा. मला बघा..तुम्हीच तुमचे राजे व्हाल ! स्वतंत्र विचार हेच आपलं साम्राज्य !

■ ■ ■

# ९५. दिलूचे भाग्य

रोज रस्त्यावर कचरा गोळा करणारी ती एक मुलगी. शिलू तिचं नाव. तिची आई, मावशी, भाऊ, बहीण सगळे याच कामात होते. भल्या पहाटे उठून ही मंडळी शहराच्या मध्यवर्ती भागातल्या ठिकाणी येत, निरनिराळ्या घरी कचरा गोळा करून तो एकत्र करणे, निवडून भंगार साठवणे आणि मग ते विकणे असा या मंडळींचा व्यवसाय होता.

शिलू नेहमीप्रमाणे कचराकुंडी धुंडायला गेली आणि त्या दिवशी तिला काय दिसलं....

कचऱ्याच्या ढिगावर एक लहानसं गोजिरवाणं पिलू, ते निपचित पडलं होतं. त्याला धाप लागली होती. कुणी तिथं टाकलं की ते येऊनच बसलं....

पिलू छान होतं. शरीरावर नक्षी काढल्यासारखे पांढरे-पिवळे ठसे होते. डोळे पाणीदार होते. ते पिलू शिलूकडं केविलवाणंपणानं बघत होतं.

शिलूनं त्याला अलगद उचललं. जवळ घेतलं, कुरवाळलं. आईनं मुलाला जवळ घेतल्यावर जसं वाटतं तसं त्या पिलाला वाटलं. त्याच्या डोळ्यातल्या भावांनी शिलूला वाईट वाटलं. मग ती त्याला कट्ट्यावर घेऊन गेली.

एका फाटक्या बस्करावर झाडाखाली त्याला अलगद ठेवलं. त्याला पाणी पाजलं आणि तिला कुणीतरी दिलेले दोन पावाचे तुकडे तिनं त्याला खायला दिले. अंगावर पांघरूण घालून ती बिल्डिंगमधील कचरा गोळा करण्याच्या कामाला निघून गेली.

दोन तासांनी आली तेव्हा त्या पिलाचा चेहरा टवटवीत झाला होता. त्याला आधार मिळाला होता, आसरा मिळाला होता.

आता शिलूनं त्याचं नाव 'दिलू' ठेवलं होतं. शिलू-दिलूची जोडी त्या भागात कचरा गोळा करण्याच्या कामावर हिंडू लागली. शिलूला कुणीतरी उरलेले बिस्किटांचे तुकडे, पाव देत तेव्हा ती प्रथम दिलूला द्यायची. शिलूची आई म्हणायचीसुद्धा...

आपल्याला नवीन वाटेकरी झालाय. ''घरचं झालं थोडं-''

पण शिलूची दिलूवर खूप माया जडली होती.

आता दिलूनं चांगली उभारी धरली होती. दिलू एक देखणा कुत्रा दिसू लागला. त्याच्या अंगावरच्या नक्षीनं त्याच्या सौंदर्यात भर पडली होती. त्याची जात काही वेगळीच वाटत होती. त्याचे डोळे पाणीदार होते. त्याचे उभारीचे कान छान दिसत असत. गोंडस शेपूट शरीराला एक वेगळाच घाट देणारी होती.

एकदा शिलू आणि दिलू दोघेही कचरा गोळा करण्याच्या कामगिरीवर चालले होते.

एका बिल्डिंगमध्ये शिलू शिरली. तिच्याबरोबर दिलूही होता. इतक्यात बिल्डिंगमध्ये असलेल्यांच्याकडे येणारी एक नखरेल पाहुणी दारातून बाहेर पडली

आणि ती दिलूला बघताच थबकली.

''हाऊ स्वीट इज द पपी'' असं ती जीन्सवाली बाई म्हणाली.

तिला देखणा दिलू फारच आवडला होता. तिनं शिलूला विचारलं...

''कोणाचा आहे गं हा पपी ?''

''माजाच हाय..मला उकिरड्यावर मिळाला.''

''छान. देतेस मला ?''

''न्हाई बा..माजा दोस्त हाय त्यो.''

''अगं तुला पन्नास रुपये देते ना.''

पन्नास रुपये म्हटल्यावर शिलूची आई पाघळली आणि तिनं दिलूला त्या बाईला देऊन टाकलं....

शिलू हिरमुसली; पण काय करणार !

आणि दिलूला त्या जीन्सवाल्या बाईनं उचलून आपल्या इंडिका गाडीत ठेवलं. आपल्या गुबगुबीत मांडीवर त्याला घेऊन ती बसली. गाडी सुसाट पुढं गेली...

आता दिलू मोठा झाला. उकिरड्यावरचा दिलू आता मोठ्या बंगल्यात राहतो. आणि....

ज्या शिलूनं त्याला उकिरड्यावरून आणलं, ती शिलू अजूनही कचरा गोळा करते.

दिलूच्या बंगल्यातला कचरा शिलूच गोळा करते आणि दिलू शिलूला मालकिणीनं सांगितल्याप्रमाणे पावाचे तुकडे आणून देतो !

■ ■ ■

# १६. देव झाला पंडित

मराठवाड्यातलं एक दूरस्थ गाव. नाव त्याचं निधोने. या गावाला प्रसिद्धी मिळावी, ते नकाशावर ठळकपणे यावं, असं त्या गावात काहीच नव्हतं. त्या गावात एक देव कुटुंब राहत होतं. देवमाणसच ती. भाऊसाहेब देव कर्ता पुरुष. भाऊसाहेबांना तीन मुलगे. त्रिमूर्ती देव भावंडं एकमेकांवर खूप प्रेम करणारी होती.

आणि अचानक या निधोने गावात बातमी आली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक निधोने गावात येणार...

ही बातमी वाऱ्यासारखी पसरल्यावर निधोने गाव शहारलं. साक्षात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आपल्या या दूरस्थ गावात येणार, याचं गावकऱ्यांना खूप अप्रूप वाटलं.

गावकऱ्यांनी जोरदार तयारी केली. घराघरांच्या अंगणाबाहेर रांगोळ्या काढल्या, रस्ते स्वच्छ केले.

लोकमान्य टिळक आले. त्यांच्याबरोबर विदर्भाचे दादासाहेब खापर्डे होते. लोकमान्य खापर्ड्यांबरोबर गेले ते देवांच्या घरी.

भाऊसाहेब देवांच्या घरीही आज जणू दिवाळीसण होता. लोकमान्य टिळक येणार म्हणून जय्यत तयारी होती. मामीसाहेबांनी स्वयंपाकाचा वेगळा घाट घातला होता.

भाऊसाहेब देवांचे तीन पुत्र खेळण्यात मग्न होते. त्यांना या कार्यक्रमाचं विशेष काही वाटत नव्हतं.

भाऊसाहेबांनी अंथरलेल्या शुभ्रासनावर लोकमान्य, दादासाहेब बसले. आधी विचारपूस, गप्पा संपल्या. एव्हाना जेवणाची वेळ झाली. सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतल्यावर पुन्हा बैठक बसली.

"भाऊसाहेब, आज आम्ही तुमच्याकडं वेगळ्या कामासाठी आलो आहोत. मला थोडी कल्पना आहे; पण आपलं सविस्तर सांगावं...."

"आपल्याला विदित आहेच की पुण्याच्या सरदार पंडितांना दत्तक हवाय. ती जबाबदारी आम्ही घेतली आहे. आपल्या पुत्रांपैकी कोणाला तरी दत्तक घ्यावा असा विचार आहे", लोकमान्य म्हणाले.

''होय महाराज, आपणाला निवडीला वाव मिळावा म्हणून आमच्या चुलत घराण्यातली आणखी दोन-तीन मुलं आम्ही बोलावली आहेत.''

''चालेल, त्या सर्वांनाच इथं बोलवा. आम्ही त्यांच्याशी बोलू.'' त्याप्रमाणे सहा-सात मुलं आली.

लोकमान्य टिळक आणि दादासाहेब खापर्डे एकेका मुलाशी बोलत होते. आधी चुलत घराण्यातील मुलं समोर आली.

आणि मग भाऊसाहेबांच्या तीनही पुत्रांना समोर आणले गेले. सामान्यपणे अशावेळी थोरल्या मुलाची निवड होते असा त्यावेळी रिवाज होता. त्याप्रमाणे भाऊसाहेबांच्या ज्येष्ठ चिरंजीवांची निवड होणार, असंच सर्वांना वाटलं.

''तू पुढं काय करणार आहेस ?'' दादासाहेबांनी विचारलं.

''मी पुढे वडिलांचा व्यवसाय करणार आहे.'' उत्तर आले.

मधला मुलगा जगन्नाथ...

तो भिंतीवर कोरलेल्या हनुमानाकडं अनिमिष नेत्रांनी बघत होता. आधीचे संवाद त्याने शांतपणे पण आत्मविश्वासाने ऐकले होते. मग जगन्नाथला पुढं बोलावलं....

''तू पुढं काय होणार ?'' लोकमान्यांनी विचारलं.

''मी खूप मोठा होणार आणि घोडागाडीत बसणार!''जगन्नाथ उत्तरला.

एवढं म्हणून तो दादासाहेबांच्या मांडीवर जाऊन बसलादेखील.

लोकमान्य त्याच्याकडं कौतुकानं बघत होते. ते एकदम म्हणाले,

''ठरलं दादासाहेब, हाच मुलगा योग्य आहे. हा तुमच्या मांडीवर आत्मविश्वासानं येऊन बसला. यालाच आता पंडितांच्या मांडीवर देऊ.''

आणि मग जगन्नाथला पंडितांकडं दत्तक द्यायचं ठरलं. त्यादिवशी रात्री जगन्नाथाच्या आईचे डोळे सतत गळत होते. भाऊसाहेबांनाही गलबलून आलं होतं; पण मुलाच्या कल्याणाचा विचार करून त्यांनी भावनावेग आवरला.

यथावकाश दत्तकविधान झालं.

जगन्नाथाचा जगन्नाथमहाराज झाला.

देवाचा झाला पंडित !

याच जगन्नाथमहाराजांनी शि.प्र.मंडळीला आणि टिळक स्मारकाला आपली जागा उदारतेने देऊन लो. टिळकांचं ऋण अंशत: फेडलं. देव असलेल्या पंडितांनी समाजमनावर आपली नाममुद्रा उमटवली.

■ ■ ■

# १७. रानवाऱ्याचा गंध

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव हे व्यापारी महत्त्वाचे केंद्र असलेले लहानसे गावं; पण या गावाची सांस्कृतिक ओळखही तितकीचं महत्त्वाची आहे. सुखाचा मूलमंत्र मराठी साहित्याला देणारे थोर कादंबरीकार नारायण हरी आपटे, कोरेगाव शांतीलाल भंडारी हे लेखक इथलेच. आधुनिक काळात वाङ्मयीन व शैक्षणिक चळवळीत नाव घेण्यासारखे गाव म्हणजे कोरेगाव!

याच कोरेगावात डॉ.श्रीनिवास कात्रे राहतात.

हे डॉक्टरेट मिळवलेले तत्त्वज्ञानी डॉक्टर शिक्षक आहेत. सरस्वती विद्यालयात सलग तीन तपे सेवा करून या डॉक्टराने या भागातील दोन पिढ्या घडवल्या.

शालान्त परीक्षेत सरस्वती विद्यालयाचे सारस्वत विद्यार्थी चमकू लागले.

कात्रे निवृत्त झाले; पण त्यांचे शिकविणे थांबले नाही. आदर्श शिक्षकाचा पुरस्कार मिळालेले कात्रे आता कोरेगावच्या अनौपचारिक शाळेत शिकवू लागले.

त्यांनी समाजकार्यात स्वत:ला झोकून दिले.

ग्राहक चळवळीचा कार्यकर्ता म्हणून कार्य सुरु केले.

आकाशवाणीवरुन 'ग्राहकराजा' या विषयावर चिंतनात्मक प्रबोधन केले.

संत वाङ्मयाचा अभ्यास करुन लेखन केले.

कोरेगाव रोटरी क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळून अनेक उपक्रम राबविले.

आणखी किती संस्थाचा भार त्यांनी उचलावा...

रेडक्रॉस सोसायटी, ना.ह.आपटे स्मारक समिती, निवृत्त मुख्याध्यापक संघ. ज्येष्ठ नागरिक संघ यांचे संस्थापक, पी.जी.फाऊंडेशनचे संस्थापक.

आणि अशाच कितीतरी सामाजिक, सांस्कृतिक संस्थांचे सल्लागार. आपल्या विद्यार्थ्यांशीही कात्रे सरांचे जिव्हाळ्याचे नाते असते. अधिकारी वा कर्मचारी, दुकानदार वा मामलेदार... या सर्व विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे नाते असणारे

कात्रे सर सर्वांना हवे हवेसे वाटतात. रामचंद्र बोताललानी या नावाचा एक विद्यार्थी त्यांचा एक विद्यार्थी एस.टी.मध्ये कर्मचारी म्हणून भरती झाला.

ट्रॅफिक इन्स्पेक्टर म्हणून रामचंद्राला बढती मिळाली. रामचंद्र आपल्या गुरुवर्याचा आशीर्वाद घेण्यासाठी गेला.

गुरुवर्यांनी प्रेमभरनं त्याला पुढील वृद्धीसाठी आशीर्वाद दिला. गुरुवर्यांच्या भावांनी 'ट्रॅफिक' अशी दुहेरी असते.

गुरुवर्य कात्रे आता पंच्याहत्तर वर्षांचे झाले.

सर्व कामं तितक्याच तडफेनं सुरु होती.

पण काही प्रमाणात वय बोलू लागलं होतं.

कात्रे याचं कौटुंबिक आयुष्य सुखसमाधानाचं आहे. त्यांचे चिंरजीव जयंत हे उच्चविद्याविभूषित आहेत. त्यांनी इंजिनियरिंगवर पुस्तकं लिहून आपल्या क्षेत्रात वडिलांसारखा नावलौकिक मिळवला आहे.

एक कन्या ललिता शिक्षणक्षेत्रात आहे.

दुसरी कन्या अपर्णा संत....

प्रख्यात गायिका....

सारेचजण पुण्यात असतात.

मुलांना वाटतं....

बाबांनी आता कोरेगावातून पुण्यात यावं. पुण्याच्या सांस्कृतिक जीवनातही त्यांना हवी ती उर्जा मिळेल. सर्वांना जवळ राहता येईल. मुलांनी मनोदय बोलून दाखविला.

पण श्रीनिवास कात्रे यांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही. एकदा मुलांनी फारच आग्रह केला तेव्हा कात्रे हसून म्हणाले-

"माझी कर्मभूमी कोरेगाव आहे. हयात इथं गेली. आता या वयात दुसरीकडं जाऊन नातं निर्माण करायचं म्हणजे कठीण माझी नाळ या भूमीशी जोडलेली आहे. इथला रानवारा पिऊनच मी जगलो-वाढलो. हा रानगंध माझी उर्जा आहे. पुणं तिथं काय उणं! पण त्या रानगंधाची उणीव भासेल. नाळ कशाला तोडू!"

■ ■ ■

# १८. तलावातले चांदणे

'तलावातले चांदणे' हे काही एखाद्या दमदार कथासंग्रहाचं किंवा लुसलुशीत काव्यसंग्रहाचं नाव नाही. ही आहे श्रमाची कथा. या कथेला घर्मबिंदूचा गंध आहे. या कथेला राबणाऱ्या हातांनी दिलेला ताल आहे. तर गोष्ट अशी-

मावळ मुलखातलं बवरे आडनावाचं एक कुटुंब. वडगाव मावळ हे इतिहासप्रसिद्ध गाव. याच गावात अनेक बवरे कुटुंब राहत होती. यातील एक बवरे कुटुंब म्हणजे प्रसिद्ध स्वातंत्र्यसेनानी तात्याराव बवरे यांचं. उंचनिंच बांधा, कमावलेली शरीरयष्टी, भेदक डोळे, रुंद कपाळ, चालण्या-बोलण्यात रुबाबदारपणा असे तात्याराव म्हणजे वडगावातला एक हिरा होता.

तात्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा परिचय नुसता कुटुंबालाच नव्हे तर वडगावात, जिल्ह्यात आणि शेकडो परिचित मित्रांना होता. अतिशयोक्ती वाटेल; पण तात्या बवरे म्हणजे उत्तम नट, उत्तम दिग्दर्शक, उत्तम वक्ते, उत्तम खेळाडू, उत्तम चित्रकार, उत्तम छायाचित्रकार, करारी देशभक्त, प्रेमळ मातृ-पितृभक्त आणि गरिबांचे कैवारी होते. इंदू पोफळेची सुशीला बवरे पत्नी होऊन तात्यांना साथ देऊ लागली. लग्नाच्या वेळीच मोरेश्वर तथा तात्या यांनी पत्नीला कल्पना दिली होती की आपला संसार म्हणजे इतरांसारखा चूलबोळक्यांचा सामान्य संसार नाही. समाजाचा संसार करावा लागणार आहे, याची इंदूताईंना कल्पना होती. तात्यारावांचे समाजकार्य जोरात सुरू होते. वडगावचे ग्रामदैवत पोटोबा. या पोटोबाच्या देवळालगत रेल्वे लाइनला लागून एक तळे होते. तळे वर्षानुवर्षे गाळाने खचाखच भरले होते. मग तात्यारावांनी एक श्रमदान शिबिर घेतले. तळ्यातला गाळ काढण्याचं काम सुरू झालं.

एस.एम. जोशी आणि प्रधानमास्तर याच कामासाठी आले होते. ते तात्या बवरे यांच्याकडे राहत. नानासाहेब गोरे, लालाजी कुलकर्णी, श्यामकांत मोरे, विमल गरुड, भाई वैद्य, शिरुभाऊ आणि अनुताई लिमये, माई केदारी अशा नामवंत व्यक्ती या कामात सहभागी झाल्या होत्या.

रमेश भांबळ, गुलाबभाई मारुती ठिगळे, उमाकांत भावसार, म्हाळसकर या सर्वांचे हात लागले.

तळ्यातले पाणी काढले आणि तळ्यातल्या गाळाचे विराट झाले.

मग शेकडो फावडी, घमेली आली आणि गाण्याच्या तालावर श्रमयज्ञ सुरू झाला.

एके दिवशी प्रा.दाभोळकर (पुढे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले) डोक्यावर पत्र्याची ट्रंक घेऊन आले. त्यावेळेपर्यंत आजच्यासारख्या व्ही.आय.पी बॅगा नव्हत्या. भविष्यातील कुलगुरू थेट गाळाला भिडला होता. आणखी एक भविष्यातील कुलगुरू या श्रमयज्ञात सामील झाला होता. त्याचं नाव होतं डॉ. राम ताकवले.

डॉ. राम ताकवले फावड्यानं गाळ काढता काढता स्वत: अगदी गाळमय झाले होते.

तिकडं कुणीतरी गाण्यांनी साद घालीत होते.

'एक तास एक तास
द्या देशाला एक तास
करा करा श्रम एक तास...'

आणि त्या लयीवर हात चालत होते. शिक्षण, पदवी, नोकरी समजातलं स्थान सगळं विसरून तलावातलं चांदणं बघायला मंडळी अधीर झाली होती.

असंख्य ट्रक गाळाने भरले.

सर्वांची सोय गावकऱ्यांनी छान केली होती.

बंडा फणसळकर नावाचा एक कार्यकर्ता या कामात अत्यंत उत्साहानं आणि तडफेनं काम करीत होता. त्याला सर्व लोक 'तळेश्वर' असंच म्हणत.

७०-८० लोक एकावेळी काम करीत होते. श्रम विसरण्यासाठी गाणी, गोष्टी, नकला, पोवाडे, देशभक्तीपर गीते होतीच....

आणि मग...

तलाव स्वच्छ झाला.

गाळानं खचाखच भरलेल्या तलावाचा तळ सुंदर दिसू लागला. श्रम कारणी लागले. तात्या बवरे यांच्या प्रेमळ हक्काचा आणि सुशीलाताईंच्या अगत्याचा प्रभाव! तलावातलं चांदणं सर्वांना सुखावून गेलं!

■ ■ ■

# १९. अमर भूपाली

'घन:श्याम सुंदरा श्रीधरा
अरुणोदय झाला
उठी लवकरी वनमाळी
उदयाचळी मित्र आला....'

शाहीर होनाजी बाळा यांच्या या सुंदर शब्दांना सुरेल साज चढविणारे संगीतकार वसंत देसाई म्हणजे एक अजब रसायन होतं.

उत्तम संगीतकार
उत्तम व्यायामपटू
उत्तम नकलाकार
उत्तम अभिनेते

असा सगळा गुणमेळ त्यांच्या ठायी होता.

निसर्गसुंदर कोकणातल्या कुडाळमध्ये ९ जून १९१२ रोजी जन्मलेला वसंता वयाच्या आठव्या वर्षांपासूनच हार्मोनियमशी खेळू लागला. कोकणातली कीर्तनं, अभंग, दशावतार यांचे संस्कार घेता घेता कोकणातले सारे सूर यानं साठवून ठेवले होते. पावसाचे, धबधब्याचे आवाज, पक्ष्यांची किलबिल, बैलांच्या गळ्यातील घुंगरांचे आवाज त्याला साद घालीत होते.

वसंतरावांचं आधीचं नाव होतं आत्माराम; पण त्यांचा आत्माराम संगीत वसंतानंच अधिक फुलू-फळू लागला.

मग कोल्हापूरच्या प्रभात फिल्म कंपनीत काम सुरू झालं. पहिला पगार तीन रुपये, मग सात रुपये. पडेल ते काम. कधी गायचं, कधी नाचायचं, कधी समूहदृश्यात उभं राहायचं. हे सगळं करता करता अल्लादियाँ खाँ, मंजिखाँ, इनायत खाँ यांच्याकडून मिळतील तसे संगीताचे धडेही घेतले.

राजा हरिश्चंद्र या चित्रपटात राजाचा भाट नांदी म्हणतो, ते वसंत देसाई यांनी गायिले आहे. मग गोविंदराव टेंबे यांनी त्यांना हेरलं. गोविंदराव टेंबे, मास्टर

कृष्णराव, केशवराव भोळे या त्याकाळच्या प्रख्यात संगीतकारांकडे काम करायची संधी मिळाली.

१२-१३ वर्षे प्रभातमध्ये काढल्यावर वसंतराव देसाई राजकमलमध्ये आले आणि तिथं त्यांचा संगीत वसंत अधिक बहराला आला. संत ज्ञानेश्वर सिनेमातला गाडीवान आठवतो का ?

'आम्ही दैवाचे, दैवाचे शेतकरी....' हा शेतकरी म्हणजेच वसंत देसाई !

मग अमर भूपाळी सिनेमा करायचा होता.

वसंतरावांनी जुन्या शाहिरी वाङ्मयाचा खूप अभ्यास केला. एवढंच नाही तर होनाजी बाळा शाहीर यांचा १५० वर्षांपूर्वीचा तानपुरा मागवून घेतला. संपूर्ण चरित्राचा अभ्यास केला. होनाजी जिथं जिथं वावरला तिथं तिथं जाऊन धांडोळा घेतला.

आणि मग अमर भूपाळी या चित्रपटातलं बहारदार संगीत जन्माला आलं.

''सांगा मुकुंद कुणी हा पाहिला'

'लटपट लटपट तुझं चालणं गं मोठ्या नखऱ्याचं बोलणं गं मंजुळ मैनेचं...'

ही बहारदार लावणी जन्माला आली.

हिंदी चित्रपटसृष्टीतही वसंत देसाई यांनी खूप पराक्रम केला.

५० हिंदी व २० मराठी चित्रपटांना संगीत दिलं. पंडितराव जगन्नाथ यासारख्या नाटकांना बहारदार संगीत दिलं.

आणि एक दुर्दैवाचा फेरा ओढवला.

एके दिवशी वसंतराव देसाई अशीच एक मैफल आटोपून येत होते. हातात त्यांचा आवडता मोगऱ्याचा गजरा होता. तोंडानं ते गाणं गुणगुणत होते. मनात सूर रुंजी घालत होते. आता घरी जायचं आणि पुन्हा तानपुरा ओढून बसायचं असं जणू त्यांनी ठरवलंही होतं.

काळ टपून बसला होता. त्यानं आपला फास सज्ज ठेवला होता. वसंत देसाई नामक अजरामर संगीतकाराचा वार त्याच्या लेखी त्यानं राखून ठेवला होता. वसंतरावांना त्याची सुतराम कल्पना नव्हती. वसंतराव आपल्या राहत्या इमारतीच्या तळाशी आले. त्यांनी लिफ्टचा दरवाजा उघडला. आत शिरणार...शरीर आत अर्धच. लिफ्ट सुरु झाली आणि करवतीनं कापावं तसा चिरला.. अमर भूपाळीचा कर्ता गतप्राण झाला. त्यांच्या भूपाळीचे सूर मात्र अजरामर झाले.

■ ■ ■

# १००. मोटारीचे बलिदान

मुंबईत कुर्ल्याच्या नेहरुनगरमध्ये राहणारे प्रभाकर गोपाळ पटवर्धन हे एक हरहुन्नरी गृहस्थ आहेत. उत्तम चित्रकार असलेले पटवर्धन व्होल्टासमध्ये आर्ट डायरेक्टर या पदावर होते तर त्यांच्या पत्नी वैशाली या टाइम्स ऑफ इंडियामध्ये होत्या. मूळचे वाईचे असलेले पटवर्धन मुंबईद्वारा आता पुण्यात निवृत्त आयुष्यासाठी आले आहेत; पण मधेच एक जीवघेणा प्रयोग त्यांच्या कलात्मक जीवनात घडून गेला.

त्याचं असं झालं.

प्रभाकरपंत आणि त्यांचे मित्र नरहरी लेले आणि आणखी दोघेजण दादरहून पुण्याला येण्यासाठी स्वत:च्या गाडीनं निघाले. दुपारच्या अडीचच्या सुमारास त्यांनी ठाणे सोडले आणि द्रुतगती मार्गावरून गाडी द्रुतगतीनं धावू लागली. नरहरी गाडी चालवीत होते. एरवी ते अत्यंत कुशल चालक होते. वाहनावर विलक्षण ताबा होता;पण.....

त्या दिवशी काय घडलं कुणास ठाऊक.

चार वाजण्याच्या सुमारास...

उर्से नाक्याच्या रस्त्यावरून गाडी वेगाने पळत होती. नरहरी गाडी चालवीत होते. शेजारी प्रभाकरराव बसले होते....

गाडी मधला रस्ता सोडून उजव्या बाजूने वेगाने जात आहे असं शेजारी बसलेल्या प्रभाकरपंतांच्या ध्यानात आलं....ते ओरडले...दुर्दैवानं गाडीचा उजवा ब्रेक जाम झाला होता. रस्त्यावरुन ३०-३५ फूट फरफटत गाडी रस्त्याच्या मध्यावरील ७२ दगड, अनेक कुंड्या उडवीत पुढे गेली. समोर असलेल्या अडथळ्यांवर जोरात धडकून गाडी पूर्णपणे उलटी होऊन थांबली.

खाली डोकं वर पाय...

अशा स्थितीत मोटारीत सर्वजण अडकलेले....

काचा फुटलेल्या, दरवाजे ब्लॉक असल्याने उघडत नव्हते. चौघांपैकी

कोणालाच इतरांना काय झालंय हे कळणं शक्य नव्हतं, अशा अवस्थेत सर्वजण होते.

सुदैवानं प्रभाकर व नरहरी शुद्धीवर होते; पण मागं बसलेल्या विनायकराव व तात्या यांचा काहीच आवाज येत नव्हता. रस्त्यावरून इतर वाहनं सुसाट पळत होती. कोण अशावेळी दखल घेणार होतं...पण आणखी एक आक्रित झालं.

कोठूनतरी चार व्यक्ती एकदम आल्या.

त्यांनी सांगितलं...आम्ही तुम्हाला बाहेर काढतो.

त्यांनीच खटपट करून दरवाजा उघडला आणि प्रथम प्रभाकरपंताना बाहेर काढलं. मग यथावकाश नरहरी, विनायक, तात्या यांना बाहेर काढलं. सर्वजण एकमेकांकडे बघत होते. थोडंस खरचटण्यापलीकडं कुणालाच काही झालेलं नव्हतं, हे आश्चर्य !

त्याक्षणी योगायोगानं प्रभाकरपतांना आठवण झाली ती गोंदवलेकर महाराजांची.

जणू काही महाराजांनीच त्यांच्या अभयवचनाप्रमाणे सर्वांना पाठीशी घेऊन वाचवलं होतं.

सर्वांचे नातेवाईक आपापल्या गाड्या घेऊन अपघातस्थळी आले आणि त्यांनी हायसं वाटून आश्चर्य व्यक्त केलं.

आश्चर्य म्हणजे सुरुवातीच्या काही क्षणातच ज्या चार माणसांनी प्रभाकर, नरहरी, विनायक, तात्या यांना उलट झालेल्या गाडीतून सुखरूप बाहेर काढलं ती चार माणसं अचानक कुठं गेली ते यांना कळलंच नाही. त्यांचं नाव, गाव, पत्ता, फोन नंबर विचारायचं राहून गेलं आणि त्या माणसांनीही आपली विशेष ओळख दाखविली नाही. जणू काही ते एवढ्याच कारणासाठी अवतरलेले देवदूत होते.

उर्से नाक्याजवळ गाडी पूर्णपणे उलट्या अवस्थेत पडली होती. गाडीला ठिकठिकाणी पोचे गेले होते. चाकं निखळली होती. टप फाटला होता. इंजिन नादुरुस्त झालं होतं.

पुराणातल्या अष्टावक्रासारखी गाडीची स्थिती झाली होती. असं वाटतं होतं की अपघाताचे धक्के स्वत:च्या अंगावर झेलत या माऊलीनं आपल्या प्रवासी बाळांना वाचवलं होतं. गाडीनं स्वत:चं बलिदान करून यांना वाचवलं होतं. नरहरीनं गाडीला हळदी-कुंकू वाहून ती गाडी विमा कंपनीच्या हवाली केली. असं मोटारीचं बलिदान !

■ ■ ■

# १०१. समाजवादाचा त्रिशूल

प्रख्यात समाजवादी विचारवंत व नेते साथी एस.एम.जोशी हे आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे नेते होते. उंच व कृश शरीरयष्टी, पाणीदार डोळे, गौरवर्ण, भव्य कपाळ आणि शांत मुद्रा अशी त्यांची मूर्ती अनेकांसमोर आदर्श अशीच होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एस.एम. यांचे योगदान म्हणजे एक प्रेरक अध्याय आहे.

काँग्रेसच्या वलयांकित प्रभावाशी टक्कर देत समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यावेळी नेहमीच आपली लढाई नेटाने लढावी लागे. निवडणुकांमध्ये अनेक वेळा पराभव पत्करावे लागत. तरीही पराभव पचवून पुढे जनतेचे प्रश्न हाती घेऊन निदर्शने, मोर्चे, हरताळ, निषेध अशा हत्यारांसह लढाई करावी लागे. या सर्व संघर्षामध्ये एस.एम.जोशी नेहमीच अग्रेसर असत.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत एस.एम.जोशी यांना पुण्यातील लोकसभा मतदारसंघातून समाजवादी पक्षाने उभे केले होते. एस.एम. अनेक ट्रेड युनियनचे नेतृत्व करीत होते. त्यामुळे कामगारांची व त्यांच्या घरची मिळून एस.एम.ना किमान दोन लाख मते तरी मिळतील असा अंदाज सर्वांचा होता. तो साफ चुकला, एस.एम. यांना फक्त ३४ हजार मते मिळाली आणि समाजवादी पक्षाला मुंबई प्रांतात फक्त ९ जागा मिळाल्या. अर्थातच तरीही सैनिकांचा निर्धार कायम होता.

काही दिवसांनी अन्नधान्याची टंचाई, शिधावाटप केंद्रातून मिळणारे खराब धान्य, जीवनावश्यक वस्तूंचे वाढते भाव या प्रश्नांवरून एस.एम. यांनी सत्याग्रह करायचे ठरविले. महाराष्ट्रभर गाजलेल्या या सत्याग्रहात हजारो स्त्री-पुरुषांनी भाग घेतला. एस.एम. यांना दोन महिन्यांची शिक्षा झाली. काही दिवसांनी पुण्याच्या शुक्रवार पेठेतून एका पोटनिवडणुकीत एस.एम.विजयी झाले, आमदार झाले. यावेळी त्यांची प्रकृती बरीच खालावली होती. उपचारासाठी ससून

हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करावे लागले होते. एस.एम. यांच्या विजयानंतर त्यांचे अभिनंदन करण्यासाठी थोर समाजवादी विचारवंत डॉ.राममनोहर लोहिया पुण्यात आले होते.

त्यावेळी डॉ. लोहिया यांनी एस.एम. यांच्या कार्याचा विशेष गौरव केला.

त्यापूर्वी पंचमढी येथील समाजवादी पक्षाच्या अधिवेशनात डॉ. लोहिया यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले होते की– भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी आपल्याला त्रिशूल वापरावा लागेल...

कार्यकर्त्यांनी विचारले....

कसला त्रिशूल !

डॉ. लोहिया म्हणाले–

या त्रिशूलाची तीन धारदार टोके आहेत..

ती कोणती ? कार्यकर्त्यांनी विचारलं.

सांगतो.

या त्रिशूलाचे पहिले टोक म्हणजे फावडे.

या त्रिशूलाचे दुसरे टोक म्हणजे तुरुंग.

या त्रिशूलाचे तिसरे टोक म्हणले मतपेटी.

मग डॉ. लोहिया पुण्यात म्हणाले–

"डॉ.एस.एम. जोशी यांनी समाजवादी पक्षाच्या या त्रिशूलाचा यथायोग्य उपयोग केला. सानेगुरुजी सेवापथक सुरू करून शेकडो तरुणांना फावडे वापरून विधायक काम करायला लावले.

धान्यवाढीच्या विरोधात अनेक वेळा सत्याग्रह करून शेकडो कार्यकर्त्यांना घेऊन 'एस.एम. तुरुंगात गेले आणि आत्ताच्या पोटनिवडणुकीत लोकशिक्षण करून ते मतपेटीद्वारा लोकप्रतिनिधी झाले." आपला हा विचार या एस.एम. यांनी साकार केला.

डॉ. लोहिया व एस.एम. जोशी यांच्या रूपाने नवभारताच्या निर्मितीची तीन हत्यारेच तरुणांना मिळाली. ही तीन हत्यारे म्हणजे फावडे, तुरुंग व मतपेटी !

■ ■ ■

# १०२. शाब्बास सूनबाई

सासरच्या लोकांनी आळशी, निर्बुद्ध आणि मंद ठरविलेल्या एका चाणाक्ष आणि चलाख सूनबाईंची ही विलक्षण कथा! प्रसंगावधान आणि धैर्य यांचा अफलातून किस्सा!

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातलं एक सधन शेतकरी कुटुंब. एकत्र कुटुंबपद्धतीमुळं माणसांचा घरात राबता मोठा. गावात मोठा वाडा आणि गावाच्या सीमेपलीकडेच असलेल्या विस्तीर्ण शेतात बांधलेलं एक सुरेख टुमदार दुमजली फार्महाऊस!

मोठ्या मुलाचं लग्न झालं. मधल्याचं झालं. धाकट्याची बायको नवी सून म्हणून घरात आली. ती इतरांपेक्षा जरा चार बुकं जास्त शिकलेली. शिवाय सुशिक्षित उच्च मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेली असल्यामुळं थोडं अधिक मोकळंढाकळं वागणं झालं. खानदानाच्या शिस्तीत काहीसं न बसणारं असं होतं.

पहिल्या दोघी सुना पहाटेस उठून सडा-रांगोळी करून, न्हाऊन आल्या नि तुळशीवृंदावनाला प्रदक्षिणा घालू लागल्या की ही धाकटी तोंडात टूथब्रश धरून सामोरी यायची. सासऱ्यांना हे आवडत नव्हतं. सासुबाईंना पटत नव्हते; पण उगाच वाद नको म्हणून त्यांनी तोंडाला आवर घातला होता. आपल्या मुलाजवळ ते याबद्दल कधीमधी तक्रारवजा बोलत; पण तेवढंच. सूनबाई इतर व्यवहारात मात्र हुशार होती. तालुक्याला कोर्टाचं काही काम निघालं तर वकीलांशी बोलायला ही पुढं. हा तिचा गुण सासऱ्यांनाही आवडत होता. तरी कोणत्याही सुनेचं घरकामावरच मूल्यमापन होतं तसं हिचं होतं.

एकदा शेतातल्या फार्महाऊसवर सगळेच राहायला गेले. खालती बाकीचे सगळे लोक. वरच्या मजल्यावर तेलाच्या घाणीतून तेल गाळून आणलेले सहा डब्बे भरून साठवलेले ठेवले होते. ते वरच्या गॅलरीत होते. शेजारच्या खोलीत धाकट्या सूनबाई आणि धाकटे चिरंजीव होते.

फार्महाऊसला उत्तम कपांऊंड होतं. फाटकापासून प्रवेशद्वारापर्यंत संगमरवरी

फरशी घातलेली होती. सगळीकडून ग्रिल लावून चांगला बंदोबस्त केला होता.

मध्यरात्री काही धूसफूस ऐकू आली. दहा-पाच काळ्या आकृत्या तोंडाला रुमाल बांधलेल्या पुढं आल्या. त्याने पहारीने ग्रिल तोडले आणि दरवाजा तोडून आत प्रवेश केला. खालच्या मजल्यावर असलेल्या सर्वांवर एकानं बंदूक रोखली आणि भराभर माल लुटायला सुरुवात केली. वरच्या मजल्यावर धाकट्या सूनबाईंना याची चाहूल लागली. वर फारसा माल नाही याची दरोडेखोरांना माहिती असावी. त्यांनी सासूबाईंच्या हातातल्या पाटल्या-बांगड्या खसकन ओढून काढल्या. नणंदेच्या गळ्यातलं मंगळसूत्र ओढलं. गोदरेजेचं कपाट फोडलं. सर्वजण गर्भगळीत झाले होते. फोनची वायर तोडली होती. सर्व माल गोळा होताच दरोडेखोर त्वरेनं पळून जाण्याच्या तयारीत होते.

आणि वर धाकट्या सूनबाईंचा वेगळा उद्योग सुरू होता. तिने ते तेलाचे डबे फोडले...

आणि खाली दरोडेखोर मंगळसूत्र खेचत असताना ते तेलाचे डबे वरून बदाबदा खाली ओतले.....

प्रवेशद्वाराच्या पायऱ्या, पुढचा संगमरवरी रस्ता सगळा सगळा तेलमय झाला.

नवऱ्याला कळेना ही वेड्यासारखे तेलाचे डबे का ओततीय ! त्यानं प्रतिबंध केला; पण ती म्हणाली,

"चूप बसा. मी करतेय ते बरोबर आहे."

पाच-सहा दरोडेखोर घाईघाईने बाहेर पडले आणि तेलामुळे घसरुन आपटले. त्यांची अंग तेलमय झाली. पुन्हा उठून चालू लागले तर पुन्हा आपटले....अंगं तेलानं निथळत होती. तोपर्यंत मोबाईल फोनवरून सूनबाईंनी शेजाऱ्यांना आणि पोलिसांना कळवलं होतं. पोलिसांची गाडी आली.

सहाही दरोडेखोर तेलानं माखलेले पोलिसांना मिळाले. ऐवज मिळाला. तेलाचे डबे गेले; पण ऐवज वाचला.

सूनबाईंच्या या प्रसंगावधाननंतर त्यांना कधीही कुणी काही बोललं नाही. उलट सासू-सासरे म्हणाले....शाब्बास सूनबाई, शाब्बास !

■ ■ ■

# १०३. समतेची समस्या

विषमता हा आपल्या राष्ट्रीय व सामाजिक जीवनाला जडलेला भयंकर रोग आहे. या रोगावरील उपचारही तात्पुरत्या पद्धतीने केले गेले तर रोग बरा झाल्यासारखा वाटतो; पण अधिक उफाळतो. नेमकं काय करावं हे कळत नाही. संघर्ष वाढत राहतात; पण गुणवत्तेवर अन्याय होऊ न देता वंचिताला न्याय मिळवून देणारे काही असू शकतात. या संदर्भातली ही एक छोटीशी कथा!

एका ख्यातनाम संस्थेच्या वतीने एक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली गेली होती. राज्यभरातून लहान-मोठी मुलं या स्पर्धेसाठी आली होती. एका ख्यातनाम लेखकाला या स्पर्धेचे प्रमुख परीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

आधीच्या बाद फेऱ्यातून निवडलेले निवडक दहा उमेदवार आता रिंगणात होते आणि त्यातून तीन स्पर्धकांना पारितोषिके द्यायची होती. या दहा मुलांमध्ये एका ख्यातनाम अभिनेत्याचा मुलगाही होता. कुणी एखादा मध्यम वर्गातला तर कुणी चांगल्या सुसंस्कृत घरातला. एक मुलगा इतक्या फेऱ्या पार करून दहांमध्ये आला होता. तो होता इस्लामपूरजवळील एका शेतकऱ्याचा मुलगा. दिसणं किंवा असणं या दोन्ही बाबतीत कौटुंबिक पार्श्वभूमीमुळं हा मुलगा इतर सर्व मुलांपेक्षा डावाच होता; पण गुणवत्तेच्या जोरावर तो इथपर्यंत आला होता.

स्पर्धा सुरू झाली. अंतिम फेरी असल्यामुळे त्या दहाही मुलांचे पालक, आई-वडील, मित्र-मैत्रिणी स्पर्धेतील भाषणे ऐकण्यासाठी आले होते. या शेतकरी मुलाचे वडिलही आले होते. डोईला पागोटं, हातात काठी, खांद्यावर पंचा, हातात लांब झोळीसारखी पिशवी, पायात कोकणी वहाणा...इतर सर्व पालकांमध्ये हा पालकही विशोभित दिसत होता. त्याच्या शेजारीच ते ख्यातनाम अभिनेते बसले होते. स्पर्धेच्या नियमानुसार परीक्षकांनी जे तीन क्रमांक काढले त्यामध्ये या शेतकरी मुलाचा क्रमांक येऊ शकला नाही. ज्यांचा क्रमांक आला ती मुले उत्तम बोलली होतीच.

पण कुठेतरी अर्ध्यापाऊण गुणाच्या फरकाने या मुलाला गुण कमी मिळाले. हा मुलगा बोलायला उभा राहिला तेव्हा त्याच्या पागोटेधारी वडिलांच्या डोळ्यातून नकळत दोन अश्रू कौतुकानं ओघळले. किती दूरवरून आला होता. आपल्या मुलाला बक्षीस मिळायला पाहिजे; असंच त्या भूमिपुत्राला वाटत होतं....

आता निकालाची वेळ आली.

निकाल जाहीर करण्यापूर्वी विचारविनिमय करण्यासाठी परीक्षक मंडळी बसली. प्रमुख परीक्षक असणाऱ्या या लेखकांच्या ध्यानी एक गोष्ट आली..

गुणवत्तेने आलेले पहिले तीन क्रमांकच पारितोषिक मिळवू शकत होते; पण हा शेतकरी मुलगा चौथ्या क्रमांकावर होता. नियमानुसार तीनच पारितोषिके देण्यात येणार होती.

या मुलाची पार्श्वभूमी लक्षात घेता त्यालाही पारितोषिक मिळणे आवश्यक आहे. असे त्या लेखक परीक्षकांना वाटले. आता काय करायचं ?

मोठी शृंगापत्ती आली. दुसऱ्या एका परीक्षकाने एक मार्ग सुचवला...पहिल्या तिघांचेही प्रत्येकी दोन दोन गुण कमी करा. असे केले की तिसऱ्या क्रमांकावरचा जो स्पर्धक आहे त्याचेही दोन गुण कमी होतील. मग चौथ्या उमेदवाराचे गुण त्याच्यापेक्षा जास्त होतील. तिसरा बाद होईल आणि चौथा तिसरा येऊन पारितोषिक मिळवेल. विजेत्या प्रत्येकाचे दोन गुण कमी होणार असल्यामुळे कुणावरच तसा अन्यायच होणार नाही.

पण प्रमुख परीक्षक म्हणाले...हा तसा अन्यायच आहे. त्यांनी पूर्णपणे गुणवत्तेने स्थान प्राप्त केले आहे. इतरांना स्थान देताना कुणाचे तरी स्थान बळकावण्याची आवश्यकता नाही.

मग काय करायचं ? त्यांनी उपाय शोधला...त्यांनी संस्थेलाच विनंती केली की या वेळी अपवादात्मक स्थिती म्हणून आणखी एका अधिक पारितोषिकाची योजना करा. संस्थेने ती आनंदानं मान्य केली आणि तिढा सुटला.

खालच्याला वर आणण्यासाठी वरच्याला खाली खेचण्यापेक्षा खालच्यासाठी सुविधा निर्माण करणं आणि त्याला वरच्याला रांगेत सन्मानानं बसवणं ही खरी समानता !

शेतकरी आणि शेतकऱ्याचा पोर आनंदित झाले.

■ ■ ■

# १०४. सचिवालय ते शाळा

अर्धशतकापूर्वीची गोष्ट! संध्याकाळची वेळ महाबळेश्वरपासून वाईपर्यंत महाबळेश्वरच्या शाळेतला एक तरुण शिक्षक चालत होता. त्याला शेवटची गाडी मिळाली नाही. वाईहून त्याला पुणं आणि तडक मुंबई गाठायची होती. कारण त्या काळच्या लोकसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन त्याला सचिवालयात नोकरी मिळाली होती. या तरुण शिक्षकाचं नाव कमलाकर वाकणकर. त्यावेळी दळणवळणाच्या, संपर्काच्या एवढ्या सुविधा नव्हत्या म्हणून वेळ गाठण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागे. अखेर कमलाकर खूप धडपड करून मुंबईला पोहोचला. मुंबईची काहीच माहिती नव्हती. त्या मायानगरीचे तोंड कमलाकर प्रथमच बघत होता. गोंधळून गेला होता; पण ध्येयसिद्धीचा दीप समोर होता म्हणून अंधारातही ठेचकाळत वाटा शोधत गेला.

कमलाकर राहायचा कल्याणला आणि कामाला जायचा सचिवालयात. वाईला वृद्ध आई-वडील होते. त्यांची काळजी होतीच. मग या श्रावणबाळानं आई-वडिलांनाच कल्याणला आणलं.

सचिवालयाच्या नोकरीत चांगला जम बसला. इंग्रजीवर चांगलं प्रभुत्व होतं. वरिष्ठ खूश होते. अनेक आय.सी.एस. अधिकाऱ्यांचा संपर्क आला. त्यांच्याकडून इंग्रजी आविष्काराची शैली शिकायला मिळाली. आई-वडिलांची प्रकृती कल्याणला बिघडू लागली. त्यांना हवा मानवली नाही. कमलाकर व्यथित झाला आणि त्याचवेळी वाईच्या द्रविड हायस्कूलमध्ये एका शिक्षकाची जागा रिकामी आहे असं कळलं. मनाची ओढाताण आणि आई-वडिलांच्या सेवेत व्यत्यय नको म्हणून कमलाकरनं एक निर्णय घेतला. सचिवालयातली चांगली नोकरी सोडून वाईच्या द्रविड हायस्कूलमध्ये जाण्याचं ठरवलं. तो राजीनामा द्यायला आपल्या साहेबासमोर गेला तेव्हा साहेब चकित झाले.

''मि. वाकणकर थिंग ट्वाइस! सचिवालयातील चांगली नोकरी सोडून तुम्ही जाताय. आज मी तुमची प्रमोशनची ऑर्डर काढलीय. अहो, पुढं-मागं तुम्ही

कलेक्टरच्या दर्जाचे अधिकारी व्हाल.'' साहेब म्हणाले.

''होय साहेब, खरं आहे; पण मला माझ्या भवितव्यापेक्षा आई-वडिलांच्या प्रकृतीची काळजी अधिक वाटते. मी त्यांच्याजवळ असणं आवश्यक आहे.''

आणि कलेक्टर होऊ शकणारा हा श्रावणबाळ आपल्या आई-वडिलांना घेऊन वाईला आला. द्रविड हायस्कूलमध्ये मास्तर झाला.

आई-वडिलांच्या सेवेची सार्थकता त्यानं मिळवली.

तेथून त्याची बदली संस्थेनं थेट उंबरगावला गुजराथच्या सरहद्दीवर केली. तिथंही हा मास्तर रमून काम करू लागला. इंग्रजी विषयात रस होता. त्यात त्यानं निष्णातता मिळविली.

तिथून पुण्याला न्यू इंग्लिश स्कूल टिळक रस्त्याला बदली झाली. आणि वाकणकरांच्या जीवनात एक वेगळाच अध्याय सुरू झाला. त्याला 'आंग्लाध्याय' म्हणता येईल.

वाकणकरांच्या असं लक्षात आलं की बरेच विद्यार्थी आणि शिक्षकही इंग्रजी विषयाबाबत कमी पडतात. मग प्रत्येक शनिवारी दुपारी आणि रविवारी वाकणकर पुणे जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातल्या शाळांमध्ये इंग्रजी विषयाचे जादा अध्यापन करण्यासाठी जाऊ लागले. लोकांना आवडू लागले आणि आता वाकणकर ही त्यांची अपरिहार्य गरज झाली.

वाकणकरांचा हा आंग्ल भाषालौकिक त्याकाळी उच्च शिक्षणाधिकारी असलेले बोकील यांच्या कानी गेला आणि मग बोकीलांनी शिक्षकांच्या आंग्ल भाषा प्रशिक्षणाची योजनाच वाकणकरांसमोर ठेवली. औरंगाबाद, महाबळेश्वर इथं शिक्षकांसाठी इंग्रजी भाषेच्या प्रशिक्षणाची शिबिरं घेतली. ती खूपच यशस्वी झाली. मग पुण्याच्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या शासकीय संस्थेनं शेकडो वर्गासाठी वाकणकरांना पाचारण केलं.

बालभारतीची इंग्रजी पुस्तके म्हणजे वाकणकर असं मग समीकरण झालं.

महाराष्ट्रभर शाळा, संस्था यातून वाकणकरांनी इंग्रजी भाषेच्या अध्यापनाचे प्रशिक्षण दिले.

वाकणकर निवृत्त झाले तरी लोक त्यांना स्वस्थ बसू देईनात. त्यांच्या डोक्यावर लोकांनी इंग्रजी अध्यापनाचा जो मुकुट चढवला तो उतरवू देईनात.

वयाच्या पंच्याहत्तरीतही वाकणकर एखाद्या खेड्यात असा वर्ग घेताना दिसतात. कलेक्टरचा शाळा मास्तर झाला; पण तो समाजशाळेचा मास्तर झाला. त्यांच्या समाधानाचा 'अमृतकुंभ' भरभरून वाहतोय.

■ ■ ■

# १०५. मुख्याध्यापकाचा कोट

नू.म.वि. ही एकेकाळची आशिया खंडात गाजलेली शाळा होती. मुख्याध्यापक कै.वा.मा.दबडघाव यांचा काळ हा शाळेच्या इतिहासातला सुवर्णकाळ होता. लागोपाठच्या अनेक वर्षांत शाळेचे विद्यार्थी एस.एस.सी. बोर्डाच्या गुणवत्ता यादीत चमकत होते. वक्तृत्व, नाट्य, खेळ अशा विषयातही शाळा गाजत होती. डॉ.पु.ग.सहस्रबुद्धे, डॉ.रा.शं.वाळिंबे, डॉ.प्र.न.जोशी, वि.मो.पंत अशा नामांकित शिक्षकांनी शाळेची मान उंचावली होती.

स्वत: दबडघावसर सव्वासहा फूट उंचीचे होते. त्यांनी शाळेलाही उंची प्राप्त करून दिली होती. ही उंची साध्य करण्यामध्ये दबडघावसरांचं जागरूक प्रशासन, क्षमाशील वृत्ती आणि राष्ट्रभक्त संवेदनशील अंत:करण यांचा वाटा मोठा होता.

पु.श.वझे (प्रख्यात रंगकर्मी माधव वझे यांचे वडील) यांच्यासारखे पर्यवेक्षक त्या काळी नू.म.वि मध्ये होते. वा.मा.दबडघाव हे प्रख्यात शास्त्रज्ञ सी.व्ही.रामन यांचे लाडके विद्यार्थी. कलाशास्त्राच्या शास्त्रीय संशोधन शाळेत दबडघाव संशोधन करीत होते; पण नियतीनं त्यांना वेगळीच वाट दाखविली. पुण्याच्या शिक्षण प्रसारक मंडळीच्या वतीनं सी.व्ही.रामन यांना निरोप गेला की पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयात विज्ञान विषयाच्या प्राध्यापकाची एक जागा रिकामी आहे. योग्य माणूस द्या. मग रामन यांनी दबडघाव यांना पुण्याला जायला सांगितलं आणि गुरुची आज्ञा मानून भय्यासाहेब दबडघाव पुण्याला आले. नू.म.वि.चे मुख्याध्यापक झाले. त्यांच्याच काळात नू.म.वि. चा सुवर्णमहोत्सव साजरा झाला.

म.गांधी जयंतीला शाळेत सफाईचा कार्यक्रम असे. सर्व विद्यार्थी आपापले वर्ग झाडीत; पण मुख्याध्यापकाचं कार्यालय व शाळेचं कार्यालय हे कोण साफ करणार.....

शाळेचे सेवक शिपाई बाकड्यावर बसून होते.

भय्यासाहेब दबडघाव आले. ते सुटाबुटात होते.

त्यांनी शाळेचे कर्मचारी दि.द.तांबे यांच्याकडे एक लांब काठी आणि

केरसुणी मागितली. ती केरसुणी काठीला बांधली आणि सुटाबुटातला हा मुख्याध्यापक व्हरांड्यातील जळमटं साफ करू लागला. मग मात्र शिपाई हडबडले आणि त्यांनी सफाईला सुरुवात केली.

सौजन्यशील स्वभावाचे भैय्यासाहेब दबडघाव कुणावरही कधी कायमचा राग धरत नसत. कामानिमित्त एखादा शब्द कुणाला बोलावा लागला तरी तो तेवढ्यापुरताच.

संस्था म्हटली की समज, गैरसमज, तक्रारी, हेवेदावे, भांडण आलीच; पण यासाठी सर्व गोष्टींचा निचरा भैय्यासाहेब नेहमीच शांतपणे करीत असत. असाच प्रसंग या बाबतीतला –

शाळेच्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याविषयी शिक्षक आणि इतर कर्मचारी यांनी बऱ्याच तक्रारी केल्या.

भय्यासाहेबांनी त्या सर्व तक्रारी शांतपणे ऐकून घेतल्या.

तक्रारी करणाऱ्यांच्या तक्रारीही त्यांनी गांभीर्याने ऐकल्या.

पण त्यावर लगेच कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही किंवा स्वत:चे मत प्रकट करून निर्णय घेतला नाही.

मधे काही दिवस गेले.

तक्रारी करणाऱ्यांनी भैय्यासाहेबांना विचारलं...

"आमच्या तक्रारीचं काय झालं ?"

"तुमच्या तक्रारी माझ्याजवळ आहेत ?"

"पण त्यावर निर्णय काय ?"

"योग्य तपास करून मगच निर्णय देणार."

मग भैय्यासाहेबांनी या तक्रारींबाबत कसून तपास केला आणि त्यांना असं आढळलं की तक्रारींमध्ये थोडं तथ्य असलं तरी बरचं तिखट-मीठ लावून तक्रारी केल्या आहेत.

मग भैय्यासाहेबांनी त्या कर्मचाऱ्याला प्रेमळ सूचना दिल्या. तो कर्मचारीही ओशाळला. तक्रार करणारेही नरमले. तेव्हा दोघांनाही भैय्यासाहेबांना विचारलं,

तेव्हा ते हसून एवढचं म्हणाले,

'मुख्याध्यापकाच्या कोटाचे खिसे खूप मोठे असतात. कारण त्याला अनेकांच्या तक्रारी सांभाळून ठेवायच्या असतात. !'

■ ■ ■

# १०६. दिघे यांची तीर्थयात्रा

पुण्याला सदाशिव पेठेत नागनाथ पाराच्या रस्त्याला गंधाली नावाच्या इमारतीत चौथ्या मजल्यावरच्या एका आलिशान सजवलेल्या सदनिकेत पन्नाशीला आलेला एक मुलगा सत्तरी ओलांडलेल्या आपल्या आईला आंघोळ घालतोय हे दृश्य पाहिलं तर कुणालाही अचंबा वाटेल. चार मुलांचा संसार करून आता सुखाच्या वाटेवर सावलीत असणाऱ्या विजयाताई दिघे यांना एक जगावेगळा आजार झालाय...मेंदूला रक्तपुरवठा कमी हा तर अनेकांचा विकार असतो. पण मेंदूच आक्रसलाय हे डॉक्टरांनी निदान केलं आणि कर्तीसवरती आई पुन्हा एकदा मूल झाली. आता मुलांनाच तिचं करावं लागतं.

नव्या पेठेतील गांजवेवाडीत स्वत:च्या छोट्याशा वाड्यासदृश्य घरात राहणारे बाळकृष्णपंत दिघे एम.ई.एस. मध्ये नोकरीला होते. बाळकृष्ण-विजया यांच्या संसारवेलीवर कल्पना, संदीप, नूतन आणि नितीन ही चार फुलं उगवली. कल्पना खरे झाली, नूतन गवंडी झाली. संदीप वडिलांच्याच खात्यात एम.ई.एस. मध्ये नोकरीला लागला. आणि नितीन एका खासगी नामवंत कंपनीत चिकटला. वडिलांच्या निधनानंतर दोघाही भावांनी जुनं घर सोडलं आणि नव्या इमारतीत शेजारी-शेजारी सदनिका घेतल्या. म्हटलं तर एक म्हटलं तर वेगळे. आईचा वावर दोन्ही घरात समान होता. अर्चना आणि अमिता या दोन्ही सुना एम.ई.एस. मध्येच नोकरीला लागल्या. मग आईनं वाढत्या वयातही आपली कष्टाळू सावली दोन्ही घरांना दिली. सत्यम, कांचन, केदार, मयूर या नातवंडांना आजी भरवू लागली. पोरं आजीच्या भोवती गोष्टीसाठी गोळा होऊ लागली.

नितीनला नोकरीमध्ये शिफ्टमधून तीन पाळ्यात काम करावे लागे. तीस-बत्तीस वर्षे नोकरी झाल्यावर नितीननं ठरवलं की आता या पाळी प्रकरणातून निवृत्त व्हायचं. नितीन कलादृष्टीचा आहे. त्यानं घर सुंदर सजवलेलं आहे. रद्दीतून रत्ने आणि टाकाऊतून टिकावू ही कला साध्य करणारा नितीन आता

प्रवासाचे बेत ठरवू लागला.

नोकरीतून त्यानं मुक्तता घेतली. खूप हिंडायचे, तीर्थयात्रा करायच्या, देशाटन करायचे...असं त्यानं ठरवलं. त्याला आणखीनही काही छान छंद आहेत. श्वानप्रेमी दिघे कुटुंबाकडे जेनी, झीन आणि टली अशी तीन सुंदर कुत्री आहेत. ती त्यांच्या कुटुंबाचे घटकच आहेत...

नितीन देशाटनाचे, तीर्थयात्रेचे बेत आखू लागला...

आणि नियतीने त्याच्यासमोर एक वेगळीच तीर्थयात्रा उभी केली.

विजयाताई एके दिवशी त्यांच्या एका कौटुंबिक शोकप्रसंगातून घरी आल्या आणि त्या ज्या सुन्न बसल्या त्या सुन्नच झाल्या.

एका जागी बसून राहू लागल्या. काही उमगेनासं झालं आणि त्यांच्या जाणीवाच थंडावल्या. बाकीचे काहीच आजार नाही. हिंडत्या-फिरत्या आहेत. पण ते हिंडण म्हणजे निरुद्देश जाणीवहीन हालचाल!

सगळं घर स्वत:च्या नजरेखाली घालणाऱ्या विजयाताईंची नजर ढिम्म झाली...

आणि आता त्यांच्यावर इतरांना नजर ठेवावी लागते.

केव्हाही उठतात आणि बाहेर चालू लागतात. आपण कोणत्या रस्त्यानं जात आहोत याचं भान त्यांना नसतं...

आणि मग नितीनला आपला तीर्थयात्रेचा बेत रद्द करावा लागला...

आता मातृसेवा हीच त्यांची तीर्थयात्रा !

घरातले इतर सर्व कुटुंबीय मदत करतात. प्रेमानं करतात. कधीकधी अर्चना, अमिता या सुनाही सासूला आंघोळ घालतात. लहानग्याला तीट-काजळ करावं तसं त्यांना कपडे घालून सजवतात. बाहेरच्या माणसांनी एकदम पाहिलं तर मुळीच कळणार नाही, या बाईची अवस्था अशी आहे ते...

अशी दिघे यांची मातृतीर्थयात्रा सुरू आहे.

आणि हो...

महत्त्वाची गोष्ट म्हणजे सून सुप्रिया आणि जेनी याही तीर्थयात्रेत आहे. जेनी आजीवर लक्ष ठेवते आणि या तीर्थयात्रेत आपलीही ओंजळ वाहते. मुक्या प्राण्यांची ही अंजली मानवतेवरचा विश्वास वाढवणारी आहे.

■ ■ ■

# १०७. उंची मनाची आणि शरीराची

गंगाधर महांबरे हे नाव कवितेच्या क्षेत्रात घेतलं जात असलं तरी मराठी कवितेच्या क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ कवींना मराठी लब्धप्रतिष्ठित समीक्षकांना 'गीतकार' या पायरीवरच ठेवलं होतं. सुरुवातीच्या काळात थेट ग.दि.माडगूळकरही यातून सुटले नव्हते. गंगाधर महांबरे यांचा आणि एका समीक्षकांचा चांगला परिचय होता. दोघांचा संवाद अनेक वेळा दूरध्वनीवरूनही होत असे. त्या विलक्षण समीक्षकांची- फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे-'पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव' हे गीत आकाशवाणीच्या सुप्रभात कार्यक्रमात ऐकलं. निवेदकानं कवीचं नाव सांगितलं, ते ऐकायचं हे विसरले कारण रेडिओ सुरू केला तो प्रत्यक्ष गीत ऐकताना. समीक्षकांना वाटलं हे गीत जगदीश खेबुडकर, योगेश्वर अभ्यंकर, योगेश अणावकर यापैकी कोणाचं तरी असावं.

गीत संपलं आणि कै. गंगाधर महांबरे यांचा या समीक्षकांना दूरध्वनी आला.

''नमस्कार, मी महांबरे बोलतोय. आज सायंकाळी भेटू या.''

''कुठं ?''

''साहित्य परिषदेत येतो.''

''अहो कविराज, आज सकाळी मी रेडिओवर गाणं ऐकलं.''

''कोणतं गाणं ?''

''पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव. कवीचं नाव ऐकलं नाही; पण असेल कोण तरी अणावकर, अभ्यंकर असे. गाणं चांगलं पण...''

''पण काय ?'' महांबरे यांनी उत्सुकतेनं विचारलं.

''अहो महांबरे, या गाण्यातील ओळीत काव्य काय आहे ? सरळ सरळ एक गद्य वाक्य आहे. म्हणून बघा गद्यात- पूर्वेच्या देवा तूझे सूर्यदेव नाव. प्रभातीच येशी सारा जागवीत गाव...

''आपल्याला गाण आवडलं का ?''

''हो गाणं आवडलं. सूर चांगले, स्वरयोजना चांगली पण शब्द ? अहो, वाङ्मयीन मूल्याचं नाव नाही.''

''पण तुम्हाला गाणं आवडलं का ?'' महांबरे यांनी विचारलं.

''हो आवडलं. कोण कवी आहे हो ?''

''मलाही आठवत नाही; पण संध्याकाळी सांगतो.'' महांबरे म्हणाले.

संध्याकाळी महांबरे आणि ते समीक्षक नियोजित वेळी भेटले.

दोघांच्या सपाटून गप्पा झाल्या. त्या गप्पांमध्ये साहित्य, कला, संस्कृत याबद्दलच्याही गप्पा होत्या. गीतकार आणि कवी, काव्य आणि पद्य यांच्याबद्दलही भरपूर मुद्द्यांची चर्चा दोघांच्या संवादानं संपली. संवाद इतका रंगलेला होता की शेजारचे लोकही उत्सुकतेनं ऐकत होते. अर्थातच ते समीक्षकच खूप बोलत होते. महांबरे प्रामुख्याने श्रोत्याची भूमिका घेत होते. तासाभराच्या गप्पानंतर आता समारोपाची वेळ आली. महांबरे आणि ते समीक्षक दोघेही हॉटेलबाहेर पडले आणि...

समीक्षकांना एकदम आठवण झाली.

''अहो कविराज, सकाळच्या आपल्या चर्चेतला एक मुख्य मुद्दा राहिलाय.''

''कोणता ?''

''पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव या गीताचे कवी कोण ?''

''त्याचं काय ?''

''त्या कवीचं तुम्ही मला सांगणार होतात.''

''तुम्हाला कोण कवी असेल वाटतं ?''

''कोणीही असू शकेल. मराठीत पुष्कळ गीतकार आहेत.''

''हो. त्यातलाच एक आहे.''

''कोण ?''

''गीतकाराचं नाव आहे गंगाधर महांबरे.''

''हे ऐकल्यावर समीक्षक उडालेच. त्यांच्या शब्दांच्या ताना कंठातच रुतल्या. सकाळी किंवा आत्ता एवढी टीका करूनही हा कवी शांत मनानं निर्मल वृत्तीनं आपल्याशी बोलत होता. मनात अढी न धरता बोलत होता.

कै. गंगाधर महांबरे हे खूप उंच होते; पण त्यांच्या शरीरयष्टीत त्यांच्या मनाचीही उंची खूप मोठी आहे, याची साक्ष त्यांना पटली आणि त्या संधिकाळी या अशा महांबरे यांच्यापुढं मनानं नतमस्तक झाले.

■ ■ ■

# १०८. किरपेकरांची किमया

पुण्याच्या देशमुखवाडीत राहणारे किरपेकर नुकतेच कैलासवासी झाले. मूळचे कऱ्हाडचे असलेले प्रभाकर किरपेंकर यांनी वडिलोपार्जित इस्टेट सांभाळता सांभाळता एक वेगळाच मार्ग आक्रमिला. स्वतःच्या प्रकृतीचा अभ्यास करता करता इतरांच्या आरोग्याचा विचारही किरपेकर करू लागले. आणि त्यांनी चुंबकचिकित्सा आणि ॲक्युप्रेशर यांचा उपयोग सुरू केला. एक दिवस किरपेकरांच्या घरी निरनिराळ्या आकाराचे, निरनिराळ्या वजनाचे चुंबक येऊन धडकले. चुंबकाची गादी, चुंबकाची माळ, चुंबकाचा चष्मा, चुंबकाचा पट्टा या सर्व आयुधांनी त्यांची खोली सज्ज झाली. मुंबईलाही दादरला त्यांची जागा होती. तिथंही चुंबकता निर्माण झाली. वयाच्या पन्नाशीनंतरसुद्धा त्यांचा हा उद्योग जोमानं सुरू होता. ॲक्युप्रेशर पद्धती अमलात आणताना शरीराच्या विशिष्ट भागावर दाब देऊन रुग्णाला किती आराम वाटतो याचा त्यांनी संशोधनपूर्वक छडा लावला. पारंपरिक लोकांनी शरीराचे जे दाबबिंदू ठरवून दिले होते त्यापेक्षा वेगळे दाबबिंदू त्यांनी शोधून काढले आणि अनेक रुग्णांना दिलासा दिला.

किरपेकरांचा स्पर्श म्हणजे वेदनापरिहार, असं काही रुग्णांचं गणित होते. काहींचं गणित सुटत नव्हतं. ते किरपेकरांवर नाराज नव्हते.

या धंद्याबरोबर किरपेकरांचा एक विलक्षण छंद असा होता की जुन्या मराठी नाटकातले उतारेच्या उतारे त्यांना तोंडपाठ होते.

"सृष्टीची उलथापालथ तर झाली नाही ना ?"

वडवानलानं समुद्र तर जाळला नाही ना ?

मुंग्यांनी मेरू पर्वत तर गिळला नाही ना ?

मग आम्हीच असे कमनशिबी कसे की समशेरीचे शिकंदर निपजून नालायकाची गत कपाळी यावी ?

संभाजी महाराजांच्या तोंडी बेबंदशाही नाटकात कै.विष्णुपंत औंधकर यांनी हे स्वगत घातले आहे.

८२ वर्षांचे प्रभाकर किरपेकर तरुणाईच्या तडफेनं हे स्वगत म्हणत तेव्हा लोक ऐकून थक्क होते. एकच प्याला नाटकातील सुधाकर, तळीराम, रामलाल यांची स्वगते, कीचकवधातील भीम, युधिष्ठिर, कीचक यांची स्वगते किरपेकरांना पाठ होती.

मुंबईला आठवड्यातून तीन दिवस रुग्णोपचारासाठी किरपेकर जात. दादरच्या उद्यानात त्यांचे वयोवृद्ध रुग्ण त्यांची वाट बघत थांबलेले असत. थेट ऐंशीव्या वर्षांपर्यंत प्रभाकर किरपेकर यांची ही पुणेफेरी सुरू होती. पंचाहत्तरीच्या वेळीच त्यांच्या आप्तांपैकी त्यांना कुणीतरी म्हणालं, ''आता पंचाहत्तरीचे झालात. यापुढे प्रवास कमी करा. दगदग कमी करा. धावपळ कमी करा.''

किरपेकर त्यांना मोकळं हसून उत्तर देत–

''माझ नाव प्रभाकर आहे. प्रभाकर म्हणजे सूर्य! सूर्य कधी थांबतो का ? किंवा सूर्याला कुणी थांबा असं कधी म्हटलं का ?'' यावर म्हणणारा निरुत्तर होत असे.

अनेक जुनाट व्याधींवर इतर डॉक्टरांकडे हिंडून–फिरुन पैसा घालवून आलेले रुग्ण प्रभाकर किरपेकरांकडे येत. ते विनोदानं म्हणत–

''आमच्याकडं ॲडमिशन ओपन आहे. डोनेशन नाही. लिव्हिंग सर्टिफिकेट नको किंवा एक्स–रे रिपोर्ट नकोत. पैसेही नकोत. जाताना वाटलं तर पैसे द्या; पण तुम्ही देणारच याची मला खात्री आहे.'' तरीही बहुतेक सर्व रुग्ण किरपेकरांना योग्य मोबदला देत, कारण रुग्णांनाही त्याचा मोबदला मिळत होता, असा विश्वास होता.

चुंबकाच्या गादीवर एखाद्या रुग्णाला झोपवून किरपेकर त्याच्याशी मनमोकळ्या गप्पा मारीत किंवा आवडत्या नाटकातला एखादा उतारा मोठमोठ्याने साभिनय म्हणून दाखवीत.

अपरिचित माणसानं हे दृश्य बघितलं तर त्याला अप्रूप वाटायचं. एखादा विचारायचा...

''काय हो किरपेकरसाहेब, इतर डॉक्टर रुग्णांशी एवढं बोलत नाहीत. बऱ्याच डॉक्टरांचे शब्द महाग असतात आणि तुम्ही तर चुंबकोपचार किंवा ॲक्युप्रेशर करताना रुग्णांशी भरभरून गप्पा मारता, हे कसं ?

किरपेकर छानसं हसून म्हणत–

''अहो महाशय, चुंबकोपचार, ॲक्युप्रेशर हे निमित्त! मी रुग्णाच्या मनावर उपचार करतो. त्याला हसवतो, त्याच दुःख विसरायला लावतो. चुंबक त्याला मदत करतो एवढंच!''

किरपेकरांची ही किमया किती जणांना साधेल ?

■ ■ ■

# १०९. कोणीही बघणार नाही

प्राचीन काळातील गोष्ट आहे. एका ऋषीचा निर्सगसुंदर आश्रम. आश्रमामागे नदी, पलीकडे डोंगर, समोरच्या बाजूला निबिड अरण्य !

आश्रमाचे आचार्य आपल्या शिष्यांना भरपूर ज्ञान भरभरून देत होते. शिष्यही भरभरून घेत होते.

आश्रमाचे आचार्य तत्त्वनिष्ठ होते. कोणतेही ज्ञान पुस्तकी न देता त्याचा जीवनात उपयोग झाला पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे त्यांची ज्ञानदान पद्धतीही सप्रयोग होती.

आपल्या कोणत्याही शिष्याला 'हे करू नको, ते करू नको' असं ते बोलत नसत. 'हे कर किंवा ते कर' असं स्पष्टपणे विधायक स्वरूपात सांगत असत.

शारंगधर नावाचा एक शिष्य होता. नारायणदेव नावाचा त्याचा एक सहाध्यायी मित्र होता. शारंगधर थोडासा खट्याळ आणि अवखळ होता. त्याच्या अवखळपणाला काही वेळा मुद्दाम लगाम घालावा लागत असे. मग आचार्य पत्नीलाही त्याची कधी कधी कानउघाडणी करावी लागत असे.

अरण्यात गेल्यावर किंवा आश्रमाभोवतालच्या उद्यानात जे पक्षी विहार करीत त्यांना उगीचच धनुष्यबाणाच्या सहाय्याने किंवा प्रत्यक्ष पकडून मारण्याची विचित्र हौस शारंगधरला होती.

एकदा नारायणदेवानंच याबाबत गुरुजींना सांगितलं. अकारण जीवहत्त्या करू नये, असं सांगून शारंगधरानं ऐकलं नसतं याची गुरुजींना जाणीव होती. मग त्यांनी एक दिवस शारंगधरला नारायणदेवाबरोबर निरोप पाठवून बोलावून घेतलं. गुरुजी आसनस्थ होते.

समोर शारंगधर आणि नारायणदेव उभे होते. शारंगधराची मान खाली होती.

"शारंगधर, आम्ही काय ऐकतो आहोत तुमच्याबद्दल ?"

"काय गुरुजी ?"

'तू म्हणे पक्ष्यांना मारतोस.''

''होय गुरुजी.''

''पण का ?''

''मला मारायला आवडतं म्हणून.''

''वा ! अरे पण ते पाप आहे..''

''गुरुजी पाप आणि पुण्य हे हेतूवर अवलंबून असतं असं तुम्हीच सांगितलंय. मी या पक्ष्यांना मारून त्याचं मांस इतर प्राण्याना देतो. म्हणजे मी शुद्ध हेतूनंच हे कार्य करतो.''

''अरे बाळा, तरीही ती हिंसा आहे.''

''मग इतर प्राणी जगणार कसे ?''

''त्यांचं ते बघतील. तू पदरी पाप का घेतोस ?''

''मग यावर उपाय काय ?''

''उपाय सांगतो. तुला पक्षी मारण्यात आनंद मिळतो असं तू म्हणालास.''

''हो.''

''ठीक, तुझा आनंद मी हिरावून घेत नाही. पण एक कर...''

''काय करू सांगा ! तुमची आज्ञा शिरोधार्ह..''

''हे बघ, पक्ष्यांना पकड पण त्यांना अशा ठिकाणी घेऊन जा की त्यांना मारताना कुणीही बघणार नाही.''

''फारच छान. सोपी अट आहे गुरुजी. मग मला पाप नाही लागणार ?''

''नाही.'' गुरुजी मिश्किलपणे हसले.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेस शारंगधरानं दोन पक्ष्यांना पिंजऱ्यात पकडलं आणि तो पिंजरा घेऊन आश्रमापासून दूर चालत गेला. पक्षी बिचारे चिवचिवाट करीत होते.

गाव संपलं, अरण्य लागलं. निबिड अरण्यात गेला. आता तिथं चिटपाखरूही नव्हतं.

ही जागा पक्ष्यांना मारण्यासाठी बरी आहे, असा विचार करून त्यानं पिंजरा खाली ठेवला.

इथं आता पक्ष्यांना मारताना कुणीही बघणार नाही. म्हणजे मग आपल्याला जीवहत्त्येबद्दल पापही लागणार नाही, या विचारानं शारंगधर खूश होता, आणि–

पिंजऱ्याचं दार उघडून पक्ष्यांची मान मुरगळणार एवढ्यात त्यानं हात मागं घेतला. त्याच्या मनात एकदम दीप्ती प्रगटली. अंतरंगातला काळोख नाहीसा झाला. तो मनात म्हणाला,

''इतर कुणीही पाहिलं नाही तरी पक्षीहत्त्या करताना मी स्वत: बघणारच ना! माणूस इतर कुणाला फसवू शकतो; पण स्वत:ला फसवू शकत नाही.

■ ■ ■

# ११०. चंद्रभागेचा प्रसाद

पंढरपूर हे महाराष्ट्राचं लोकतीर्थ. मराठी जनमानसाचं शरणस्थान आणि चंद्रभागा नदी म्हणजे मनाची पावनगंगा! या चंद्रभागेच्या काठी काही नावाडी नावा चालवून आपला भाकरतुकडा मिळवीत होते. त्यातलंच एक परचंडे कुटुंब. मारोतराव परचंडे आणि नागरबाई आपला संसार कष्टानं चालवीत होती. मारोतराव चंद्रभागेत नाव चालवायचे. त्यांच्या एका मुलाचं नाव होत बबन. बबनला शिकण्यासाठी खूप हौस. रोज तो स्वत: चंद्रभागेत नाव चालवायचा; पण शाळेतही जायचा. वडिलांबरोबर नावेचं वल्हं मारता मारता शाळेतली गणित मनातल्या मनात सोडवण्याचा उद्योग बबन करू लागला.

मारोतरावांनी नगरपालिकेत नोकरी धरली. आता संसार चालवण्यासाठी नागरबाईंना अधिक कष्ट करावे लागत. कारण तोंड वाढली. एकाच्या नोकरीवर कसं भागणार! मग बबन नाव चालवू लागला. शाळा सुरू होतीच. वाटेवरचे काटे वेचीत मार्गक्रमणा सुरू होती.

बबन शालांत परीक्षा पास झाला. त्यानं महाविद्यालयात प्रवेश घेतला; पण इतर विद्यार्थ्यांप्रमाणे कॉलेज जीवनाची रंगीबेरंगी स्वप्न बघणं त्याला शक्य नव्हतं. चंद्रभागा सुटणार नव्हती. कॉलेज संपलं की पुस्तकं टाकून बबन चंद्रभागेवर जायचा आणि हाती वल्ही घ्यायचा. बबन पदवीधर झाला. त्याला बी.एड.ला प्रवेश हवा होता. शिक्षक व्हायची त्याची फार इच्छा होती. सोलापूरच्या दयानंद अध्यापक महाविद्यालयात त्यानं बी.एड.साठी अर्ज केला. मागास विद्यार्थ्यांसाठी अठ्ठेचाळीस रुपये फक्त भरायचे होते. तेवढेही पैसे बबन जवळ नव्हते.

नागरबाईला वाटत होतं, मुलगा शिकला पाहिजे. त्याला पैसे द्यायला पाहिजेत; पण ती माऊली तरी बिचारी काय करणार होती; पण बबन डगमगला नाही. तशी अठ्ठेचाळीस रुपये ही रक्कम फार नव्हती; पण त्यासाठी परचंडे कुटुंबाला एक रुपयासुद्धा गाडीच्या चाकाएवढा वाटत होता.

मग बबननं काहीतरी निश्चय केला. तो गेला चंद्रभागेवर. हात जोडून त्यानं चंद्रभागेची प्रार्थना केली. चंद्रभागेनंही या सुपुत्राला आशीर्वाद दिला.

कपडे काढून बबन चंद्रभागेच्या तळाशी गेला. तिथं लोकांनी टाकलेली नाणी साचली होती. त्या भागातील नाणी गोळा केली. मग वर येऊन वाळूत थोडं अंग वाळवून पुन्हा काही अंतरावर चंद्रभागेत बुडी मारली. तिथं पैसा, दोन पैसा, चार आणे, आठ आणे अशी चिल्लरं नाणी हाताला लागली. यातली काही नाणी खोटी तर काही गुळगुळीत आणि न चालणारी. बबननं ठिकठिकाणी चंद्रभागेत बुड्या मारून हाताला लागतील तेवढी नाणी गोळा केली.

घरी आला.

आता सोलापूरला तडक पोहोचायचं होतं. दुपारी बाराला मुलाखत होती. पायजमा, सदरा, तुटक्या चपला आणि हातात प्लॅस्टिकच्या पिशवीत भरलेली नाणी अशा अवतारात बबन धावत-पळत कॉलेजमध्ये पोहोचला. तोपर्यंत बारा वाजले होते. एक वाजता मुलाखत होती.

डॉ. मार्डोकर नावाचे प्राचार्य होते. डॉ. मार्डोकर स्वभावाने फार चांगले होते. समाजमनस्वी होते.

'आत येऊ का सर ?''

'या'

असं म्हणताच पायजमा, शर्ट आणि हाती प्लॅस्टिकची पिशवी अशा वेशातला हा उमेदवार मुलाखतीला आला.

आणि त्या उमेदवारानं फीचे पैसे म्हणून ती चंद्रभागेतील नाणी समोर ठेवली. मार्डोकर द्रवले. त्यांनी ती नाणी परत केली. स्वत: शुल्काची व्यवस्था केली. या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती दिली.

हा विद्यार्थी बी.एड. पास झाला. शिक्षक म्हणून रुजू झाला आणि आता त्याला ख्यातनाम अशा शिक्षक प्रसारक मंडळीच्या नूतन मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदाची खुर्ची मिळालीय. एवढी मोठी कष्टाची वाटचाल ! परचंडे विसरले नाहीत. त्यांना चंद्रभागेच्या प्रसादाची, तळाशी गोळा केलेल्या नाण्यांची अजूनही आठवण आहे. चंद्रभागेचा तो प्रसाद त्यांनी मनाशी जपून ठेवलाय !

■ ■ ■

# १११. नारद राजकपूर

संगम, जिस देश में गंगा बहती है, आवारा, बूटपॉलिश असे गाजलेले हिंदी चित्रपट निर्माण करणारा जुन्या जमान्यातील आघाडीचा नायक, निळ्या डोळ्यांचा हिरो राज कपूर याचं स्मरण वेगळ्याच कारणासाठी होत असतं.

राज कपूरचे वडील पृथ्वीराज कपूर हे चित्रपटसृष्टीतले दमदार नट. त्यांच्या पृथ्वी थिएटर्समुळेही त्यांचा रंगभूमीवर मोठा दबदबा होता. भालजी पेंढारकर हे कलानगरीतील आदर्श व्यक्तिमत्त्व ! अभिनेत्यांच्या आणि अभिनेत्रींच्या पिढ्या भालजींनी घडविल्या. त्याच भालजींनी राज कपूरलाही चित्रपटसृष्टीची दार खुली करून दिली, त्याची ही गोष्ट !

अगदी सुरुवातीच्या काळात भालजींनी 'वाल्मिकी' नावाच्या हिंदी चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात वाल्मिकींची भूमिका तगड्या आणि तडफदार पृथ्वीराज कपूर यांना दिली. चित्रपटाचं चित्रीकरण कोल्हापूरमधील 'जयप्रभा' मध्ये. पृथ्वीराज होते मुंबईला.

मग पृथ्वीराज सहकुटुंब काही महिने चित्रीकरणासाठी कोल्हापूरला येऊन राहिले. चित्रपट पूर्ण होईपर्यंत पृथ्वीराज आणि त्यांचे सर्व कुटंब यांचा मुक्काम जयप्रभा स्टुडिओच्या आवारातच होता. पृथ्वीराज यांच्या एका मुलाचं नाव होतं राज. बालवयातील राज जयप्रभा स्टुडिओच्या आवारात मुक्तपणे वावरत असे. राज चांगलाच व्रात्य होता. त्याच्या कृष्णलीला तिथंही चालत; पण कडक शिस्तीबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या भालजींना राज आवडत असे. त्याच्या खोड्या ते सहन करीत आणि मग तर एक गंमतच झाली.

वाल्मिकी सिनेमात नारदाची भूमिका होती. ही भूमिका कोणाला द्यावी, याबद्दल चर्चा झाली. पृथ्वीराज यांच्याबरोबरही भालजींनी चर्चा केली. काही नावं समोर आली. दुसऱ्या दिवशी निर्णय होणार होता.

दुसऱ्या दिवशी भालजींनी पृथ्वीराजना सांगितलं....''नारदाच्या भूमिकेसाठी

मी नट निवडलाय''

''कोण आहे ? कोणाला देणार ही भूमिका ?''

''राजला..''

''काय ?''

पृथ्वीराजजींनी आश्चर्यानं विचारलं.

''होय पृथ्वी. तुमच्या मुलालाच राजला ही भूमिका मी देणार आहे.''

''बघा बरं...तो जरा व्रात्य आहे.''

पृथ्वीराज चिंतेनं म्हणाले.

''नारदाच्या भूमिकेसाठी मला व्रात्य मुलगाच हवाय.'' भालजी म्हणाले.

आणि मग...

वाल्मिकी चित्रपटात राज कपूर नारद झाला. ही राज कपूरची चित्रपटाच्या पडद्यावरची पहिली एण्ट्री !

राज कपूरच्या आईला पृथ्वीराजच्या पत्नीला भालजी पेंढारकर आपली बहीण मानत. अर्थातच राज त्यांचा भाचा ! भाचा-मामा यांचं सूतगूत चांगल जुळलं. तारा जुळल्या. एवढचं नव्हे तर नारदाच्या भूमिकेसाठी भालजींनी राजला तब्बल पाच हजार रुपये एवढा मानधनाचा चेक दिला.

त्या काळातले पाच हजार म्हणले आजचे पन्नास लाख !

ते पैसे पृथ्वीराजजींनी स्वत:जवळ ठेवून घेतले. त्यातून चेंबूरला मोठी जागा खरेदी केली. तिथंच आर.के.स्टुडिओ उभा राहिला. पुढं राज कपूर हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचा अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता बनला; पण तो आपले मूळ विसरला नाही. कोल्हापूर, नारद, भालजी यांचं त्याला स्मरण होतं.

मध्ये पंचवीस वर्षे गेली.

कोल्हापुरात एक मोठी आलिशान गाडी जयप्रभा स्टुडिओच्या दिशेनं गेली. आतून एक गोरापान, निळ्या डोळ्यांचा तरणाबांड, सशक्त तरुण उतरला. त्यानं भावुकपणे स्टुडिओच्या सर्व आवारावर आपली नजर फिरवली आणि भालजी कुठं असतील, याची चौकशी केली. अर्ध्या विजारीतले भालजी आपल्या कुटीत काही वाचत बसले होते.

हा तरुण पुढं गेला. अदबीनं वाकला. भालजींच्या पायाला हात लावून त्यानं अत्यंत आदरानं नमस्कार केला आणि त्यांच्या पावलाखालची माती आपल्या कपाळाला लावली. भालजींनी प्रेमानं त्याला आलिंगन दिलं आणि

ते म्हणाले, ''राज, केवढा मोठा झालास रे बाळा!''

''आपके सामने कुछ भी नही, मैं मैं अभी भी तुम्हारा नारद हूँ! आणि हे अभूतपूर्व दृश्य स्टुडिओचे सर्व कर्मचारी अनिमिष नेत्रानं बघत होते. नारद राज कपूर त्यांनी डोळ्यात व मनात साठवला होता.

■ ■ ■

# ११२. पाच लाख – पाच कोटी

मराठी लोककथांमधील कहाण्या लोकप्रिय आहेत. त्यामध्ये एक कहाणी आहे, 'खुलभर दुधाची कहाणी' ! शेकडो घागरी दुधाच्या ओतूनही शिवमंदिराचा गाभारा भरला नाही; पण एका साध्या गवळणीच्या खुलभर दुधानं तो गाभारा ओसंडून वाहू लागला. कारण भावभक्तीला जास्त महत्त्व आहे.

तशीच एका निष्ठावंत प्राध्यापकाची ही कहाणी. मधुकर यशवंत गोडबोले हे पुण्याच्या टिळक महाविद्यालयात प्राध्यापक होते. साध्या पाठनिरीक्षक या पदावरून बढती होत होत ते त्याच महाविद्यालयाचे उपप्राचार्य झाले.

प्रशिक्षण महाविद्यालयात भावी शिक्षकांना वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन सराव-पाठ घ्यावे लागतात. या सरावपाठांचे वेळापत्रक करणे हे अत्यंत जिकिरीचं काम असतं; पण म.य.गोडबोले यांनी ते अत्यंत निष्ठेने वर्षानुवर्षे केले. उत्तम नाटकाची जाण असलेले गोडबोले आपल्यातला अभिनय बाजूला ठेवून वेगळ्याच नाटकात वेगवेगळ्या भूमिका करू लागले. शालेय वयात त्यांनी बाळ कोल्हटकर यांच्या 'वाहतो ही दुर्वांची जुडी' या गाजलेल्या नाटकात दिगूची भूमिका समरसून केली होती. हीच दिगूची भूमिका कदाचित पुढंही वेगळ्या अर्थानं त्यांच्या वाट्याला आली.

गोडबोले यांचे वडील कै. यशवंतराव हेही नू.म.वि.मध्ये नाणावलेले हिंदी शिक्षक होते. ते उत्तम नाटके बसवीत. त्यांच्या नाटकांतून भूमिका केलेले कै. मोहन गोखले यांच्यासारखे अनेक अभिनेते पुढं चित्रपटात झळकले.

गोडबोले घराण्याची राहणी साधी, चोख काम आणि काटकसरीचा व्यवहार. त्यामुळे इतर लोकांना आर्थिक प्रश्न सतावतात, तसे या कुटुंबाला कधी सतावले नाहीत. तशी महिन्याला हातातोंडाची मिळवणी करणारंच उत्पन्न होते; पण त्याबद्दल या दोघाही पिता-पुत्रांचं काही म्हणणं नव्हतं कारण कर्तव्यनिष्ठेच्या समाधानात ते ओतप्रोत चिंब होत होते.

कै. यशवंतरावांचं निधन झालं.

वडील, आजोबा यांच्यासाठी काही तरी करावं असं मधुकर गोडबोले यांच्या मनात होते.

त्या काळी महाराष्ट्रातील सर्वच प्राध्यापकांना नव्या वेतनश्रेणीचा लाभ होऊन काहींना लाखालाखात नव्या वेतनश्रेणीचा फरक मिळाला. अर्थातच गोडबोल्यांनाही मिळाला.

इतर कुणी त्यातून घर खरेदी, वाहन खरेदी, अलंकार खरेदी, प्रवास, मुदत ठेवी अशा प्रकारे रकमा गुंतवल्या. गोडबोले यांच्या मनात वेगळाच विचार आला.

ज्या महाविद्यालयात आपण वर्षानुवर्षे काम केलं, ज्या महाविद्यालयाने आपल्याला उभं केलं, त्या महाविद्यालयासाठी काही तरी करावं असं त्यांच्या मनात खूप होतं. टिळक शिक्षण महाविद्यालयावर गोडबोले यांचं इतकं प्रेम होतं की त्यांच्या सहकाऱ्यांपैकी कुणी त्यांना विनोदानं म्हणत असे-

''गोडबोले, तुमच्यानंतर तुमचा देह या महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराशीच समाधीसारखा स्थित करून त्यावरून नामदेवाच्या पायरीवरून विठोबाला जातात, तसे विद्यार्थी महाविद्यालयात गेले पाहिजे.''

आणि आपले हे महाविद्यालयप्रेम गोडबोले यांनी प्रत्यक्षात आणलं. महाविद्यालयाच्या नव्या संगणक प्रयोगशाळेची आवश्यकता होती. मधुकर गोडबोले यांनी एकरकमी पाच लाख रुपये शिक्षण प्रसारक मंडळीच्या हवाली केले.

या देणगीतून टिळक शिक्षण महाविद्यालयात 'एस.एम.गोडबोले संगणककक्ष' उभारला. एस.एम. या आद्याक्षरातच त्यांनी पूर्वजांची नावे गुंफली होती. एवढी मोठी देणगी देऊनही उद्‌घाटन समारंभात गोडबोले गुच्छ घेऊन निर्विकार मनाने हजर होते.

शिक्षण प्रसारक मंडळीला तशा लाखो रुपयांच्या, अब्जावधी रुपयांच्या देणग्या मिळतात. सर्वच संस्थाना मिळतात. तेव्हा कुणीतरी म्हणालं, 'पाच लाख रुपये म्हणजे काय विशेष देणगी आहे काय ?' तेव्हा गोडबोले यांचे मित्र म्हणाले, ''होय. एका शिक्षकानं कोणत्याही अन्य मार्गाने पैसे न मिळवता स्वत:च्या बचतीतून आपल्याला संस्थेला दिलेली ही देणगी पाच लाख नव्हे, पाच कोटींची आहे.'' खुलभर दुधाची कहाणी !

■ ■ ■

# सुयोग प्रकाशनाची

## आपल्या संग्रही हवीच अशीच उपयुक्त व अत्यंत दर्जेदार पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १) | बोधकथा | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर |
| २) | मजेदार गोष्टी | धनश्री हळबे |
| ३) | प्राण्यांच्या कथा | निशा डंके |
| ४) | देवांच्या बालकथा | निशा डंके |
| ५) | पाच समाजसुधारक | मुक्ता केणेकर |
| ६) | कथा विवेकानंदांच्या | शुभदा खळदकर |
| ७) | सद्गुणांच्या गोष्टी – भाग १ | डॉ. प्रभाकर चौधरी |
| ८) | सद्गुणांच्या गोष्टी – भाग २ | डॉ. प्रभाकर चौधरी |
| ९) | संस्कार कथा – भाग १ | डॉ. प्रभाकर चौधरी |
| १०) | संस्कार कथा – भाग २ | डॉ. प्रभाकर चौधरी |
| ११) | संस्कार कथा – भाग ३ | डॉ. प्रभाकर चौधरी |
| १२) | विदेशी कथा | विनिता ऐनापुरे |
| १३) | १०१ थोर भारत रत्न | सौ. स्मिता मैड |
| १४) | ५१ थोर भारतमातेच्या कन्या | सौ. स्मिता मैड |
| १५) | यश तुमच्या हातात | डॉ. शांता वैद्य |
| १६) | संतकथा | डॉ. न. म. जोशी |

–: संपर्कासाठी पत्ता :–

**सुयोग प्रकाशन**

२१६३/१, सदाशिव पेठ, रजत को.ऑप.सोसायटी,
निलायम टॉकीजशेजारील गल्ली, फ्लॅट नं.५,
पहिला मजला, पुणे ४११ ०३०.
फोन : ०२०–२४३३६५८४ मो.९८२२८७३६६१
E-mail : suyogprakashan12@gmail.com



## डॉ. न. म. जोशी

(M. A. M. Ed. Ph. D.)

लेखक, शिक्षणतज्ज्ञ व वक्ते

(माजी) प्राध्यापक टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे/ पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र शाखा. ५५ पुस्तकांचे लेखक
('निःस्पृह', 'प्रेषित', या चरित्रात्मक कादंबऱ्या) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र.
३ वेळा महाराष्ट्र शासनाचा उत्तम वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार. याशिवाय किर्लोस्कर फाउंडेशन, नासिक सार्वजनिक वाचनालय, बालकुमार साहित्यसभा, कोल्हापूर, अशा अनेक संस्थांचे साहित्य पुरस्कार.

(माजी) कार्यवाह-महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
(माजी) कोषाध्यक्ष-अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ.
संस्थापक विश्वस्त-महर्षी शांडिल्य प्रतिष्ठान, पुणे.
पुणे महापालिकेच्या वतीने उत्तम शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याबद्दल विशेष गौरव. सर्व वृत्तपत्रांतून सातत्याने बोधकथा.
अनेक विद्यापीठांचे संशोधन तज्ज्ञ व मार्गदर्शक-शिक्षणशास्त्र शाखा.
इंग्रजी, मराठी, हिंदी व सिंधी या चारही भाषांवर प्रभुत्व.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दोन खंडांचे मराठीत अनुवाद.
अनेक सिंधी कथांची मराठीत भाषांतरे.
निगडी, पुणे येथील १७ व्या अ. भा. 'बालकुमार साहित्य संमेलना'चे अध्यक्ष
पहिल्या कोयना साहित्यसंमेलनाचे (पाटण, सातारा) अध्यक्ष.
स्नेहांजली पुरस्कार २०१०
नाट्यपरिषदेचा ज्येष्ठ रंगकर्मी पुरस्कार.
महाराष्ट्र शिक्षण रत्न पुरस्कार.
महाराष्ट्र मानवाधिकार पुरस्कार.
'डॉ. न. म. जोशी' व्यक्ती आणि वाङमय या विषयावर डॉ. दिलीप गरुड यांनी पुणे विद्यापीठाची Ph. D. मिळवली आहे.

सुयोग प्रकाशन
२१६३/१, सदाशिव पेठ, रजत को.ऑप.सोसा.,
निलायम टॉकीजशेजारील गल्ली, फ्लॅट नं.५;
पहिला मजला, पुणे ४११ ०३०.,
फोन : ०२०-२४३३६५८४ मो. ९८२२८७३६६१
E-mail : suyogprakashan12@gmail.com